मुंबईचा

# ग्रामपंचायतीबाबत कायदा

सन १९३३ चा मुंबईचा कायदा नं. ६ वा.

द. व. गोडबोले

द. ह. चौधरी

# मुंबईचा ग्रामपंचायतीबाबत कायदा

## सन १९३३ चा मुंबईचा कायदा नंबर ६ वा

विवेचक प्रस्तावना, स्पष्टीकरणार्थ टीका,
मुंबई सरकारनें या कायद्याबाबत
केलेल्या कानू, वगैरेंसह


लेखक

दत्तात्रेय बळवंत गोडबोले, एम्. ए., एल्‌एल्. एम्.
प्रोफेसर, लॉ कॉलेज पुणें, वकील, पुणें.

व

दत्तात्रय हरी चौधरी, बी. एस्‌सी., एल्‌एल्. बी.
सर अरनोल्ड व चंदावरकर प्राइझमन वकील, जळगांव (पू. खा.)



१ ऑगस्ट १९३५ ] [ किंमत १२ आणे

| | | |
|---|---|---|
| ८ | पंचायतीस येणें असलेले कर व इतर रकमा वसूल करण्या-बद्दल कामगारास द्यावयाच्या मेहनतान्याची रीत ठरवण्या-बाबत | ३३–३४ |
| ९ | जिल्हा लोकलबोर्डानें गांवपंचायतीस द्यावयाच्या कर्जाच्या शर्तीबाबत | ३५ |
| १० | गांवचें न्यायदानमंडळ | ३६–४७ |
| ११ | गांवपंचायतीचें बजेट व अकौंट्स् (हिशेब) यांबाबत | ४८–८९ |

# पुरस्कार

हल्लीं ग्रामसंघटनेचें कार्य अनेक कार्यकर्त्यांनीं करण्याचें मनावर घेतलें आहे. आणि सुदैवानें मुंबई कायदेकौन्सिलानें ग्रामपंचायतीसंबंधानें एक कायदा नुकताच केलेला असून, त्याची अंमलबजावणी करण्याकरतां एक स्वतंत्र अधिकारी नेमून त्याच्या कामाकरतां कांहीं रक्कमहि मंजूर केली आहे. यामुळें जिल्हा लोकलबोर्डाच्याहि मनांत या कार्यास मदत करण्याचें येण्याचा संभव आहे. अशा सुयोगाच्या वेळीं प्रस्तुत पुस्तक रा. गोडबोले व रा. चौधरी यांनीं लिहून तयार केलें याबद्दल त्यांचें, पण त्यांच्याहिपेक्षां खेडेगांवांतील जनतेचें, अभिनंदन करणें अवश्य आहे. कारण ग्रामसंस्थांविषयीं कायदा व नियम झाले, व त्याची अंमलबजावणी करण्याकरितां अधिकारीहि नेमला गेला, तरी त्या कामाची सांगोपांग माहिती मिळावयाची तर ती मिळण्याला एरवीं जें साधन नव्हतें, तें या पुस्तकानें मिळवून दिलें आहे. या कायद्यान्वयें यापुढें आणखीहि नियम पोटनियम होतील. परंतु ते सर्व होईपर्यंत न थांबतां ग्रंथकर्त्यांनीं हें पुस्तक तातडीनें लिहिलें व प्रसिद्ध केलें ही फार चांगली गोष्ट झाली. कारण ग्रामसंस्थेच्या कारभाराचीं मुख्य ढोबळ तत्त्वें—यांचीच मुख्यतः माहिती लोकांना सुरवातीस हवी असते. आणि ही माहिती ग्रंथकर्त्यांनीं कसोशीनें—सोपी व सुबोध—करून दिली आहे. दोघेही ग्रंथकार तरुण वकील आहेत. तथापि त्यांचें लक्ष हौसेनें व स्वतःच्या स्फूर्तीनें अशा लोकोपयोगी कामाकडे लागलें व तें त्यांनीं मनःपूर्वक व परिश्रमपूर्वक केलें याबद्दल त्यांचें कृतज्ञतापूर्वक अभिनंदन केलें पाहिजे. ग्रामसंस्थांचें कार्य आज इतकीं वर्षें कळकळीनें ज्यांनीं चालविलें आहे त्या तपस्वी बाबासाहेब परांजपे यांना हें पुस्तक पाहून अतिशय आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं.

ग्रंथकर्त्यांनीं पुस्तक लिहिण्याचे श्रम घेतले, पण त्याच्या छपाईच्य खर्चाची जोखीमहि त्यांच्यावर पडणें योग्य नाहीं. हें जाणून, आणि आपण चालविलेल्या **विधायक कार्यक्रमाचें** एक उत्तम साधन म्हणून, हें पुस्तक छापण्याचा खर्च **'टिळक-स्मारक स्वराज्य संघ'** व **'टिळक-पर्स फंड ट्रस्ट'** या उभय संस्थांनीं मिळून करण्याचें ठरविलें. वरील दोन्हीहि संस्थांच्या वियमानें या ग्रंथाचा पुरस्कार करण्याला मला अतिशय आनंद वाटतो. कारण सुशिक्षित तरुणांचें लक्ष, इतर चळवळींबरोबर, अशा विधायक स्वरूपाच्या व अभ्यासाच्या कार्याकडे राहणें केव्हांहि इष्टच होय. आपल्या देशाची राजकीय व आर्थिक दु:स्थिति आज आहे ती सुधारण्याला अवश्य असणारें तीव्र व सौम्य स्वरूपाचें, तसेंच नित्य व नैमित्तिक स्वरूपाचें, मिळून दोन्ही प्रकारचीं कामें करण्याची जबाबदारी तरुण पिढीवरच मुख्यत: पडणारी आहे ही गोष्ट उघड आहे.

पुणें,
ता. २६।११।३३

न. चिं. केळकर.

# प्रस्तावना

हिंदुस्थान देश हा प्रामुख्यानें खेडेगांवांचा देश असल्यामुळें हिंदुस्थानची खरी प्रगति होणें येथील खेडीं सुधारल्याशिवाय केव्हांही शक्य नाहीं. हल्लीं आपणांस मोठमोठ्या शहरांतून शिक्षणाचा, वेगवेगळ्या चळवळींचा, स्थानिक स्वराज्याचा वगैरे पुष्कळ प्रसार झालेला दिसतो हें खरें. पण बहुजनसमाजास अद्याप या गोष्टींचा बिलकूल गंध नाहीं. सर्व हिंदुस्थानांत मिळून सात लक्षांवर खेडीं असून त्यांमधून एकंदर लोकसंख्येच्या शेंकडा ९० इतके लोक राहातात. तेव्हां शहरें सुधारलीं असें गृहीत धरून चाललें तरी राष्ट्रीय सुधारणेंत त्यांचा अंश फार थोडा आहे. बहुतेक खेडीं अद्याप अशिक्षित, मागासलेलीं व दारिद्र्यांत खितपत पडलेलीं असून त्यांना आधुनिक कल्पनांचें, विचारांचें व सुधारणेचें वारेंही लागलें नाहीं. खेडेगांवें राज्य व्यवस्थेचा प्रमुख घटक असल्यानें त्यांची सुधारणा प्रथम झाली पाहिजे. सुदैवानें ही गोष्ट अलीकडे जनतेला व सरकारला पटत चालली असून राष्ट्रीय कार्यकर्त्यांच्या व सरकारच्याही ठरावांतून तिचा उल्लेख वरचेवर होत असतो. मात्र त्याकरितां होणारे प्रयत्न अद्यापि सर्वस्वी चुकीचे मार्गांनीं होत आहेत असें म्हटलें पाहिजे. खेडेगांवाची सुधारणा करावयाची तर तेथें प्रचारकांनीं नुसतें एखादे वेळीं जाऊन व व्याख्यानें देऊन भागणार नाहीं. त्यासाठीं खेडेगांवांतच राहून लोकांना विविध प्रकारचें शिक्षण देऊन त्यांचे स्वतःचे करवींच त्यांचा उद्धार केला पाहिजे. व तो करण्यास प्रत्येक गांवीं ग्रामपंचायत स्थापन करणें हा एक उत्तम मार्ग आहे. ह्या मार्गानें प्रयत्न करणारासाठीं नवीनच एक चांगली संधि प्राप्त झाली आहे. व ती म्हणजे मुंबई सरकारनें कायदे कौन्सिलच्या गेल्या बैठकींत पास केलेला नवा ग्रामपंचायत कायदा ही होय. या संधीचा प्रत्येक राष्ट्रभक्तानें फायदा घेणें जरूर आहे.

**पूर्वकालीन ग्रामपंचायती:—** ग्रामपंचायतींची स्थापना अलीकडच्या काळांत मुंबई, मद्रास, पंजाब, संयुक्त प्रांत, मध्यप्रांत वगैरे कायदे कौन्सिलांनीं

सन १९२९ सालीं त्या त्या प्रान्तांसाठीं ग्रामपंचायत कायदे पास करून सुरू केली असली तरी आपल्याकडे ग्रामपंचायत ही संस्था फार जुनी आहे. किंबहुना ती हिंदी संस्कृतीचा एक प्रमुख भाग आहे असेंच म्हटलें पाहिजे. एका दृष्टीनें पाहिलें असतां पूर्वीच्या कांहीं ग्रामपंचायती अनिर्वाह्य असत व म्हणूनच त्या अस्तित्वांत आल्या व राज्यकारभाराचा एक प्रमुख घटक होऊन राहिल्या, कारण या काळीं दळणवळणाचीं साधनें अत्यंत अल्प असत. राजधानीचे शहरापासून दूरच्या गांवांपर्यंत पोंचावयाचें म्हणजे कित्येक महिने सुद्धां लागत व वर्षांतून कांहीं दिवस तर रस्ता चालूच नसे. अशा परिस्थितींत मध्यवर्ती सरकारचें दूरच्या प्रदेशांवर नियंत्रण नुसतें नांवापुरतें असणेंच सहाजिक आहे. त्यांचें लक्ष वेगवेगळ्या गांवाहून योग्य तो सरकारसारा यावा व त्या गांवांतील व्यवस्था चांगली चालू रहावी येवढ्याच पुरतें असे. त्यामुळें गांवकऱ्यांना कोणतीही जरूर उत्पन्न झाल्यास ती स्वतःच भागवावी लागे. गांवांत रस्ते लागले, तलावांची जरूर भासली किंवा विहीर खणावयाची असली तर त्या गांवकऱ्यांनींच व्यवस्था करावी किंवा त्यांवाचून भागवावें असें होतें. गांवांत शिक्षण हवें असेल तर गांवकऱ्यांनाच गांवजोशाची व्यवस्था करावी लागे व गांवांत एकादा गुन्हा घडला तर त्याची चौकशीही त्यांनाच करावी लागे. जरूर लागली कीं ती भागवण्याचीही तरतूद होतेच. या तत्त्वाअन्वयें गांवोगांवचा प्रत्यक्ष कारभार चालण्यासाठीं पंचायती प्रथम अस्तित्वांत आल्या व त्यांनींच गांवचा सर्व कारभार पहाणें सरकारला व गांवकऱ्यांनाही फायदेशीर वाटल्यामुळें त्या थेट ब्रिटिश अमदानीच्या आरंभापर्यंत चालू राहिल्या. कालांतरानें त्यांची कायमची घटना झाली व कारभाराचे नियमही बांधले गेले. अशा तऱ्हेच्या पंचायतीच्या अस्तित्वांचे दाखले जुन्या अनेक लेखांतून सांपडतात. वेदकालींही ग्रामपंचायती अस्तित्वांत असाव्या असें समजण्यास जागा आहे. वैदिक वाङ्मयांत आपणांस मध्यदेशी (खाजगीपंच), ग्रामणी (ग्रामपंचायतीचा अध्यक्ष), अशा संज्ञांचा उल्लेख सांपडतो. याज्ञवल्क्यानें त्यांच्या न्यायदानाच्या अधिकारांचा उल्लेख केलेला आहे. त्यांच्या घटनेसंबंधाचे बांधून दिलेले नियमही चाणक्याच्या अर्थशास्त्रांत सांपडतात. मध्य युगांतील चोल, पांड्य, चेर वगैरे राज्यवंशांचा इतिहास पाहिला तर त्यांत ग्रामपंचायतीचें अस्तित्व प्रामुख्यानें दिसून येतें. मोगल राज्यांतही ग्रामपंचायती

पूर्णपणें जोरांत चालू होत्या व शेरशहासारख्या समंजस राजानें व त्यानंतर अल्बुकर्कसारख्या परस्थानेंही त्यास पूर्वीपेक्षां जास्त अधिकार दिल्याचाही दाखला आढळतो. (ज्ञानकोश पु. खं. पहा) शिवकालीन व पेशव्यांचे वेळचे जे कागदपत्र प्रसिद्ध झाले आहेत त्यावरूनही त्याकाळीं सुद्धां ग्रामपंचायतींच्या मार्फतच खेडयांचा सर्व कारभार चालत असे हें उघड दिसतें व ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांनीही या संस्थांचा The little republics असें म्हणून अनेक ठिकाणीं मोठ्या गौरवपूर्वक उल्लेख केलेला आहे. अशा तऱ्हेनें ही अत्यंत पुरातन संस्था आहे. अनेक राज्यें, घराणीं व साम्राज्यें आलीं व नष्ट झालीं परंतु ग्रामसंस्था मात्र कायम राहिली. व तिचे मार्फतच गांवाची शैक्षणिक, आर्थिक, जमीन महसुलाचीं वगैरे सर्व कामें अखंड चालू राहिल्यामुळें गांवाच्या भरभराटीस कधींही खळ न पडतां देशाची समृद्धीच होत गेली. तेव्हां आतां पंचायती स्थापन करावयाच्या म्हणजे फक्त या चिरंजीव संस्थेचा नव्या स्वरूपांत पुनरुद्धार करावयाचा.

वर सांगितल्याप्रमाणें पंचायती ह्या राज्यकारभाराचा एक प्रमुख घटकावयव असल्यामुळें सर हेन्री मेनचें जें म्हणणें आहे कीं, पूर्वीच्या कांहीं राज्यकारभारांत अंदाधुंदी असल्यामुळेंच पंचायतींना सत्ता प्राप्त झाली, तें सयुक्तिक दिसत नाहीं. ह्या पंचायतींच्या मागें लोकमताचाच आधार असे, एवढेच नव्हे तर त्यांचे हुकूम अमलांत आणण्यासाठीं सर्व राज्यसत्ता त्यांचे पाठीमागें असे व पंचायतीची हुकमत प्रत्यक्ष राजासुद्धां हरण करून घेत नसे. या संबंधींचा एक शिवकालीन उत्तम दाखला आढळतो. एकदां एक मनुष्य आपली फिर्याद घेऊन एकदम शिवाजी महाराजांकडे गेला असतां महाराजांनीं त्यांस कळवलें कीं तुमची तक्रार तुमच्या गांवच्या पंचायतीपुढेंच मांडली पाहिजे. तेथें योग्य न्याय नच मिळाला तर त्यावर सुभेदाराकडे तक्रार करा. परंतु पंचायतीच्या कारभारांत मी हात घालणार नाहीं (राजवाडे). त्यामुळें लोकांना पंचायतीचा निकाल मान्य करावा लागे व कज्जेदलाली निष्कारण वाढत नसे. परंतु अलीकडे गांवच्या पंचायतीनें एकादा हुकूम दिलाच तर ब्रिटिश न्यायकोर्टें त्याकडे बिलकूल लक्ष देत नसल्यामुळें पंचायती निरुपयोगी ठरल्या.

या पूर्वकालीन पंचायतींत गांवांतील सर्व अनुभवी व वृद्ध लोक भाग घेत, व कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास तो त्यांचेकडेच सोंपवीत. या फक्त जात-

पंचायतीच होत्या हें म्हणणे चूक आहे. त्यांत अस्पृश्यसुद्धां अंतर्भूत होत. पंचायतीच्या कामांत न्यायदानाचें काम प्रमुख असे. प्रत्येक फिर्यादीचे वेळीं पक्षकाराकडन खर्च भागविण्यासाठीं कांहीं फी घेत. जर एकादा प्रतिवादी किंवा आरोपी पंचायतीपुढें हजर राहाण्याचें नाकारील तर त्यास पंचायती सक्तीनें हजर राहाण्यास भाग पाडीत असे. गांवपंचांनीं सर्व पुरावा ऐकल्यानंतर त्यांना योग्य वाटेल तो निवाडा देत. ही चौकशी अर्थात् बरीच Informal असे. निकाल दिल्यानंतर त्याखालीं सर्व पंच सह्या करीत. (याज्ञवल्क्यस्मृति व व्यवहारमयख पहा). एल्फिन्स्टन साहेब म्हणतो कीं पूर्वीं न्यायदानाचे लेख ठेवीत नसंत. पण आतां त्यानंतर जे अनेक शिलालेख, निवाडे, आज्ञापत्रें व वगैरे छापून प्रसिद्ध झालीं आहेत त्यांवरून हें म्हणणें अगदीं चूक असल्याचें उघड आहे. त्यावेळीं गांवपंचायतीची हुकमत अनिर्बंध असे व क्वचित एकादा खुनासारखा खटलाच वरच्या अधिकाऱ्याकडे चौकशीसाठीं पाठवीत.

गांवाच्या इतर सोईंसाठीं जीं कामें करावयाचीं असत त्यांसाठीं एक ग्रामफंड असे. व मध्यवर्ती सरकार जो कर वसूल करी त्यापैकींही बराच भाग गांवकऱ्यांचे हितासाठींच खर्च करीत असल्यामुळें, राजरस्ते, तलाव वगैरेंसारखीं गांवकऱ्यांच्या हातून न होणारीं कामेंच फक्त मध्यवर्ती सरकार करी. बाकी सर्व कामें गांवकरीच करीत. वेगवेगळीं कामें करण्यासाठीं स्वतंत्र कामगार नेमीत. त्यांना बलुतेदार म्हणत. हे गांवकामगार पंचांचे देखरेखीखालीं आपापलें खातें सांभाळीत. पाटील फौजदारी कामें बघे, कुलकर्णी हा गांवचा हिशेब लिहिण्याचें काम करी, शिक्षणाचें काम गांवजोशी करी वगैरे.

**पूर्वीं ग्रामपंचायती यशस्वी कां झाल्या:**—अशा तऱ्हेनें हा गांवगाडा शतकानुशतकें चालला होता. ही संस्था इतकी यशस्वी कां होती याचीं आपण कारणें थोडक्यांत पाहूं म्हणजे तीं आजच्या ग्रामसंघटनेस उपयोगी पडतील.

१. या यशस्वीपणाचें सर्वांत मोठें कारण असें होतें कीं पूर्वीं गांवकऱ्यांत एकजूट असे. आपसांत भांडणें व तट फार थोडे असत. त्यामुळें सर्व गांवकऱ्यांना आपण एकत्र कुटुंबाचे घटक असल्याप्रमाणेंच वाटे. एकाचा फायदा तो सर्व गांवकऱ्यांचा फायदा. एकाचें नुकसान तें सर्व गांवाचें नुकसान त्यामुळें कोणत्याही कार्यांत सर्व गांव सरसावून येत असे. एका घरीं चोरी झाल्यास

ती सर्व गांव भरून देत असे. गांवाचा कारभार पहाणारे सर्वच गांवांतील अनुभवी व श्रेष्ठ लोक (Village elders) असल्यामुळें त्यांपासून आपणांस अन्याय होईल ही भीतीसुद्धां वाटत नसे.

२. वर सांगितल्याप्रमाणें पूर्वीं पंचायतीची सत्ता व अधिकार फार मोठे असत, व सरकार त्यामध्यें मुळींच ढवळाढवळ करीत नसे. त्यामुळें पंचायतींची हुकमत कायम राही. तसे अधिकार पंचायतीकडे न सोपविल्यास सहाजिकच लोकांची प्रवृत्ति श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यांकडे धांव घेण्याची होते. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट रिलीफ ॲक्ट खालचें. या कायद्यानें अशी व्यवस्था केली होती कीं, गांवांत कोणताही वाद उपस्थित झाला कीं, तो प्रथम मध्यस्थामार्फत तोडण्याचा यत्न करावयाचा. पण त्या मध्यस्थामार्फत दाव्याचा निकाल नच झाल्यास त्याचें सर्टिफिकेट घेऊन दावा कोर्टांत दाखल करावयाचा. ही सवलत ठेवल्यामुळें मध्यस्थाच्या या प्रयत्नाकडे कोणीही लक्षच देत नसत. सर्व लोक कोर्टाकडे धांव घेत. हळुहळू ही मध्यस्थ संस्था इतकी निरुपयोगी झाली कीं सरकारला ती अखेर बंद करावी लागली.

३. सरकार पंचायतींत ढवळाढवळ करीत नसे. इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष मदतही पुष्कळ करी. वर सांगितल्याप्रमाणें गांवांतून जमा झालेल्या उत्पन्नापैकीं बराच भाग गांवाकडे खर्च होई. व पंचायतीचे हुकूम मान्य करण्यास लोकांना भाग पाडण्यांत येई.

**ग्रामपंचायतीचा ऱ्हासः—** अशा तऱ्हेची ही यशस्वी संस्था होती. परंतु ब्रिटिश अमदानी सुरू होतांच सर्व गाडें पालटलें. सरकारनें नवी राज्यव्यवस्था सुरू केली व पंचायतीकडे पूर्ण दुर्लक्ष केलें. नव्या राज्यव्यवस्थेंत नवीं खातीं सुरू झालीं व तीं थेट सर्व मध्यवर्ती किंवा प्रांतिक सरकारचे हुकुमाखालीं काम करूं लागलीं. त्यांचा व गांवकऱ्यांचा कांहींही संबंध राहिला नाहीं. न्याय खातें, शिक्षण खातें, आरोग्य खातें, शेतकी खातें, जमाबंदी खातें वगैरे सर्वांचीं कामें परस्पर होत; त्यांचीं ऑफिसें गांवाबाहेर, काम चालावयाचें परक्या ठिकाणीं, व हुकूमही सर्व परक्या ठिकाणांहून येत. त्यांनीं योजना कराव्या व गांवकऱ्यांनीं त्या निमूटपणें ऐकाव्या. नव्या कल्पना आल्या; नव्या सुधारणा झाल्या पण त्या सर्वच गांवकऱ्यांना अपरिचित होत्या. या-

सर्वांचा परिणाम अपेक्षित असाच झाला. ग्रामपंचायतीचें एक एक अंग निर्जीव होत जाऊन त्या शेवटीं अजिबात नष्ट झाल्या. खेडेगांवांचें महत्त्व पार नाहींसें झालें. दैव काढण्यासाठीं नव्या राजवटींत महत्त्व पावलेल्या शहरीं लोक धांव घेऊं लागले. चांगला सुतार किंवा चांभार शहरांत जाऊन दुकान घालूं लागला; हुषार विद्यार्थी शहरांत राहून नव्या पद्धतीचें शिक्षण घेऊं लागला; व या सर्व कर्तबगार लोकांना खेडेगावें कायमपारखीं झालीं, अशा रीतीनें खेडेगावांच्या कर्तबगारीस ओहोटी लागली, व तीं पूर्णपणें मागासलीं. शहरें व खेडेगांवें एकमेकांपासून पूर्णपणें दुरावलीं.

**ग्रामपंचायतीची पुन्हां जरूरी व स्थापना**:—राष्ट्राच्या दृष्टीनें ही फार हानि होत होती. व हळुहळू सरकारलाही ही स्थिति थोडी नडूं लागली. सर्वच खातीं मध्यवर्ती सरकारकडून चालवावयाचीं म्हणजे त्यांचेवर जबरदस्त ताण पडूं लागला (Excessive centralization झालें) व ही परिस्थिति बदलून अधिकारविभागणी करणें त्यांना जरूर वाटूं लागलें; व त्यामुळें राष्ट्रसुधारक जेव्हां ग्रामपंचायतींचा पुनरुद्धार करण्यासाठीं जोराची मागणी करूं लागले तेव्हां सरकारनें त्या गोष्टींस आपली मान्यता दर्शविली. परंतु सरकारी गाडें अर्थात अशा बाबतींत फार हळू हळू सरकावयाचें, लोकांनीं योजना मागून योजना कराव्या व सरकारनें त्यांस शाब्दिक सहानुभूति दाखवून त्या दप्तरी दाखल कराव्या. ही स्थिति गेल्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू राहिली. नंतर १९०८ सालीं बादशहांचे सरकारनें जे अधिकार विभागणी कमिशन नेमलें (Decentralization commission) त्यानें ग्रामपंचायती पुन्हां स्थापना करण्याची शिफारस केली व हीच सरकारची पंचायती बाबतची पहिली घोषणा होय. त्यानंतर हिंदुस्थान सरकारनें १९१५ सालीं पंचायतीबाबत एक ठराव केला व त्याअन्वयें प्रत्येक प्रांतिक सरकारनें आपापल्या प्रांतांत ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत शिफारसी करण्यासाठीं १९१८ सालीं एक एक अधिकारी नेमला व त्यांनीं केलेल्या शिफारसींचेंच दृश्य फल म्हणजे सन १९२० सालीं मुंबई, मद्रास, पंजाब, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत वगैरेंनीं पास केलेले ग्रामपंचायत कायदे होत. हे सर्व कायदे मॉटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा अमलांत येण्यापूर्वींचे होते व त्यामुळें ते सहजींच फार अदूरदर्शीपणें केलेले होते. व त्यांतही मुंबई सरकारचा कायदा अगदींच संकुचित होता.

**सन १९२० चा मुंबई ग्रामपंचायत कायदा:—** मुंबईच्या कायद्या-अन्वयें योग्य रीतीनें अर्ज आल्यानंतर ग्रामपंचायत स्थापन करण्याचा हक्क कमिशनरकडे सोपविला होता. सदर पंचायतींत किमान पांच सभासद असून त्यांपैकीं गांवपाटील हा एक असे. स्त्रियांस सभासद होण्याची मनाई असे. निवडणुकी कलेक्टरच्या किंवा त्यानें नेमलेल्या माणसाच्या अध्यक्षतेखालीं होत. प्रत्येक पंचायतीची मुदत तीन वर्षांची असे. पंचायतीस न्यायदानाचें काम वगळून इतर किरकोळ हक्क व कामगिरी देण्यांत आली होती. तिला घरपट्टी व ऑक्ट्राय हे कर बसविण्याचा अधिकार दिला, व इतर उत्पन्नाच्या किरकोळ बाबी होत्या. पंचायतींवर जिल्हा लोकल बोर्डाची हुकमत चाले. सरकारला नालायक पंचायती बंद करण्याचा हक्क होता.

अपेक्षेप्रमाणें हा कायदा निरुपयोगी ठरला. त्या कायद्याअन्वयें फारशा पंचायती स्थापन होऊं शकल्या नाहींत. सन १९२६–२७ सालीं सर्व इलाख्यांत फक्त २२७ पंचायती होत्या. व १९३२–३३ सालीं २५६ होत्या. म्हणजे १९३२-३३ सालीं सुमारें १०० गांवांत फक्त एक गांव पंचायतीचें असे. या बारा वर्षांचे काळांत मुंबई सबर्बन डिस्ट्रिक्ट, व सिंध यांमध्यें एकही पंचायत स्थापन झाली नाहीं व ज्या ठिकाणीं पंचायती अस्तित्वांत होत्याच तेथेंही त्या अत्यंत अप्रिय ठरल्या, व कांहीं ठिकाणीं तर असलेल्या पंचायती बंद कराव्या म्हणून लोकांनीं अर्ज केले. हा कायदा पास झाल्यानंतर सुमारें ५ वर्षांनीं सरकारनें या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमली. तिनें आपला रिपोर्ट १९२६ सालीं सादर करून पंचायती अप्रिय होण्याच्या कारणांची मीमांसा केली व त्या सुधारण्याचे उपाय सुचविले.

हा कायदा याप्रमाणें अयशस्वी होण्यास झालेल्या कारणांचा विचार केला असतां तो फायदेशीर होईल.

**१९२० चा ग्रामपंचायत कायदा अयशस्वी होण्याचीं कारणें:—**

१. सर्वांत मोठें कारण म्हणजे द्रव्याभाव. आधींच खेडीं अत्यंत दरिद्री झालेलीं. त्यांतून सरकार सालोसाल कर वसूल करणार व लोकलबोर्ड सेस वसूल करणार. त्यामुळें नवीन कर देऊन जास्त पैसा उभारण्यास गांवकरी नाखूष असत. लोकलबोर्डांनीं पंचायतींना मदत केल्याचीं उदाहरणें फारच थोडीं होतीं, व सरकारनें तर त्यांच्या स्थापनेसाठीं कांहींच खर्च केला नाहीं.

वास्तविक या बाबतींत मध्यप्रांत सरकारचें व मद्रास सरकारचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेऊन मुंबई सरकारनेंही पंचायती स्थापन करण्यास आर्थिक साहाय्य करावयास हवें होतें. मध्यप्रांत सरकारनें १९२७ सालीं पंचायतीसाठीं २५००० रुपये, १९२८ व २९ सालीं ३५००० रुपये याप्रमाणें मदत केली असून ती अद्याप चालू ठेवली आहे. मद्रास सरकारनेंही १९२५–२६ सालीं लायब्ऱ्यांसाठीं पंचायतीस ८००० रु., १९२७ सालीं १०,००० व १९२८ सालीं २०,००० याप्रमाणें मदत करून ती चालू ठेवली आहे. त्याप्रमाणें तेथें १९२६–२७ सालापासून शिक्षणासही प्रत्येक शाळेस शिक्षकांमागें १८० रुपये व नवीन शाळा स्थापन करतेवेळीं प्राथमिक खर्चासाठीं ८० रुपये देण्यांत येतात. याशिवाय रस्ते तयार करण्यासाठीं व पाणीपुरवठा करण्यासाठीं मद्रास सरकार ग्रामपंचायतींना लक्षावधी रुपये देते. याच्या उलट मुंबई सरकारनें अद्याप पंचायतीसाठीं एका पैचीही मदत केली नाहीं हें लक्षांत ठेवलें असतां येथें यशस्वी पंचायती फारशा स्थापन न झाल्याचें आश्चर्य वाटत नाहीं. जमा झालेल्या माहितीवरून असें दिसतें कीं येथील पंचायतींपैकीं बहुतेकांचें सालाचें उत्पन्न १००० रुपयांहूनही कमी होतें व कांहींचें तर १०० रुपयांपेक्षांही कमी होतें. ही चूक लक्षांत घेऊन १९३३ चा कायदा पास झाल्यानंतर सरकारनें पंचायती स्थापण्यासाठीं २५००० रुपये खर्च करण्याचें जाहीर केलें आहे, त्याचा विचार पुढें करूं.

२. सन १९२० चा पंचायतीचा कायदा निष्फळ ठरण्याचें दुसरें कारण म्हणजे सरकारच्या सहानुभूतीचा पूर्ण अभाव, १९२५ सालीं कायदे कौन्सिलांत स्थानिक स्वराज्याच्या मंत्र्यांनीं ज्यावेळीं जाहीर केलें कीं १९२० चा कायदा निरुपयोगी ठरला, त्याचवेळीं त्यांना हीही कबुली द्यावी लागली कीं पंचायती लोकप्रिय होण्यासाठीं सरकारनें कांहींही केलें नाहीं. बोलून चालून पंचायती संस्था तीन पिढ्या लोकांना अपरिचित असलेली; व या काळांत सर्व लोकस्थिति बदललेली; अशा स्थितींत पंचायती खरोखर लोकप्रिय व्हाव्या अशी इच्छा असल्यास सरकारनें सहानुभतिपूर्वक त्यांच्या स्थापनेस मदत करावयास हवी होती. परंतु सरकारनें त्यांचेकडे उघड सापत्न भावानें पाहिलें. मध्यप्रांतांत याचे अगदीं उलट स्थिति झाली. तेथें १९२५ सालीं एका सभासदानें कौन्सिलमध्यें ठराव आणला कीं डेप्युटी कमिशनर हे पंचायतींचे स्थापनेस पुरेसें उत्तेजन देत

नाहींत; तेव्हां त्यांस या बाबत जरूर ती सर्व मदत करण्याचा हुकूम व्हावा. हा ठराव तेथें पास झाला. व सरकारी अधिकारी पंचायती स्थापण्याचे कामीं मदत करूं लागले. त्याच सालच्या सप्टेंबर महिन्यांत सरकारनें या कामीं विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमली. तिच्या शिफारशीअन्वयें १९२० सालचा कायदा बदलण्यांत आला व तेव्हांपासून आतां तेथें पंचायतींचें काम जोरांत चालू आहे. म्हैसूर व मद्रास मध्येंही सरकारच्या उत्तेजनामुळें ग्राम-पंचायती भरभराटींत आहेत. मुंबई सरकारनें याप्रमाणें कांहींच केलें नाहीं, तरी त्यांची सायमन कमिशनला रिपोर्ट सादर करतांना प्रौढी मारण्यास तयारीच कीं स्थानिक स्वराज्याचें खातें दिवाणांच्या हातीं गेल्यापासून पंचायतींच्या प्रश्नाचा सहानुभूतिपूर्वक विचार होत आहे. व त्याचें उदाहरण काय तर १९२५ सालीं पंचायतींचा विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमण्यांत आली! या कमेटीचा १७ पानीं रिपोर्ट मात्र ७ वर्षें धूळ खात पडला होता.

३. तिसरें कारण म्हणजे पुरेशा अधिकारांचा विशेषतः दिवाणी व फौजदारी कामाबद्दलच्या अधिकारांचा अभाव. आरंभीं दिलेल्या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी कीं, पूर्वीच्या पंचायतीच्या कामांत न्यायादानाचें काम प्रमुख समजलें जात असे. पण तें १९२० च्या मुंबईच्या कायद्यानें पंचायतीस देण्यांत आलें नव्हतें. अशा तऱ्हेचें काम पंचायतीकडे मध्यप्रांतांत सोंपविण्यांत आलें असून तेथील पंचायतींनीं १९३१ सालीं ९२२७ दिवाणी व ४४९२ फौजदारी कामांचे निवाडे केले. ही गोष्ट लक्षांत घेतां हें काम किती उपयुक्त व लोकप्रिय आहे याची कल्पना येईल. शिवाय पंचायतीचे हें एक प्रमुख असें उत्पन्नाचें साधन होऊं शकतें. इतर उत्पन्नाच्या बाबी फार थोड्या असल्यामुळें बाकीचींही कामें पंचायतींच्या हातून फारशी होणें शक्य नव्हतें.

४. चौथें कारण आपसांतील यादवी. या दृष्टीनें गेलें दशक महाराष्ट्रास फार वाईट गेलें. त्यापैकीं बहुतेक काळ ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद फार जोरांत होता. त्यामुळें गांवकऱ्यांनीं एक जुटीनें वागून काम करणें अशक्य होतें.

या प्रमुख कारणांशिवाय जनतेचें अज्ञान, अशिक्षितपणा वगैरे अनेक कारणें आहेत. परंतु तीं केवळ पंचायतीच्याच स्थापनेच्या आड येत नसून सर्वसाधारण राष्ट्रहिताच्या मार्गांत येत असल्यामुळें त्यांचा येथें विचार करण्याची जरूरी नाहीं.

**सन १९३३ चा ग्रामपंचायत कायदा:**—ह्या सर्व कारणांमुळें १९२० चा ग्रामपंचायत कायदा अयशस्वी ठरला व ग्रामपंचायतींसाठीं नवा कायदा असण्याची जरूरी भासूं लागली. सन १९२५ च्या ग्रामपंचायत कमेटीचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यापासून त्या रिपोर्टाच्या सूचनांनुसार नवा ग्रामपंचायत कायदा पास व्हावा म्हणून जनतेनें पुन्हां मागणी सुरू केली; व याबाबत सरकार कांहींच योजना करीत नाहीं असें पाहून पुण्याचे लोकप्रिय प्रतिनिधि श्री. गोखले यांनीं नव्या कौन्सिलामध्यें एक ग्रामपंचायत बिल सादर केलें. तेव्हां सरकारला स्वस्थ बसणें अशक्य होऊन सन १९३२ च्या मे महिन्यांत स्थानिक स्वराज्याच्या दिवाणांनीं या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं एक कमेटी नेमली व त्या कमेटीच्या सूचनांनुसार सरकारी ग्रामपंचायत बिल तयार करून तें मुंबई कायदेकौन्सिलपुढें मांडलें. त्यानंतर तें बिल सिलेक्ट कमेटीकडे पाठविण्यांत आलें व सिलेक्ट कमेटीच्या सूचनांचा विचार करून मुं. का. कौन्सिलनें जो कायदा पास केला तोच हल्लींचा ग्रामपंचायत कायदा होय.

या कायद्याच्या सर्व योजना पुढें दिलेल्याच आहेत. तेंव्हां या ठिकाणीं फक्त त्या कायद्यंतील प्रमुख गुणदोषांचा विचार करूं.

**ग्रामपंचायतींची स्थापना:**— या कायद्याअन्वयें जि. लो. बोर्डाच्या किंवा कलेक्टरच्या किंवा कमींत कमी बीस गांवकऱ्यांच्या अर्जावरून कमिशनरनें एकादा प्रदेश 'गांव' आहे असें जाहीर केल्यावर तेथें पंचायत स्थापन व्हावयाची आहे. म्हणजे पंचायतीच्या स्थापनेबाबतचे सर्व हक्क कमिशनरकडे दिलेले आहेत. पण कमिशनरनें याप्रमाणें अर्ज आल्यानंतर पंचायत स्थापन केलीच पाहिजे असें त्याच्यावर बंधन नाहीं. पंचायतींच्या स्थापनेसाठीं त्यानें किती उत्तेजन द्यावयाचें हें अर्थात् तत्कालीन सरकारचे धोरणावर अवलंबून राहणार. या बाबतचा मध्यप्रांतांतील १९२५ पर्यंतचा अनुभव विशेष समाधानकारक नव्हता. त्यामुळें १९२६ सालीं मध्यप्रांतांतील ग्रामपंचायत कायदा बदलून आतां एकाद्या ठिकाणीं ग्रामपंचायत देण्याचें नाकारणें कमीशनरचे हातीं ठेवलें नाहीं. पूर्वीच्या कायद्याअन्वयें एकाद्या गांवचा अर्ज आला असतांही कमिशनर कांहीं तरी सबब काढून त्या गांवाला पंचायत स्थापण्याची परवानगी देतच नसे. नव्या कायद्याअन्वयें एखाद्या गांवचा अर्ज

असतांही तेथें ग्रामपंचायत स्थापन करूं नये असें कमिशनरला वाटलें तर त्यानें तें सर्व प्रकरण स्थानिक सरकारकडे पाठवावयाचें असतें. मुंबईच्या कायद्यान्वयेंही हे सर्व अधिकार स्थानिकस्वराज्य खात्याचे मंत्र्याकडे सोपविले असते तर ग्रामपंचायतीच्या स्थापनेचा विचार जास्त सहानुभूतिपूर्वक होण्यास जागा राहिली असती.

ग्रामपंचायतीच्या स्थापनेबाबत दुसरीही एक सुधारणा होणें जरूर आहे. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें जितक्या ग्रामपंचायती स्थापन होतील तितक्या जरूर असल्यामुळें कांहीं विशिष्ट परिस्थितींत ग्रामपंचायत स्थापन झालीच पाहिजे अशी योजना कायद्यानेंच करणें जरूर आहे. म्हैसूर संस्थानांत ग्रामपंचायत स्थापन करण्याचे सर्व हक्क मुलकी अधिकाऱ्यांचे हातीं असल्यानें तेथें अनेक पंचायती स्थापन झाल्या आहेत.

**ग्रामपंचायतीचा 'गांव':—** या कायद्यान्वयें कमिशनरनें एकादा विशिष्ट प्रदेश ग्रामपंचायतीचा 'गांव' आहे असें जाहीर करावयाचें आहे. परंतु पंचायतीच्या 'गांवा'ची हद्द मुलकी गांवाइतकीच असेल असें नाहीं. ती कदाचित् मुलकी गांवाच्या हद्दीपेक्षां जास्त असेल किंवा कमीही असेल. या योजनेमुळें एक नवीनच स्थानिक विभाग अस्तित्वांत येऊन गांवकऱ्यांचा घोटाळा होण्याचा संभव आहे. व शिवाय पंचायतीच्या लोकप्रियतेस जरूर असणारी एकजूट अशा नव्या विभागांत नसल्यामुळें जनतेचा पंचायतीवर दृढ विश्वासही असणें कठीण जाईल. यासाठीं ग्रामपंचायतीची हद्द मुलकी गांवाइतकीच असली पाहिजे.

**मतदार व सभासद:—** प्रत्येक पंचायतींत सात ते अकरापर्यंत सभासद असावयाचे आहेत. मतदानाचा व सभासदत्वाचा हक्क पुष्कळच विस्तृत ठेवण्यांत आला आहे ही समाधानाची गोष्ट आहे. या कायद्याअन्वयें प्रत्येक गांवांतील २१ वर्षांहून अधिक वयाच्या स्त्री–पुरुषांस, घरपट्टी देणाऱ्या घरमालकास व सेस देणाऱ्या जमिनीच्या मालकास मतदानाचा हक्क देण्यांत आलेला आहे. गांवाचे पंचायतींत गांवचा पाटील, व त्या गांवांत एकादा इनामदार असल्यास तो किंवा त्याचा प्रतिनिधि हे सभासद असतील. ही इनामदारांना देण्यांत आलेली सवलत लोकशाहीच्या दृष्टीनें फार घातुक आहे. वास्तविक इनामदार हा श्रीमंत, वजनदार व पुढारलेल्या वर्गांतील असल्यामुळें

तोच गांवांतील पुढारी असण्यास योग्य असतो. परंतु त्यासाठीं त्यानें गांवकऱ्यांत स्वत: मिसळन त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे. व त्या विश्वासाचे जोरावरच पंचायतींत निवडून आलें पाहिजे. परंतु सध्यांचे इनामदार हे गांवकऱ्यांत मिसळणें कमीपणाचें समजतात व त्यांच्यापासून फटकून वागतात. सरकारला या वर्गास खष ठेवणें जरूर वाटल्यामुळें या कायद्यानें इनामदार हा पंचायतीचा निवडणुकीशिवायच सभासद होऊं शकावा अशी त्याला सवलत ठेवण्यांत आली आहे, इतकेंच नव्हे तर त्याला स्वत: पंचायतीस न येतां आपल्या तर्फेचा एकादा प्रतिनिधि नेमण्याचीही मुभा ठेवण्यांत आली आहे.

अशाच तऱ्हेची दुसरीही एक योजना या कायद्यांत केलेली असून ती याहूनही जास्त घातुक आहे. या कायद्याअन्वयें जर कलेक्टरला एकाद्या जातींतील किंवा वर्गांतील पुरेसे सभासद पंचायतीवर निवडून आले नाहींत असें वाटलें तर त्याला त्या जातींतील किंवा वर्गांतील दोनपर्यंत सभासद नेमण्याचा हक्क आहे. ही योजना अल्पसंख्याक वर्गाचे हितासाठीं आहे असें अर्थात् सरकारकडून सांगण्यांत येतें. परंतु या योजनेमुळें जातीजातींतील वैमनस्यें मोडण्यास मदत न होतां तीं कायम मात्र राहातील. या जातवारीच्या तत्त्वानें हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत गेलीं अनेक वर्षें इतका घोटाळा माजवून दिला आहे कीं निदान १९३३ सालीं केलेल्या कायद्यांत तरी या तत्त्वास मूठमाती देणें अत्यंत जरूर होतें. शिवाय ही योजना मागासलेल्या जातींच्या संरक्षणार्थ आहे असें म्हणावें तर ह्याप्रमाणें कोणत्या जातींतील सभासद कलेक्टरनें नेमावे यालाही निर्बंध नाहीं. मद्रासच्या ग्रामपंचायत कायद्यानें फक्त आदिद्रविड जातीपुरत्या दोन राखीव जागा ठेवल्या आहेत. पण तेथेंही हें नेमणुकीचें तत्त्व पूर्णपणें अमान्य केलें आहे. व मध्यप्रांतांत गांवांतील पाटीलखेरीज करून फक्त लोकनियुक्त सभासदच पंचायतींत येऊं शकतात. या दोन्ही ठिकाणचा अनुभव असा आहे कीं सभासदत्वाचा हक्क अगदीं विस्तृत ठेवण्यांत आल्यामुळें अस्पृश्यादि सर्व जातींतील लोकांना पंचायतींत निवडून येणें सुलभ झालें असून बहुतेक गांवीं पंचायतींत प्रत्येक प्रमुख जातीचा निदान एक एक सभासद निवडून देण्याचा प्रघातच पडला आहे. मुंबईच्या कायद्यांतही फक्त निवडणुकीचेंच तत्त्व मान्य केलें असतें तर गांव-

कऱ्यांत एकोपा वाढून परस्परांतील विश्वास संपादन करण्याची सर्व जातींत जरूर भासली असती व पंचायतींचें काम फार सुरळीत रीतीनें चाललें असतें.

शिवाय जर सरकारला कांहीं विशिष्ट वर्गांच्या हितसंरक्षणासाठीं नेमणुकी करणें जरूर वाटत होतें तर तो हक्क कलेक्टरकडे न ठेवतां निदान जिल्हा लोकल बोर्डाकडे ठेवण्यांत यावयास पाहिजे होता. पण असें केलें असतें तर पंचायतीही आपल्या ताब्यांत ठेवण्याचा सरकारचा हेतू कसा साध्य झाला असता ? या कायद्यानें आतां सर्वसाधारण लोकांना ते लायक वाटोत अगर न वाटोत, परंतु पाटील, इनामदार किंवा त्याचा प्रतिनिधि व कलेक्टरचे दोन हस्तक हे प्रत्येक पंचायतींत असावयाचेच. अशा पंचायतींना सर्व गांवकऱ्यांचा विश्वास संपादन करणें कठीण जाईल यांत शंका नाहीं.

**पंचायतींचीं कर्तव्यकर्मे**:— 'खेडेगांवांत स्थानिक स्वराज्याची वाढ होण्यास मदत करणें' हा जो पंचायतीचा मुख्य हेतु प्रास्ताविक भागांत दिलेला आहे त्या दृष्टीनें पाहिलें असतां पंचायतींकडे विविध प्रकारचीं व पुष्कळ उपयुक्त कामें सोपविलीं आहेत यांत शंका नाहीं व त्यांपैकीं कांहीं कामें जरी पंचायतींनीं योग्य तऱ्हेनें पार पाडलीं तरी खेडेगांवाचे उन्नतीस पुष्कळ मदत होईल. पंचायतींच्या कामांत पुढील गोष्टींचा प्रामुख्यानें अन्तर्भाव होतो:— (अ) घरकामासाठीं पाणीपुरवठा करणें; (आ) सार्वजनिक रस्ते, गटारें, धरणें, तलाव, विहिरी व इतर सार्वजनिक ठिकाणें स्वच्छ करणें; (इ) सार्वजनिक रस्ते, गटारें धरणें व पूल तयार करणें व दुरुस्त करणें; (ई) आरोग्य व साफसफाई राखणें व उपद्रव दूर करणें; (उ) सार्वजनिक आरोग्य राखणें व वाढविणें; (ऊ) सार्वजनिक इमारती, कुरणें, जंगलें, तलाव व विहिरी राखणें व त्यांचें नियंत्रण करणें, (ऋ) गांवांत दिवाबत्ती करणें; (ऌ) यात्रा, बाजार, कत्तलखाने व गाडीतळ यांचें नियंत्रण करणें; (ए) स्मशानें व कबरस्थानें यांची तरतूद करणें; (ऐ) व यांशिवाय सार्वजनिक आरोग्य , सुरक्षितता, शिक्षण, सुखसोई व सामाजिक व आर्थिक उन्नति यांसाठीं जरूर त्या इतर गोष्टी करणें; (ओ) जिल्हा लोकल बोर्डानें सोपविलेलीं इतर कामें करणें; (औ) खेडेगावांतील शाळांवर देखरेख करणें; (अं) आपल्या गांवांत लोकल बोर्डानें सुरू केलेल्या कामावर देखरेख करणें; (अः) धर्म-

शाळांचे दुरुस्तीवर देखरेख करणें; (क) कोंडवाडे ठेवणें; (ख) सरकारनें सोपविलेलीं इतर कामें करणें; वगैरे.

**पंचायतींचें उत्पन्न**:— १९२० सालच्या कायद्यान्वयें स्थापन झालेल्या पंचायती विशेष भरभराटीस न येण्याचें कारण म्हणजे त्यांचा द्रव्याभाव होय हें वर दिग्दर्शित केलेंच आहे. पंचायतीच्या हातून उपयुक्त कामगिरी होण्यास तिचेजवळ पुरेसा पैसा असणें जरूर आहे. परंतु खेडेगांवांतील लोक अत्यंत दरिद्री असल्यानें व ते आधींच करांच्या भारानें दडपून गेले असल्यामुळें गांवकरी साहजिकच जास्त कर लादून घेण्यास नाखूष असतात. त्यांची पैशाची अडचण कांहींशी दूर करण्याचा प्रयत्न या कायद्यानें केलेला आहे.

(अ) या संबंधाची पहिली उपयुक्त योजना अशी आहे कीं त्या गांवांतून जमा केलेल्या लोकल फंड सेस पैकीं पांचवा हिस्सा जि. लो. बोर्डानें त्या गांवच्या पंचायतीस दिला पाहिजे. १९२० च्या कायद्यांत अशा तऱ्हेची तरतूद केली नसल्यामुळें जिल्हा लोकल बोर्डें पंचायतीस कांहीं द्रव्यसहाय्य करीत नसत; किंवा केलेंच तर फार थोडी मदत देत. उदाहरणार्थ १९३२ सालीं दौंड ग्रामपंचायतीचें एकंदर उत्पन्न ७७७० रु. होतें त्यांपैकीं फक्त ७१ रु. जिल्हा लोकल बोर्डाकडून मिळाले होते. पूर्व खानदेशांत एकंदर ३३ ग्रामपंचायतींचें उत्पन्न ९०८६९ रुपये होतें त्यांपैकीं फक्त १४१५८ रु. जिल्हा लोकल बोर्डांनीं दिलें होतें. व विजापूर जिल्ह्यांत ४ ग्रामपंचायतींस जिल्हा लोकल बोर्डानें कांहींच मदत केली नव्हती. आतांच्या या योजनेमुळें ग्रामपंचायतीजवळ चालू खर्चासाठीं कांहीं तरी उत्पन्न राहीलच.

(ब) या उत्पन्नाशिवाय ग्रामपंचायतींस बऱ्याच बाबींवर कर बसवून उत्पन्न मिळवितां येईल. यापैकीं कोणत्या बाबीवर कर बसवावयाचा हें ठरविण्याची ग्रामपंचायतीस पूर्ण मुभा ठेवण्यांत आली आहे हीहि समाधानाची गोष्ट आहे. अशा करांच्या बाबी येणें प्रमाणें:—(१) गांवांतील घरांचे व जमिनीचे मालक यांचेवर कर; (२) यात्रेकरू, जत्रा, उत्सव, मालाची विक्री, लग्नें, दत्तविधानें व मेजवान्या यांचेवर कर; (३) जकात; (४) जिल्हा लोकल बोर्डानें मान्य केलेले व सरकारनें मंजुरी दिलेले इतर कर. यांपैकीं कांहीं कर बसवून ग्रामपंचायतीस आपली कामगिरी योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास पुरेसें उत्पन्न मिळत नाहीं असें जिल्हा लोकल बोर्डास वाटल्यास त्यानें

ग्रामपंचायतीस त्याहून जास्त कर बसवण्यास सांगावे. हे कर वसूल करण्याचे बाबतींत एक उपयुक्त सुधारणा होणें फार इष्ट आहे. खेडेंगांवांतील लोक बहुतेक शेतीवर उदरनिर्वाह करणारे असल्यामुळें त्यांचेजवळ सहसा रोख पैसा असत नाहीं. परंतु वर्षांतून बरेच महिने त्यांचा वेळ मात्र पुष्कळसा वांया जातो. तेव्हां पंचायतीला देण्याचा कर मजुरीच्या स्वरूपांत देण्याची गांवकऱ्यांस सवलत ठेवण्यांत आली असतां गरीब शेतकऱ्यांस ते कर जाचक न वाटतां रस्ते करण्यासारखीं कामें फार सुलभ रीतीनें पार पडतील.

(क) या करांशिवाय पंचायतीच्या उत्पन्नाच्या इतरही कांहीं बाबी आहेत. त्यांपैकीं प्रमुख येणेंप्रमाणें:– (१) दंड व नुकसानभरपाईदाखल वसूल केलेल्या रकमा; (२) कोर्टानें गांवफंडाच्या खातीं जमा करण्याचा हुकूम दिलेल्या रकमा; (३) गांवांतील केर, कचरा, शेण वगैरेच्या विक्रीची किंमत; (४) सरकारनें किंवा जिल्हा लोकल बोर्डानें गांवफंडास दिलेली मदत; (५) सरकारकडून किंवा जिल्हा लोकल बोर्डाकडून घेतलेलीं कर्जें व मिळालेल्या देणग्या; (६) सरकारनें सामान्य किंवा विशिष्ट हुकुमानें गांवफंडाच्या खातीं जमा करण्यास दिलेल्या इतर रकमा; (७) पंचायतीच्या मालकीच्या मिळकतीचें उत्पन्न व ती विकल्यास तिची किंमत; (८) दावे व फिर्यादी दाखल करते-वेळीं घेतलेली फी; वगैरे.

या सर्व विवेचनांत एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे कीं, सर्व कायद्यांत सरकारनें आपणावर पंचायतींना द्रव्य साहाय्य करण्याची जबाबदारी कोठें-ही घेतलेली नाहीं. अनेक खात्यांवर निष्कारण लक्षावधी रुपये खर्च होत असतां ग्रामसंघटनेसारख्या अत्यंत महत्त्वाच्या बाबीवर एक पैसुद्धां खर्च करण्यास सरकारने कायद्यानें आपणास बांधून घेण्यास तयार होऊं नये ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे. या बाबतींत मुंबई सरकारनें इतर प्रांतांचें उदाहरण तरी डोळ्यांपुढें ठेवणें जरूर होतें. मद्रास सरकार दरसाल शिक्षण, लायब्ऱ्या, रस्ते व पाणीपुरवठा यांसाठीं ग्रामपंचायतींस लक्षावधी रुपयांची मदत करते. मध्यप्रान्त सरकारही दरसाल ग्रामपंचायतीस २५ ते ३० हजार रुपयांपर्यंत मदत देते; अशाच तऱ्हेची मदत इतर प्रांतांत व संस्थानांतही देण्यांत येत असते. मुंबईसारख्या दरिद्री इलाख्यांत तरी सरकारकडून प्रत्यक्ष द्रव्यसाहाय्य झाल्याशिवाय पंचायतींकडून उपयुक्त कामगिरी होणें अगदीं अशक्य आहे.

ग्रामपंचायतीची कल्पना लोकप्रिय होण्यासाठीं आपण प्रथम २५ हजार रुपयांची रक्कम खर्च करणार आहों असें सरकारनें नुकतेंच जाहीर केलें असून ही रक्कम कोणत्या मार्गानें खर्च करावी याबद्दल जबाबदार व्यक्तींचीं व संस्थेचीं मतें मागविलीं आहेत; व त्याप्रमाणें बऱ्याच योजना सरकारकडे रवानाही झाल्या आहेत. त्यांचा विचार करून सरकार ती रक्कम खर्च करीलच. परंतु याप्रमाणें प्रारंभींच नव्हे तर सालोसाल सरकारनें पंचायतीस मदत करणें जरूर आहे.

**न्यायदानाचें काम**:—पूर्वकालीन पंचायतींत न्यायदानाचें काम फार प्रमुख समजलें जात असे हें वर दिलेंच आहे; व हल्लींही पंचायतीच्या कल्पनेंतही या कामास फार महत्त्व दिलें जातें. १९०८ च्या अधिकार विभागणीकमिशननें पंचायतीकडे जीं कामें सोपविण्याचा उल्लेख केला होता त्यांत न्यायदानाचें काम प्रामुख्यानें सांगितलें होतें. पंचायतीकडे लहान लहान कामाचे निवाडे करण्याचें सोपविणें हें पुष्कळ दृष्टीनें फायदेशीर असतें. एकतर निवाडा गांवांतच होत असल्यामुळें निष्कारण खर्च व काल यांचा अपव्यय होत नाहीं. दुसरें, पुष्कळशीं कामें आपसांतच मिटून परस्परांत वैमनस्य वाढण्यास जागा रहात नाहीं व कज्जेदलालीची प्रवृत्तीही वाढत नाहीं. व तिसरें, उभयबाजूंचे पक्षकार पंचांच्या प्रत्यक्ष माहितीचे असल्यानें न्याय होण्यास जास्त अवसर सांपडतो. अशा तऱ्हेचें फार उपयुक्त काम मध्यप्रान्तांतील पंचायती गेल्या ८–१० वर्षें अगदीं निःपक्षपातीपणानें करीत आल्या आहेत.

न्यायदानाचें काम पंचायतीचे हातून यशस्वी रीतीनें पार पडण्यास तिनें दिलेल्या निवाड्यावर लोकांचा विश्वास असणें अत्यंत आवश्यक आहे. व सर्व पंचलोक नियुक्त असल्याशिवाय असा विश्वास बसणें शक्य नसतें. मुंबईच्या कायद्यानें या सर्वसंमत तत्त्वाकडे अगदीं दुर्लक्ष केले आहे. या कायद्यान्वयें निवाडे देण्याचें काम सर्व पंचायतीनें करावयाचें नसून त्यासाठीं सरकारनें एक स्वतंत्र गांवकोर्ट ( Village Bench) स्थापन करावयाचें आहे. या गांवकोर्टांत पांच ते सात सभासद असून ते सर्व कलेक्टरनें नेमावयाचे आहेत. गांवकोर्ट पांच सभासदांचें असल्यास त्यांपैकीं तीन व सात सभासदांचें असल्यास त्यांपैकीं पांच पंचायतीपैकीं असावयाचे व बाकीचे कलेक्टरनें आपल्या मर्जीस येतील ते नेमावयाचे आहेत; व गांवांत एकादा इनामदार असल्यास

त्यालाही गांवकोर्टावर नेमलें पाहिजे व हें गांवकोर्टही प्रत्येक पंचायतीच्या गांवांत नेमलेंच पाहिजे असें नाहीं. सरकारला वाटेल तेवढ्याच पंचायतीच्या गांवीं याप्रमाणें गांवकोर्ट नेमलें जाईल.

ह्या गांवकोर्टाचे योजनेनें सरकारनें पंचायतीकडून होणाऱ्या न्यायदानाच्या मूलतत्त्वास सर्वस्वी हरताळ फांसला आहे असें म्हणावें लागतें. कारण ही सर्व कल्पना लोकप्रतिनिधींनीं दिलेला न्याय लोकप्रिय झालाच पाहिजे या तत्त्वावर उभारली आहे. व याच तत्त्वाचा अवलंब करून पाश्चिमात्य राष्ट्रांतील कांहीं मोठाल्या कोर्टाचे न्यायाधीशही लोकांनीं निवडलेले असतात. या तत्त्वाचा मूळ पायाच या तऱ्हेनें काढून घेतल्यावर नंतर या गांवकोर्टांनीं दिलेला न्याय पंचायतींनीं दिलेल्या न्यायाइतका लोकप्रिय होणें केव्हांही शक्य नाहीं. कारण या गांवकोर्टातील सभासदांना पंचायतीच्या इतर सभासदांइतकें लोकमताकडे लक्ष देण्याची जरूरी भासणार नाहीं. या गांवकोर्टाची कल्पना कांहींशी ऑनररी मॅजिस्ट्रेटांच्या बेंचाप्रमाणें आहे. व या बेंचावर हल्लीं लोकांचा पाहिजे तितका विश्वास नसतो हें महशूर आहे.

या योजनेंतील दुसऱ्या दोषाचाही वर उल्लेख केलाच आहे. वास्तविक प्रत्येक पंचायतीस इतर कामाबरोबर न्यायदानाचेंही काम पंचायतीच्या स्थापनेबरोबरच दिलें पाहिजे. त्याशिवाय ती पंचायत लोकप्रिय होणें शक्य नाहीं. परंतु या कायद्यान्वयें हे हक्क सरकार कांहीं निवडक पंचायतींनाच फक्त देणार आहे. या मुंबईच्या कायद्याप्रमाणें कांहीं निवडक पंचायतींनाच फक्त न्याय देण्याचा हक्क देण्याचा प्रयोग मध्यप्रांतांत केला होता. पण त्यावेळीं असें आढळून आलें कीं ज्या पंचायतींना हा हक्क मिळालेला नसतो त्या पंचायती लोक कमी महत्त्वाच्या समजत; व त्यामुळें त्यांच्या हातून कांहींच काम होत नसे. त्यामुळें आतां १९२५ सालापासून हा फरक तेथें काढून टाकण्यांत आला असून ज्या पंचायतींना न्यायदानाचें काम करण्याची इच्छा असेल त्यांना तो हक्क डे. कमिशनरनें दिलाच पाहिजे असा नियम करण्यांत आला आहे. शिवाय, हा हक्क सर्व पंचायतींकडे दिल्यास त्यांना त्या दाव्यावर व फिर्यादीवर मिळणाऱ्या फीतून गांवांसाठीं पुष्कळच उपयुक्त कामगिरी करण्यांत येईल.

अशा तऱ्हेनें स्थापन होणाऱ्या गांवकोर्टाकडे किरकोळ दिवाणी व फौजदारी दावे व फिर्यादी ऐकण्याचा हक्क दिलेला आहे. एकाद्या गुन्ह्याबद्दल गांव-कोर्टाला जास्तींत जास्त दहा रुपये दंड करतां येतो व सरकारनें हक्क दिल्यास कांहीं गुन्ह्यांस २० रुपयेपर्यंतही दंड करतां येतो व त्यांना योग्य वाटल्यास त्या दंडापैकीं कांहीं रक्कम आरोपीस नुकसानभरपाईदाखल देण्याचीही पर-वानगी आहे. दिवाणी दाव्यांत मागणीची रक्कम २५रु. च्या आंत असली पाहिजे; मात्र सरकारनें एकाद्या गांवकोर्टास हक्क दिला असल्यास अगर उभय पक्ष-कारांची संमति असल्यास गांवकोर्टाला शंभर रुपयेपर्यंत मागणीचा दावा चालवितां येईल.

**ग्रामपंचायतींवर देखरेख करण्याचा हक्क:**—ग्रामपंचायतीची कल्पना लोकशाहीच्या तत्त्वावर उभारली गेली असल्यामुळें ग्रामपंचायतीवर देखरेख करण्याचा अधिकार वास्तविक जिल्हा लोकल बोर्डाकडे व स्थानिक स्वरा-ज्याच्या दिवाणाकडे सोंपविण्यांत येणें जरूर होतें. परंतु या कायद्यांत सर्वत्र सरकारचा लोकशाहीबद्दलचा गैरविचारच दिसून येतो. ग्रामपंचायती ह्या स्थानिक स्वराज्याच्या एक प्रमुख अंग होणार असूनही या सर्व कायद्यांत स्थानिक स्वराज्याच्या दिवाणाचा कोठें उल्लेखसुद्धां आढळत नाहीं ही फार आश्चर्याची गोष्ट आहे. मग हें खातें लोकनियुक्त प्रतिनिधीच्या हातीं असल्या-मुळें जाणून बुजून सरकारनें आपल्या नोकरशाहीच्या हातीं सर्व सत्ता दिली असल्यास नकळे. ग्रामपंचायतीवर देखरेख करण्याचे बरेच प्रमुख अधिकार कलेक्टरकडे सोंपविले असून फक्त कांहीं किरकोळ हक्क जिल्हा लोकल-बोर्डाच्या हातीं ठेवले आहेत. येवढेंच नव्हे तर मळ बिलांत सरकारच्या हातीं जे हक्क दिलेले होते तेही सिलेक्ट कमेटीनें त्यांचेकडून काढून 'कमिशनरकडे' सोंपविले आहेत!

आतांपर्यंत या नव्या कायद्यांतील प्रमुख दोषांचें दिग्दर्शन झालें. यांशिवाय किरकोळ पुष्कळ दोष आहेत. परंतु त्यांचें स्वतंत्र विवरण करण्याची जरूर नाहीं. या संबंधांत एका गोष्टीचा येथें विशेष उल्लेख केला पाहिजे. सरकारनें जे मूळ बिल कायदेमंडळापुढें मांडलें होतें त्यांत यांपैकीं बरेच दोष नव्हते. उदाहरणार्थ, त्या बिलानें न्यायदानाचा हक्क सर्व पंचायतींकडे सोंपविला होता, ग्रामपंचा-यतीवर देखरेख व नियंत्रण करण्याचे काम बरेचसें जिल्हा लोकल बोर्डाकडे

सोपविलें होतें, वगैरे. परंतु हें बिल जेव्हां जास्त विचारासाठीं व सुधारण्यासाठीं 'सिलेक्ट कमेटी' कडे पाठविण्यांत आलें तेव्हां सिलेक्ट कमेटीने हें त्याला विकृत स्वरूप दिलें व त्यांत राहिलेल्या लोकशाहीचा अंश काढून घेतला! सरकारनें जनतेवर जास्त विश्वास टाकण्यास तयार व्हावें, पण लोकप्रतिनिधींची तेवढीही तयारी नसावी याहून जास्त दुःखाची गोष्ट काय असणार? हा प्रकार पाहून इतर प्रांतांतील लोक आश्चर्यानें थक्क होतील यांत शंका नाहीं.

**समारोपः—** वरील सर्व दोष असले तरी १९२० च्या कायद्यापेक्षां हा कायदा पुष्कळच उपयुक्त आहे ही गोष्ट मान्य केली पाहिजे. या कायद्यानें पंचायतीचे हक्क विस्तृत केले आहेत. त्यांना लोकलबोर्डाकडून नियमित उत्पन्न मिळण्याची व्यवस्था केली आहे. व इतरही उत्पन्नाच्या बऱ्याच बाबी दिलेल्या आहेत, आणि विकृत स्वरूपांत कां होईना पण न्यायदानाचे हक्क दिलेले आहेत. सरकारकडून या बाबतींत फारशी मदत होण्याचें चिन्ह दिसत नसलें तरी सरकार पंचायतींची कल्पना लोकप्रिय होण्यासाठीं प्रारंभीं २५००० रुपये खर्च करीत आहे. व सध्याचे इलाखाधिपति ठिकठिकाणीं भाषणें करून ग्रामोद्धाराची घोषणा करून या कार्यास सहानुभूति दर्शवीत आहेत. तेव्हां या वेळीं प्रत्येक देशभक्तानें राष्ट्राच्या सुधारणेंत ग्रामोद्धाराचें किती महत्त्व आहे हें जाणून या कायद्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याचा निश्चय केला पाहिजे.

आज हिंदुस्थानांतील खेड्यांची स्थिति अत्यंत अनुकंपनीय आहे. त्यांतही मुंबई इलाख्यांतील खेडीं फारच मागासलेलीं आहेत. येथील खेड्यांतील शेती बहुशः पावसाचे पाण्यावर अवलंबून असल्यानें शेतकऱ्यांचें उत्पन्न अत्यंत अनिश्चित आहे. वरचेवर पडणारे दुष्काळ, सरकारी करांचा दुःसह बोजा, व जमिनींत पिकणाऱ्या मालाची उतरती किंमत यामुळें शेतकरी अत्यंत बेजार झालेले आहेत. त्यांना शिक्षणाचा गंधही नसल्यामुळें ही दुःस्थिति सुधारण्यास काय उपाय करावे हेंही समजत नाहीं. अशा स्थितींत सर्वत्र खेडोपाडीं ग्रामपंचायती स्थापन केल्यास ही परिस्थिति बदलण्यास पुष्कळच मदत होईल. इतर प्रांतांनीं व संस्थानांनीं ग्रामपंचायतींचे बाबतींत पुष्कळच आघाडी मारलेली दिसून येते. बडोदे संस्थानांत ५०० हून अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेडेगांवांत ग्रामपंचायत स्थापन झालेली आहे. त्या संस्थानांत एकंदर

२९२० खेडीं असून त्यांपैकीं २११८ मध्यें ग्रामपंचायती स्थापन झालेल्या आहेत. म्हैसूर संस्थानांमध्यें सध्यां १०५८२ गांवांत पंचायती स्थापन झालेल्या असून त्या ग्रामोद्धाराचें फार उपयुक्त काम करीत आहेत. त्यांपैकीं एकट्या शिमोगा जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींनीं लहान मोठें ७००० तलाव काढून शेतीची वाढ केली आहे. म्हैसूरमध्यें चालू सालीं १०० ग्रामपंचायतींनीं आपल्या गांवांत विजेचा पुरवठा करण्यासाठीं योजना तयार केल्या असून १२ ग्रामपंचायतींनीं प्रत्यक्ष कार्यासही सुरवात केली आहे. मध्यप्रांतांत १९३२ सालीं एकंदर ६०१ पंचायती होत्या व त्यांनीं दिवाणी व फौजदारी कज्जांचे निकाल करण्याचें महत्त्वाचें काम केलें आहे. मद्रासमध्यें पंचायतींमार्फत गांवोगांव लायब्ररऱ्या, शाळा, रस्ते, पाणी पुरवठा यासारखीं कामें प्रत्यहीं होत आहेत. याच्या उलट १९३३ सालीं सर्व मुंबई इलाख्यांत मिळून फक्त २५० पंचायती अस्तित्वांत असून त्यांपैकींही बहुतेक नाममात्रच आहेत ही गोष्ट लक्षांत घेतल्यास मुंबई इलाखा या कामांत किती मागासलेला आहे याची योग्य कल्पना येईल. व येथें किती मोठें कार्य करावयास पाहिजे याचा अंदाज लागेल.

इतर प्रांतांप्रमाणें मुंबई इलाख्यांतही प्रत्येक खेड्यांत ग्रामपंचायत स्थापन झाल्यास खेडोपाडीं शिक्षणाचा प्रसार होईल, नवीन रस्ते तयार होतील, पाणीपुरवट्याची योजना करतां येईल व ग्रामस्थांचें आरोग्य सुधारण्याची व्यवस्था होईल. पंचायतीवर सर्व जातींचे प्रतिनिधी काम करूं लागले कीं जातींतील दुही मोडेल व पूर्वीप्रमाणें गांवकऱ्यांतील एकोपा वाढेल. गांवकऱ्यांची कोणतीही मागणी किंवा तक्रार असल्यास ती एकमुखानें जनतेपुढें व सरकारपुढें मांडतां येऊन तिची ताबडतोब दाद लावून घेतां येईल. पण या सर्वांपेक्षांही जास्त महत्त्वाचा फायदा असा होईल कीं खेडेगांवांतील प्रत्येक व्यक्तीचा या राज्ययंत्राशीं प्रत्यक्ष संबंध येत गेल्यानें तिला आपण राष्ट्राचा एक जबाबदार घटक आहों याची जाणीव होईल व त्यायोगें प्रत्येक व्यक्तीचे अंगीं आत्मविश्वास येईल; व तो आल्यावर स्वराज्य दूर राहाणार नाहीं.

द. ब. गोडबोले.

# मुंबईचा ग्रामपंचायतीबाबत कायदा

## सन १९३३ चा मुंबईचा कायदा नंबर ६ वा.

## अनुक्रमणिका

कलम पृष्ठ

### भाग १.

#### प्रास्ताविक


| | | |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त नांव | ११ |
| २ | व्याप्ति | ११ |
| ३ | व्याख्या | ११ |


### भाग २

#### पंचायतींची स्थापना व घटना


| | | |
|---|---|---|
| ४ | गांव जाहीर करणें | १४ |
| ५ | पंचायतींची स्थापना | १५ |
| ६ | पंचायतींची घटना | १५ |
| ७ | निवडणूक | १७ |
| ८ | नालायकी | १८ |
| ९ | कलेक्टरनें निवडणूक बेकायदेशीर ठरविणें | १९ |
| १० | निवडणूक रद्द झाल्यास नवी निवडणूक | २१ |
| ११ | लोकनियुक्त सभासदांच्या हुद्याची मुदत | २१ |
| १२ | हुद्याच्या मुदतीला आरंभ | २१ |
| १३ | सभासदांचा राजीनामा | २२ |
| १४ | सरपंच व दुय्यम सरपंच यांची निवडणूक | २२ |
| १५ | सरपंच व दुय्यम सरपंच यांच्या हुद्याची मुदत | २२ |
| १६ | सरपंचानें त्याचे मागून येणारा सरपंच नेमीतोंपर्यंत आपलीं चालू कर्तव्यें करीत राहाणें | २३ |

१७ पंचायतीच्या स्थापनेनंतर वगैरे सरपंचाची निवडणूक २३
१८ सरपंच किंवा दुय्यम सरपंच यांचे राजीनामे २४
१९ पंचायतीच्या बैठकीची वेळ व स्थळ व सभेची कार्यपद्धति २४
२० पंचायतीचीं कामें पार पाडणें २५
२१ हुद्यावरून काढून टाकणें २५
२२ गैरहजर राहण्यासाठीं रजा २५
२३ रिकाम्या झालेल्या जागा भरणें २६
२४ जागा रिकामी असल्यामुळें पंचायतीच्या कामास बाध येत नाहीं २७
२५ ह्या कायद्याखालीं पंचायत स्थापन होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था २७

## भाग ३

### कार्यकारी सत्ता व कर्तव्यें

२६ पंचायतींची कार्यकारी सत्ता व कर्तव्यें २७
२७ संस्थांची व्यवस्था व इतर कामें पार पाडणें हीं पंचायतीकडे सोंपविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचा अधिकार २९
२८ इतर कर्तव्यें २९

## भाग ४

### ग्रामपंचायत संस्थापित करणें; तिची मिळकत व निधि

२९ ग्रामग्रंचायतीचें संस्थापन ३०
३० पंचायतीची मिळकत ३१
३१ गांवफंड ३१
३२ गांवफंडाचा विनियोग ३३

## भाग ५

### नोकर–चाकरांची नेमणूक आणि हिशोब

३३ सेक्रेटरीची नेमणूक ३३
३४ नोकरांची यादी ३४
३५ नोकरांची नेमणूक ३४
३६ अंदाजपत्रक व हिशेब, पंचायतीनें गांवच्या रहिवाश्यांची सभा बोलवावी ३४

# भाग ६

## गांवकोर्टांची घटना व त्यांचे अधिकार

३७ दावे व फिर्यादी चालवण्यासाठीं गांवकोर्टें स्थापन करण्याचा सरकारचा अधिकार ३६
३८ चालू दाव्याबद्दल अपवाद ३७
३९ गांवकोर्टास चालवतां येण्यासारखे दावे ३८
४० गांवकोर्टाला न चालवतां येण्यासारखे दावे ३९
४१ गांवकोर्टाला चौकशी करतां येण्यासारखे गुन्हे ३९
४२ चोरीचा आरोप असलेल्या कांहीं माणसांची चौकशी करण्याचा अधिकार गांवकोर्टाला नाहीं ४६
४३ सरकारी नोकरानें केलेल्या अगर त्याचेविरुद्ध झालेल्या गुन्ह्याची चौकशी करण्याचा अधिकार गांवकोर्टाला नाहीं ४७
४४ गांवकोर्टानें ठरविलेली गुन्ह्याची शाबिती ही पूर्वी झालेली गुन्ह्याची शाबिती समजली जाणार नाहीं ४७
४५ जास्तींत जास्त शिक्षा ४८
४६ कांहीं विशिष्ट गांवकोर्टांना जास्त शिक्षा देण्याला अधिकार देण्याचा सरकारचा अधिकार ४९
४७ फिर्यादींची नुकसानभरपाई ४९
४८ खोटया किंवा बेजबाबदारपणें केलेल्या फिर्यादीबद्दल आरोपीला नुकसान-भरपाई ४९
४९ अल्पवयी गुन्हेगार ५०
५० हितसंबंध असलेल्या सभासदांनीं गांवकोर्टावर काम करूं नये ५०
५१ निवाडा झालेल्या दाव्याची चौकशी न करणें, व चालू दावे व फिर्यादी ५०
५२ दाव्यांत सर्व मागणीचा अंतर्भाव करणें ५१
५३ दावे आणि फिर्यादी दाखल करण्याची मुदत ५२
५४ कोणत्या गांवकोर्टांत दावा दाखल करावा ५२
५५ कोणत्या गांवकोर्टांत फिर्यादी दाखल कराव्या ५२
५६ तक्रारीअर्ज परत करणें ५२

५७ दावे किंवा फिर्यादींचे कामीं कोर्टांची हुकमत रद्द ५२
५८ गांवकोर्ट असलेल्या गांवास मुंबईच्या १८६७ च्या ८ व्या कायद्याचें १४ वें कलम लागू होणार नाहीं ५३

## भाग ७

### पंचायतीपुढील दाव्यांची व फिर्यादींच्या चौकशीची पद्धत

५९ दावे आणि फिर्यादी कशा दाखल कराव्या ५४
६० अर्जाचा सारांश नमूद करणें ५४
६१ वादीनें किंवा फिर्यादीनें गांवकोर्टाचे पुढील बैठकींत हजर राहावें ५४
६२ प्रतिवादीला किंवा आरोपीला समन्स काढणें ५५
६३ समन्स कोणी बजावावें ५५
६४ समन्स बजावण्याची पद्धत ५५
६५ गांवाबाहेर बजावण्याची पद्धत ५६
६६ कांहीं माणसांना दाव्याचे वेळीं न हजर राहाण्याची सवलत ५६
६७ साक्षीदारांना समन्स काढणें ५७
६८ वकील वगैरेंना हजर राहाण्याची मनाई ५८
६९ खरी हकीकत निश्चित केल्यानंतर दाव्याचा किंवा फिर्यादीचा निवाडा ५९
७० गांवकोर्टाचा निवाडा ६०
७१ तहकुबी ६०
७२ संबंध असलेल्या पक्षकाराच्या अपरोक्ष दाव्याचा किंवा फिर्यादीचा निकाल ६०
७३ तडजोड ६१
७४ पक्षकाराचा मृत्यू ६२
७५ गांवकोर्टानें आपल्या निवाड्याचा फेर विचार करूं नये किंवा तो बदलूं नये ६२
७६ व्याज आणि हप्ते ६२
७७ गांवकोर्टानें कलेक्टरकडे हुकुमाकरितां पाठविणें ६३
७८ गांवकोर्टांच्या हुकुमनाम्याला आणि हुकुमाला हरकत घेतां येणार नाहीं ६४
७९ हुकूमनामे आणि हुकूम अखेरचे समजले पाहिजे ६४

## भाग ८

### बजावणी

८० हुकूमनाम्याच्या भरपाईची किंवा तडजोडीची नोंद करणें ६५
८१ कलेक्टरमार्फत बजावणी ६५
८२ हप्तेबंदीच्या हुकूमनाम्याची कलेक्टरमार्फत बजावणी ६६
८३ हुकूमनाम्याची किंवा हप्त्याची दाखल्यानंतर भरपाई ६७
८४ दंड किंवा नुकसानभरपाई केव्हां द्यावी ६७
८५ दंडाची किंवा नुकसानभरपाईची वसुलीनंतर नोंद करणें ६८
८६ नुकसानभरपाई गांवफंडांतून देणें ६८
८७ डिस्ट्रिट जज्जाला किंवा कलेक्टरला हुकमत काढून घेतां येईल किंवा चालू कामें रद्द करतां येतील ६८
८८ दरखास्तींत कैद करण्याची आणि तुरुंगांत ठेवण्याची मनाई ६९

## भाग ९

### कर बसविणें व येणें रकमेची वसुली करणें

८९ पंचायतीनें कर आणि पट्टी बसविणें ७०
९० पंचायतीचे कर वाढविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचा अधिकार ७१
९१ कर आणि बाक्या यांची वसुली ७२
९२ वसूल न होणाऱ्या रकमा बुडीतखातीं लिहिण्यास सांगण्याचा कलेक्टरचा अधिकार ७४

## भाग १०

### पंचायतींना आर्थिक मदत

९३ जिल्हा लोकल बोर्डाकडून मदत व कर्ज ७५

## भाग ११

### निर्बंध

९४ कामकाजाचे कागदपत्र वगैरे मागविण्याचा अधिकार ७६
९५ कामें दुसऱ्यावर सोपविणें, अधिकारी नेमणें, ग्रामपंचायतींच्या स्थापनेस व त्यांच्या वाढीच्या जोपासनेस उत्तेजन देण्यासाटीं ऑनररी मंडळींचा उपयोग करणें ७७
९६ आंत जाण्याचा अधिकार ७८

९७ हिशोब तपासणी ७९
९८ नोकर मंडळींची संख्या कमी करणें ७९
९९ हुकूम बजावण्याचें तहकूब करणें ७९
१०० निकडीचे वेळीं काम करणें ८०
१०१ कर्तव्य करण्यांत कसूर ८१
१०२ कामें न करण्याबद्दल पंचायत मोडण्याचा किंवा ती बंद करण्याचा अधिकार ८१
१०३ गांवाची मर्यादा बदलल्यानंतर पंचायत मोडणें व तिची पुनर्घटना करणें ८२
१०४ मोडलेल्या पंचायतीची मिळकत वगैरे पुनर्घटना केलेल्या, किंवा स्थापन केलेल्या पंचायतीच्या स्वाधीन व्हावी ८३
१०५ एकादा विभाग गांव असण्याचें बंद झाल्याचा परिणाम ८४
१०६ पंचायत मोडल्याचा किंवा बंद केल्याचा गांवकोर्टावर व त्याचे पुढें चालू असलेल्या कामकाजावर परिणाम ८५
१०७ सरकारचा अधिकार ८६

## भाग १२

### नियम आणि पोट नियम

१०८ नियम ८६
१०९ पोटनियम ८९

## भाग १३

### किरकोळ

११० नुकसान, उधळपट्टी किंवा दुरुपयोग याबद्दल सभासदाची जबाबदारी ९१
१११ पंचायत, गांवकोर्ट वगैरे विरुद्ध काम चालविण्यास हरकत व दाखल करण्यापूर्वी नोटीस ९२
११२ अधिकार सोंपविणें ९४
११३ स्थानिक चौकशी व पंचायतींचे रिपोर्ट ९५
११४ पंचायतीचे किंवा गांव कोर्टाचे सभासद वगैरे सरकारी नोकर समजावे ९६
११५ कांहीं कायदे रद्द करणें व अपवाद ९७
परिशिष्ट ९८

# ग्रामपंचायत बिल

## हेतू व कारणें यांचें विवरण

ह्या इलाख्यांतील ग्रामपंचायतींच्या कामगिरीकडे सरकारचें लक्ष बरेच दिवसांपासून वेधलें आहे. सन १९२५ सालीं सरकारनें ग्रामपंचायतींच्या भवितव्याचा आणि त्या जास्त यशस्वी कशा होतील या प्रश्नांचा विचार करण्याकरितां एक कमेटी नेमिली होती. त्या कमेटीनें आपला रिपोर्ट सन १९२६ मध्यें सादर केला. सरकारनें कमेटीच्या शिफारशींचा विचार करून एक बिल तयार केलें. मे १९३२ मध्यें स्थानिक स्वराज्याच्या दिवाणांच्या अध्यक्षतेखालीं मुंबई कायदेकौन्सिलच्या कांहीं सभासदांची एक खाजगी बैठक भरून तींत त्या बिलाची चर्चा करण्यांत आली. सन १९२५ मध्यें नेमलेल्या कमिटीनें व गेल्या मे महिन्यांत भरलेल्या बैठकीनें केलेल्या शिफारशींपैकीं ज्या सरकारनें मान्य केलेल्या आहेत त्या शिफारशी अमलांत आणण्याकरितां हल्लींचें बिल तयार केलेलें आहे. “ कांहीं लहान प्रदेशांतील रहिवाश्यांना स्थानिक स्वराज्यांत लक्ष घालण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें अशा देशांत पाण्याचा पुरवठा, आरोग्य व सार्वजनिक उपयुक्ततेचीं दुसरीं कामें यासंबंधीं जरूर त्या गोष्टी करण्यासाठी तरतूद करण्याची त्यांना योग्य संधि देणें ” हा १९२० च्या कायद्याचा हेतू होता. त्यावेळीं पंचायतींना हल्लीं-प्रमाणें न्यायदानाचा किंवा त्या स्वरूपाचा अधिकार देण्याचा हेतू नव्हता. आतां त्यांचे अधिकार पुष्कळच वाढविण्याचा सरकारचा विचार आहे व त्याबरोबरच त्यांची उपयुक्तताही वाढेल अशी आशा आहे. सन १९२० च्या कायद्यांत न दिसून येणारे या कायद्यांतील कांहीं विशेष येणेंप्रमाणें:—

(१) स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणें.

(२) कर बसविण्याच्या बाबतींत पंचायतीच्या अधिकाराची वाढ.

(३) लोकफंडसेसचा कांहीं भाग पंचायतींना देणें;

(४) किरकोळ दर्जाचीं कांहीं दिवाणी व फौजदारी कामें 'समरी' पद्धतीनें चालवण्याचा पंचायतींना दिलेला अधिकार.

हे नवीन उद्देश अमलांत आणण्यासाठीं चालू कायद्यांत पुष्कळच दुरुस्ती करावी लागेल; त्यापेक्षां हल्लींचा कायदा रद्द करणें व एकत्रित स्वरूपांत नवा कायदा करणें हेंच जास्त सोईचें होईल. या कायद्यांतील बहुतेक नवीन कलमें संयुक्तप्रांत ग्रामपंचायत कायदा १९२०, मध्यप्रांत ग्रामपंचायत कायदा १९२०, मद्रास ग्रामपंचायत कायदा १९२० व पंजाब ग्रामपंचायत कायदा १९२२ यांतून घेऊन त्यांत स्थानिक जरूरीप्रमाणें सुधारणा केली आहे असें आढळून येईल.

---

# मुंबईचा सन १९३३ चा
# ग्रामपंचायतीचा ६ वा कायदा

( गव्हर्नर जनरल यांची मंजुरी मिळाल्यानंतर मुंबई सरकार गॅझेटमध्यें तारीख १२ जून सन १९३३ रोजीं प्रथम प्रसिद्ध केलेला )

**ग्रामपंचायतींच्या घटनेबाबतचा कायदा सुधारण्यासाठीं व एकत्र करण्यासाठीं केलेला कायदा.**

ज्या अर्थी ग्रामपंचायतींची वाढ व्हावी म्हणून, व खेडेगांवांत स्थानिक स्वराज्याची जास्त वाढ होण्यांत व दिवाणी व फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी करण्यांत त्यांची उपयुक्तता वाढावी म्हणून त्यांच्या घटनेसंबंधींचा कायदा सुधारण्याची व एकत्र करण्याची जरूरी आहे; व ज्या अर्थी हा कायदा पास करण्यास हिंदुस्थान सरकारसंबंधीं कायद्याचें कलम ८० पोटकलम (३) प्रमाणें गव्हर्नर जनरलची आगाऊ मंजुरी व त्याच कायद्याचें कलम ८० क प्रमाणें जरूर असलेली गव्हर्नरची मंजुरी ह्या हा कायदा पास करण्या-साठीं आगाऊ मिळवलेल्या आहेत; त्याअर्थी पुढीलप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे:—

ह्या कायद्याचा उद्देश १९२० च्या ग्रामपंचायत कायद्यापेक्षां फारच व्यापक आहे. १९२० च्या कायद्यानें, खेडेगांवांतील लोकांनीं स्थानिक स्वराज्यांत लक्ष घालावें म्हणून ग्रामपंचायतीकडे पाण्याचा पुरवठा, आरोग्य व सार्वजनिक उपयुक्ततेचीं दुसरीं कामें सोंपविलीं होतीं. ह्या कायद्याचा उद्देश तेवढाच नसून, खेडेगांवांत स्थानिक स्वराज्याची पुढील वाढ होण्याचे कामीं ग्रामपंचायतींचा विशेष उपयोग व्हावा असा आहे. शिवाय, न्यायदानाचे कामीं त्यांचा उपयोग व्हावा असाही ह्या कायद्याचा दुसरा उद्देश आहे. त्याचकरतां पंचायतीचे गांवांत गांवकोर्ट स्थापून, त्यांनीं किरकोळ दिवाणी व फौजदारी कामें पहावीं, अशी ह्या कायद्यांत तरतूद केली आहे. (कलम ३७). एकंदरीत पाहातां ह्या कायद्यानें ग्रामपंचायतीस पुष्कळच नवीन अधिकार दिलेले आहेत व त्याचें कार्यक्षेत्र वाढविलें आहे. हे उद्देश पूर्ण होण्यास खेडोपाडीं ग्रामपंचायती स्थापन होणें जरूर आहे; व अशा स्थापन झालेल्या पंचायतीस आरंभाला तरी त्यांचे कामांत मदत करण्यांत आली पाहिजे. हें विचारांत घेऊनच ह्या कायद्याच्या कलम ९५ मध्यें, तें काम जि. लो. बोर्डाकडे सोंपविण्यांत आलेलें आहे व सरकारला या कामासाठीं स्वतंत्र अधिकारी नेमण्याचीही परवानगी दिली आहे.

---

# भाग १

## प्रास्ताविक.

१ **संक्षिप्त नांव.** या कायद्यास मुंबई ग्रामपंचायत कायदा १९३३ असें म्हणावें.

२. **व्याप्ति.** ह्याचा अंमल मुंबई शहर खेरीज करून इतर सर्व मुंबई इलाखाभर असावा.

३. **व्याख्या.** या कायद्यांत, विषयांत किंवा संदर्भांत कांहीं बाध येत नसेल तर:—

(१) 'पोट नियम' म्हणजे जिल्हा लोकल बोर्डानें कलम १०९ खालीं केलेले पोट नियम.

(२) 'फिर्याद' म्हणजे कोणत्याही न्यायाचे कामासंबंधांत, गांव-कोर्टाला चौकशी करतां येण्यासारख्या गुन्ह्यांचें फौजदारी काम[१].

(३) 'चेअरमन' म्हणजे कलम ३७ चें पोटकलम ४ खालीं नेमलेला गांवकोर्टाचा चेअरमन.

(४) 'जिल्हा लोकल बोर्ड' म्हणजे, कोणत्याही स्थानिक विभागाचे संबंधांत या शब्दांचा उपयोग केला असेल तर, ज्या स्थानिक विभागांत तो जिल्हा येतो त्या जिल्ह्यासाठीं, मुंबई लोकल बोर्ड कायदा सन १९३३ खालीं स्थापन केलेलें जिल्हा लोकल बोर्ड.

(५) 'इनामदार' म्हणजे, इनाम गांवचा इनामदार, आणि यांत

---

१. गांवकोर्टाला चौकशी करतां येण्यासारखे गुन्हे कलम ४१ मध्यें दिलेले आहेत.

खोत, तालुकदार, सरकतदार व सिंधमध्यें जहागीरदार व जमीनदार यांचा अंतर्भाव होतो[२].

(६) 'गुन्हा' म्हणजे, त्या काळीं अंमलांत असणाऱ्या कोणत्याही कायद्यानें शिक्षेस पात्र असलेलें कोणतेंही कृत्य किंवा कसूर[३].

(७) 'पंचायत' म्हणजे या कायद्याखालीं स्थापन केलेली पंचायत.

(८) 'ठरविलेलें' म्हणजे नियमांनीं ठरविलेलें.

(९) 'जमाबंदीचा गांव' म्हणजे जमाबंदीचे खात्यांत, जमाबंदीचा गांव म्हणून समजला जाणारा कोणताही स्थानिक विभाग[४].

(१०) 'नियम' म्हणजे कलम १०८ खालीं सरकारनें केलेले नियम[५].

(११) 'सरपंच' म्हणजे कलम १४ खालीं निवडलेला सरपंच.

---

२. "इनामदार" हा शब्द येथें (क. ३) त्याच्या रूढ अर्थापेक्षां पुष्कळच व्यापक अर्थानें योजिलेला आहे. काण त्यांत खोत, तालुकदार, सरकतदार आणि सिंधमधील जहागीरदार व जमीनदार यांचाही समावेश केलेला आहे.

३ कायद्यानें मना केलेलें कृत्य करणें हा 'गुन्हा' शब्दाचा नेहमींचा अर्थ आहे. येथें 'गुन्हा' ह्या शब्दांत कायद्यानें मना केलेलें कृत्य करणें किंवा कायद्यानें सांगितलेलें कृत्य न करणें ह्या दोहोंचाही समावेश केलेला आहे.

४ जमाबंदीचे कामांकरितां प्रत्येक गांवाची चतुःसीमा ठरविलेली आहे, व तेवढ्या सर्व भागांस तेथें लोकवस्ती नसली तरी " गांव " असें म्हटलेलें असतें. व तोच अर्थ नेहमींच्या भाषेंत रूढ आहे. परंतु ह्या कायद्यांत क. ४ खाली जाहीर केलेल्या प्रदेशास ' गांव ' असें म्हटलेलें आहे. व हा विशिष्ट अर्थ लक्षांत यावा म्हणून सरकारी दप्तरांत प्रचारांत असलेल्या ' गांवास ' ' जमाबंदीचें गांव ' असें म्हटलें आहे.

५ हे नियम परिशिष्टांत दिलेले आहेत.

(१२) 'स्कूलबोर्ड' म्हणजे मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा १९३३ च्या कलम ३ खालीं स्थापन केलेलें स्कूलबोर्ड[६].

(१३) 'दावा' म्हणजे, गांवकोर्टाला या कायद्याखालीं चालवितां येणारा दिवाणी दावा.[७].

(१४) 'कर' म्हणजे, या कायद्याखालीं बसवितां येण्यासारखा कोणताही कर, पट्टी, आकार किंवा दुसरा कोणताही दस्त.[८]

(१५) 'पंचायतीची मुदत' म्हणजे ज्या मुदतीपर्यंत कलम ११ खालीं तिचे निवडलेले सभासद हुद्यावर असतात ती मुदत.

(१६) 'गांव' म्हणजे कलम ४ खालीं गांव असल्याचें जाहीर केलेला कोणताही स्थानिक विभाग.[९]

(१७) 'गांव कोर्ट' म्हणजे कलम ३७, पोट कलम (१) खालीं दावे व फिर्यादी चालविण्यासाठीं स्थापन केलेलें कोर्ट.

---

६ त्या कायद्याच्या कलम ३ मध्यें स्कल बोर्डाच्या घटनेचे नियम पुढील प्रमाणें दिले आहेत:–

(अ) स्कूलबोर्ड म्युनिसिपालिटीचें असल्यास त्यांत ७ पेक्षां कमी नाहीं व ९ पेक्षां जास्त नाहीं इतके निवडलेले सभासद व ३ सरकारनियुक्त सभासद असावेत.

(ब) स्कूल बोर्ड जिल्हा लोकल बोर्डाचें असल्यास त्यांत ९ पेक्षां कमी नाहीं व १६ पेक्षां जास्त नाहीं इतके निवडलेले सभासद व ४ सरकारनियुक्त सभासद असावेत.

७ कलम ३९ मध्यें हे दावे दिलेले आहेत.

८ कलम ८९ मध्यें हे कर दिलेले आहेत.

९ वरील पोट कलम (९) खालील टीप पहा.

## भाग २

# पंचायतींची स्थापना व घटना.

**४. गांव जाहीर करणें.**[1] (१) कलेक्टरला आगाऊ सूचना देऊन जिल्हा लोकल बोर्डानें, (२) जिल्हा लोकल बोर्डाला अगाऊ सूचना देऊन कलेक्टरनें, किंवा (३) कोणत्याही स्थानिक विभागांतील वीसपेक्षां कमी नाहीं इतक्या रहिवाशांनीं[2], लेखी अर्ज केल्यावरून कमिशनरनें नियमांत सांगितलेल्याप्रमाणें चौकशी केल्यानंतर, मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा प्रसिद्ध करून, ज्या स्थानिक विभागासंबंधीं अर्ज केलेला आहे तो गांव आहे, किंवा गांव असल्याचें रद्द केलें आहे, किंवा कांहीं विभागांचा गांवांत समावेश केलेला आहे किंवा त्यांतून तो काढून टाकला आहे हें जाहीर करावें[3].

---

१. पंचायत स्थापन होण्यापूर्वी, कोणत्या स्थानिक भागावर तिचा अधिकार चालेल हें ठरविणें जरूर आहे. त्याकरितां ह्या कलमांत तरतूद केलेली आहे.

२. गांवांतील लोकांना अर्ज करण्याची तरतूद १९२० च्या ग्रामपंचायत कायद्यांत नव्हती.

३. सोईच्या दृष्टीनें कोणत्या भागावर पंचायतीचा अधिकार असणें इष्ट आहे हें ठरविणें हा कमिशनरनें करावयाच्या चौकशीचा मुख्य उद्देश आहे. म्हणूनच सदरील 'गांवांत' (१) जमाबंदीचा एक किंवा अधिक गांव किंवा (२) जमाबंदीचा एक सबंध गांव व दुसऱ्याचा कांहीं भाग, किंवा (३) जमाबंदीच्या एका गांवाचा कांहीं भाग, येऊं शकेल. ह्या जाहीर केलेल्या गांवांत त्याचे गांवठाणावरील वस्ती व त्याचे गांवठाणाबाहेरील पण त्या 'गांवाचे' हद्दींत असलेली, शेतांतील, बागांतील, रानांतील, नदीकिनाऱ्यावरील व इतर ठिकाणीं असलेली वस्तीही समाविष्ट होईल.

मात्र, जर अशा एकाद्या विभागांत एकाद्या गांवाचा इनामदार असेल, व जर अशा तऱ्हेनें त्या विभागांत तें इनाम गांव अंतर्भूत केल्याचा जाहीरनामा काढण्यास त्याची हरकत असेल तर कमिशनरनें त्या इनाम गांवासंबंधींचा जाहीरनामा न काढतां त्या इनामदाराची हरकत सरकारकडे पाठविली पाहिजे, व त्यानंतर सरकारनें त्या हरकतीचा विचार करून मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा प्रसिद्ध करून अशा इनाम गांवाचा त्या गांवांत समावेश केला आहे किंवा नाहीं हें जाहीर केलें पाहिजे[४].

५. **पंचायतींची स्थापना.** कलम ४ खालीं जाहीर केलेल्या प्रत्येक गांवांत एक पंचायत स्थापण्यांत आली पाहिजे.

६. **पंचायतींची घटना.** पंचायत पुढील सभासदांची असेल:—

(अ) कलेक्टर जिल्हा लोकलबोर्डाशीं विचारविनिमय करून ठरवील तितके, पांचपेक्षां कमी नाहीं व अकरापेक्षां जास्त नाहीं इतके, लोकनियुक्त सभासद.

मात्र जर अशा लोकनियुक्त सभासदांमध्यें त्या गांवांत राहणाऱ्या एकाद्या वर्गापैकीं एकही सभासद नसेल, व जर कलेक्टराचे मतानें त्या वर्गाच्या संख्येमुळें किंवा इतर कोणत्याही कारणामुळें, लोकहितासाठीं, सदर पंचायतीमध्यें त्या वर्गाचा सभासद असणें

---

४. मूळच्या बिलांत तालुकदारी किंवा इनामी गांवांत पंचायत स्थापन करण्याबद्दल योजना केलेली नव्हती. तेथील लोकांनीं सिलेक्ट कमेटीकडे आपलें शिष्टमंडळ पाठविल्यावरून, सिलेक्ट कमेटीनें अशा गांवांत पंचायत स्थापन करण्यास हरकत नाहीं असें ठरविलें व त्याचप्रमाणें इनामदार व तालुकदार लोकांच्या हक्कांचा विचार करून, ह्या कलमांत दिल्याप्रमाणें तरतूद केलेली आहे.

जरूर असेल तर कलेक्टरानें अशा वर्गापैकीं पंचायतींत काम करण्यास खुषी असलेल्या इसमाची नेमणूक करावी[१].

मात्र याप्रमाणें कलेक्टरनें नेमलेल्या सभासदांची संख्या दोनपेक्षां अधिक असूं नये.

(ब) कामगार पाटील; त्याची निवड पुढील अनुक्रमानें करावी:—

(१) त्या गांवांत एकाहून अधिक मुलकी कामगार पाटील असतील तर त्यांपैकीं वरिष्ठ मुलकी पाटील; किंवा

(२) त्या गांवांत एकाहून अधिक कामगार मुलकी पाटील नसल्यास कामगार मुलकी पाटील; किंवा

(३) त्या गांवांत वेगळा कामगार मुलकी पाटील नसल्यास कामगार पाटील;

वर (ब) मध्यें, कामगार पाटील यांत, सिंध गांवकामगार कायदा सन १८८१ चें कलम ३ खालीं नेमलेल्या गांवकामगाराचा समावेश होतो.

(क) (१) त्या गांवांत असलेल्या इनामगांवचा इनामदार; व त्या गांवांत एकाहून अधिक इनाम गांवांचा समावेश होत असेल तर त्यांचा इनामदार; व एकाद्या गांवाचे एकाहून अधिक इनामदार असतील तर त्यांच्यापैकीं प्रमुख असा कलेक्टरनें नेमलेला इनामदार. जर असा एकादा इनामदार काम करण्यास असमर्थ किंवा नाखूष असेल तर कलेक्टरनें

---

१ कांहीं जातींचे उमेदवार निवडून न आल्यास, त्या जातींतील लोकांना पंचायतीवर नेमण्यास कलेक्टरला अधिकार दिलेला आहे. खेडेगांवांतील अल्प संख्याक जातींचे हितसंबंधांचें संरक्षण करण्याकरितां सिलेक्ट कमेटीनें ही तरतूद केलेली आहे.

आपणास पसंत असलेला त्या इनामदाराचा प्रतिनिधी नेमला पाहिजे.

(२) वरिष्ठ मुलकी पाटील कोणता, किंवा प्रमुख इनामदार कोणता, किंवा इनामदाराचा प्रतिनिधी कोण असावा या संबंधींचा कलेक्टरचा निर्णय अखेरचा समजला पाहिजे.

(३) जर कलेक्टरनें जिल्हा लोकल बोर्डाशीं विचार विनिमय करून ठरविलेली पंचायतींतील लोकनियुक्त सभासदांची संख्या पांचहून अधिक असेल तर पांचहून अधिक सभासद न निवडले गेले तरी पंचायतीच्या घटनेस बाध येणार नाहीं[२].

७. **निवडणूक.** (१) पंचायतांतील लोकनियुक्त सभासदांची निवडणूक, कलेक्टर या संबंधांत ठरवील त्या तारखेस झाली पाहिजे.

(२) त्या गांवांत सामान्यत: राहाणारीं वयांत आलेलीं सर्व माणसें, व त्या गांवांत घरपट्टी देण्यास पात्र असलेल्या घरांचे किंवा मुंबई लोकलबोर्ड कायदा सन १९२३ च्या कलम ९३ खालीं फंड देण्यास पात्र असलेल्या जमिनींचे वयांत आलेले सर्व मालक हे त्या निवडणुकीचे वेळीं मत देण्यास पात्र असतील[३].

---

२ कलेक्टरनें ठरविलेल्या संख्येइतके उमेदवार न निवडून आले तरी पंचायतीला काम करितां यावें व नवीन निवडणुकीची जरूर पडूं नये म्हणून, निवडलेल्या सभासदांची किमान मर्यादा पांच ठेविलेली आहे.

३. १९२० च्या ग्रामपंचायत कायद्यांत स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिलेला नव्हता. ह्या कायद्याप्रमाणें खालील लोकांना मत देतां येईल:—

(१) त्या गांवातील वयांत आलेले पुरुष व स्त्री रहिवासी.

(२) घरपट्टी द्यावी लागणारे घरांचे वयांत आलेले मालक.

(३) लोकलफंड द्यावा लागणाऱ्या जमीनींचे वयांत आलेले मालक.

अशी निवडणूक त्या बाबत घालून दिलेल्या नियमांप्रमाणें केली जाईल[४].

(३) अशा निवडणुकींत एकादा मनुष्य मत देण्यास पात्र आहे किंवा नाहीं यासंबंधीं वाद किंवा शंका उत्पन्न झाल्यास कलेक्टरनें त्याला जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर त्याचा निकाल केला पाहिजे.

८. **नालायकी.** कोणताही मनुष्य पंचयतीचा सभासद म्हणून नेमला किंवा निवडला जाणार नाहीं, किंवा सभासद म्हणून पुढें चालू राहणार नाहीं, जर---

(अ) तो वयानें २१ वर्षांपेक्षां कमी असेल, किंवा

(ब) तो सामान्यतः त्या गांवांत रहात नसेल, किंवा

(क) त्याला एकाद्या फौजदारी कोर्टानें सहा महिन्यांपेक्षां जास्त मुदतीपर्यंतची कैदेची शिक्षा होण्यास पात्र असलेल्या गुन्ह्याबद्दल कैदेची किंवा काळ्या पाण्याची किंवा फटक्याची शिक्षा दिलेली असेल, किंवा क्रिमिनल प्रोसीजर कोड १८९८ खालीं जर चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल त्याचेकडून जामीन घेतला असेल व अशी शिक्षा किंवा हुकूम जर नंतर फिरविला किंवा माफ केला नसेल तर जोंपर्यंत अशा शिक्षेची मुदत संपली नाहीं किंवा असा हुकूम अंमलांत आहे तोंपर्यंत, सरकारनें त्यांना या ठिकाणीं दिल्या जाणाऱ्या अधिकाराअन्वयें अशा तऱ्हेच्या शिक्षेमुळें किंवा हुकमामुळें येणाऱ्या नालायकींतून त्याला हुकमानें मुक्त केलें नसेल तर, किंवा

---

४. १९२० च्या कायद्यांत सभासदांची निवडणूक कलेक्टरच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या सभेंत व्हावी अशी तरतूद होती. ह्या कायद्याखालीं ती परिशिष्ट 'अ' मध्यें दिलेल्या नियमाप्रमाणें व्हावयाची आहे.

(ड) कोणत्याही लायक कोर्टानें तो वेडा असल्याबद्दलचा ठराव केला असेल तर, किंवा

(इ) त्याला नादार ठरवण्यांत आलें असेल, पण ऋणमुक्त केलें नसेल तर, किंवा

(फ) त्याला कलम २१ अन्वयें हुद्यावरून बडतर्फ करून टाकलें असेल व त्या बडतर्फीपासून पांच वर्षें झालीं नसतील, व जर जिल्हा लोकलबोर्डानें बडतर्फीपासून एक वर्षानंतर, त्यांना या ठिकाणीं दिलेल्या अधिकाराअन्वयें, अशा बडतर्फीमुळें येणाऱ्या नालायकींतून त्याला मुक्त केलें नसेल तर, किंवा

(ग) तो पंचायतीच्या मर्जीवर किंवा अधिकारांत असलेल्या एकाद्या पगारी किंवा फायद्याचे हुद्यावर किंवा जागेवर असल्यास त्या हुद्यावर किंवा जागेवर असेपर्यंत, किंवा

(ह) पंचायतीशीं किंवा पंचायतीकडून किंवा तिच्यातर्फे होणाऱ्या एकाद्या करारांत त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हिस्सा किंवा हितसंबंध असल्यास तो हिस्सा किंवा हितसंबंध असेतोंपर्यंत;

मात्र (ग) व (ह) मध्यें दिलेल्या नालायक्या कमिशनरला याबाबत हुकूम करून काढून टाकतां येतील.

खुलासा:—कोणीही मनुष्य एकाद्या संस्थापित किंवा नोंदलेल्या कंपनीचा, अगर सहकारी संस्थांचा कायदा १९१२ किंवा सहकारी संस्थांचा कायदा सन १९२५ खालीं नोंदलेल्या एकाद्या सहकारी संस्थेचा भागीदार किंवा सभासद आहे येवढयावरूनच त्याचा, सदर कंपनी किंवा सहकारी संस्था व सदर पंचायत यांचे दरम्यान झालेल्या करारांत, कांहीं हितसंबंध आहे असें समजलें जाणार नाहीं.

**९. कलेक्टरनें निवडणूक बेकायदेशीर ठरवणें.** (१) जर कलेक्टरची, त्याला जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर अशी खात्री

झाली कीं, ८ व्या कलमाच्या ठरावाचा भंग करून एकादा सभासद निवडण्यांत आला आहे, किंवा त्या निवडणुकीबाबत कांहीं लांच-लुचपत अगर नियमबाह्य वर्तन झालें आहे, आणि अशा गैरकायदा गोष्टीमुळें, किंवा लांचलुचपतीमुळें किंवा नियमबाह्य वर्तनामुळें त्या निवडणुकीचे निकालावर कांहीं विशेष परिणाम झाला आहे, तर त्यानें त्या सभासदाची निवडणूक बेकायदेशीर आहे असें जाहीर करावें, व तो जाहीरनामा अखेरचा समजावा.

मात्र, जर कांहीं लांचलुचपत एकाद्या सभासदानें केली आहे अशी कलेक्टरची खात्री झाली तर त्या लांचलुचपतीचा निवडणुकीचे निकालावर विशेष परिणाम झाला असो अगर नसो, तर कलेक्टरनें ती निवडणूक बेकायदेशीर आहे असें ठरविलें पाहिजे, व तो निकाल अखेरचा समजला पाहिजे.

(२) जो कोणी इसम

(अ) कोणत्याही उमेदवाराचे बाजूनें मत देण्याकरतां किंवा न देण्याकरतां, कोणत्याही मतदाराचें मत कळण्याचे हेतूनें, कोणत्याही इसमास कोणत्याही पैशाचा किंवा मौल्यवान मोबदला देऊं करतो किंवा देतो, किंवा वैयक्तिक फायद्याचें कोणतेंही वचन देतो किंवा दुखापतीची धमकी देतो, किंवा

(ब) तो मत देणारा इसम नसलेल्या एकाद्या मतदाराच्या नांवानें मत देतो, मिळवतो किंवा तें देण्याचे कामीं सहाय्य करतो. त्यानें लांचलुचपतीची कृति केली आहे असें समजलें पाहिजे.

खुलासा १.– जर एकाद्या उमेदवाराच्या माहितीनें व त्याच्या संमतीनें, निवडणुकीचे संबंधांत अशा उमेदवाराच्या सामान्य किंवा विशेष अधिकाराखालीं काम करीत असलेल्या एकाद्या इसमाकडून,

लांचलुचपतीची कृति केली गेली असेल तर ती कृति अशा उमेद-वारानें केली आहे असें समजलें पाहिजे.

खुलासा २.– (१) 'वैयक्तिक फायद्याचें वचन' या संज्ञेंत—

पंचायतीपुढें विचारास येणाऱ्या कोणत्याही ठरावाच्या बाजूनें किंवा विरुद्ध मत देण्याच्या वचनाचा समावेश होत नाहीं; परंतु (२) हे वगळून खुद्द त्या इसमाच्या फायद्यासाठीं किंवा त्याचा हितसंबंध असलेल्या कोणत्याही इसमाच्या फायद्यासाठीं दिलेल्या वचनाचा समावेश होतो.

**१०. निवडणूक रद्द झाल्यास नवी निवडणूक.** जर कलम ९, खालीं एकाद्या सभासदाची निवडणूक बेकायदेशीर आहे असें कलेक्टरनें जाहीर केलें तर त्या रिकाम्या झालेल्या जागेसाठीं या कायद्याच्या कलमानुसार नवी निवडणूक केली पाहिजे.

**११. लोकनियुक्त सभासदांच्या हुद्याची मुदत.** (१) या कायद्यांत इतर रीतीनें कांहीं ठरवलें असेल तर तेवढे खेरीज करून, लोकनियुक्त सभासदांच्या हुद्याची मुदत तीन वर्षें राहील.

(२) कलेक्टरला लेखी हुकूम देऊन त्यांत सांगितलेल्या कारणां-करतां ती मुदत एक वर्षाहून अधिक नाहीं इतका काल वाढवतां येईल. असा हुकूम कलेक्टरला पसंत पडेल त्या रीतीनें जाहीर केला पाहिजे.

**१२ हुद्याच्या मुदतीला आरंभ.** (१) निवडलेल्या किंवा नेम-लेल्या सभासदांच्या हुद्यांची मुदत त्यांच्या निवडणुकीनंतर, किंवा नेमणुकीनंतर जसें असेल त्याप्रमाणें, होणाऱ्या पहिल्या सभेपासून सुरू झाली असें समजलें पाहिजे.

(२) सभासदाचा हुद्दा सोडून जाणाऱ्या सभासदांच्या हुद्याची मुदत त्या सभेच्या दिवसापर्यंत चालू राहून त्या दिवशीं संपली असें समजलें पाहिजे.

(३) अधिकारपरत्वें पंचायतीचा सभासद होणाऱ्या सभासदाच्या हुद्याची मुदत तो ज्या अधिकारामुळें सभासद आहे त्या अधिकाराचे जागेवर असेतोंपर्यंत चालू आहे असें समजलें पाहिजे.

(४) कलम [६] पोटकलम (१) (क) खालीं नेमलेल्या सभासदाची मुदत निवडलेल्या सभासदाच्या मुदतीइतकी आहे असें समजलें पाहिजे.

१३ **सभासदांचा राजीनामा.** कोणत्याही निवडलेल्या किंवा नेमलेल्या सभासदाला सरपंचास त्या अर्थाची लेखी नोटीस देऊन आपल्या हुद्याचा राजीनामा देतां येईल. व असा राजीनामा ती नोटीस सरपंचास मिळाल्या तारखेपासून अमलांत येईल.

**१४ सरपंच व दुय्यम सरपंच यांची निवडणूक.** (१)प्रत्येक पंचायतीचा सभासदांनीं आपल्यामधून निवडलेला सरपंच अध्यक्ष असेल. पंचायतीनें आपल्या सभासदांपैकीं एक दुय्यम सरपंच निवडला पाहिजे.

(२) मुंबई ग्रामपंचायत कायदा सन १९२० ह्याखालीं स्थापन केलेल्या व कलम ११५ खालीं चालू ठेवलेल्या पंचायतींचे त्या त्या हुद्यावर असलेले सरपंच व सभासद हे ह्या कलमाखालीं निवडले आहेत असें समजलें जाईल; व ह्या कायद्याचे ठरावाखालीं नव्या पंचायतीची घटना होईपर्यंत ते आपापल्या हुद्यावर रहातील.

**१५ सरपंच व दुय्यम सरपंच यांच्या हुद्याची मुदत.** या कायद्यांत इतर रीतीनें ठराव केला असेल तर तो वगळून, सरपंच

व दुय्यम सरपंच हे एक वर्षपर्यंत आपल्या हुद्यावर रहातील. परंतु ते फेरनिवडणुकीस पात्र रहातील.

मात्र अशा सरपंचांच्या किंवा दुय्यम सरपंचांच्या हुद्याची मुदत त्यांचेमागून अनुक्रमानें हुद्याच्या जागेवर येणाऱ्यांच्या निवडणुकीच्या आदल्या दिवसापर्यंत किंवा पंचायतीची मुदत संपेतो दिवसपर्यंत— जो अगोदर असेल त्या दिवसपर्यंत—चालू राहील व त्या दिवशीं संपेल.

मात्र जर पंचायतीची मुदत सरपंचाच्या किंवा दुय्यम सरपंचाच्या हुद्याचे मुदतीनंतर सहा महिन्यांचे आंत संपणार असेल तर, तोच सरपंच किंवा दुय्यम सरपंच, जसें असेल त्याप्रमाणें, पंचायतीची मुदत संपेतो दिवसपर्यंत आपल्या हुद्यावर कायम राहील.

**१६ सरपंचानें त्याचे मागून येणारा सरपंच नेमीतोपर्यंत आपलीं चालू कर्तव्यें करीत रहाणें.** सरपंचानें आपल्या हुद्याची मुदत संपल्यानंतरही त्या जागीं नवा सरपंच निवडला जाऊन तो रुजू होईपर्यंत आपल्या हुद्याचीं चालू कर्तव्यें करीत राहिलें पाहिजे.[१]

**१७. पंचायतीच्या स्थापनेनंतर वगैरे सरपंचांची निवडणूक.** या कायद्याखालीं एखाद्या पंचायतीची प्रथम स्थापना झाल्यानंतर, किंवा कलम १०१ किंवा १०३ खालीं त्या पंचायतीची पुनर्घटना किंवा स्थापना झाल्यानंतर, जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षानें तिची एक सभा बोलवावी, व त्यानें स्वत: तिचे अध्यक्ष व्हावें किंवा त्या पंचायतीचा सभासद नसलेल्या एखाद्या इसमास तिचे अध्यक्ष नेमावें. जिल्हा लोकल बोर्डाचा अध्यक्ष किंवा वर सांगितल्याप्रमाणें नेमलेला

---

१ नवीन निवडणूक होऊन सरपंच निवडेपर्यंत पंचायतीचें चालू कामकाज पहाणें जरूरीचें आहे म्हणून ही तरतूद केलेली आहे.

इसम तिचा अध्यक्ष राहील, परंतु त्याला मत देण्याचा अधिकार असणार नाहीं; व मग पंचायतीनें सरपंच निवडण्याचें काम करावें. समसमान मतें पडल्यास सरपंचाच्या निवडणुकीचा निकाल अध्यक्षानें तो स्वत: ठरवील त्या पद्धतीनें चिठ्ठया टाकून करावा.

(२) पंचायतीची मुदत संपल्यानंतर, किंवा कलम १५ प्रमाणें सामान्यत: सरपंच एक वर्ष आपल्या हुद्याच्या जागेवर असतो त्या वर्षाची मुदत संपल्यानंतर, सरपंचानें नवीन सरपंचाचे निवडणुकी-साठीं पंचायतीची सभा बोलाविली पाहिजे. तो त्या सभेचा अध्यक्ष असावा, परंतु तो त्यावेळीं पंचायतीचा सभासद नसेल तर त्यानें त्या सभेंत मत देऊं नये. समसमान मतें पडल्यास सरपंचानें तो ठरवील त्या पद्धतीनें चिठ्ठया टाकून निवडणुकीचा निकाल करावा.

मात्र हुद्दा सोडून जाणाऱ्या सरपंचानें वर उल्लेख केलेल्या दोन्ही मुदतीपासून तीस दिवसांचे आंत सरपंच निवडण्यासाठीं सभा बोलाविली नाहीं तर जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षानें वर पोट-कलम (१) यांत दिलेल्या पद्धतीप्रमाणें सभा बोलवावी व त्याप्रमाणें नवीन सरपंच निवडावा.

**१८. सरपंच किंवा दुय्यम सरपंच यांचे राजिनामे.** दुय्यम सरपंचाला सरपंचास लेखी नोटीस देऊन आपल्या जागेचा राजीनामा देतां येईल.

सरपंचाला जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्षास लेखी नोटीस देऊन आपल्या जागेचा राजीनामा देतां येईल.

असे राजीनामे ते मान्य केल्यापासून अमलांत येतील.

**१९ पंचायतीच्या बैठकीची वेळ व स्थळ व सभेची कार्य-पद्धति.** पंचायतीच्या बैठकीची वेळ व स्थळ व सभेची कार्यपद्धति ही पोटनियमांत सांगितल्याप्रमाणें असेल.

**२० पंचायतीचीं कामें पार पाडणें.** या कायद्याचे ठराव व पंचायतीनें पास केलेले ठराव अमलांत आणण्याचा कार्यकारी अधिकार सरपंचाचा आहे व तो या कायद्यानें किंवा या कायद्याखालीं पंचायतीवर सोपविलेलीं कामें पार पाडण्यास प्रत्यक्ष जबाबदार असेल. सरपंचाचे गैरहजेरींत त्याचे अधिकार व कर्तव्यें, पोटनियमानें इतर ठरविलें असेल तर तेवढें वगळून, दुय्यम सरपंचानें बजावावे व पार पाडावीं.

**२१ हुद्यावरून काढून टाकणें.** जिल्हा लोकल बोर्डानें पंचायतीस योग्य ती नोटीस दिल्यानंतर व त्यांना जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर, कलेक्टरची आगाऊ मंजुरी घेऊन, कोणत्याही सभासदाला, किंवा सरपंचाला किंवा दुय्यम सरपंचाला जर तो त्यांचा मताप्रमाणें सभासद, सरपंच किंवा दुय्यम सरपंच, जसें असेल त्याप्रमाणें, असण्यास नालायक असेल किंवा जर तो आपलीं कर्तव्यें पार पाडण्यांत दुराग्रहानें हलगर्जीपणा करीत असेल तर त्यास त्याचे हुद्यावरून काढून टाकावें. अशा रीतीनें काढून टाकलेल्या सरपंचाला किंवा दुय्यम सरपंचाला, जर तो अधिकारपरत्वें सभासद नसेल तर, जिल्हा लोकलबोर्डानें वर लिहिल्याप्रमाणें आगाऊ मंजुरी घेऊन, पंचायतींतूनही काढून टाकावें. अशाच तऱ्हेच्या कारणासाठीं पंचायतीनें जिल्हा लोकल बोर्डाचे आगाऊ मंजुरीनें, योग्य नोटीस दिल्यानंतर व चौकशी केल्यानंतर पंचायतीच्या सेक्रेटरीला त्याच्या हुद्यावरून काढून टाकावें.

**२२ गैरहजर राहण्यासाठीं रजा.** (१) जो कोणीही पंचायतीचा निवडलेला किंवा नेमलेला सभासद आपल्या हुद्याचे मुदतींत,—

(अ) पंचायतीनें त्याला गैरहजर राहण्यासाठीं सहा महि-

त्यांहून अधिक नाहीं इतकी रजा दिली नसतांही, लागोपाठ चार महिन्यांपेक्षां जास्त त्या गांवांत हजर नसेल, किंवा

(ब) त्या पंचायतीच्या परवानगीशिवाय लागोपाठ सहा महिने पंचायतीच्या सभेला गैरहजर राहील,

तो पंचायतीचा सभासद राहणार नाहीं व त्याची जागा रिकामी होईल.

(२) एखादी जागा या कलमाखालीं रिकामी झाली आहे किंवा नाहीं याबद्दलचा वाद कलेक्टरकडे निकालाकरतां पाठवला पाहिजे, व त्याचा निर्णय अखेरचा समजला पाहिजे.

**२३ रिकाम्या झालेल्या जागा भरणें.** (१) एकादा सरपंच किंवा दुय्यम सरपंच, किंवा नेमलेला किंवा निवडलेला सभासद पंगू झाल्यामुळें, मरण पावल्यामुळें, त्यानें राजीनामा दिल्यामुळें, तो नालायक झाल्यामुळें, रजेशिवाय गैरहजर राहिल्यामुळें किंवा काढून टाकल्यामुळें त्याची जागा रिकामी झाल्यास, कलेक्टरला नियमांत सांगितल्याप्रमाणें नोटीस देऊन, ती जागा सरपचाच्या किंवा दुय्यम सरपंचाच्या निवडणुकीनें, किंवा सभासदाच्या निवडणुकीनें किंवा नेमणुकीनें भरली पाहिजे; व तो ज्या सरपंचाचे किंवा दुय्यम सर-पंचाचे किंवा सभासदाचे जागीं त्याला नेमलें किंवा निवडलें आहे तो जर ती जागा रिकामी झाली नसती तर जितके दिवस त्या हुद्यावर असता तितके दिवस मात्र त्या हुद्यावर राहील.

(२) पोटकलम (१) खालीं सरपंचाच्या निवडणुकीची सभा जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षानें कलम १७ पोट कलम (१) यांत दिलेल्या पद्धतीप्रमाणें बोलावली पाहिजे.

**२४ जागा रिकामी असल्यामुळें पंचायतीच्या कामास बाध येत नाहीं.** पंचायतींत एकादी जागा रिकामी असली तरी, बाकीच्या सभासदांनीं जागा रिकामी झालीच नाहीं असें समजून काम करावें.

**२५ ह्या कायद्याखालीं पंचायत स्थापन होईपर्यंत तात्पुरती व्यवस्था.** ह्या कायद्यांत कांहींही सांगितलें असलें तरी, सरकार मुंबईसरकार गॅझेटमध्यें जाहीर करील त्या तारखेपर्यंत, ग्रामफंडाची व्यवस्था, मुंबई ग्रामपंचायत कायदा १९२० खालीं स्थापन केलेल्या ग्रामपंचायतींनीं शक्य तितकी या कायद्याचे ठरावाप्रमाणें करावी; त्या पंचायती या कायद्याचे कलमाखालीं स्थापन केल्या आहेत असें समजलें जाईल.

---

## भाग ३
## कार्यकारी सत्ता व कर्तव्यें.

**२६. पंचायतींची कार्यकारी सत्ता व कर्तव्यें.** (१) पंचायतीचे हातीं असलेल्या ग्रामफंडांतून शक्य असेल तितके, जिल्हा लोकलबोर्डाचे सर्वसाधारण नियंत्रणाखालीं, आपल्या गांवांत पुढील गोष्टींसाठीं वाजवी तरतूद करणें हें ग्रामपंचायतीचें कर्तव्य असेल:—

(अ) घरखर्चासाठीं पाण्याचा पुरवठा;

(ब) सार्वजनिक रस्ते, गटारें, धरणें, (बागायतीसाठीं उपयोग करण्यांत येत असलेले तलाव व विहिरी खेरीजकरून बाकीच्या) तलाव व विहिरी, व गांवांतील इतर सार्वजनिक जागा व कामें स्वच्छ ठेवणें;

(क) सार्वजनिक रस्ते, मोऱ्या, धरणें व पूल बांधणें, राखणें व दुरुस्त करणें;

मात्र जर ते रस्ते, मोऱ्या, धरणें व पूल दुसऱ्या एकाद्या सार्वजनिक अधिकाऱ्याचे ताब्यांत असतील तर अशीं कामें त्या अधिकाऱ्याच्या संमतीशिवाय हातीं घेतां येणार नाहींत;

(ड) आरोग्य, झाडलोट, व कोणताही उपद्रव न होऊं देणें व झाल्यास त्याचें निवारण करणें;

(इ) सार्वजनिक आरोग्य राखणें व त्यांत सुधारणा करणें;

(फ) पंचायतीच्या ताब्यांत किंवा त्यांच्या अधिकाराखालीं असलेल्या सार्वजनिक इमारती, गायरानें, कुरणें (यांत हिंदुस्थान जंगलाबाबत कायदा १९२७ खालीं सोंपविलेल्या जमिनींचा समावेश होतो), (बागायतीसाठीं उपयोगांत आणलेले तलाव व विहिरी खेरीज करून बाकीचे) तलाव व विहिरी, हीं राखणें व त्यांच्या उपयोगावर नियंत्रण घालणें;

(ग) गांवांत उजेडाची व्यवस्था करणें;

(ह) जत्रा, बाजार, कत्तलखाने व गाडीतळ यांच्यावर निर्बंध ठेवणें, आणि

(ई) स्मशानें व कबरस्थानें यांची तरतूद करणें व व्यवस्था ठेवणें;

(२) आपल्या गांवांतील रहिवाशांचें आरोग्य, सुरक्षितपणा, शिक्षण, सुखसोई, किंवा सामाजिक किंवा आर्थिक भरभराट यांचे वाढीस मदत होण्यासारखीं इतर आणखी कामें व योजना आपल्या गांवांत अंमलांत आणण्यासाठींही पंचायतीनें तरतूद करावी.

(३) पंचायतीनें जिल्हा लोकल बोर्डाची आगाऊ संमति घेऊन पोटकलम (१) व (२) यांत सांगितलेल्या तऱ्हेचीं कामें आपल्या गांवाबाहेर करण्यासाठींही तरतूद करावी.

**२७ संस्थांची व्यवस्था व इतर कामें पार पाडणें हीं पंचायतींकडे सोपविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचा अधिकार.** जिल्हा लोकल बोर्डानें पंचायतीची संमती घेऊन कोणत्याही वेळीं, एकाद्या संस्थेची व्यवस्था पहाण्याचें किंवा कलम २६ मध्यें न दिलेलें कोणतेंही काम करण्याचें त्या पंचायतीकडे सोंपवावें; आणि त्यानंतर सदर पंचायतीनें त्या संस्थेची व्यवस्था पहाण्याचें हातीं घेणें, किंवा तें काम करणें हें कायदेशीर होईल:

मात्र अशा प्रत्येक बाबतींत, अशी व्यवस्था पहाण्यास किंवा काम पार पाडण्यास जरूर असलेला पैसा जिल्हा लोकल बोर्डानें पंचायतीच्या हवालीं केला पाहिजे.

**२८. इतर कर्तव्यें.**

(१) पंचायतीनें:—

(अ) मुंबई प्राथमिक शिक्षण कायदा सन १९२३ याखालीं स्थानिक संस्थांनीं केलेल्या नियमास बाध न येतां, खेडेगांवांतील शाळेवर देखरेख करावी व ती चांगल्या स्थितींत चालू ठेवण्यासाठीं जरूर ती दुरुस्ती करावी; आणि

(ब) जिल्हा लोकल बोर्डानें याबाबत केलेल्या पोटनियमास बाध न येतां:—

(१) जिल्हा लोकल बोर्डानें गांवांतील कामावर नेमलेल्या मजुरावर देखरेख करावी;

(२) धर्मशाळांच्या दुरुस्तीवर देखरेख करावी;

(३) कोंडवाडे ठेवून त्यांची व्यवस्था करावी; आणि

(४) जिल्हा लोकल बोर्डानें त्यांचेकडे सोपवलीं असतील तीं कामें पार पाडावीं; आणि

(क) सरकारनें जिल्हा लोकल बोर्डाशीं विचारविनिमय करून मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन त्यांच्याकडे सोंपवलीं असतील तीं, ज्यांत बागायतीच्या पाण्याची विभागणी करणें याचा अंतर्भाव होतो अशीं इतर कारभाराचीं कामेंही पंचायतीनें, आपल्या पंचायतीच्या संमतीनें व सरकार घालील त्या अटीस बाध न येतां, करावीं.

(२) स्थानिक संस्थांनीं करावयाचे नियम हा कायदा पास झाल्यापासून सहा महिन्यांचे आंत केले पाहिजेत. तसे नियम त्या मुदतींत न केल्यास सरकारला त्या बाबतींत नियम करतां येतील.

(३) स्थानिक अधिकाऱ्यांनीं किंवा स्कूल बोर्डानें, जसें असेल त्याप्रमाणें, पुरेसे पैसे पंचायतीचें ताब्यांत दिल्याशिवाय पोट कलम (१) भाग (अ) यांत सांगितलेली खेडेगांवांतील शाळेची दुरुस्ती, किंवा जिल्हा लोकल बोर्डानें पंचायतीचे ताब्यांत पुरेसे पैसे दिल्याशिवाय, पोटकलम १ भाग (ब) यांमध्यें सांगितलेलीं कर्तव्यें, पार पाडण्यास पंचायत जबाबदार नाहीं.

---

## भाग ४

## ग्रामपंचायत संस्थापित करणें; तिची मिळकत व निधी.

**२९ ग्रामपंचायतींचें संस्थापन.** प्रत्येक ग्रामपंचायत ही "...ची ग्रामपंचायत" या नांवाची संस्थापित मंडळी असेल, तिची परंपरा सतत चालू राहील, व तिचा एक सामायिक शिक्का असेल, आणि तिला व तिच्यावर संस्थापित नांवानें फिर्याद करतां येईल, व तिला ज्या गांवांत तिचा अधिकार आहे त्या गांवांत किंवा

त्याचे बाहेर, स्थावर किंवा जंगम दोन्ही प्रकारची मिळकत मिळवतां व धारण करतां येईल, व जी कोणतीही स्थावर किंवा जंगम मिळकत तिचे ताब्यांत असेल किंवा तिनें मिळवली असेल ती भाडयानें देण्याचा, विकण्याचा किंवा इतर कोणत्याही मार्गानें दुसऱ्यास देण्याचा, व करार करण्याचा व या कायद्यास जरूर असणाऱ्या दुसऱ्या कोणत्याही गोष्टी करण्याचा तिला अधिकार असेल.

मात्र कलेक्टरची आगाऊ परवानगी घेतल्याशिवाय (कलम ३० पोटकलम १ यांत उल्लेख केलेली मिळकत सोडून इतर) कोणत्याही मिळकतीचा सात वर्षांहून अधिक मुदतीचा भाडेपट्टा केलेला असल्यास, किंवा ती विक्रीनें किंवा इतर मार्गानें दुसऱ्यास दिलेली असल्यास तो भाडेपट्टा किंवा ती विक्री किंवा इतर मार्गानें दुसऱ्यास देणें हें कायदेशीर होणार नाहीं.

**३० पंचायतीची मिळकत.** (१) कोणत्याही लोकल बोर्डास त्याचे ताब्यांत वेळोवेळीं येणारी कोणतीही मिळकत पंचायतीच्या मालकीची असावी असा ठराव करतां येईल.

मात्र, अशा कोणत्याही मिळकतीचा भाडेपट्टा, विक्री किंवा ती इतर कोणत्याही मार्गानें दुसऱ्यास देणें हें त्या लोकल बोर्डाचे आगाऊ परवानगीशिवाय कायदेशीर होणार नाहीं.

(२) गांवफंडांतून बांधलेल्या प्रत्येक कामावर त्या पंचायतीची मालकी राहील.

**३१. गांवफंड.** (१) प्रत्येक गांवांत एक निधी असावा; त्याला गांवफंड असें म्हणावें.

(२) पुढील बाबींचा गांवफंडांत अंतर्भाव होईल किंवा त्या गांवफंडाचें खातीं जमा करण्यांत याव्या:—

(अ) मुंबईचा जिल्हा म्युनिसिपल कायदा १९०१ याच्या कलम १९१ च्या ठरावा अन्वयें सरकारनें गांवफंडाकडे नेमून दिलेली रक्कम;[१]

(ब) कलम ८९ खालीं बसवलेल्या कोणत्याही कराचें किंवा फीचें उत्पन्न;

(क) कलम ४५ व कलम ४६ खालीं नुकसान भरपाई म्हणून देवविलेले दंड किंवा रकमा;

(ड) गांवफंडाचे खातीं जमा करण्यासाठीं कोर्टानें हुकूम केलेल्या इतर सर्व रकमा;

(इ) गांव कामगारांनीं गोळा केलेली माती, केर, कचरा, शेण व इतर घाण (यांत जनावरांच्या प्रेताचाही समावेश होतो) यांच्या विक्रीचें उत्पन्न, याच्या सर्व किंवा कांहीं भागावर दुसऱ्या कोणत्याही इसमाचा हक्क असेल तें खेरीज करून;

(फ) सरकारनें किंवा जिल्हा लोकल बोर्डानें गांवफंडाला दिलेली रक्कम.

---

१. मुंबई डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट १९०१ च्या कलम १८७ खालीं सरकारला एकाद्या विभागांतील लोकांवर कर बसवून त्याच्यासाठीं म्युनिसिपालिटीनें केलीं असतीं अशीं सर्व कामें करतां येतात. नंतर त्यांना अशा तऱ्हेची जरूर नाहीं असें वाटल्यास ती व्यवस्था रद्द करून, करानें जमा केलेल्या पैशांपैकीं कांहीं शिल्लक राहिलेला असल्यास तो त्या गांवांतील रहिवाशांचे हितासाठीं कलम १९१ खालीं खर्च करून टाकतां येतो. अशी शिल्लक रक्कम सरकारनें ग्रामपंचायतीस दिल्यास ती गांवफंडांत जमा करावी असें येथें सांगितलें आहे.

(ग) सरकारकडून किंवा जिल्हा लोकल बोर्डाकडून कर्जाऊ घेतलेल्या, किंवा देणगीच्या रूपानें मिळालेल्या सर्व रकमा.

(इ) सरकारच्या सामान्य किंवा विशेष हुकुमावरून ज्या दुसऱ्या रकमा गांवफंडास देण्यांत येतील त्या इतर रकमा.

(ई) पंचायतीच्या मालकीच्या असलेल्या कोणत्याही मिळकतीचें उत्पन्न किंवा किंमत; आणि

(ज) कलम ५९ खालीं दाखल केलेल्या दावे किंवा फिर्यादी यांच्या फीचें उत्पन्न.

**३२. गांवफंडाचा विनियोग.** ह्या कायद्यानुसार पंचायतीचे ताब्यांत असलेली सर्व मिळकत, व या कायद्याचे ठरावानुसार तिला मिळालेला सर्व पैसा, व त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या कोणत्याही कायद्याखालीं तिला मिळणाऱ्या सर्व रकमा, यांचा या कायद्याचे ठरावानुसार व या कायद्यांत सांगितलेल्या कामासाठीं विनियोग करावा; व हे सर्व निधी व या रकमा नियमांनीं ठरविलें असेल त्याचे ताब्यांत द्याव्या.

---

## भाग ५

## नोकरचाकरांची नेमणूक आणि हिशोब

**३३. सेक्रेटरीची नेमणूक.** प्रत्येक पंचायतीनें एक सेक्रेटरी नेमला पाहिजे. त्याची नेमणूक जिल्हा लोकलबोर्डाच्या स्टँडिंग कमेटीच्या पसंतीवर अवलंबून राहील.

**३४ नोकरांची यादी.** कलम ९८ च्या ठरावास बाध न येतां, प्रत्येक पंचायतीनें या कायद्यानें किंवा या कायद्याखालीं पंचायतीकडे सोंपविलेलीं कामें पार पाडण्यासाठीं जरूर लागणाऱ्या नोकरांची संख्या व पगार यांची यादी करून ती माहितीसाठीं जिल्हा लोकलबोर्डाकडे पाठवावी.

**३५. नोकरांची नेमणूक.** (१) सरपंचानें पंचायतीचे नोकर नेमावे व त्याचे हातीं असलेल्या ग्रामनिधींतून त्यांचा पगार द्यावा. तसेंच त्याला जरूर वाटतील तितके हंगामी नोकर निकडीच्या प्रसंगीं नेमतां येतील. व सरपंचास वेळोवेळीं लेखी हुकुमानें त्यानें नेमलेल्या कोणत्याही नोकरास दंड करतां येईल, किंवा कामावरून तात्पुरतें किंवा कायमचें काढून टाकतां येईल.

(२) पोटकलम (१) खालीं केलेल्या हुकुमावर पंचायतीकडे अपील करतां येईल.

**३६. अंदाजपत्रक व हिशेब. पंचायतीनें गांवच्या रहिवाशांची सभा बोलवावी.**

(१) पंचायतीनें सरकार ठरवील त्या तारखेस किंवा त्याच्या आंत व त्या नमुन्याप्रमाणें दरसाल पुढील गोष्टींचें पत्रक करून तें जिल्हा लोकलबोर्डाकडे पाठविलें पाहिजे:—

(अ) गेल्या वर्षाची शिल्लक व पुढील वर्षाचें अंदाजपत्रक;

(ब) नोकरावर व कलम २६ पोटकलम (१) यांत सांगितलेलीं कर्तव्यें पार पाडण्यासठीं योजलेला खर्च;

(क) कलम २६ पोटकलम (१) व कलम २८ पोटकलम (१) याखालीं योजलेला खर्च.

(२) जिल्हा लोकलबोर्डानें असें पत्रक मिळाल्यापासून तीन महिन्यांचे आंत तें मंजूर करावें किंवा कलम २६ व २८ यांखालीं दिलेल्या कामावर योजलेला खर्च वाढवला पाहिजे किंवा कमी केला पाहिजे असें सांगावें.

मात्र, त्या गांवचें पुढील वर्षाचें गांवफंडाचें अंदाजीं उत्पन्न व चालू शिल्लक यांच्यापेक्षां एकंदर योजलेला खर्च जास्त व्हावा असें सांगण्याचा जिल्हा लोकल बोर्डास अधिकार नाहीं.

(३) सरकार नियम करून ठरवील त्या पद्धतीप्रमाणें पंचायतीनें हिशोब ठेवले पाहिजेत, व सरकारनें नियम करून ठरविलेल्या तारखेस किंवा त्याचे आंत व पद्धतीप्रमाणें त्याचा वार्षिक आढावा जिल्हा लोकलबोर्डाकडे पाठवला पाहिजे.

(४) पंचायतीनें नियमांत सांगितलेल्या पद्धतीनें व वेळीं आपल्या गांवांतील वयांत आलेल्या सर्व रहिवाशांची सभा बोलावली पाहिजे, व त्या सभेपुढें गेल्या हिशोबाचें पत्रक, गेल्या वर्षाच्या कामाचा अहवाल, व पुढील वर्षी करावयाच्या कामाचा कार्यक्रम हे ठेवले पाहिजे.

---

पंचायतीनें आपलें बजेट कोणत्या पद्धतीनें करावें व आपापले हिशोब कोणत्या पद्धतीनें ठेवावे, त्याबद्दल सरकारनें कलम १०८ (फ) खालीं केलेले नियम परिशिष्ट 'अ' मध्यें दिलेले आहेत.

# भाग ६

## गांवकोर्टांची घटना व त्यांचे अधिकार.

**३७. दावे व फिर्यादी चालविण्यासाठीं गांवकोर्टें स्थापन करण्याचा सरकारचा अधिकार.**

(१) ज्या गांवांत ग्रामपंचायत स्थापन केलेली आहे त्या गांवांत या कायद्याखालीं गांवकोर्टांना दिलेले सर्व किंवा कांहीं न्यायदानाचे अधिकार नियमांप्रमाणें बजावण्यासाठीं, त्याबाबत ठरवलेल्या तारखे-पासून एक गांवकोर्ट स्थापन केलें आहे असें सरकारनें मुंबई—सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन जाहीर करावें.

(२) अशा गांवकोर्टावर कलेक्टर नेमील ते पांच किंवा सात सभासद असावे. जर गांवकोर्टांत पांच सभासद असतील तर त्यां-पैकीं तीन, व गांवकोर्टांत जर सात सभासद असतील तर त्यांपैकीं पांच, कलेक्टरनें पंचायतीच्या सभासदांतून, नियमानें घालून दिलेल्या पद्धती-प्रमाणें नेमले पाहिजेत. बाकीचे सभासद कलेक्टरनें, नियमानें घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणें, जे सरकारचे किंवा एखाद्या स्थानिक संस्थेचे नोकर नाहींत अशा लोकांमधून नेमले पाहिजेत; मग ते पंचायतीचे सभासद असोत किंवा नसोत.

मात्र, ज्या गांवांत गांवकोर्ट स्थापन केलें आहे त्या गांवचे हद्दींत जर एखाद्या गांवचा इनामदार असेल तर कलेक्टरनें त्याला गांव-कोर्टाचा सभासद नेमलें पाहिजे. अशा एखाद्या गांवांत एकाहून अधिक इनामदार असतील तर कलेक्टरनें त्यांपैकीं प्रमुख इनामदारास गांवकोर्टाचा सभासद नेमलें पाहिजे. जर असा एखादा इनामदार

गांवकोर्टावर काम करण्यास असमर्थ किंवा नाखूष असेल तर कलेक्टरनें, त्याला पसंत असलेला त्या इनामदाराचा प्रतिनिधी नेमला पाहिजे.

प्रमुख इनामदार कोण, किंवा त्या इनामदाराचा प्रतिनिधी कोण याबद्दलचा कलेक्टरचा निर्णय अखेरचा समजावा.

(३) गांवकोर्टाचे सभासद नेमतांना कलेक्टरनें त्या गांवांत रहाणाऱ्या सर्व अल्पसंख्यांक वर्गांचें न्याय्य व योग्य प्रतिनिधित्व गांवकोर्टावर राखण्याकडे लक्ष दिलें पाहिजे.

(४) गांवकोर्टाचे सभासदांतून कलेक्टरनें गांवकोर्टाचा अध्यक्ष नेमला पाहिजे.*

**३८ चालू दाव्याबद्दल अपवाद.** कलम ३७ खालीं अधिकार दिलेल्या गांवकोर्टाला चौकशी करतां येण्यासारखा, कलम ३९ किंवा ४१ मध्यें सांगितलेल्या स्वरूपाचा कोणताही दावा किंवा फिर्याद जर कोणच्याही कोर्टांत चालू असेल तर तो दावा किंवा फिर्याद, व त्यांतून उपस्थित होणारीं व त्यांच्यांशीं संबंध असलेलीं इतर सर्व

---

* १९२५ च्या हॅच कमेटीनें संयुक्तप्रांतांतील ग्रामपंचायतीच्या कायद्याचे धर्तीवर येथील निवडक पंचायतींनाही कांहीं किरकोळ दिवाणी व फौजदारी कामांचा निवाडा करण्याचा अधिकार द्यावा अशी शिफारस केली होती. व मूळच्या बिलांत पंचायतींना तसा अधिकार दिलाही होता. सिलेक्ट कमेटीला ग्रामपंचायतींना न्यायदानाचे हक्क देण्याचें तत्त्व मान्य होतें; परंतु त्यांचे मतें हा नवीनच प्रयोग असल्यामुळें, लोकनियुक्त सभासद असलेल्या सर्व पंचायतींना हा अधिकार एकदम न देतां, कलेक्टरनें त्यांपैकीं कांहीं अनुभवी व निवडक पंच व त्या गांवांतील कांहीं इतर तज्ञ लोक यांचें मिळून एक वेगळें ' गांव कोर्ट ' स्थापन करून त्याला हे अधिकार देणें योग्य होईल असें वाटलें. ती त्यांची शिफारस कौन्सिलनें मान्य करून त्याप्रमाणें या कलमांत तरतूद केली आहे. (जास्त चर्चेसाठीं प्रस्तावना पहा.)

प्रकरणें हीं, त्या कोर्टानें किंवा तीं चालवण्यास, ऐकण्यास किंवा निकाल करण्यास हुकमत असणाऱ्या दुसऱ्या एकाद्या कोर्टानें, हा कायदा पास झालाच नाहीं असें समजून, चालवून त्यांचा निकाल करावा[१]

**३९. गांवकोर्टास चालवतां येण्यासारखे दावे.** (१) कलम ४० यांत इतर कांहीं सांगितलें असेल तर तें वगळून, गांवकोर्टाला पुढील दाव्यांचा—जर त्या दाव्यांतील मागणीची रक्कम किंवा किंमत २५ रुपयांहून जास्त नसेल तर—निकाल करण्याचा अधिकार आहे:—

(अ) स्थावर मिळकतींतील कोणत्याही हितसंबंधास बाध न आणणाऱ्या अशा करारांवरून येणें असलेल्या पैशांबद्दलचे दावे;

(ब) जंगम मिळकत किंवा त्या मिळकतीची किंमत परत मिळण्यासाठीं दावे;

(क) जंगम मिळकत बिगर हक्कानें घेतल्याबद्दल अगर तिला अपाय केल्याबद्दल नुकसान भरून मागण्यासाठीं केलेले दावे.

(२) गांवकोर्टासमक्ष नमूद केलेल्या उभयपक्षांच्या लेखी संमतीनें, वर पोटकलम (१) यांत वर्णन केलेल्या स्वरूपाचे दावे, ज्याची किंमत १०० रुपयांपेक्षां अधिक नाहीं असे, गांवकोर्टाला चालवतां येतील.

(३) सरकारला मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन त्या जाहीरनाम्यांत दिलेल्या किंमतीइतके परंतु ज्यांची किंमत १०० रुपयांहून अधिक नाहीं असे, पोटकलम (१) यांत दिलेल्या स्वरू-

---

१ गांवकोर्ट स्थापन झालें तरी त्याचे अधिकारांत येणारे, पण पूर्वीच दुसऱ्या कोर्टांत दाखल केलेलें काम त्याच कोर्टानें पुढें चालवावें म्हणून ही तरतूद केलेली आहे.

ऱ्यांचे दावे, एकाद्या गांवकोर्टाला चालवतां येतील असें जाहीर करतां येईल.

**४०. गांवकोर्टाला न चालवतां येण्यासारखे दावे.** कोणत्याही गांवकोर्टांत पुढील प्रकारचे दावे दाखल करतां येणार नाहींत:

(१) भागीदारांच्या हिशेबाच्या बाकीवरून आणलेले;

(२) एकादा मनुष्य मृत्युपत्र केल्याशिवाय मेला असल्यास त्याच्या मिळकतीच्या हिश्श्याबद्दल किंवा त्याच्या विभागाबद्दल; किंवा मृत्युपत्राअन्वयें मिळावयाच्या देणगीसाठीं किंवा देणगीच्या भागासाठीं;

(३) सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल, किंवा एकादी स्थानिक अधिकारी संस्था, किंवा सरकारचा एकादा अधिकारी किंवा नोकर, किंवा एकाद्या स्थानिक अधिकारी संस्थेचा सभासद, अधिकारी किंवा नोकर ते अधिकारी म्हणून काम करीत असतांना, यांच्यातर्फे किंवा यांच्या विरुद्ध;

(४) अज्ञानानें किंवा अज्ञानाविरुद्ध किंवा वेडयानें किंवा वेडयाविरुद्ध आणलेले;

(५) ज्या तंटयासंबंधीं किंवा प्रश्नासंबंधीं मुलकी कोर्टाला दावा किंवा अर्ज चालवतां येईल त्यासंबंधीं.

**४१. गांवकोर्टाला चौकशी करतां येण्यासारखे गुन्हे[१].**

---

१ या कलमांत गांवकोर्टाला चौकशी करण्याची हुकमत असलेले गुन्हे दिले आहेत. व गुन्ह्यांच्या व्याख्या इंडियन पीनल कोडमध्यें दिलेल्या आहेत परंतु त्यांपैकीं प्रत्येक गुन्हा शाबीत होण्यास कोणकोणत्या गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत तें येथें दर्शविलें आहे.

(१) खालील गुन्ह्यांची व त्याचप्रमाणें ते करण्यास साह्य करणें[२] अगर ते करण्याचा प्रयत्न करणें या गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार गांवकोर्टाला आहे:--

(अ) इंडियन पीनल कोडखालीं-- कलम

आपखुषीनें दुखापत करणें[३] ३२३

क्रोधास चढण्यास मोठें व आकस्मिक कारण[४] झाल्या-

---

२-३ आपखुषीनें दुखापत करणें:–कोणत्याही माणसास शारीरिक दुःख किंवा रोग किंवा पंगुपणा उत्पन्न केल्यास त्यास 'दुखापत' केली असें म्हणतात. (क. ३१९) ही दुखापत जर ती करण्याचे इरादानें केली असेल किंवा जी गोष्ट. करण्यामुळें दुखापत होण्याचा संभव आहे असें माहीत आहे अशी गोष्ट करून केली असेल तर ती दुखापत 'आपखुषीनें' केली आहे असें म्हणावें. (क. ३२१) अशा आपखुषीनें केलेल्या दुखापतीबद्दल कलम ३२३ खालीं शिक्षा करतां येते.

४ मोठें व आकस्मिक कारण:–कोपास चढण्यास झालेलें कारण हें मोठें व आकस्मिक आहे किंवा नाहीं हें त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून राहील. आणि असें कारण जर

(१) अपराध करण्यास सबब व्हावी म्हणून अपराध्यानें शोधून काढलें, किंवा आपखुषीनें उकरून काढलें तर, किंवा

(२) कायद्याप्रमाणें केलेलें कृत्य असलें किंवा आपल्या सरकारी नोकरीच्या नात्यानें सरकारी नोकरानें कायद्याप्रमाणें केलेलें कांहीं कृत्य असलें, किंवा

(३) खाजगी नात्यानें बचाव करण्याचा कायदेशीर हक्क कोणी बजावीत असतां त्यानें केलेलें कृत्य असेल, तर

इं. पी. कोडच्या क. ३५२ किंवा क. ३५८ खालीं जी शिक्षा व्हावयाची ती क्रोधास चढण्यास मोठें व आकस्मिक कारणामुळें कमी व्हावयाची नाहीं.

शिवाय अंगावर जाणें[५] अगर अन्यायाची बळजोरी करणें[६] ३५२

क्रोधास चढण्यास मोठें व आकस्मिक कारण झाल्यामुळें अंगावर जाणें अगर अन्यायाची बळजोरी करणें ३५८

ज्यांत चोरीच्या मालाची किंमत १० रुपयांपेक्षां अधिक नाहीं, अशी चोरी[७] ३७९

ज्यांत झालेलें नुकसान अगर खराबी १० रुपयांपेक्षां अधिक किंमतीची नाहीं, अशी अपक्रिया[८] ४२६

---

५ अंगावर जाणें:–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील दोन गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत. (१) एका माणसानें दुसऱ्याचे देखत अंगविक्षेप किंवा तयारी केली; व (२) अशा अंगविक्षेप किंवा तयारी करणाऱ्या माणसाची त्या दुसऱ्या माणसाचे मनांत आतां हा आपणास अन्यायाची बळजोरी करणार अशी भीति उत्पन्न करण्याचा हेतू होता किंवा ती उत्पन्न होईल हें माहीत होतें. नुसतेच शब्द बोलण्यामुळें अंगावर गेला असें होत नाहीं पण त्या शब्दामुळें त्याच्या अंगविक्षेपाचा किंवा तयारीचा वर दिलेल्याप्रमाणें अर्थ होऊं शकेल. क. (३५१) या गुन्यास क. ३५२ खालीं शिक्षा करतां येते.

६ अन्यायाची बळजोरी:–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत:– (१) एका मनुष्यानें दुसऱ्यावर हेतुपुरःसर बळजोरी केली; (२) ही बळजोरी त्या मनुष्याचे संमतीशिवाय केली; (३) व ती गुन्हा करण्याचे हेतूनें किंवा त्या मनुष्यास नुकसान, भीति किंवा त्रास उत्पन्न करण्यासाठीं किंवा तो होण्याचा संभव आहे हें जाणून केली. (क. ३५०)

७ चोरी–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत–अपराधी मनुष्यानें (१) एकाद्या मनुष्याच्या संमतीवाचून (२) त्याच्या ताब्यांतून (३) कांहीं जंगम माल (४) लबाडीनें तो घ्यावयाकरतां (५) हलवला. (क. ३७८)

८ अपक्रिया–हा गुन्हा शाबीत होण्यास तीन गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत (१) एकाद्या माणसानें कोणत्याही मालाचा नाश, किंवा त्यांत किंवा त्याच्या

सार्वजनिक शांततेचा भंग करविण्याचे हेतूनें एका-
द्याचा बुद्धिपूर्वक अपमान करणें[९] ५०४

मात्र जर गुन्हेगार मनुष्याला पकडलें नसेल किंवा त्याची ओळख पटून त्याचें नांव मिळालें नसेल तर त्या चोरीच्या गुन्ह्याची चौकशी कोणत्याही गांवकोर्टाला करतां येणार नाहीं.

(ब) गुरांच्या अतिक्रमणाचा कायदा १८७१ खालीं–गुरांना पकडतांना बळजोरीनें विरोध करणें किंवा त्यांना सोडविणें[१०]
कलम २४

---

स्थितींत फेरफार केला. (२) त्या नाशामुळें किंवा फेरफारामुळे त्या मालाची किंमत किंवा उपयुक्तता नाहींशी किंवा कमी झाली किंवा त्याची नुकसानी झाली. व (३) हें करण्यांत सर्वसाधारण लोकांचें किंवा एकाद्या मनुष्याचे अन्यायानें नुकसान किंवा खराबी करण्याचा त्या मनुष्याचा इरादा होता, किंवा तें होण्याचा संभव आहे हें त्यास माहीत होतें. या कलमान्वयें स्वतः-च्या, किंवा स्वतःच्या व दुसऱ्याच्या मिळून एकत्र मालकीच्या मालाचें नुक-सान किंवा खराबी करूनही अपक्रिया होईल. उदाहरणार्थ स्वतःच्या घराचा विमा उतरल्यानंतर विमा कंपनीचें नुकसान व्हावें म्हणून त्या घराला आग लावल्यास ती अपक्रिया होईल. ( क. ४२५ )

९ **बुद्धीपूर्वक अपमान**— या कलमाखालीं गुन्हा शाबीत होण्यास तीन गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत. (१) एका मनुष्यानें दुसऱ्याचा बुद्धिपूर्वक अप-मान केला. (२) तो अपमान त्या मनुष्यास क्रोधास चढविण्यासारखा होता; (३) व त्या क्रोधास चढल्यामुळें त्या मनुष्यानें सार्वजनिक शांततेचा भंग करावा अगर दुसरा एखादा गुन्हा करावा असा हेतू, किंवा तो याप्रमाणें करण्याचा संभव आहे याची त्यास जाणीव होती.

१० गुरांच्या अतिक्रमणाचा कायदा कलम २४ खालीं पुढील दोन प्रकारच्या गुन्ह्यास शिक्षा दिलेली आहे. (१) त्या कायद्याखालीं धरण्यास पात्र असलेलीं गुरें धरण्यास बळजोरीनें विरोध करणें; व (२) अशीं गुरें

(क) या कायद्याखालीं शिक्षेस पात्र केलेल्या पोर्टनियमांचें उल्लंघन करणें.

(२) सरकारला, मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन, खालीं दिलेल्या इंडियन पीनल कोडखालील सर्व अगर कांहीं गुन्ह्यांची व त्याचप्रमाणें ते करण्यास साह्य करणें अगर ते करण्याचा प्रयत्न करणें या गुन्ह्यांची चौकशी करण्याचा अधिकार, एकाद्या गांवकोर्टाला देतां येईल.

जिवास धोका आणणारा रोग एकाद्या कृत्यानें पसरण्याचा संभव आहे हें माहीत असून निष्काळजीपणानें तें कृत्य करणें[११] कलम २६९

---

धरल्यानंतर तीं कोंडवाड्यांतून, किंवा एकादा मनुष्य तीं कोंडवाड्यांत नेत असतां, तो मनुष्य जवळच असून या कायद्यानें त्याला दिलेले अधिकार बजावीत असतां, त्याचे हातून सोडवणें.

त्या गुन्ह्याची चौकशी करण्यास या कलमानें गांवकोर्टास अधिकार दिला आहे.

**साह्य करणें**– कोणाही मनुष्यानें एखाद्या गुन्ह्याबद्दल पुढील तीन पैकीं कृत्य केल्यास त्यानें त्या गुन्ह्यास साह्य केलें असें होईल.– (१) तो गुन्हा करण्यास कोणासही उत्तेजन देणें; (२) तो गुन्हा करण्याबद्दल संगनमत करणें; (३) बुद्धीपुरस्सर तो गुन्हा करण्याचे कामीं साह्य करणें.

(क. १०७ इं. पी. को. पहा.)

११. जें कृत्य केल्यानें जिवास धोका आणणारा एकादा रोग पसरण्यासारखा आहे हें माहीत असून किंवा असें मानण्यास त्यास जागा असून जो कोणी गैरकायद्यानें अगर हयगयीनें तें कृत्य करील त्यास इं. पी. कोडचे क. २६९ मध्यें शिक्षा सांगितलेली आहे.

सार्वजनिक झऱ्यांतलें अगर हौदांतलें पाणी गढूळ करणें[१२] २७७

एकाद्या सार्वजनिक रस्त्यावर धोका, अडथळा अगर नुकसान करणें[१३] २८३

ज्यांत चोरीच्या मालाची किंमत रु. २० पेक्षां अधिक नाहीं अशी चोरी[७] ३७९

ज्यांत झालेलें नुकसान अगर खराबी रु. २० पेक्षां अधिक किंमतीची नाहीं, अशी अपक्रिया[८] ४२६

---

१२. एकाद्या सार्वजनिक झऱ्यांतलें किंवा हौदांतलें पाणी ज्या कामासाठीं नेहमीं उपयोगी पडतें त्या कामाला त्याची योग्यता कमी होईल अशा तऱ्हेनें जो कोणी तें खराब करील अगर गढूळ करील त्यास इं. पी. कोडच्या कलम २७७ मध्यें शिक्षा सांगितली आहे.

१३ जर एकाद्यानें कांहीं कृत्य केल्यानें किंवा त्याच्या स्वाधीन अगर ताब्यांत जो माल आहे त्याची व्यवस्था न केल्यानें एकाद्या सार्वजनिक रस्त्यावर कोणाही मनुष्यास धोका, हरकत किंवा नुकसान होईल तर त्यास क. २८३ मध्यें शिक्षा सांगितली आहे.

७ **चोरी**–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत– अपराधी मनुष्यानें (१) एकाद्या मनुष्याच्या संमतीवाचून (२) त्याच्या ताब्यांतून (३) कांहीं जंगम माल (४) लबाडीनें तो घ्यावयाकरतां (५) हलवला. क. (३७८)

८ **अपक्रिया**–हा गुन्हा शाबीत होण्यास तीन गोष्टी सिद्ध केल्या पाहिजेत:– (१) एकाद्या माणसानें कोणत्याही मालाचा नाश, किंवा त्यांत किंवा त्याच्या स्थितींत फेरफार केला. (२) त्या नाशामुळें किंवा फेरफारामुळें त्या मालाची किंमत किंवा उपयुक्तता नाहींशी किंवा कमी झाली किंवा त्यांची नुकसानी झाली. व (३) हें करण्यांत सर्वसाधारण लोकांचें किंवा एकाद्या मनुष्याचें अन्यायानें नुकसान किंवा खराबी करण्याचा त्या मनुष्याचा इरादा होता, किंवा तें होण्याचा संभव आहे हें त्यास माहीत होतें. या कलमान्वयें स्वतःच्या

अन्यायानें अतिक्रमण करणें[१४] ... ४४७
घरांत अतिक्रमण करणें[१५] ... ४४८
ज्या बारदानांत माल आहे अगर असावा असें वाटतें असें बंद केलेलें बारदान लबाडीनें फोडणें अगर मोकळें करणें ... ४६१
परस्त्रीगमन[१६] ... ४९७

---

किंवा स्वतःच्या व दुसऱ्याच्या मिळून एकत्र मालकीच्या मालाचें नुकसान किंवा कराबी करूनही अपक्रिया होईल. उदाहरणार्थ स्वतःच्या घराचा विमा उतरल्यानंतर विमा कंपनीचें नुकसान व्हावें म्हणून त्या घराला आग लावल्यास ती अपक्रिया होईल. (क. ४२५)

१४ **अन्यायानें अतिक्रमण करणें**:–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील गोष्टी सिद्ध झाल्या पाहिजेत:–(१)एक मनुष्य दुसऱ्याचे ताब्यांत असलेल्या मिळकतींत किंवा मिळकतीवर गेला. (२) असें जाणें जर न्याय्य असेल, तर तो तेथें अन्यायानें राहिला; (३) असें जाणें किंवा गैरकायदा रहाणें हें गुन्हा करण्याच्या इराद्यानें, किंवा ज्याचे ताब्यांत ती मिळकत आहे त्याला भीति दाखविण्याच्या, त्रास देण्याच्या किंवा त्याचा अपमान करण्याचे इराद्यानें केलें होतें. (क. ४४१) या गुन्ह्यास क. ४४७ मध्यें शिक्षा सांगितली आहे.

१५ **घर फोडणें**:–ज्या इमारतींत किंवा तंबूंत अगर नावेंत माणसें रहात असतील, किंवा जी इमारत पूजेसाठीं उपयोगांत आणली जात असेल अशा इमारतींत अगर तंबूंत अगर नावेंत शिरून अगर तेथें राहून कोणी अन्यायाची आगळीक करील तर त्यानें घराविषयीं आगळीक केली असें म्हणावें. घराविषयीं आगळीक होण्यास, अन्यायानें आगळीक करणारा आंत जातांना त्याच्या शरीराच्या कोणत्याही भागाचा प्रवेश झाला म्हणजे पुरे. (क.४४२) या गुन्ह्यास क. ४४८ मध्यें शिक्षा सांगितली आहे.

१६ **परस्त्रीगमन**:–हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील तीन गोष्टी शाबीत झाल्या पाहिजेत:–(१) एका मनुष्यानें, जी दुसऱ्या मनुष्याची बायको आहे

जिला नवरा आहे अशा स्त्रीला बदमार्गाच्या इराद्यानें फूस लावून नेणें, अगर घेऊन जाणें, अगर अटकावून ठेवणें[१७] ४९८

**४२ चोरीचा आरोप असलेल्या कांहीं माणसांची चौकशी करण्याचा अधिकार गांवकोर्टाला नाहीं**—जर इंडियन पीनल कोड कलम ३७९ खालीं शिक्षेस पात्र असलेल्या चोरीच्या गुन्ह्यांतील एकाद्या आरोपीला —

(अ) इंडियन पीनल कोडाच्या भाग १२ अगर भाग १७ खालीं तीन वर्षें किंवा त्यांहून अधिक इतक्या कोणत्याही तऱ्हेच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्याबद्दल[१] पूर्वी शिक्षा झाली असेल,

---

व ही गोष्ट त्याला माहीत आहे किंवा असें वाटण्याचें कारण आहे, अशा स्त्रीशीं शरीरसंभोग केला; (२) हा शरीरसंभोग त्या दुसऱ्या मनुष्याचे संमतीशिवाय किंवा त्यानें कानाडोळा केल्यावाचून केला; व (३) तो शरीर संभोग जबरी संभोग नव्हता. (क. ४९७).

१७ जिला नवरा आहे अशा स्त्रीस अन्यायानें फूस लावून नेणें किंवा अटकावून ठेवणें—हा गुन्हा शाबीत होण्यास पुढील गोष्टी सिद्ध झाल्या पाहिजेत:—(१) जिला नवरा आहे अशी स्त्री त्या मनुष्याकडून किंवा त्या मनुष्यातर्फे ज्याचे पालकत्वाखालीं ती आहे अशा मनुष्याकडून काढून नेणें किंवा फूस लावून नेणें, किंवा लपवून ठेवणें किंवा अटकावून ठेवणें, व (२) हें काढून नेण्याचें वगैरे कृत्य तिचा दुसऱ्याशीं गैरकायदा संभोग व्हावा या हेतूनें केलेलें असणें (क. ४९८).

१. इं. पी. कोडमधील भाग १२ यांत नाणीं आणि सरकारी स्टँप यांबद्दलचे गुन्हे दिलेले आहेत; आणि भाग १७ यांत मालाबद्दलचे गुन्हे दिलेले आहेत. ह्या गुन्ह्यांची चौकशी करण्यास पंचायतीस हुकमत न देण्याचें कारण असें आहे कीं अशा गुन्हेगारांना इं. पीनल कोड खालीं जास्त शिक्षा सांगितलेली आहे ती पंचायतीस देतां येणार नाहीं.

(ब) पूर्वी चोरीच्या गुन्ह्याबद्दल कोणत्याही ग्रामपंचायतीनें दंड केलेला असेल; किंवा

(क) तो जर गुन्हेगार जातीचा कायदा, १९२४ च्या कलम ४ खालीं गुन्हेगार जातींतील म्हणून नोंदलेला असेल[२]; अगर

(ड) त्याचेकडून क्रिमिनल प्रोसीजर कोड, १८९८ च्या कलम १०९ अगर कलम ११० खालीं दाखल केलेल्या कामांत, चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल जातमुचलका घेतला असेल[३]; तर त्याची चौकशी गांवकोर्टाला करतां येणार नाहीं.

**४३ सरकारी नोकरानें केलेल्या अगर त्याचे विरुद्ध झालेल्या गुन्ह्याची चौकशी करण्याचा अधिकार गांवकोर्टाला नाहीं**– जर कलम ४१ मध्यें दिलेल्या कोणत्याही गुन्ह्याच्या चौकशींतील अर्जदार अगर आरोपी हा, ती पंचायत स्थापन केलेला गांव ज्या जिल्ह्यांत असेल त्यांत सरकारी नोकर असेल तर त्या गुन्ह्याची चौकशी करण्याचा अधिकार त्या गांवकोर्टाला नाहीं.

मात्र, अर्जदार जरी सरकारी नोकर असला तरी, गुन्हा जर एखाद्या पोटनियमाचें उल्लंघन केल्याबद्दलचा असेल तर गांवकोर्टाला त्या गुन्ह्याची चौकशी करण्याला प्रतिबंध नाहीं.

**४४ गांवकोर्टानें ठरविलेली गुन्ह्याची शाबिती ही पूर्वी झालेली गुन्ह्याची शाबिती समजली जाणार नाहीं** –गांव-

---

२. गुन्हेगार जातींचा कायदा, १९२४, कलम ४ खालीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें, आपल्या जिल्ह्यांतील गुन्हेगार जातींच्या लोकांची नोंद केलेली असते.

३. क्रि. प्रो. कोडाच्या कलम १०९ खालीं, उडाणटप्पू किंवा संशयित लोकांकडून चांगली वर्तणूक ठेवण्याबद्दल जामीन घेण्याचा मॅजिस्ट्रेटला अधिकार आहे; त्याचप्रमाणें कलम ११० खालीं नेहमीं गुन्हा करणाऱ्या लोकांकडून, असा जामीन मागण्याचा त्याला अधिकार दिलेला आहे.

कोर्टानें ह्या कायद्याखालीं ठरविलेली गुन्ह्याची शाबिती ही इंडियन पीनल कोड कलम ७५ च्या बाबत पूर्वी झालेली गुन्ह्याची शाबिती समजली जाणार नाहीं.*

**४५. जास्तीत जास्त शिक्षा.** (१) कलम ४१ मध्यें दिलेल्या गुन्ह्यांबद्दल गांवकोर्टाला जास्तींत जास्त खालीलप्रमाणें शिक्षा करतां येईल:—

(अ) इंडियन पीनल कोडखालीं रु. १० पेक्षां अधिक नाहीं इतका, अगर नुकसानीच्या किंवा खराबीच्या रकमेच्या दुप्पट परंतु २० रुपयांपर्यंत दंड;

(ब) गुरांच्या अतिक्रमणाचा कायदा १८७१ च्या कलम २४ खालीं रु. ५ पेक्षां अधिक नाहीं इतका दंड; आणि

(क) या कायद्याखालीं शिक्षेस पात्र असलेल्या पोटनियमाचे उल्लंघनाबद्दल—

१० रु. पेक्षां अधिक नाहीं इतका, किंवा कलम १०९, पोट-कलम (३) मध्यें दिलेल्या चालू उल्लंघनाबद्दल दररोज १ रु. हून अधिक नाहीं इतका, दंड.

(२) कोणत्याही गांवकोर्टाला, मूळची किंवा दंड न दिल्याबद्दल तुरुंगाची शिक्षा, किंवा फटक्याची शिक्षा देतां येणार नाहीं.

---

*पूर्वी एकदां नाण्यांसंबंधीं किंवा मालासंबंधीं गुन्हा केल्याबद्दल शिक्षा झालेल्या अपराध्यानें पुन्हां त्याच तऱ्हेचा गुन्हा केल्यास त्यास जास्त शिक्षा द्यावी असें इं. पी. कोडाच्या कलम ७५ मध्यें सांगितलें आहे. पंचायतीनें शिक्षा केलेले गुन्हे हे किरकोळ स्वरूपाचे असल्यामुळें. तशाच तऱ्हेचा गुन्हा पुन्हा केल्यास त्या गुन्हेगाराला जास्त शिक्षा देणें योग्य होणार नाहीं. म्हणून अशा गुन्ह्यास इं. पी. कोडाचें ७५ कलम लागू केलें नाहीं.

**४६. कांहीं विशिष्ट गांवकोर्टांना जास्त शिक्षा देण्याला अधिकार देण्याचा सरकारचा अधिकार.** सरकारला, मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन, एकाद्या गांवकोर्टाला खालीलप्रमाणें जास्तींत जास्त शिक्षा देण्याचा अधिकार देतां येईल:—

(अ) कलम ४१ मध्यें दिलेल्या इंडियन पीनल कोडाच्या कलमांखालीं—

रु. २० पेक्षां अधिक नाहीं इतका, किंवा नुकसानीच्या अगर खराबीच्या रकमेच्या दुप्पट, यांपैकीं जास्त असेल तितका दंड.

(ब) गुरांचा अतिक्रमणाचा कायदा १८७१ च्या कलम २४ खालीं रु. १० पेक्षां अधिक नाहीं इतका दंड.

**४७. फिर्यादींची नुकसानभरपाई.** कलम ४५ किंवा कलम ४६ खालीं दंडाची शिक्षा करतांना, गांवकोर्टाला असें फर्मावतां येईल कीं, वसूल केलेल्या दंडाच्या सर्व रकमेचा किंवा तिच्या कांहीं भागाचा विनियोग—

(अ) फिर्यादीला फिर्यादीचे कामीं झालेला रास्त खर्च भरून देण्याकडे करावा, किंवा

(ब) घडलेल्या गुन्ह्यांमुळें ज्या मनुष्याचें विशेष नुकसान किंवा खराबी झाली आहे, अशा मनुष्यास नुकसानभरपाई देण्याचे कामीं करावा.

**४८. खोटया किंवा बेजबाबदारपणें केलेल्या फिर्यादीबद्दल आरोपीला नुकसानभरपाई.** जर चौकशीनंतर गांवकोर्टाची अशी खात्री झाली कीं, त्याचे पुढें दाखल केलेली फिर्याद ही खोटी, बेजबाबदार किंवा त्रास देण्याचे हेतूनें केलेली आहे, तर त्या कोर्टाला, त्याला

वाटेल तितकी, पण ५ रुपयांहून अधिक नाहीं इतकी नुकसान-भरपाई, आरोपीला फिर्यादीनें द्यावी असा हुकूम करतां येईल.

**४९. अल्पवयी गुन्हेगार.** एकादा अल्पवयी गुन्हेगार गांवकोर्टाच्या मतानें त्या गुन्ह्याबद्दल दोषी ठरविण्याचे वेळीं १६ वर्षांहून कमी वयाचा असेल तर त्याला गांवकोर्टानें शिक्षा देण्याचे ऐवजीं योग्य ती ताकीद देऊन सोडून द्यावें.

**५०. हितसंबंध असलेल्या सभासदांनीं गांवकोर्टावर काम करूं नये.** जर गांवकोर्टापुढें चालू असलेल्या कोणत्याही दाव्यांत किंवा फिर्यादींत त्या गांवकोर्टाचा एकादा सभासद पक्षकार असेल किंवा त्याचा त्यांत हितसंबंध असेल तर त्यानें त्या कोर्टापुढें तो दावा किंवा फिर्याद चालू असेपर्यंत, त्या कोर्टावर काम करूं नये.

एकाद्या गांवकोर्टाचा सभासद दाव्यांत किंवा फिर्यादींत पक्षकार आहे किंवा नाहीं किंवा त्यांत त्याचा हितसंबंध आहे किंवा नाहीं ह्याबद्दलचा वाद, त्या दाव्यांतील किंवा फिर्यादींतील एकाद्या पक्षकाराचे लेखी अर्जावरून, कलेक्टरकडे किंवा या बाबतींत तो ज्याला अधिकार देईल अशा अधिकाऱ्याकडे निकालासाठीं सोंपविला पाहिजे. कलेक्टरचा किंवा त्या अधिकाऱ्याचा या बाबतींतील निर्णय अखेरचा समजला पाहिजे.

**५१. निवाडा झालेल्या दाव्याची चौकशी न करणें, व चालू दावे व फिर्यादीः-** (१) जर त्याच पक्षकारांचे दरम्यान किंवा त्यांचेपासून ज्यांना हक्क प्राप्त झाले आहेत अशांचे दरम्यान उपस्थित झालेल्या एखाद्या विषयाबद्दलच्या दाव्याचा किंवा मुद्याचा वाद, पूर्वी दाखल केलेल्या एखाद्या दाव्यांत, कोणत्याही

योग्य हुकमतीचे कोर्टांत चालू असेल, किंवा तशा कोर्टानें त्याचा ऐकून निवाडा केला असेल, तर कोणत्याही गांवकोर्टानें तो दावा किंवा मुद्दा चालवूं नये.

(२) जर एकाद्या आरोपीची एकाद्या गुन्ह्याकरितां चौकशी केली असेल तर त्याच गुन्ह्याबद्दल, किंवा, त्याच हकीकतीवरून ज्या दुसऱ्या एकाद्या गुन्ह्याबद्दल त्या आरोपीवर आरोप ठेवितां आला असता अगर गुन्हा शाबीत करतां आला असता असल्या गुन्ह्याबद्दल, कोणत्याही गांवकोर्टाला त्या आरोपीची पुन्हां चौकशी करतां येणार नाहीं.*

**५२. दाव्यांत सर्व मागणीचा अंतर्भाव करणें:–** गांव कोर्टांत दाखल केलेल्या प्रत्येक दाव्यांत, वादीला वादांत असलेल्या विषयाबद्दल जें जें मागणें करण्याचा हक्क असेल त्या सर्व मागण्यांचा अंतर्भाव केला पाहिजे, परंतु गांवकोर्टाचे हुकमतींत आपला दावा आणण्यासाठीं त्याला आपल्या मागणीपैकीं कांहीं भागाची सूट देतां येईल.

---

*पूर्वी त्याच पक्षकाराच्या दरम्यान व त्याच कारणासाठीं एकदां दावा किंवा फिर्याद होऊन तिचा योग्य कोर्टानें गुणदोषावर निकाल केला असतां पुन्हां तीच फिर्याद किंवा दावा चालवितां येत नाहीं. कारण तशी परवानगी दिल्यास चालू भांडणाचा केव्हांही निकालच व्हावयाचा नाहीं, व प्रतिवादीला किंवा गुन्हेगाराला एकाच चुकीसाठीं अनेक वेळां त्रास भोगावा लागेल. म्हणूनच या कलमाप्रमाणें तशी दुसरी फिर्याद किंवा दावा करतां येत नाहीं.

त्याचप्रमाणें त्याच पक्षकारांचे दरम्यान एकाद्या लायक हुकमतीच्या कोर्टांत ज्या कारणासाठीं दावा किंवा फिर्याद चालू असेल त्याच कारणासाठीं दुसऱ्या कोर्टांत पुन्हां फिर्याद किंवा दावा आणतां येणार नाहीं. कारण असा दावा किंवा फिर्याद एकदम दोन कोर्टांत चालू राहिल्यास त्यांचे परस्परविरोधी निकाल होऊन त्यामुळें न्यायाचे कामांत घोटाळा उत्पन्न होईल.

जर एकाद्या वादीनें आपल्या मागणीपैकीं कांहीं भागाबद्दल दावा केला नाहीं किंवा तो जाणून बुजून सोडून दिला तर त्या वगळलेल्या किंवा सोडलेल्या भागाबद्दल त्याला पुन्हां दावा आणतां येणार नाहीं.

**५३. दावे आणि फिर्यादी दाखल करण्याची मुदत.**–(१) दाव्यास प्रथम कारण घडल्यापासून एक वर्षानंतर कोणत्याही गांवकोर्टाला तो दावा विचारांत घेतां येणार नाहीं.

(२) गुन्हा घडल्याचे तारखेपासून एक महिन्यानंतर कोणत्याही फिर्यादीची गांवकोर्टाला चौकशी करितां येणार नाहीं.

**५४. कोणत्या गांवकोर्टांत दावा दाखल करावा.**–दाव्यास कारण कोठेंही घडलें असलें तरी, प्रतिवादी, किंवा एकाहून अधिक प्रतिवादी असतील तर त्यांपैकीं प्रत्येक, या कायद्याखालील दावा दाखल करण्याचे वेळीं ज्या गांवांत राहात असेल त्या गांवाचे गांवकोर्टांत तो दावा दाखल केला पाहिजे.

**५५. कोणत्या गांवकोर्टांत फिर्यादी दाखल कराव्याः**– या कायद्याखालील प्रत्येक फिर्याद, ज्या गांवांत गुन्हा घडला असेल तेथील गांवकोर्टांत दाखल केली पाहिजे.

**५६. तक्रारीअर्ज परत करणें.**–गांवकोर्टानें चौकशी करण्यासारख्या गुन्ह्याच्या हकीकतीची तक्रार एकाद्या मॅजिस्ट्रेटकडे आल्यानंतर, त्याला समाधानकारक कारण दाखविलें गेलें नाहीं तर, त्यानें त्या गुन्ह्याची चौकशी करण्यास हुकमत असलेल्या गांवकोर्टाकडे दाखल करण्यासाठीं ती तक्रार परत केली पाहिजे.

**५७. दावे किंवा फिर्यादीचे कामीं कोर्टाची हुकमत रद्द.**– त्या त्या काळीं चालू असलेल्या कायद्यांत कांहीं सांगितलें असलें

तरी कोणत्याही कोर्टाला, जर डिस्ट्रिक्ट जज्जानें किंवा कलेक्टरनें ७७ किंवा ८७ कलमाखालीं लेखी हुकूम दिलेला नसेल तर व तोंपर्यंत, कलम ५६ च्या ठरावांना बाध न येतां, कलम ३९ मध्यें सांगितलेला दावा विचारांत घेतां येणार नाहीं, किंवा कलम ४१ मध्यें सांगितलेल्या गुन्ह्याची चौकशी करतां येणार नाहीं.*

**५८. गांवकोर्ट असलेल्या गांवास मुंबईच्या १८६७ च्या ८ व्या कायद्याचें १४ वें कलम लागूं होणार नाहीं**—मुंबई गांव पोलीस कायदा, १८६७ यांत कांहींही सांगितलें तरी, ज्या गांवांत कलम ३७ चें पोट कलम (१) खालीं गांवकोर्ट स्थापन केलेलें असेल, त्या गांवाला, त्या कायद्याचें १४ वें कलम लागू होणार नाहीं.†

---

* गांवकोर्टाला चालविण्यास हुकमत असलेले दावे व फिर्यादी, त्या फार भानगडीच्या किंवा महत्त्वाच्या आहेत असें कलेक्टरनें किंवा डिस्ट्रिक्ट जज्जानें क. ७७ व ८७ खालीं ठरविल्याशिवाय, त्या गांवकोर्टाकडेच दाखल केल्या पाहिजेत. दुसऱ्या कोणत्याही कोर्टास त्यांची चौकशी करण्याची हुकमत नाहीं. या कलमानें गांवकोर्टाची हुकमत कायम राखली आहे.

† मुंबईच्या गांव पोलीस कायद्याच्या १४ व्या कलमानें, गांवाचे हद्दींत झालेल्या आंगावर जाण्याबद्दलच्या किंवा शिवीगाळीच्या किरकोळ गुन्ह्यांबद्दल चौकशी करण्याचा आणि गुन्हा शाबीत झाल्यास आरोपीस २ रु. पर्यंत दंडाची व दंड न दिल्यास १२ तासांपेक्षां जास्त नाहीं इतकी कैदेची, किंवा गांवचे चावडींत २४ तासांपेक्षां जास्त नाहीं इतकी कैदेची शिक्षा देण्याचा पोलीस पाटलास अधिकार दिलेला आहे. गांवांत गांवकोर्ट स्थापन झाल्यानंतर वरील तऱ्हेच्या गुन्ह्यांची चौकशी करण्याचा गांवकोर्टाला अधिकार असल्या-मुळें, ह्या कलमान्वयें पोलिस पाटलाचा तो अधिकार काढून घेतला आहे.

## भाग ७
# पंचायतीपुढील दाव्यांच्या व फिर्यादींच्या चौकशीची पद्धत

**५९. दावे अणि फिर्यादी कशा दाखल कराव्या.** कोणत्याही मनुष्यास ह्या कायद्याखालीं गांवकोर्टापुढें दावा किंवा फिर्याद दाखल करणें असेल तर त्यानें चेअरमनकडे, किंवा तो गांवांत नसेल त्यावेळीं याबाबत चेअरमननें जो गांवकोर्टाचा सभासद नेमला असेल त्याचेकडे लेखी किंवा तोंडी अर्ज केला पाहिजे; व त्याचवेळीं ठरविलेली फी दिली पाहिजे.*

**६०. अर्जांचा सारांश नमूद करणें.**—ह्या अर्जाचा सारांश ताबडतोब ठरविलेल्या रजिष्टरांत लिहिला पाहिजे. आणि त्या रजिष्टरवर अर्जदाराची सही किंवा आंगठा घेतला पाहिजे व चेअरमननें किंवा त्याचे गैरहजरींत, कलम ५९ खालीं अधिकार दिलेल्या सभासदानें त्या रजिष्टरवर सही केली पाहिजे.

**६१. वादीनें किंवा फिर्यादीनें गांवकोर्टाचे पुढील बैठकीस हजर राहावें.**—कलम ५९ चे ठरावाखालीं दाखल केलेला प्रत्येक दावा किंवा फिर्याद गांवकोर्टाचे पुढच्या बैठकीचे वेळीं सुनावणीस निघाला पाहिजे, आणि वादीला किंवा फिर्यादीला, जसें असेल त्याप्रमाणें, अर्ज करण्याचे वेळीं कोर्ट भरण्याची पुढची तारीख व ठिकाण हीं कळविलीं पाहिजेत व त्यावेळीं व त्या ठिकाणीं हजर राहण्याबद्दल त्याला सूचना दिली पाहिजे.

---

*दावा किंवा फिर्याद दाखल करतांना द्याव्या लागणाऱ्या फीबद्दल सरकारनें कलम १०८ पो. क. १ 'ह' खालीं केलेले नियम परिशिष्ट अ मध्यें दिलेले आहेत.

**६२. प्रतिवादीला किंवा आरोपीला समन्स काढणें.** गांवकोर्टानें अर्ज ऐकल्यानंतर, प्रतिवादीवर किंवा आरोपीवर, जसें असेल त्याप्रमाणें, ठरवलेल्या पद्धतीप्रमाणें लेखी समन्स* बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे; समन्समध्यें दिलेल्या तारखेला व ठिकाणीं स्वत: हजर राहून आपला पुरावा तयार ठेवण्यास त्याला फर्माविलें पाहिजे. व ह्याच वेळीं वादीला किंवा फिर्यादीला त्या वेळीं व त्या ठिकाणीं हजर राहून आपला पुरावा तयार ठेवण्यासही सांगितलें पाहिजे.

मात्र गांवकोर्टाला, अर्ज ऐकल्यानंतर आणि वादीची किंवा फिर्यादीची तपासणी केल्यानंतर, लेखी कारणें देऊन समन्स काढण्याचें नाकारतां येईल आणि दावा किंवा फिर्याद काढून टाकतां येईल.

**६३. समन्स कोणी बजावावें.**—अशा तऱ्हेचें समन्स बजावण्याची व्यवस्था साधारणपणें पाटलानें किंवा गांवच्या मुख्यानें केली पाहिजे. गांवांत मुलकी पाटील व पोलीस पाटील असे दोन पाटील असतील तर साधारणपणें समन्स दाव्याचें असल्यास मुलकी पाटलानें व फिर्यादीचें असल्यास पोलीस पाटलानें बजावलें पाहिजे.

मात्र, गांवकोर्टाला दुसऱ्या एकाद्या मनुष्यामार्फत समन्स बजावण्याची व्यवस्था करतां येईल.

**६४. समन्स बजावण्याची पद्धत.**—गांवकोर्टाच्या अध्यक्षाची सही असलेल्या समन्साच्या दोन प्रती असल्या पाहिजेत, व शक्य तितकें, तें प्रतिवादीवर किंवा आरोपीवर, जसें असेल तसें, प्रत्यक्ष बजावलें पाहिजे, व बजावणीदाखल त्यावर त्याची सही किंवा आंगठा घेतला पाहिजे. प्रतिवादी किंवा आरोपी सांपडत नसेल व व तो बजावणी चुकवीत आहे अशी गांवकोर्टाची खात्री झाली तर

---

*समन्सचे नमुने परिशिष्ट अ मध्यें दिलेले आहेत.

किंवा तो समन्स घेण्याचें नाकारीत असेल तर, गांवकोर्टाला त्याचे घरांत राहणाऱ्या एकाद्या वयांत आलेल्या माणसावर तें बजावण्याचा किंवा तो साधारणपणें ज्या घरांत राहतो त्या घराचे कोणत्याही प्रमुख भागावर त्याची प्रत चिकटवून तें बजावण्याचा, हुकूम देतां येईल.

**६५. गांवाबाहेर बजावण्याची पद्धत.**—समन्स काढण्याचे वेळीं प्रतिवादी किंवा आरोपी पंचायतीचे गांवाबाहेर असेल तर, गांवकोर्टानें तें समन्स कलेक्टरकडे किंवा याबाबत कलेक्टरनें अधिकार दिलेल्या मामलेदारापेक्षां कमी दर्जाचा नाहीं अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे पाठवावें आणि कलेक्टरनें किंवा त्या अधिकाऱ्यानें तें समन्स आपल्याच कोर्टाचें आहे असें समजून बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**६६. कांहीं माणसांना दाव्याचे वेळीं हजर न रहाण्याची सवलत.**—(१) त्या देशांतील रीतीरिवाजाप्रमाणें ज्या स्त्रियांना सार्वजनिक ठिकाणीं हजर रहाण्याबद्दल सक्ति करतां येत नाहीं. त्यांनीं कोणत्याही दाव्याचे वेळीं गांवकोर्टापुढें जातीनें हजर राहण्याची जरूरी नाहीं.

(२) सिव्हिल प्रोसीजर कोड १९०८ च्या कलम १३३प्रमाणें ज्या माणसांना जातीनें हजर न रहाण्याची सवलत असेल, त्यांना गांवकोर्टापुढेंही हजर न रहाण्याची सवलत आहे[१].

---

१ ज्यांच्या दर्जामुळें कोर्टापुढें जातीनें हजर न राहण्याची ज्यांना स्थानिक सरकार गॅझेटमध्यें नांव प्रसिद्ध करून सरकारनें सवलत दिलेली आहे, अशा सर्व लोकांनीं कोर्टापुढें जातीनें हजर राहाण्याची जरूरी नाहीं, असें क्रि. प्रो. कोडाचे कलम १३३ मध्यें सांगितलें आहे. अशा लोकांनीं गांवकोर्टापुढेंही जातीनें हजर राहण्याची जरूरी नाहीं असें ह्या कलमांत सांगितलें आहे.

**६७. साक्षीदारांना समन्स काढणें.** (१) जर कोणत्याही दाव्यांत किंवा फिर्यादींत एकाद्या माणसाची साक्ष, किंवा त्यानें कांहीं कागदपत्र हजर करणें, गांवकोर्टाला जरूर वाटेल तर त्यानें त्या माणसाला हजर राहण्याला भाग पाडण्यासाठीं किंवा ते कागदपत्र हजर करण्यासाठीं किंवा करविण्यासाठीं समन्स काढावें, व समन्स-मध्यें दिलेल्या ताकिदीप्रमाणें त्या माणसानें वागलेंच पाहिजे. असें समन्स पूर्वी दिलेल्या पद्धतीप्रमाणें असलें पाहिजे व बजाविलें पाहिजे.

(२) जर एकाद्या साक्षीदाराला हजर ठेवण्यांत, त्या परिस्थितींत अयोग्य वाटण्यासारखा विलंब किंवा खर्च, किंवा गैरसोय होईल असें गांवकोर्टास वाटलें तर, त्याला त्या साक्षीदाराला समन्स काढण्याचें किंवा आधींच समन्स काढलें असेल तर तें बजावण्याचें नाकारितां येईल.

(३) जर एकादा साक्षीदार त्या गांवाचे बाहेर राहात असेल तर कोणत्याही गांवकोर्टाला, त्या साक्षीदाराचा जरूर तो खर्च भाग-विण्यास त्या गांवकोर्टाच्या मतानें लागणारी रकम त्या गांवकोर्टाकडे अनामत ठेविल्याशिवाय, त्याला साक्ष देण्यास किंवा कांहीं कागद-पत्र हजर करण्यास भाग पाडतां येणार नाहीं; आणि जर कलेक्टर-च्या किंवा ६५ कलमाखालीं अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याच्या मतानें, जसें असेल त्याप्रमाणें, दाव्याचा किंवा फिर्यादीचा योग्य निकाल करण्यासाठीं तशा एखाद्या माणसानें हजर राहणें जरूर नसेल तर त्या कलेक्टरानें किंवा त्या अधिकाऱ्यानें त्याप्रमाणें शेरा मारून समन्स परत पाठविलें पाहिजे.

(४) हिंदुस्थानचा पुराव्याचा कायदा १८७२ च्या ठरावा-प्रमाणें किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या दुसऱ्या कोणत्याही कायद्याप्रमाणें जो पुरावा एखाद्या मनुष्यास देतां येणार नाहीं किंवा

जो मजकूर त्याला उघड करून सांगतां येणार नाहीं,[१] तो पुरावा देण्यास किंवा तो मजकूर उघड करून सांगण्यास कोणाही माणसास गांवकोर्टाला भाग पाडतां येणार नाहीं.

**६८. वकील वगैरेंना हजर राहण्याची मनाई.** गांवकोर्टा-पुढील कोणत्याही दाव्यांत किंवा फिर्यादींत किंवा कलम ८७ खालील कोणत्याही चौकशींत प्लीडर, वकील, मुखत्यार, किंवा हाय-कोर्टाचा ॲडव्होकेट किंवा ॲटर्नी यांना कोणाही पक्षकारातर्फे हजर राहण्यास परवानगी दिली जाणार नाहीं.[२]

---

१ पुराव्याचे कायद्याखालीं खालील तऱ्हेचा मजकूर उघड करून सांगण्यास भाग पाडतां येत नाहीं:—

(१) कोणत्याही जज्जास किंवा मॅजिस्ट्रेटास त्याच्या स्वतःच्या कोर्टातील वर्तणुकीबद्दल, अगर जज्ज किंवा मॅजिस्ट्रेट म्हणून त्याचे ध्यानांत आलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, त्याचें वरिष्ठ कोर्टाचे परवानगीशिवाय विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर.

(२) लग्नसंबंध कायम असेपर्यंत नवऱ्यानें किंवा बायकोनें एकमेकांस सांगितलेला मजकूर. (क. १२२)

(३) कोणत्याही खात्याचे वरिष्ठाचे परवानगीशिवाय राज्यप्रकरणा-विषयीं प्रसिद्ध न झालेली माहिती. (क. १२३)

(४) सरकारी अधिकारी म्हणून सांगितलेला मजकूर. (क. १२४)

(५) गुन्हा घडल्याबद्दलची माहिती देणाराचें नांव. (क. १२५)

(६) वकील, बॅरिस्टर, किंवा प्लीडर या नात्यानें कोणत्याही दाव्याचे किंवा फिर्यादीचे कामीं कुळानें दिलेली माहिती. (क. १२६)

अशा तऱ्हेचा मजकूर गांवकोर्टापुढेंही उघड करून सांगण्यास भाग पाडतां येणार नाहीं.

२ गांवकोर्टापुढें चालणारे दावे किरकोळ स्वरूपाचे असल्यामुळें व पंचांपुढें पक्षकार स्वतः हजर राहिल्यास अशा दाव्यांतील खरी हकीकत लवकर पुढें

मात्र कोणत्याही फिर्यादींतील किंवा दाव्यांतील पक्षकारानें, गांवकोर्टाला, किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाला किंवा कलेक्टरला समाधानकारक वाटणारें योग्य कारण दाखविल्यास, त्या पक्षकाराला स्वतःचे बरोबर किंवा स्वतःचे ऐवजीं हजर रहाण्यासाठीं, एकाद्या साध्या किंवा पूर्वी प्लीडर, वकील, मुखत्यार, किंवा हायकोर्टाचा ॲडव्होकेट किंवा ॲटर्नी नसलेल्या अशा नातेवाईकाला, किंवा नोकराला, किंवा आश्रिताला किंवा मित्राला नेमण्याची परवानगी देतां येईल.

जेव्हां एकादा नातेवाईक, नोकर, आश्रित किंवा मित्र एकाद्या पक्षकाराऐवजीं हजर राहील, तेव्हां त्या पक्षकारानें, कोणतें काम करण्यास त्याला अधिकार दिला आहे हें नक्की दाखविणारें लेखी अधिकारपत्र त्याला दिलें पाहिजे.

**६९. खरी हकीकत निश्चित केल्यानंतर दाव्यांचा किंवा फिर्यादीचा निवाडा.** (१) या कायद्यांतील ठरावाप्रमाणें आणि नियमाप्रमाणें[१] चौकशी करून पुढें असलेल्या दाव्याची किंवा फिर्यादीची खरी हकीकत निश्चित करणें हें गांवकोर्टाचें कर्तव्य आहे.

(२) अशा तऱ्हेच्या चौकशी करण्याबाबतच्या गांवकोर्टाच्या

---

येण्याचे संभव असल्यामुळें त्यांत स्वतः पक्षकारच हजर असणें जास्त चांगलें. शिवाय गांवकोर्ट स्थापन करण्याचा मूळ हेतु हा कीं पक्षकारांना फार खर्च न होतां न्याय मिळावा व अशा कामांत निष्कारण कायद्याचा कीस काढूं नये, तो वकील हजर राहिल्यास साध्य होणार नाहीं. म्हणून या कलमान्वयें गांवकोर्टापुढें काम चालविण्यास वकिलांस बंदी केली आहे.

१. गांवकोर्टांतील काम चालविण्याच्या पद्धतीचे नियम परिशिष्ट ब मध्यें दिलेले आहेत.

अधिकारास पुराव्याबद्दलच्या किंवा कामें चालविण्याच्या पद्धतीबद्दलच्या कोणत्याही कायद्यानें बाध येणार नाहीं.[१]

(३) अशीं चौकशी केल्यानंतर, गांवकोर्टानें, ठरविलेली फी घेऊन अगर न घेतां व या कायद्यांतील ठरावास बाध न येतां, त्याला योग्य व न्याय्य वाटणारा हुकूमनामा किंवा हुकूम करावा.

**७०. गांवकोर्टाचा निवाडा.** गांवकोर्टाच्या बैठकीच्या वेळीं हजर असलेल्या सभासदांच्या मताप्रमाणें किंवा त्यांतील सभासदांच्या बहुमताप्रमाणें त्याचा निवाडा असला पाहिजे. सभासदांचीं मतें सारखीं विभागलीं गेल्यास अध्यक्षाला दुसरें किंवा जादा मत असेल.

**७१. तहकुबी.** गांवकोर्टाला कोणत्याही दाव्याचें किंवा खटल्याचें काम वेळोवेळीं तहकूब ठेवतां येईल;

मात्र, अशी तहकुबी त्याच्या मताप्रमाणें, दाव्याच्या किंवा खटल्याच्या न्याय्य व योग्य निवाडयासाठीं अनिर्वाह्य किंवा जरूरीची असली पाहिजे.

**७२. संबंध असलेल्या पक्षकाराच्या अपरोक्ष दाव्याचा किंवा फिर्यादीचा निकाल.** (१) पुराव्याची वेळ व जागा ही वादीस किंवा फिर्यादीस कळविली असतांही, जर तो हजर राहिला नाहीं तर, गांवकोर्टाला त्याचे गैरहजेरींत दावा किंवा फिर्याद ऐकतां येईल आणि तिचा निकाल देतां येईल.

(२) प्रतिवादीवर किंवा आरोपीवर, वर दिलेल्या पद्धतीप्रमाणें समन्स बजाविल्यानंतर, किंवा त्यास कामाची वेळ व जागा कळ-

---

१ काम चालविण्याबद्दलच्या किंवा पुराव्याबद्दलच्या विशिष्ट नियमांनीं कोर्टाचें काम अवघड झालें असतें; तशी स्थिति गांव कोर्टाची होऊं नये म्हणून या कलमांत तरतूद केलेली आहे.

विल्यानंतर गांवकोर्टाला त्याचे गैरहजेरींत दावा किंवा फिर्याद ऐकतां येईल आणि तिचा निकाल देतां येईल.

मात्र, आरोपी जातीनें किंवा मुखत्यारामार्फत गांवकोर्टापुढें हजर राहिल्याशिवाय आणि त्यानें दिलेल्या जबाबाचा सारांश ठरविलेल्या रजिस्टरमध्यें लिहून घेतल्याशिवाय गांवकोर्टास त्या आरोपीला शिक्षा फर्मावितां येणार नाहीं.

(३) जर, आरोपीवर समन्स बजाविल्यानंतर तो जातीनें किंवा मुखत्यारामार्फत गांवकोर्टापुढें हजर राहिला नाहीं तर, गांवकोर्टाला डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे किंवा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें या बाबतींत अधिकार दिलेल्या पण सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटपेक्षां कमी दर्जाचा नाहीं अशा अधिकाऱ्याकडे, अर्ज करितां येईल. आणि डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें किंवा अधिकाऱ्यानें आपण स्वत:च तो खटला चालविणारें कोर्ट आहों असें समजून त्या आरोपीला जातीनें किंवा मुखत्यारामार्फत गांवकोर्टापुढें हजर राहाण्यास भाग पाडलें पाहिजे.

(४) आरोपीला पोटकलम (३) प्रमाणें, गांवकोर्टापुढें हजर राहाण्यास भाग पाडल्यानंतर, गांवकोर्टानें त्याचा लागलीच जबाब घेतला पाहिजे, आणि त्यानंतर फिर्यादीच्या पुराव्याच्या वेळीं त्याचेवर हजर राहण्याची सक्ती करतां येणार नाहीं.

**७३. तडजोड.** ह्या कायद्यांत किंवा त्या त्या वेळीं अमलांत असणाऱ्या कायद्यांत कांहींही सांगितलें असलें तरी, गांवकोर्टाला त्याचे हुकमतींत असलेल्या कोणत्याही दाव्याचा किंवा फिर्यादीचा निकाल पक्षकारांनीं आपसांत ठरलेल्या समजुतीप्रमाणें, तडजोडीप्रमाणें किंवा शपथेप्रमाणें करतां येईल.[१]

---

गांवकोर्टाचे सभासद आणि त्याच्यापुढें चालणाऱ्या कामांतील पक्षकार हे एकाच गांवांत राहाणारे असल्यामुळें, कामांचा निकाल शक्य तोंपर्यंत पक्ष-

**७४. पक्षकाराचा मृत्यू:**—जर, दाव्याच्या निवाडयापूर्वी त्या दाव्यांतील पक्षकार मयत झाला तर तो दावा पुढें चालवितां येणार नाहीं; परंतु त्याच कारणावरून नवीन दावा आणतां येईल, आणि त्या नवीन दाव्याकरितां, कलम ५३ खालीं दिलेली मुदत मोजतांना, जितके दिवस पूर्वींचा दावा चालू होता तितके दिवस वजा केले पाहिजेत.

**७५. गांवकोर्टानें आपल्या निवाडयाचा फेरविचार करूं नये किंवा तो बदलूं नये:**—(१) गांवकोर्टाला, पोटकलम २ मध्यें सांगितलें आहे तेवढें वगळून, त्यानें केलेला निवाडा किंवा हुकूम रद्द करण्याचा किंवा त्याचा फेरविचार करण्याचा किंवा तो बदलण्याचा अधिकार नाहीं.

(२) गांवकोर्टानें केलेल्या निवाडयाच्या किंवा हुकुमाच्या तारखे-पासून एक महिन्याचे आंत अर्ज केल्यास, गांवकोर्टाला लेखी कारणें देऊन, हयगयीकरितां काढून टाकिलेला किंवा ज्यांत प्रतिवादीविरुद्ध एकतर्फी निवाडा झाला आहे, असा एकादा दावा परत घेतां येईल.

**७६. व्याज आणि हप्ते:**—पैशासंबंधींच्या दाव्यांत, हुकूम-नाम्यांत देवविलेल्या रकमेवर, गांवकोर्टाला योग्य वाटल्यास त्याला हुकूमनाम्याचे तारखेपासून ते पैसे फिटेपर्यंत, दरसाल दर शेंकडा सहापेक्षां जास्त नाहीं अशा दरानें व्याज आणि ठरविलेली फी देण्या-बद्दलचा हुकूम देतां येईल.

जेव्हां गांवकोर्ट एकाद्या दाव्यांत एकादी रक्कम देण्याबद्दल

---

कारांनीं ठरविलेल्या तडजोडीप्रमाणें वगैरे होणें हें केव्हांही योग्य असतें. अशी तडजोड झाल्यानें आपसांतील सलोखा कायम राहातो व विनाकारण तेढ उत्पन्न होत नाहीं. याच करतां ह्या कलमांत तरतूद केलेली आहे.

हुकूमनामा करील, त्या वेळीं ती रक्कम हप्त्यानें व्याजाशिवाय किंवा वर दिलेल्यापेक्षां जास्त नाहीं अशा दरानें व्याजासुद्धां द्यावी असा त्याला हुकूम करतां येईल.

**७७. गांवकोर्टानें कलेक्टरकडे हुकुमाकरितां पाठविणें:—** (१) जर एकादा दावा किंवा खटला कोर्टानें चालविला पाहिजे अशा स्वरूपाचा किंवा भानगडीचा किंवा महत्त्वाचा आहे असें त्याचेपुढें चालू असलेल्या कोणत्याही दाव्यासंबंधीं किंवा फिर्यादीसंबंधीं एकाद्या गांवकोर्टाला वाटेल तर त्यानें काम तहकूब ठेवावें आणि तो दावा डिस्ट्रिक्ट जज्जाकडे किंवा सबार्डिनेट जज्जाहून कमी दर्जाचा नाहीं अशा एकाद्या डिस्ट्रिक्ट जज्जानें या बाबतींत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याकडे, किंवा ती फिर्याद कलेक्टरकडे अगर मामलेदाराहून कमी दर्जाचा नाहीं अशा कलेक्टरनें या बाबतींत अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याकडे, त्याचे हुकुमाकरितां पाठवावी.

(२) जर तो दावा किंवा ती फिर्याद गांवकोर्टानें चालवूं नये, अशा स्वरूपाची, भानगडीची किंवा महत्त्वाची आहे, असें डिस्ट्रिक्ट जज्जाला किंवा कलेक्टराला किंवा त्या अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याला वाटेल तर त्यानें वादीला किंवा फिर्यादीला, तो दावा किंवा ती फिर्याद ऐकण्यास अधिकार असलेल्या योग्य त्या दिवाणी किंवा फौजदारी कोर्टाकडे, जसें असेल त्याप्रमाणें, जाण्याबद्दलचा हुकूम दिला पाहिजे.

(३) जर तो दावा किंवा ती फिर्याद कोर्टानेंच चालविली पाहिजे अशा स्वरूपाची, भानगडीची किंवा महत्त्वाची नाहीं असें डिस्ट्रिक्ट जज्जाला किंवा कलेक्टराला किंवा त्या अधिकार दिलेल्या अधिकाऱ्याला वाटेल तर त्यानें तो दावा किंवा ती फिर्याद

ज्या गांवकोर्टानें पाठविली असेल त्याचेकडे निकालासाठीं परत पाठवावी.[१]

**७८. गांवकोर्टाच्या हुकुमनाम्याला आणि हुकुमाला हरकत घेतां येणार नाहीं.** कलम ८७ मध्यें दिलेलें तेवढें वगळून गांवकोर्टानें केलेल्या हुकूमनाम्यास किंवा हुकुमास तो हुकमतीशिवाय केला आहे अशी हरकत कोणत्याहि कोर्टात घेतां येणार नाहीं.

**७९. हुकूमनामे आणि हुकूम अखेरचे समजले पाहिजेत.** या कायद्याखालीं गांवकोर्टानें, कोणत्याहि दाव्यांत किंवा फिर्यादींत केलेला प्रत्येक हुकूमनामा किंवा हुकूम हा अखेरचा समजला पाहिजे, आणि कलम ८७ मधील ठराव वगळून, त्याचेवर एखादें अपील, फेरतपासणी किंवा फेरविचार होणार नाहीं.[२]

---

१ गांवकोर्टाला आपल्यापुढें दाखल झालेला दावा किंवा फिर्याद ही भानगडीची किंवा महत्त्वाची आहे असें वाटल्यास, त्यानें ती ऐकण्यापूर्वी त्या बाबतींत अनुक्रमें डिस्ट्रिक्ट जज्जाचें किंवा कलेक्टरचें मत घ्यावें व त्यांनीं तो दावा किंवा फिर्याद गांवकोर्टाला चालविण्यास हरकत नाहीं असें कळविलें तरच ते चालवावे म्हणून ही तरतूद केलेली आहे.

२ गांवकोर्टापुढें दाखल झालेलीं कामें हीं किरकोळ स्वरूपाचीं असल्यामुळें, त्यांत गांवकोर्टानें केलेला निवाडा किंवा हुकूम हा अखेरचा समजला जाईल व त्यावर कोणतें अपील चालणार नाहीं, किंवा त्याची फेर तपासणी किंवा फेर विचार होणार नाहीं असें ह्या कलमांत सांगितलें आहे. साधारणपणें दाव्यांतील हकीकतीची किंवा घडलेल्या गुन्ह्यांची आणि त्यांतील पक्षकारांची गांवकोर्टातील सभासदांना प्रत्यक्ष माहिती असल्यामुळें, त्याच्या निवाड्यानें किंवा हुकुमानें अन्याय होणें शक्य नसतें. या तरतुदीमुळें खेडेगांवांतील लोकांचीं निष्कारण भांडणें काढून त्यांत खर्च करण्याच्या प्रवृत्तीसही आळा बसेल.

## भाग ८

## बजावणी.

**८०. हुकुमनाम्याच्या भरपाईची किंवा तडजोडीची नोंद करणें.** जर, हुकुमनाम्यांतील धनकोनें किंवा हुकुमनाम्यांतील ऋणकोनें केलेल्या अर्जाच्या चौकशीनंतर, गांवकोर्टाला असें आढळून आलें कीं, त्या हुकुमनाम्याची पूर्ण किंवा अंशत: भरपाई किंवा तडजोड झालेली आहे, तर त्यानें त्या गोष्टीची नोंद ठरविलेल्या रजिस्टर-मध्यें केली पाहिजे.[१]

**८१. कलेक्टरमार्फत बजावणी.** (१) जर, हुकुमनाम्याच्या तारखेपासून एक महिन्यानंतर, हुकुमनाम्याच्या सर्व किंवा कांहीं भागाची भरपाई किंवा तडजोड झालेली नसेल तर, हुकुमनाम्यांतील धनकोला, हुकुमनाम्याचे तारखेपासून एक वर्षाचे आंत, गांवकोर्टा-कडे दरखास्त देतां येईल.

(२) अशा दरखास्तीनंतर, त्या हुकूमनाम्याच्या सर्व किंवा कांहीं भागाची भरपाई किंवा तडजोड झालेली नाहीं, असा दाखला गांवकोर्टानें कलेक्टरला दिला पाहिजे, आणि जर गांवकोर्टानें तो दाखला कलेक्टरकडे दरखास्तीच्या तारखेपासून एक वर्षाचे आंत पाठविला असेल तर, असा दाखला मिळाल्यानंतर कलेक्टरनें,—

(अ) जर तो हुकुमनामा पैशाबद्दल असेल तर, ती जमीन-

---

१ ह्या रजिष्टरांत नोंद कशी करावयाची याबद्दल सरकारनें केलेले नियम परिशिष्ट अ मध्यें दिलेले आहेत.

महसुलाची बाकी[१] आहे असें समजून ती वसूल केली पाहिजे किंवा

(ब) जर तो हुकुमनामा विशिष्ट जंगम मालाबद्दल असेल तर तो दिवाणी कोर्टाचा हुकुमनामा[२] आहे असें समजून त्याची बजावणी करण्याची व्यवस्था केली पाहिजे, आणि असें करितांना त्याला दिवाणी कोर्टाचे सर्व अधिकार बजावतां येतील.

**८२. हप्तेबंदीच्या हुकुमनाम्याची कलेक्टरमार्फत बजावणी.** (१) जर, गांवकोर्टानें कलम ७६ खालीं हुकुमनाम्यानें देवविलेल्या एकाद्या रकमेचा हप्ता किंवा त्याचा कांहीं भाग, तो देण्यासाठीं ठरविलेल्या तारखेपासून एक महिन्यानंतर, देण्याचा राहिला असेल तर, हुकुमनाम्यांतील धनकोला, तो ज्या तारखेस द्यावयास पाहिजे त्या तारखेपासून एक वर्षाचे आंत, गांवकोर्टाकडे दरखास्त देतां येईल.

---

१. जमीन महसुलाची बाकी जमीन महसुलाचा कायदा सन १८७९ प्रमाणें खालीं दिलेल्या मार्गानें करतां येते.-

(१) मागणीबद्दलची लेखी नोटीस पाठवून; (क. १५०).

(२) रयतवारी किंवा इनाम जमिनींतील मालकाचे हितसंबंध जप्त करून; (क. १५३) अशी जमीन जप्त केल्यानंतर ती क. ५६, ५७ खालीं विकून येणारा पैसा ती बाकी न देणाऱ्याचे खातीं जमा करावयाचा असतो.

(३) जंगम माल जप्त करून व विकून; (क. १५४)

(४) स्थावर मिळकत विकून; (क. १५६).

(५) कैद करून तुरुंगांत ठेवून; (क. १५७).

(६) इनाम गांव असल्यास तो सर्व जप्त करून; (क. १५९-१६३)

२. विशिष्ट जंगम मालाबद्दल मिळविलेला हुकूमनामा बजावण्याचे सि. प्रो. को. ऑर्डर २१, रूल ३१ मध्यें खालील प्रकार दिलेले आहेत:

(१) तो माल जप्त करून वादीला देणें; किंवा

(२) हुकुमनाम्यांतील ऋणकोला दिवाणी तुरुंगांत ठेवणें; किंवा

(३) त्याची कोणतीही मालमत्ता जप्त करणें; किंवा

(४) त्याला दिवाणी तुरुंगांत ठेवणें आणि त्याची मालमत्ता जप्त करणें.

(२) अशा दरखास्तीनंतर, तो हप्ता किंवा त्याचा कांहीं भाग अद्याप दिलेला नाहीं असा दाखला गांवकोर्टानें कलेक्टरला दिला पाहिजे, आणि जर गांवकोर्टानें तो दाखला कलेक्टरकडे दरखास्तीच्या तारखेपासून एक वर्षाचे आंत पाठविला असेल तर, असा दाखला मिळाल्यानंतर कलेक्टरनें त्या थकलेल्या हप्त्याची रक्कम ती जमीनमहसूलाची बाकी आहे असें समजून वसूल केली पाहिजे.

**८३. हुकुमनाम्याची किंवा हप्त्याची दाखल्यानंतर भरपाई:—** कलम ८१ किंवा ८२ खालीं कलेक्टरला दाखला दिल्यानंतर, परंतु त्याचेमार्फत हुकुमनाम्याची बजावणी होण्यापूर्वी, जर त्या हुकुमनाम्याची किंवा हप्त्याची पूर्ण भरपाई झाली आणि ती भरपाई कलम ८० खालीं नोंदली असेल, तर गांवकोर्टानें ताबडतोब त्या भरपाईचा दाखला कलेक्टरकडे पाठविला पाहिजे, आणि त्यानें नंतर बजावणीचें काम थांबविलें पाहिजे. हुकूमनाम्याच्या भरपाईनंतर, कलेक्टरमार्फत बजावणीनें वसूल झालेल्या सर्व रकमा हुकुमनाम्यांतील ऋणकोला परत केल्या पाहिजेत.

**८४. दंड किंवा नुकसानभरपाई केव्हां द्यावी—** ( १ ) गांवकोर्टानें नुकसानभरपाई म्हणून द्यावयास सांगितलेली प्रत्येक रक्कम, आणि कलम ४५, ४६, ४७ आणि ४८ यांचे खालीं केलेला प्रत्येक दंड ताबडतोब दिला पाहिजे.

मात्र, गांवकोर्टानें नुकसानभरपाई म्हणून किंवा दंड म्हणून द्यावयास सांगितलेली रक्कम, गांवकोर्टाला योग्य वाटेल त्या पण पंधरा दिवसापेक्षां जास्त नाहीं, अशा मुदतींत आणि जामिनाच्या बाबतींत गांवकोर्ट जरूरीप्रमाणें ठरवील त्या अटीवर, त्यानें द्यावी अशी गांवकोर्टास परवानगी देतां येईल.

(२) हुकुमनाम्याचे तारखेपासून पंधरा दिवसांपर्यंत जर दंडाची किंवा नुकसानभरपाईची रक्कम दिली गेली नसेल तर गांवकोर्टानें त्या कसूर करणाऱ्या इसमाचा जंगममाल जप्त करून व विकून तिची वसूली करावी.

(३) जर दंडाची किंवा नुकसानभरपाईची सर्व रक्कम वसूल झाली नाहीं तर गांवकोर्टानें त्याप्रमाणें कलेक्टरकडे दाखला द्यावा; आणि जर, पंचायतीनें तो दाखला कलेक्टरकडे, पोटकलम (२) खालीं ती रक्कम गांवकोर्टानें वसूल करण्यास पात्र झाली त्या तारखेपासून एक वर्षाचे आंत पाठविला असेल तर, असा दाखला मिळाल्यानंतर कलेक्टरनें ती रक्कम जमीन महसुलाची बाकी आहे असें समजून वसूल केली पाहिजे आणि अशी वसूल केलेली रक्कम त्या गांवकोर्टाकडे पाठविली पाहिजे.

**८५. दंडाची किंवा नुकसानभरपाईची वसुलीनंतर नोंद करणें.** कलम ८४ मध्यें सांगितलेली दंडाची किंवा नुकसानभरपाईची रक्कम गांवकोर्टानें स्वत: किंवा कलेक्टरमार्फत वसूल केल्याबरोबर, त्या रकमेची ठरविलेल्या रजिस्टरांत नोंद केली पाहिजे, आणि गांवकोर्टानें ती गांवफंडांत जमा केली पाहिजे.

**८६. नुकसानभरपाई गांवफंडांतून देणें.** कलम ४७ किंवा ४८ खालीं, खर्च म्हणून किंवा नुकसानभरपाई म्हणून, गांवकोर्टानें जी रक्कम देण्याचा हुकूम केला असेल, ती त्यानें कलम ४५ किंवा ४६ खालीं वसूल केलेल्या रकमेंतून दिली पाहिजे आणि अशी दिलेली रक्कम गांवफंडाचे नांवें लिहिली पाहिजे.

**८७. डिस्ट्रिक्ट जज्जाला किंवा कलेक्टरला हुकमत काढून घेतां येईल किंवा चालू कामें रद्द करतां येतील.** (१) डिस्ट्रिक्ट

जज्जाला एकादे दाव्यांत आणि कलेक्टरला एकादे फिर्यादींत, केव्हांही, स्वतः किंवा नुकसान झालेल्या माणसाचे अर्जावरून किंवा कलम ७७ खालीं गांवकोर्टानें विचारल्यावरून, लेखी हुकमानें गांवकोर्टाची हुकमत काढून घेतां येईल किंवा गांवकोर्टाचें चालू काम कोणत्याही स्थितीला रद्द करितां येईल किंवा गांवकोर्टानें केलेला कोणताही हुकूमनामा किंवा हुकूम रद्द करितां येईल.

(२) जर, कोणत्याही दाव्याचे बाबतींत, डिस्ट्रिक्ट जज्जानें पोट-कलम (१) खालीं हुकूम केला असेल तर, वादीला त्याच मागणी-करितां दिवाणी कोर्टांत नवीन दावा आणतां येईल, आणि त्या नवीन दाव्याची मुदत मोजतांना, गांवकोर्टापुढें दावा दाखल केल्याचे तारखेपासून अशा हुकुमाच्या तारखेपर्यंतचे सर्व दिवस वजा मिळतील.

(३) जर कोणत्याही फिर्यादीचे बाबतींत कलेक्टरनें पोटकलम (१) खालीं हुकूम केला असेल तर, त्याच गुन्ह्याचे बाबतींत हुक-मत असलेल्या मॅजिस्ट्रेटचे कोर्टांत काम दाखल करितां येईल.[१]

**८८. दरखास्तींत कैद करण्याची आणि तुरुंगांत ठेवण्याची मनाई.** ह्या कायद्यांतील ठरावाखालीं हुकुमनाम्याचे बजावणींत कोणाही मनुष्याला कैद करितां येणार नाहीं अगर तुरुंगांत ठेवतां येणार नाहीं.[२]

---

१ गांवकोर्टापुढें चाललेल्या दाव्यांत किंवा फिर्यादींत भानगडीचा किंवा महत्त्वाचा प्रश्न आहे, असें डिस्ट्रिक्ट जज्जाला किंवा कलेक्टरला आढळून आल्यास, त्याला गांवकोर्टाची हुकमत रद्द करून, तो दावा किंवा ती फिर्याद योग्य त्या दिवाणी किंवा फौजदारी कोर्टांत दाखल करावी असें सांगण्याचा ह्या कलमानें अधिकार दिला आहे.

२ ही तरतूद मूळच्या बिलांत किंवा सिलेक्ट कमेटीनें दुरुस्त केलेल्या बिलांत नव्हती. मुंबई कौन्सिलांत बिलाची दुसरे वेळीं चर्चा चालू असतांना ती करण्यांत आलेली आहे.

# भाग ९

## कर बसविणें व येणें रकमेची वसुली करणें.

**८९. पंचायतीनें कर आणि पट्टी बसविणें**— ( १ ) ह्या कायद्याखालील पंचायतीचीं कामें योग्य तऱ्हेनें पार पाडण्याकरितां जरूर लागतील ते पोटकलम २ मध्यें दिलेल्यापैकी कर किंवा पट्टी, ठरविलेल्या पद्धतीनें आणि दरानें प्रत्येक पंचायतीला बसवितां येतील.

(२) पोट कलम (१) खालीं पंचायतीला बसवितां येण्यासारखे कर किंवा पट्टी खालीलप्रमाणें आहेत:—

(अ) त्या गांवाच्या हद्दींतील घराच्या आणि जमिनींच्या मालकावर किंवा वहिवाटदारांवर कर.

(ब) यात्रेवर कर.

(क) जत्रा आणि उत्सव यावरील कर.

(ड) मालाचे विक्रीवर कर.

(इ) आयात मालावरील जकात.

(फ) लग्नें, दत्तविधानें आणि मेजवान्या यांवरील कर.

(ग) जिल्हा लोकलबोर्डानें मान्य केलेला आणि सरकारनें मंजूर केलेला दुसरा कोणताही कर.

मात्र जर असा एखादा कर, हिंदुस्थानसरकार बाबतच्या कायद्याचें कलम ८० याचें पोटकलम (३) (अ) खालीं तयार केलेल्या ' परिशिष्टांतील कराबाबत नियम ' याच्या दुसऱ्या परिशिष्टांत दिलेल्या कराखेरीज निराळा असेल तर, असा कर गव्हर्नर

जनरल इन कौन्सिलची आगाऊ मंजुरी घेतल्याशिवाय बसवितां येणार नाहीं.

(३) अशा तऱ्हेनें कर किंवा पट्टी बसविल्यामुळें किंवा आकारल्यामुळें जर एकाद्या मनुष्याचें नुकसान झालें असेल तर त्यानें जिल्हा लोकल बोर्डाकडे अपील करावें. जिल्हा लोकल बोर्डाचा त्या बाबतींतील निर्णय अखेरचा समजला पाहिजे.

(४) पोट कलम (१) मध्यें सांगितलेला कोणताही कर किंवा पट्टी बसविण्याचें किंवा लादण्याचें सरकारला तहकूब ठेवितां येईल आणि कोणत्याही वेळीं ती तहकुबी परत घेतां येईल.[१]

**९०. पंचायतींचे कर वाढविण्याचा जिल्हा लोकल बोर्डाचा अधिकारः**— (१) जर एकाद्या पंचायतीचें कायमचें उत्पन्न कलम २६ व २८ खालीं दिलेलीं कामें योग्य तऱ्हेनें पार पाडण्यास जरूर लागणाऱ्या उत्पन्नापेक्षां कमी आहे असें जिल्हा लोकल बोर्डाला वाटेल तर, जिल्हा लोकल बोर्डाला योग्य वाटेल तितकें उत्पन्न सहा महिन्यांचे आंत वाढवण्याकरितां उपाय योजण्यास पंचायतीस जिल्हा लोकल बोर्डाला फर्मावितां येईल. जर पंचायतीनें योग्य उपाय योजून आपलें उत्पन्न सांगितलेल्या मर्यादेपर्यंत वाढविलें नाहीं तर जिल्हा लोकल बोर्डाला कलम ८० मध्यें दिलेल्यापैकीं कोणताही कर किंवा पट्टी बसविण्यास किंवा वाढविण्यास पंचायतीस फर्मावितां येईल.

---

१ पंचायतीनें गांवांतील प्रत्येक घरावर कर बसविलाच पाहिजे असें मूळच्या बिलांत कलम होतें. पण हें तत्त्व सिलेक्ट कमेटीला योग्य न वाटल्यामुळें, तिनें घरांवर कर बसवावा किंवा बसवूं नये हें प्रत्येक पंचायतीचे मर्जीवर सोंपविलें आहे. पो. क. २ मध्यें पंचायतीला कोणते कर बसवितां येतील हें दिलेलें आहे. १९२० च्या कायद्यापेक्षां, ह्या कायद्यानें पंचायतीला कर बसविण्याच्या बाबतींत जास्त अधिकार दिलेले आहेत.

मात्र, या बाबतींत जास्तींत जास्त ठरविल्या जाणाऱ्या दरांपेक्षां कोणताहि कर किंवा पट्टी अधिक बसविण्यास अगर वाढविण्यास जिल्हा लोकल बोर्डास पंचायतीस भाग पाडतां येणार नाहीं.

(२) पोट कलम (१) खालीं दिलेल्या हुकुमाविरुद्ध पंचायतीस कमिशनरकडे अपील करतां येईल आणि कमिशनरला, तो त्या अपिलाचा निकाल देईपर्यंत, त्या हुकुमाची अंमलबजावणी तहकूब ठेवितां येईल.[१]

**९१. कर आणि बाक्या यांची वसुली:**— (१) जेव्हां एकादा कर किंवा पट्टी देणें झालेली असेल तेव्हां पंचायतीनें शक्य तितक्या लवकर जो मनुष्य ते पैसे देण्यास जबाबदार आहे त्याचे कडून येणें असलेल्या रकमेचें बील, कोणत्या तारखेस किंवा कोणत्या तारखेपूर्वी ती रक्कम दिली पाहिजे हें त्यांत नमूद करून त्याचेकडे पाठविण्याचें केलें पाहिजे.

(२) या कायद्याखालीं किंवा नियमाखालीं किंवा पोटनियमाखालीं पंचायतीस देणें असलेला एकादा कर किंवा दुसरी एकादी रक्कम कोणीही मनुष्य ठरविलेल्या तारखेस किंवा त्या पूर्वी देण्यास चुकेल तर त्याचेवर पंचायतीनें मागणीची नोटीस बजावावी.

ज्या रकमेबद्दल मागणीची नोटीस बजावली असेल ती रक्कम जर अशा बजावणीपासून तीस दिवसांचे आंत न दिली तर पंचायतीला त्या चुकविणाऱ्या माणसाचा जंगम माल जप्त करून आणि विकून तिची वसुली करतां येईल.

---

१ पंचायतीनें बसविलेल्या कराचें उत्पन्न, तिचा खर्च भागण्यास अपुरें पडेल असें जि. लो. बोर्डास वाटल्यास, तें पंचायतीला वाढविण्यास सांगण्याचा या कलमानें जि. लो. बोर्डाला अधिकार दिलेला आहे.

(४) पोट कलम (२) खालीं काढलेल्या प्रत्येक मागणीच्या नोटीसीबद्दल, पोटनियमांनीं ठरविलेल्या दरानें फी द्यावी लागेल.

(५) वर दिल्याप्रमाणें जर पंचायतीला कोणताही कर किंवा दुसरी एकादी येणें असलेली रक्कम वसूल करतां आली नाहीं तर पंचायतीनें मामलेदार किंवा महालकरी यांजकडे थकलेल्या बाकीचा उतारा पाठवावा व ती गांवकामगारामार्फत वसूल करण्याची विनंति करावी; आणि त्या बाकी बद्दलचा उतारा मिळाल्यानंतर जर तो उतारा पंचायतीनें पोट कलम (१) खालीं काढलेल्या बिलांत दिलेल्या तारखेपासून एक वर्षाचे आंत मामलेदार किंवा महालकरी यांजकडे पाठविला असेल तर, मामलेदार अगर महालकरी यांनीं ती बाकी जमीनमहसुलाची बाकी समजून गांवकामगारामार्फत वसूल करावी. अशी रक्कम वसूल करण्याबद्दल पोटनियमांत सांगितलेल्या तऱ्हेनें पंचायतीकडून गांवकामगाराला वेतन मिळालें पाहिजे.

(६) जर एकादी पंचायत कोणताही कर, पट्टी किंवा तिला येणें असलेली दुसरी रक्कम वसूल करण्यास चुकेल, किंवा कलम ८४ चें पोटकलम (२) आणि (३) खालीं किंवा ह्या कलमाच्या पोट कलम (२) आणि (३) खालीं योग्य तो उपाय करण्यास हयगय करील तर, कलेक्टरकडे जिल्हा लोकल बोर्डाला ती जमीन महसूलाच्या बाकीप्रमाणें वसूल करण्याबद्दल अर्ज करतां येईल.

मात्र, जर कलम ८४ च्या पोट कलम (३) खालीं ती रक्कम शेरा मारण्यास पात्र झालेल्या तारखेपासून, किंवा ह्या कलमाचें पोट कलम (१) खालीं पाठविलेल्या बिलांत दिलेल्या तारखेपासून, जसें असेल त्याप्रमाणें, एक वर्ष झालें असेल तर, असा कोणताहि अर्ज कलेक्टरकडे करूं नये.

जिल्हा लोकल बोर्डाकडून असा अर्ज मिळाल्यानंतर, कलेक्टरनें त्याला योग्य वाटेल ती चौकशी केल्यावर ती रक्कम जमीन-महसूलाचे बाकीप्रमाणें वसूल करावी.[१]

**९२. वसूल न होणाऱ्या रकमा बुडीत खातीं लिहिण्यास सांगण्याचा कलेक्टराचा अधिकारः**—— कलेक्टरनें——

(अ) कलमें ८१, ८२, व ८४ आणि कलम ९१ चें पोटकलम (६) खालीं वसूल करण्यासारखी व पंचायतीनें शेरा मारून पाठविलेली कोणतीही रक्कम,

(ब) कलम ९१ चें पोटकलम (५) खालीं मामलेदार किंवा महालकरी यांचे मार्फत वसूल करतां येण्यासारखी कराची किंवा पंचायतीला येणें असलेली दुसरी कोणत्याहि रकमेची बाकी,

ह्या जर कलेक्टराच्या मतें वसूल न होण्यासारख्या असतील तर त्या त्यानें बुडीत खातीं लिहिण्यास फर्मावावें.

---

१ पंचायतीनें बसविलेले कर किंवा इतर येणें हें कसें वसूल करावें हें येथें सांगितलें आहे. (१) प्रथम पंचायतीनें त्या रकमेचें बील पाठवावें; (२) बिलाप्रमाणें मुदतींत रक्कम न आल्यास, मागणीची नोटीस पाठवावी; (३) नोटीशीपासून ३० दिवसांत पैसे न दिल्यास, त्या माणसाचा जंगम माल जप्त करून व विकून बाकी वसूल करावी; (४) सर्व बाकी वसूल न झाल्यास गांवकामगाराकडून जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें ती वसूल करवावी. (५) पंचायतीनें बाकी वसूल केली नाहीं तर ती वसूल करण्याबद्दल जि. लो. बोर्डाला कलेक्टरला कळवितां येईल.

# भाग १०

## पंचायतींना आर्थिक मदत

९३. जिल्हा लोकलबोर्डाकडून मदत व कर्ज. (१) मुंबई लोकल बोर्ड कायदा १९२३ यांमध्यें कांहींही सांगितलें असलें तरी जिल्हा लोकल बोर्डानें--

(अ) त्या जिल्ह्यांतील प्रत्येक पंचायतीस त्या गांवांत जमा झालेल्या लोकलफंडसेसपैकीं एकपंचमांशहून कमी नाहीं इतकी रक्कम नेमून दिली पाहिजे;

(ब) व ह्या कायद्यांत दिलेल्या कामासाठीं, अशा पंचायतींना, नियमाप्रमाणें कर्ज द्यावें.

(२) मुंबई लोकल बोर्ड कायदा १९२३ च्या कलम ७६ पोट कलम (१) खालीं तालुका लोकल बोर्डाला खर्चास मिळणाऱ्या लोकल फंडाच्या शिलकेचा अंदाज करतांना त्या शिलकेंतून पोट कलम १ (अ) खालीं त्या तालुका लोकल बोर्डाच्या हद्दींतील पंचायतींना जिल्हा लोकल बोर्डानें दिलेली रक्कम वजा करावी.[१]

---

१ जि. लो. बोर्डानें पंचायत स्थापन झालेल्या गांवांत वसूल झालेल्या लोकल फंडापैकीं किमान एकपंचमांश रक्कम तरी तेथील पंचायतीस द्यावी असें ह्या कलमांत सांगितलें आहे. दरवर्षी मिळणाऱ्या ह्या आर्थिक मदतीमुळें पंचायतींना बसवाव्या लागणाऱ्या करांचा बोजा बराच कमी होईल. पंचायतींचें कार्य यशस्वी होण्यास ज्याप्रमाणें त्यांचेजवळ पुरेसा पैसा असणें जरूर आहे, तितकेंच तो पैसा लोकांवर शक्य तितके कमी कर बसवून गोळा करणेंही जरूरीचें आहे. या दृष्टीनें या कलमान्वयें मिळणारी आर्थिक मदत ही फार महत्त्वाची आहे.

# भाग ११

## निर्बंध

**९४. कामकाजाचे कागदपत्र वगैरे मागविण्याचा अधिकार.**

(१) कलेक्टरला किंवा जिल्हा लोकल बोर्डाला पुढील अधिकार असतील:—

(अ) पंचायतीच्या कामकाजाच्या कागदपत्राचा उतारा, पंचायतीच्या ताब्यांत किंवा तिच्या हुकमतीखालीं असलेले एकादें पुस्तक, कागद किंवा दस्तऐवज, आणि कलेक्टरला किंवा जिल्हा लोकल बोर्डाला पंचायतीकडून मागविणें जरूर वाटेल असा एकादा माहितीचा तक्ता, पत्रक, हिशोब किंवा अहवाल मागविणें;

(ब) पंचायतीला पुढील गोष्टी विचारांत घेण्याला भाग पाडणें—

(१) जें काम पंचायत करण्याच्या विचारांत आहे किंवा करीत आहे अशा काम करण्याला कलेक्टर किंवा जिल्हा लोकल बोर्ड यांना वाटत असलेली हरकत; किंवा

(२) कलेक्टरला किंवा जिल्हा लोकल बोर्डाला पुरवतां येण्यासारखी कांहीं माहिती, जीवरून कलेक्टरला किंवा जिल्हा लोकल बोर्डाला पंचायतीनें एकादी गोष्ट करणें जरूर आहे असें वाटतें,

व कलेक्टरला किंवा जिल्हा लोकल बोर्डाला, जसें असेल त्याप्रमाणें, योग्य वेळांत लेखी उत्तर देऊन, ती गोष्ट करण्याचें न थांबविण्यास किंवा करण्यास काय कारणें आहेत हें कळविण्यास भाग पाडणें.

(२) पोट कलम (१) यांत दिलेले सर्व किंवा कांहीं अधिकार जिल्हा लोकल बोर्डानें आपला अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, चीफ ऑफिसर, पब्लिक हेल्थ ऑफिसर किंवा एक्झिक्यूटिव्ह एन्जीनियर यांचेकडे सोपवावे.[१]

**९५. कामें दुसऱ्यावर सोपविणें, अधिकारी नेमणें, ग्रामपंचायतीच्या स्थापनेस व त्यांच्या वाढीच्या जोपासनेस उत्तेजन देण्यासाठीं ऑनररी मंडळींचा उपयोग करणें.** (१) पंचाय-

---

१ पंचायतीचा कारभार अंदाधुंदीचा होऊं नये, व तो सुरळीत चालावा, म्हणून त्यांचेवर सारखी देखरेख असणें जरूर आहे. तें काम कलेक्टरनें आणि जि. लो. बोर्डानें करावें म्हणून ह्या व पुढील कलमांत तरतूद केली आहे. त्या करितां लागणारे जरूर ते अधिकार कलेक्टरला आणि जि. लो. बोर्डाला दिलेले आहेत. त्यांत प्रामुख्यानें पुढील गोष्टी येतात.

(१) पंचायतीच्या कामकाजाचा, व हिशोबाचा अहवाल मागविणें. (क. ९४)

(२) पंचायतीकडून लागणारी माहिती मागविणें. (क. ९४)

(३) दरसाल तिचे हिशोब तपासणें (क. ९७)

(४) तिनें ठेवलेल्या नोकरांची संख्या आणि पगार कमी करणें. (क. ९८)

(५) पंचायत करीत असलेलें काम तहकूब ठेवण्यास सांगणें. (क.९९)

(६) निकडीचे वेळीं पंचायतीकरितां जरूर तें काम करणें व त्याचा खर्च पंचायतीस देण्यास सांगणें. (क. १००)

(७) पंचायतीवर सोंपविलेलीं कामें ती करीत नसल्यास, तीं दुसऱ्याकडून करून घेऊन त्यांचा खर्च पंचायतीस देण्यास सांगणें. (क. १०१)

(८) पंचायत दिलेल्या अधिकारांचा दुरुपयोग करीत असल्यास, किंवा तिच्यावर सोंपविलेलीं कामें करण्याची नेहमीं टाळाटाळी करीत असल्यास, सरकारला ती तहकूब ठेवण्यास किंवा मोडण्यास सांगणें. (क. १०२)

तीच्या स्थापनेला उत्तेजन देणें, त्यांच्या वाढीच्या जोपासनेस मदत करणें व पंचायतींना या कायद्याखालील आपल्या अधिकाराचा योग्य उपयोग करण्याला व आपलीं कामें नीट पार पाडण्याला मदत करणें, हीं कामें जिल्हा लोकल बोर्डानें आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष, चीफ ऑफिसर, पब्लिक हेल्थ ऑफिसर किंवा जिल्हा लोकल बोर्डानें या कामासाठीं नेमलेला दुसरा एकदा अधिकारी यांचेकडे सोंपवावीं.

(२) पोटकलम (१) खालीं दुसऱ्यावर सोपवितां येण्यासारखीं कामें करतांना जिल्हा लोकलबोर्डाला त्यांत मदत करण्यास विशेष योग्य वाटणाऱ्या एकाद्या इसमाच्या कामगिरीचा स्वीकार करून तिचा ऑनररी म्हणून उपयोग करतां येईल.

(३) या कायद्याखालील कलेक्टरच्या अधिकारापैकीं व कामापैकीं सरकार ठरवील ते अधिकार बजावण्यास व कामें करण्यास सरकारला एक अधिकारी नेमतां येईल. पंचायतीच्या व गांवकोर्टाच्या स्थापनेला उत्तेजन देण्यासाठीं व वाढीला मदत करण्यासाठीं व पंचायतींना व गांवकोर्टांना त्यांचे या कायद्याखालील अधिकार योग्य तऱ्हेनें बजावण्यांत व कामें योग्य तऱ्हेनें पार पाडण्यांत त्यांना मदत करण्यासाठीं व सल्ला देण्यासाठीं सरकार ठरवील तीं इतर कामेंही त्या अधिकाऱ्यानें करावीं व अधिकार बजावावे.

**९६. आंत जाण्याचा अधिकार**:—जिल्हा लोकल बोर्डाला आपला अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा दुसरा एकादा अधिकारी यांना पंचायतीच्या ताब्यांत असलेल्या कोणत्याही स्थावर मिळकतींत किंवा तिच्या नियंत्रणाखालीं चाललेल्या कोणत्याही कामावर जाऊन देखरेख करण्यास किंवा दुसऱ्यास जाण्यास सांगून त्याचेकडून देखरेख करविण्यास अधिकार देतां येईल.

९७. **हिशोब तपासणी**:—सरकारनें याबाबत इतर योजना केली नसेल तर जिल्हा लोकल बोर्डानें दरसाल पंचायतीच्या हिशोबाची तपासणी केली पाहिजे व त्या बोर्डानें तपासणी पूर्ण झाल्यापासून एक महिन्याचे आंत तपासणीच्या यादीची प्रत कलेक्टरकडे पाठविली पाहिजे.

९८. **नोकर मंडळींची संख्या कमी करणें**:—(१) पंचायतीनें ज्या मनुष्यांस आपले अंमलदार किंवा नोकर म्हणून ठेविले असेल किंवा ठेवण्याचें योजलें असेल त्या मनुष्यांची संख्या किंवा त्यांना दिलें जाणारें किंवा देण्याची योजना असलेलें वेतन हें जबर आहे असें कलेक्टरला किंवा जिल्हा लोकलबोर्डाला वाटलें तर पंचायतीनें कलेक्टराच्या किंवा जिल्हा लोकलबोर्डाच्या हुकुमावरून, जसें असेल त्याप्रमाणें, ती संख्या किंवा वेतन कमी केलें पाहिजे.

(२) पोटकलम (१) खाली कलेक्टरच्या किंवा जिल्हा लोकलबोर्डाच्या हुकुमांत तफावत असेल तर पंचायतीनें ती तफावतीची बाब कमिशनरकडे पाठवली पाहिजे व त्याचा निर्णय अखेरचा समजला पाहिजे.

(३) पोट कलम (१) खालीं केलेल्या हुकुमाविरुद्ध पंचायतीनें कमिशनरकडे अपील करावें व कमिशनरचा त्याबाबतचा निणय अखेरचा समजला पाहिजे.

९९. **हुकूम बजावण्याचें तहकूब करणें**:—(१) पंचायतीच्या हुकुमाच्या किंवा ठरावाच्या अंमल बजावणीमुळें किंवा पंचायतीतर्फे केल्या जाणार असणाऱ्या किंवा केल्या जात असलेल्या एखाद्या गोष्टीमुळें जनतेस इजा किंवा त्रास होत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा सार्वजनिक शांततेच्या भंगाचा संभव आहे असें

कलेक्टरला वाटेल तर त्यानें लेखी हुकुमानें त्याची अंमलबजावणी करण्याचें तहकूब करावें किंवा ती गोष्ट करण्याची मनाई करावी.

(२) कलेक्टरनें पोट कलम (१) खालीं हुकूम केल्याबरोबर त्या हुकुमाची एक नक्कल त्याच्या कारणासह तो हुकूम लागू असलेल्या पंचायतीकडे ताबडतोब पाठविली पाहिजे.

(३) या कलमाखालीं उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रकरणाची हकीकत कलेक्टरनें लागलीच कमिशनरकडे पाठविली पाहिजे, आणि त्या बाबतींत केलेल्या कोणत्याही हुकुमाची फेरतपासणी करून किंवा त्यांत फेरफार करून कलेक्टरला करितां आला असतां असा एकादा हुकूम कमिशनरला करतां येईल.

**१००. निकडीचे वेळीं काम करणें:**—(१) जें कोणतेंही काम किंवा कृत्य पार पाडण्याचा किंवा करण्याचा पंचायतीस अधिकार दिलेला असेल व असें काम ताबडतोब करणें किंवा पार पाडणें सार्वजनिक आरोग्याच्या किंवा सुरक्षितपणाच्या दृष्टीनें जरूर आहे असें कलेक्टरला वाटेल, तें काम किंवा कृत्य निकडीच्या प्रसंगीं ताबडतोब पार पाडण्याची किंवा करण्याची कलेक्टरला तरतूद करतां येईल. व तें काम पार पाडण्यास किंवा कृत्य करण्यास जरूर लागणारा खर्च पंचायतीनें ताबडतोब द्यावा असें सांगतां येईल.

(२) सदरहू खर्च त्याप्रमाणें देण्यांत आला नाहीं तर ज्या अधिकाऱ्याच्या ताब्यांत गांवफंड असलेली तिजोरी ठेवलेली आहे, त्या अधिकाऱ्यानें सदर खर्च, किंवा त्यांतील जितका शक्य आहे तितका भाग, त्याच्या ताब्यांत असलेला सदरहू फंडाच्या शिल्लकेंतून द्यावा असें कलेक्टरला फर्मावितां येईल.

**१०१. कर्तव्य करण्यांत कसूरः**––(१) कलम (२६) यांत निर्दिष्ट केलेलें कोणतेंही काम करण्यांत एकादी पंचायत चुकली आहे असें जिल्हा लोकल बोर्डास केव्हांही आढळून आलें, तर त्यानें तें काम ठराविक मुदतींत करण्याचा हुकूम द्यावा, व त्या ठराविक मुदतींत तें काम करण्यांत आलें नाहीं तर जिल्हा लोकल बोर्डानें तें काम करण्यास एकादा मनुष्य नेमावा, व त्या बाबतचा खर्च कसूर करणाऱ्या पंचायतीस जिल्हा लोकल बोर्ड ठरवील त्या मुदतींत देण्यास फर्मावावें.

(२) सदरहू खर्च त्या प्रमाणें देण्यांत आला नाहीं तर ज्या माणसाचे ताब्यांत गांवफंड असेल त्यानें त्याच्या हातीं सदरहू फंडाच्या असलेल्या शिलकेंतून तो खर्च किंवा त्यापैकीं जितका शक्य आहे तितका द्यावा असें जिल्हा लोकल बोर्डाला फर्मावितां येईल.

(३) या कलमाखालीं उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रकरणाचा रिपोर्ट जिल्हा लोकलबोर्डानें कमिशनरकडे ताबडतोब पाठविला पाहिजे आणि कमिशनरला त्यांत केलेल्या हुकुमाचा फेरविचार करून किंवा त्यांत फेरफार करून त्याबाबत जिल्हा लोकल बोर्डाला करतां आला असतां असा दुसरा एकादा हुकूम करतां येईल.

**१०२. कामें न करण्याबद्दल पंचायत मोडण्याचा किंवा ती बंद करण्याचा अधिकारः**––(१) जर एकादी पंचायत आपल्या अधिकाराचें अतिक्रमण करीत आहे किंवा त्याचा दुरुपयोग करीत आहे, किंवा कलम २६ प्रमाणें किंवा त्या त्या काळीं चालू असलेल्या एकाद्या कायद्याप्रमाणें तिच्यावर सोपविलेलीं कामें करीत नाहीं असें सरकारला वाटलें तर, त्यांनीं जिल्हा लोकल बोर्डाशीं विचार-विनिमय करून, मुंबई सरकार गॅझेटमध्यें हुकूम काढून,

(अ) ती पंचायत मोडून टाकावी, किंवा

(ब) त्या हुकमांत दिलेल्या मुदतीपर्यंत ती बंद करावी.

(२) जेव्हां याप्रमाणें पंचायत मोडली असेल किंवा बंद केली असेल, तेव्हां पंचायतींतील सर्व सभासदांनीं सदरहू हुकमांत दिलेल्या तारखेपासून आपले सभासदत्वाचे हुद्दे सोडले पाहिजेत.

(३) जर पंचायत मोडली असेल, तर या कायद्यांत सांगितल्या-प्रमाणें तिची पुनर्घटना केली जाईल.

(४) जर पंचायत बंद केली असेल तर—

(अ) त्या बंद केलेल्या मुदतींत, या बाबत सरकार वेळोवेळीं नेमील त्या एक किंवा अधिक मनुष्यांनीं पंचायतीचे सर्व अधिकार बजावावे व कामें पार पाडावीं, आणि

(ब) त्या बंद केलेल्या मुदतींत, पंचायतीच्या स्वाधीन असलेली सर्व मालमत्ता सरकारच्या स्वाधीन राहील, व

(क) ज्या मुदतीपर्यंत पंचायत बंद केली असेल ती मुदत संपल्यानंतर त्या पंचायतीची या कायद्यांत सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें पुनर्घटना करावी; आणि सभासदत्वाच्या हुद्याची जागा सोडलेलीं सर्व माणसें फेर निवडणुकीस किंवा नेमणुकीस पात्र राहतील.

**१०३. गांवाची मर्यादा बदलल्यानंतर पंचायत मोडणें व तिची पुनर्घटना करणें**:—(१) जर पंचायतीचे मुदतींत त्या गांवाच्या हद्दी बदलल्या जातील तर कमिशनरला लेखी हुकुमानें ती पंचायत मोडून टाकतां येईल, आणि

(अ) ज्या गांवाची पंचायत मोडली असेल तेथें पंचायतीची पुनर्घटना करावी, किंवा

(ब) जें गांव नवीन जाहीर केलें असेल तेथें पंचायत स्थापन करावी, असें फर्मावतां येईल.

जी पंचायत मोडली असेल तिचे सभासदांनीं हुकुमांत सांगितलेल्या तारखेपासून आपल्या सभासदत्वाच्या हुद्याची जागा खालीं केली पाहिजे.

(२) पोटकलम (१) खालीं पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतींत कमिशनर लेखी हुकुमानें फर्मावील तितके लोकनियुक्त, सरकारनियुक्त किंवा कमिशनरनें ठरविलेल्या पद्धतीनें नेमलेले सभासद असतील.

अशा तऱ्हेनें पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतीचे सरपंच किंवा दुय्यम सरपंच या कायद्यांत सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें निवडले पाहिजेत.

(३) अशा पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतीची मुदत, कमिशनर लेखी हुकुमानें ठरवील तितकी, पण एक वर्षापेक्षां जास्त नाहीं इतकी, असली पाहिजे.

(४) पोटकलम (३) यांत सांगितलेली पंचायतीची मुदत संपल्यानंतर त्या पंचायतीची या कायद्यांत सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें घटना केली पाहिजे.

**१०४. मोडलेल्या पंचायतीची मिळकत वगैरे पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतीच्या स्वाधीन व्हावी:—** (१) एकादी पंचायत मोडून कलम १०३ खालीं तिची पुनर्घटना किंवा स्थापना केल्यानंतर त्या मोडलेल्या पंचायतीच्या स्वाधीन असलेला गांवफंडाचा व इतर मिळकतीचा आणि तिच्या

कर्जाचा व इतर जबाबदाऱ्यांचा जितका भाग कमिशनर लेखी हुकुमानें ठरवील तितका त्या पुनर्घटना किंवा स्थापन केलेल्या पंचायतीकडे जाईल.

(२) पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतीचा अधिकार ज्या भागांत असेल त्या भागांत उपस्थित होणारे किंवा त्यांच्याशीं संबंध असणारे करारमदार व इतर बाबी वगैरे संबंधींचे मोडलेल्या पंचायतीचे हक्क व जबाबदाऱ्या त्या पंचायतीकडे जातील.

(३) पुनर्घटना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या पंचायतीचा अधिकार ज्या भागावर चालतो त्या भागासंबंधीं काढलेली, जाहीर केलेली किंवा बसविलेली कोणतीही नोटीस, कर, हुकूम, परवाना त्या पंचायतीबाबत केलेल्या, काढलेल्या किंवा बसविलेल्या एकाद्या नोटिशीनें, करानें, हुकुमानें, परवान्यानें, परवानगीनें, नियमानें किंवा पोटनियमानें रद्द झाले नसतील तोंपर्यंत ते त्या पंचायतीनें किंवा त्या पंचायतीबाबत केले, काढले किंवा बसविले आहेत असें समजलें पाहिजे.

**१०५. एकादा विभाग गांव असण्याचें बंद झाल्याचा परिणामः**—कलम ४ खालीं काढलेल्या एकाद्या जाहीरनाम्यामुळें एकादा विभाग गांव असण्याचें रहित केलें तर—

(अ) ती पंचायत मोडली गेली पाहिजे आणि पंचायतीचे सर्व सभासदांनीं जाहीरनाम्याचे तारखेपासून आपला हुद्दा सोडून दिला पाहिजे.

(ब) गांवफंडाची न खर्च झालेली शिल्लक व पंचायतीचे स्वाधीन असलेली मिळकत जिल्हा लोकलबोर्डाचे स्वाधीन झाली पाहिजे; व त्यानें तिचा त्या विभागांतील रहिवाशांचे हितासाठीं योग्य वाटेल त्या मार्गानें खर्च करावा.

**१०६. पंचायत मोडल्याचा किंवा बंद केल्याचा गांव-कोर्टावर व त्याचे पुढें चालूं असलेल्या कामकाजावर परिणाम**

(१) जर कलम १०२, १०३ किंवा १०५ खालीं एकादी पंचायत मोडली किंवा बंद केली तर, ज्या गांवासाठीं ती पंचायत स्थापन केली होती त्या गांवांत स्थापन केलेलें गांवकोर्ट मोडलें असें समजलें पाहिजे. आणि त्या मोडण्याच्या किंवा बंद करण्याच्या तारखेपासून जसें असेल तसें, गांवकोर्टाचे सर्व सभासदांनीं आपला हुद्दा सोडला पाहिजे.

(२) पोट कलम (१) खाली गांवकोर्ट मोडल्यानंतर

(अ) त्या गांवकोर्टाचे पुढें चालू असणारे दावे किंवा फिर्यादी, डिस्ट्रक्ट जज्ज किंवा कलेक्टर यांनीं, जसें असेल त्याप्रमाणें, कलम ८७ पोटकलम (१) खालीं हुकूम काढून ते रद्द केले असल्याप्रमाणें समजून त्यांना कलम (८७) पोटकलम (२) व (३) चे नियम लागू आहेत असें समजलें पाहिजे; आणि

(ब) चालूं कामकाज व हुकुमनाम्यांच्या किंवा दाव्यांतील हुकमाच्या बजावणींसाठीं आणि फिर्यादींतील दंड व नुकसानभरपाई यांच्या वसूलीसाठीं केलेले अर्ज हे जर तें गांवकोर्ट स्थापन झालें नसतें तर ज्या सबॉर्डिनेट जज्जाला किंवा मॅजिस्ट्रेटला, जसें असेल त्याप्रमाणें, ते चालविण्याची हुकमत असती त्याचेकडे पाठविले पाहिजेत, व त्या सबॉर्डिनेट जज्जानें किंवा मॅजिस्ट्रेटनें, जसें असेल त्याप्रमाणें, ज्या दाव्यांतून किंवा फिर्यादींतून तें कामकाज किंवा अर्ज उपस्थित झाले, त्या दाव्यांचा किंवा त्या फिर्यादींचा त्यानें स्वत: ऐकून निकाल दिल्याप्रमाणें, त्या कामकाजाची किंवा अर्जाची विल्हेवाट लाविली पाहिजे.

**१०७. सरकारचा अधिकारः**—मुंबई लोकल बोर्ड कायदा १९३३ खालीं सरकारला जिल्हा लोकल बोर्डावर जे अधिकार आहेत व जी हुकमत चालवितां येते, तेच अधिकार व तीच हुकमत याही कायद्याशीं संबंध असणाऱ्या सर्व बाबतींत जिल्हा लोकल बोर्डावर आहेत व चालवितां येईल.

---

## भाग १२

## नियम आणि पोटनियम

**१०८. नियमः**—सरकारला मुंबई सरकार गॅझेटमध्यें नोटीस देऊन पुढील बाबतींत नियम करतां येतील—

(१) कलम ४ खालीं, कमिशनरनें कोणत्या तऱ्हेनें चौकशी करावी याचें नियमन करण्यासाठीं;

(२) कलम ६ खालीं, कलेक्टरनें कोणत्या तऱ्हेनें इनामदार किंवा त्याचा प्रतिनिधि नेमावा याची पद्धत ठरविण्याबद्दल;

(३) कलम ७ खालीं सभासदांची निवडणूक कशी करावी याची पद्धत ठरविण्यासाठीं;

(४) कलम २३ खालीं, सरपंच, दुय्यम सरपंच किंवा पंचायतीचे सभासद यांच्या हुद्याची जागा रिकामी झाल्याची नोटीस कोणत्या तऱ्हेनें द्यावी हें ठरविण्यासाठीं;

(५) कलम ३२ खालीं, पंचायतीला मिळणाऱ्या व पंचायतीकडे जमा होणाऱ्या सर्व रकमा कोणाचे ताब्यांत असाव्यात हें ठरविण्यासाठीं;

(६) कलम ३६ खालीं, वार्षिक अंदाजपत्रकें, तक्ते व हिशेब कोणत्या तऱ्हेनें व कोणत्या वेळीं पाठवावे व गांवांतील रहिवाशांची सभा कोणत्या तऱ्हेनें व कोणत्या वेळीं बोलवावी हें ठरविण्यासाठीं;

(७) कलम ३७ खालीं, गांवकोर्ट भरण्याची वेळ व ठिकाण, दावे व फिर्यादी चालण्याबाबत त्यांची घटना; व त्यांचे सभासदांत मतभेद उत्पन्न झाल्यास तो मिटवण्याची तऱ्हा हें ठरविण्यासाठीं; व कलेक्टरनें एकादा इनामदार किंवा त्याचा प्रतिनिधि गांवकोर्टावर कोणत्या तऱ्हेनें नेमावा याचे, व गांवकोर्टापुढील कामें योग्य तऱ्हेनें चालावीं यासाठीं सरकारला योग्य वाटणाऱ्या इतर कोणत्याही बाबीचें नियमन करण्याठीं;

(८) कलम ५९ खालीं, दावे व फिर्यादी दाखल करतेवेळीं द्यावी लागणारी फी ठरविण्याबद्दल,

(९) कलम ६०, ७२, ८० व ८५ खालीं, दाव्यांच्या व फिर्यादींच्या नोंदबुकांत कोणती माहिती लिहावी हें ठरवण्याबद्दल;

(१०) कलम ६२ खालीं समन्सचा नमुना ठरवण्याबद्दल;

(११) कलम ६९ खालीं, गांवकोर्टानें चौकशी कोणत्या तऱ्हेनें करावी याचें नियमन करण्याबद्दल;

(१२) कलम ७६ खालीं, गांवकोर्टानें दाव्यांत किंवा फिर्यादींत किती फी घ्यावी हें ठरवण्याबद्दल;

(१३) कलम ८९ खालीं, त्या कलमांत दिलेले कर व फी कोणत्या दरानें व पद्धतीनें बसवतां येतील हे ठरविण्याबद्दल;

(१४) कलम ९० खालीं, कलम ८९ मध्यें दिलेले कर व फीबसवण्याचे जास्तींत जास्त दर ठरवण्याबद्दल;

(१५) कलम ९१ च्या पोट-कलम ५ खालीं, पंचायतीला मिळावयाचे कर व इतर रकमा वसूल करण्यासाठीं गांवकामगाराचें वेतन, व तें देण्याची पद्धत, हें ठरवण्याबद्दल;

(१६) कलम ९३ खालीं, जिल्हा लोकलबोर्डानें पंचायतीला कर्ज कोणत्या अटीवर द्यावें हें ठरविण्याबद्दल;

(१७) कलम ९५ खालीं, नेमलेल्या अधिकाऱ्याकडे किंवा इसमाकडे कोणते अधिकार व कामें सोपवावीं, किंवा त्यानें बजावावीं किंवा करावीं हें ठरविण्याबद्दल;

(१८) पोटकलम ११२ च्या पोटकलम (३) व (४) खालीं, त्यांत उल्लेख केलेले अधिकार डिस्ट्रिक्ट जज्जानें किंवा कलेक्टरनें दुसऱ्यावर सोपवावयाचे याचें नियमन करण्यासाठीं;

(२) पोटकलम (१) खालीं केलेले नियम हे पूर्वीं प्रसिद्ध केले पाहिजेत या अटीवर अवलंबून असतील.

(३) पोट कलम (१) खालीं केलेले नियम मुंबई कायदे कौन्सिलच्या पुढच्याच बैठकीचे वेळीं कौन्सिलपुढें ठेवण्यांत येतील, व त्यांत त्या कौन्सिलच्या ठरावानें फेरबदल करतां येईल, किंवा ते रद्द करतां येतील, आणि त्या नियमांत, मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीर केल्यानंतर, त्याप्रमाणें फेरफार केला आहे, किंवा तो रद्द केला आहे असें समजलें जाईल.

मात्र जर अशा तऱ्हेच्या फेरफारानें किंवा रद्द करण्यामुळें या कायद्याचा कोणताही उद्देश निष्फळ होण्याचा, किंवा त्याचा विपर्यास होण्याचा संभव आहे असें सरकारला वाटेल तर त्यांनीं मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन तो फेरफार, किंवा रद्द करणें अमलांत येणार नाहीं असें जाहीर करावें, व त्यानंतर तो नियम त्याचा फेरफार केलाच नाहीं किंवा तो रद्द केलाच नाहीं असें समजून अमलांत राहील.[१]

---

१ या कलमाखालीं केलेले नियम परिशिष्ट अ मध्यें दिलेले आहेत.

१०९. **पोटनियम**—[अ] जिल्हा लोकल बोर्डानें कमिशनरच्या अगाऊ मंजुरीनें या कायद्याचे उद्देश अमलांत येण्यासाठीं जरूर ते नियम करावे.

[ब] वर दिलेल्या कलमाच्या व्यापकत्वाला बाध न येतां, जिल्हा लोकलबोर्डानें पुढील बाबींसाठीं नियम करावे—

(अ) कलम १९ खालीं, पंचायतीच्या बैठकीची वेळ व स्थळ व तिच्या सभेचें कामकाज चालवण्याची पद्धत व काम करण्यास लागणारी कमींत कमी मंडळी ठरवणें,

(ब) कलम २० खालीं, दुय्यम सरपंचानें सरपंचाचे कोणते अधिकार बजावावयाचे व कोणतीं कामें करावयाचीं हें ठरवणें;

(क) कलम २६ खालीं,

(१) पिण्यासाठीं उपयोगांत आणलेलीं पाण्याचीं सर्व साधनें शुद्ध करणें आणि तीं दूषित होऊं न देणें याबद्दल;

(२) कोणत्याही ओढयांतून, तळ्यांतून किंवा ठिकाणांतून पाणी काढून नेण्यानें किंवा उपयोग करण्यानें रोग होतो, किंवा आरोग्याला अपाय होतो, किंवा रोग होण्याचा किंवा अपाय होण्याचा संभव असेल तर असें पाणी काढण्यास किंवा त्याचा उपयोग करण्यास मनाई करणें आणि असें तळें किंवा विहीर बुजवून टाकून किंवा त्यावर आच्छादन टाकून अगर दुसऱ्या कोणत्याही योग्य वाटेल त्या मार्गानें असें पाणी काढून नेण्याची अगर तें वापरण्याची मनाई करणें याबद्दल;

(३) सार्वजनिक आरोग्य व सुखसोयी यांना बाधक अशा रीतीनें किंवा अशा ठिकाणीं खत, केरकचरा, अगर इतर कोणतीही दुर्गंधीयुक्त वस्तु ठेवण्याची किंवा सांठवण्याची मनाई करणें याबद्दल;

(४) अपायकारक धंदे किंवा व्यापार यांचें नियमन करण्याबद्दल;

(५) प्रेतें जाळून किंवा पुरून त्यांची विल्हेवाट लावण्याबद्दल;

(६) आरोग्यास अपायकारक किंवा आसपासचे लोकांस त्रासदायक अशी माती खणून काढणें व खड्डे खळगे भरून काढणें याबद्दल;

(७) अपायकारक झाडेंझुडपें काढून टाकण्याबद्दल;

(८) धोक्याच्या किंवा मोडकळीस आलेल्या इमारती दुरुस्त करणें व पाडून टाकणें याबद्दल;

(९) हवा खेळण्याची किंवा रस्ते आंखण्यासाठीं अगर त्यांची जागा ठरविण्यासाठीं योग्य तरतूद केल्याशिवाय इमारती बांधण्यास मनाई करण्याबद्दल;

(१०) यात्रा व बाजार यांवर नियंत्रण घालण्यासाठीं, व बाजारपेठा, कत्तलखाने व गाडीतळ यांचें नियमन करण्यासाठीं;

(११) विक्रीसाठीं मांडलेल्या अन्नाची व पेयाची तपासणी करणें व तें अयोग्य असल्यास त्याचा नाश करणेंबद्दल;

(१२) आरोग्य व झाडलोट यांचें सर्व साधारण नियमन करणें याबद्दल;

(ड) कलम २८ खालीं, जिल्हा लोकल बोर्डानें नेमलेल्या मजुरांवर देखरेख करणें, धर्मशाळांची दुरुस्ती करणें, कोंडवाडे ठेवणें व त्यांची व्यवस्था राखणें, जिल्हा लोकल बोर्डानें सोपवलेलीं कामें पार पाडणें, बागायतीच्या पाण्याची विभागणी करणें व सरकारनें सोपवलेलीं इतर कामें करणें याबद्दल;

[क] वर दिलेल्या पोटकलमाखालीं केलेल्या कोणत्याही

पोट नियमानें असें ठरवतां येईल कीं त्या नियमाचें उल्लंघन केल्यास पुढील शिक्षा देण्यांत येईल—

(अ) दहा रुपयांपर्यंत दंड; किंवा

(ब) हें उल्लंघन सारखें चालू राहिल्यास, पहिल्या उल्लंघनानंतर, गुन्हा शाबीत झाल्यापासून तें उल्लंघन चालू असे-पर्यंत, दररोज एक रुपयापर्यंत दंड.

---

## भाग १३
## किरकोळ

**११०. नुकसान, उधळपट्टी किंवा दुरुपयोग याबद्दल सभासदाची जबाबदारीः**—(१) पंचायतीच्या पैशांचें किंवा इतर मालमत्तेचें नुकसान, उधळपट्टी किंवा दुरुपयोग झाल्यास, ज्या सभासदानें तें करण्यांत भाग घेतला असेल, किंवा ज्याच्या अयोग्य वर्तनामुळें अगर सभासदत्वाच्या कर्तव्यांत हयगय केल्यामुळें तें घडलें असेल, किंवा घडण्यास मदत झाली असेल त्याबद्दल तो जातीनें जबाबदार राहील.[१]

---

१ पंचायत ही संस्थापित मंडळी असल्यामुळें, कायद्याच्या दृष्टीनें जरी ती एक 'व्यक्ति' समजली जात असली तरी, तिचा सर्व कारभार तिच्या सभासदांच्या मार्फतच चालावयाचा असतो. यामुळें पंचायतीचें हित किंवा अहित पाहणें, नफा किंवा नुकसान करणें, आणि तिच्या मालाचा व पैशाचा सदुपयोग किंवा दुरुपयोग करणें हें सभासदांच्या हातीं आहे. तेव्हां कोणत्याही सभासदानें पंचायतीच्या पैशाचा किंवा मालमत्तेचा नाश, नुकसान किंवा दुरुपयोग करूं नये म्हणून, या कलमांत असा सभासद झालेल्या नुकसानीबद्दल व्यक्तिशः जबाबदार धरला जाईल असें सांगितलें आहे.

(२) जर एकाद्या सभासदाबद्दल, त्याला त्याविरुद्ध योग्य कारण दाखवण्यास पुरेशी संधि दिल्यानंतरही, कलेक्टरची अशी खात्री झाली कीं, पंचायतीच्या पैशाचें किंवा मालमत्तेचें नुकसान, उधळपट्टी किंवा दुरुपयोग त्या सभासदाच्या अयोग्य वर्तणुकीचा किंवा अतिशय हयगयीचा प्रत्यक्ष परिणाम आहे, तर कलेक्टरनें लेखी हुकुमानें त्या सभासदाला कांहीं ठराविक तारखेच्या आंत तें नुकसान, उधळपट्टी किंवा दुरुपयोग भरून काढण्यास लागणारी रक्कम पंचायतीला देण्यास सांगावी.

(३) जर रक्कम याप्रमाणें दिली गेली नाहीं तर कलेक्टरनें ती जमीन महसुलाच्या बाकीप्रमाणें कसून वसूल केली पाहिजे व गांवफंडांत जमा केली पाहिजे.

(४) पोटकलम (२) खालील सभासदाच्या जबाबदारीबद्दल व त्याचेकडून वसूल करावयाच्या रकमेबद्दलचा कलेक्टरचा निर्णय अखेरचा राहील.

**१११. पंचायत, गांवकोर्ट वगैरेविरुद्ध काम चालविण्यास हरकत व दाखल करण्यापूर्वी नोटीसः—**(१) पंचायतीचा कोणीहि सभासद, अधिकारी, नोकर किंवा मुखत्यार यांनीं या कायद्याखालील, नियमाखालील किंवा पोट नियमाखालील कोणतीही गोष्ट सद्हेतूनें केल्यास त्याबद्दल त्याचेविरुद्ध काम चालणार नाहीं.[१]

---

१. पंचायतीस कायद्यानें दिलेले अधिकार बजावणें आणि तिच्यावर कायद्यानें लादलेल्या जबाबदाऱ्या पार पाडणें हें तिच्या सभासदांचें व नोकरांचें काम आहे. तें काम सद्हेतूनें करितांना जर एखाद्याच्या कायदेशीर हक्कांचें उल्लंघन झालें तर, त्याबद्दल तें काम करणारा व्यक्तिशः जबाबदार धरला जाणार नाहीं अशी त्यांस हमी देणें जरूर आहे. असें जर कायद्यानें संरक्षण न दिलें तर पंचायतीचें काम करण्यास कोणीच तयार होणार नाहीं. म्हणनच या कलमांत ती तरतूद केलेली आहे.

(२) कोणत्याही पंचायतीविरुद्ध किंवा गांवकोर्टाविरुद्ध, किंवा त्या पंचायतीचा किंवा तिच्या हुकुमतीखालीं काम करणाऱ्या गांवकोर्टाचा सभासद, अधिकारी, नोकर किंवा गुमास्ता यांचेविरुद्ध, या कायद्यान्वयें केलेल्या किंवा या कायद्यान्वयें आहे असें समजून केलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल त्या पंचायतीच्या किंवा गांवकोर्टाच्या कचेरींत व ज्या सभासदाविरुद्ध, अधिकाऱ्याविरुद्ध, नोकराविरुद्ध किंवा गुमास्त्याविरुद्ध काम चालवावयाचें असेल त्याचें राहाण्याचे ठिकाणीं लेखी नोटीस दिल्यापासून किंवा पोंचविल्यापासून तीन महिन्यांचे आंत कोणतेंही काम दाखल करतां येणार नाहीं. त्या नोटीशीमध्यें दाव्याचें कारण, मागितलेल्या दादीचें स्वरूप, मागितलेली नुकसानभरपाई व दावा आणणाऱ्या माणसाचें नांव व राहाण्याचें ठिकाण हीं दिलीं पाहिजेत[२].

(३) अशा तऱ्हेचें प्रत्येक काम दाव्यास कारण झाल्यापासून सहा महिन्यांचे आंत दाखल केलें पाहिजे. नंतर करतां येणार नाहीं.

---

२. परंतु वरप्रमाणें त्या नोकरांवर व्यक्तिशः कोणतीही जबाबदारी येत नसली तरी, कांहीं विशिष्ट परिस्थितींत त्यांच्यावर पंचायतीचे किंवा गांवकोर्टाचे सभासद, नोकर, अधिकारी किंवा मुखत्यार म्हणून दावा करतां येतो; किंवा त्या पंचायतीवर किंवा गांवकोर्टावरही दावा करतां येतो. अशा दोन्ही वेळीं सर्व जबाबदारी त्या पंचायतीवर किंवा गांवकोर्टावर असल्यामुळें, त्यांना आपल्या सर्व सभासदांची सभा भरवून व योग्य चौकशी करून विचार करण्यास, व जरूर तर दाव्यापूर्वीच नुकसानभरपाई देऊन अगर इतर मार्गानें त्या तक्रारीचें पूर्ण निरसन करण्यास सवड पाहिजे. अशी सवड मिळण्यासाठीं या कलमान्वयें त्यांना दाव्यापूर्वी तीन महिने अगाऊ नोटीस देऊन दाव्याचें कारण, वादीचें नांव, वगैरे सर्व माहिती पुरवली पाहिजे. अशाच तऱ्हेची तरतूद डि. लो. बो. अॅक्ट, म्यु. अॅक्ट, सि. प्रो. कोड वगैरे मध्येंही आहेत.

(४) पोटकलम (२) खालीं ज्या पंचायतीला किंवा गांव-कोर्टाला किंवा ज्या इसमाला नोटीस दिली असेल त्यानें जर दावा आणण्याचे पूर्वी वादीस पुरेशी नुकसानभरपाई देऊं करून ती रक्कम कोर्टात भरली तर वादीला त्याहून जास्त रक्कम देवविली जाणार नाहीं. अशा तऱ्हेनें रक्कम देऊं केल्यानंतर प्रतिवादीला जो खर्च आला असेल तोही वादीनें दिला पाहिजे.

**११२. अधिकार सोपवणें**:--(१) या कायद्याखालीं पंचायतीच्या किंवा गांवकोर्टाच्या बाबत सरकारनें बजावावयाचे सर्व अधिकार त्यांनीं मुंबई सरकार गॅझेटमध्यें जाहीरनामा देऊन कमिशनरला किंवा कलम ९५ पोटकलम (३) खालीं मुद्दाम नेमलेल्या एकाद्या अधिकाऱ्याला बजावण्याचा हुकूम द्यावा.

(२) जर एकादें जिल्हा लोकलबोर्ड मोडलें असेल किंवा रद्द केलें असेल तर या कायद्याचे ठरावाअन्वयें जिल्हा लोकलबोर्डाला पंचायतीबाबत दिलेले अधिकार बजावण्याचा हक्क सरकारनें मुंबई गॅझेटमध्यें जाहीरनामा काढून कोणाही इसमास द्यावा.

(३) कलम ८५ पोटकलम (१) खालीं डिस्ट्रिक्ट जज्जानें दाव्याचे बाबतींत बजावावयाचे अधिकार, त्यानें, याबाबत केलेल्या नियमांस बाध न येतां, कोणत्याही सबॉर्डिनेट जज्जाकडे, त्या सबॉर्डिनेट जज्जाचे हुकमतींत असणाऱ्या गांवकोर्टाबाबत, सोपवावे;

(४) या बाबत केलेल्या नियमांस बाध न येतां कलेक्टरनें:—

(अ) कलम ८७ पोटकलम (१) खालीं त्यानें गांवकोर्टाबाबत बजावावयाचे अधिकार, क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या कलम ४०७ खालीं अपील ऐकण्याचा अधिकार असणाऱ्या एकाद्या पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटकडे, त्या मॅजिस्ट्रेटच्या हुकमतीखालीं असणाऱ्या एकाद्या गांवांतील गांवकोर्टाबाबत, सोपवावे;

(ब) या कायद्याचे ठरावाप्रमाणें कलेक्टरनें फिर्यादीबाबत बजावावयाचे, कलम ८७ पोटकलम (१) यांत दिलेले वगळून बाकीचे अधिकार, डेप्युटी कलेक्टरपेक्षां दर्जानें कमी नाहीं अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवावे.

**११३. स्थानिक चौकशी व पंचायतीचे रिपोर्टः**—खालील बाबतींत चौकशी करून रिपोर्ट करण्याचें प्रत्येक पंचायतीचें काम राहील:—

(अ) ज्या प्रकरणांत एकाद्या मॅजिस्ट्रेटनें क्रिमिनल प्रोसीजर कोड १८९८ च्या २०२ कलमाखालीं[१] पंचायतीनें आगाऊ स्थानिक चौकशी करावी असें कळवलें आहे, त्या कलमाच्या पोटकलम (१) मध्यें "इतर कोणीही इसम" या शब्दांत पंचायतीचा अंतर्भाव होतो असें समजलें पाहिजे;

(ब) क्रिमिनल प्रोसीजर कोड १८९८ च्या कलम ४८८ खालीं[२] चौकशी करणाऱ्या मॅजिस्ट्रेटनें, ज्या स्त्रीच्या किंवा ज्या मुलाच्या पोटगीसाठीं अर्ज केला गेला आहे ती स्त्री किंवा तें मूल अगर तिचा नवरा किंवा त्याचा बाप ज्या गांवांत राहात असेल

---

१ क्रि. प्रो. कोडच्या २०२ कलमाखालीं, मॅजिस्ट्रेटकडे त्याला चौकशी करण्याचा अधिकार असलेली अशी कोणतीही फिर्याद आल्यानंतर, तो जर तिसऱ्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट नसेल तर, त्याला आरोपीला हजर राहाण्यासाठीं समन्स पाठविण्यापूर्वी, त्या फिर्यादीत खरेपणा कितपत हें पाहण्यासाठीं तिची चौकशी करण्याकरितां, ती फिर्याद त्याच्यापेक्षां कमी दर्जाच्या मॅजिस्ट्रेटकडे, पोलीस अधिकाऱ्याकडे किंवा दुसऱ्या एखाद्या माणसाकडे पाठवितां येते. व अशा चौकशीकरितां त्याला ती फिर्याद पंचायतीकडेही पाठवितां येईल असें ह्या कलमांत सांगितलें आहे.

२. एकाद्या मनुष्याला, पुरेसें उत्पन्न असून सुद्धां जर तो आपल्या बायकोचें किंवा औरस किंवा अनौरस अशा मुलांचें किंवा मुलींचें पालनपोषण करीत नसेल तर, त्याकरितां त्यानें दरमहा ठराविक रक्कम द्यावी असा

त्या गांवच्या पंचायतीकडून, त्या पक्षकारांची परिस्थिति विचारांत घेऊन किती पोटगी द्यावी याबद्दल रिपोर्ट मागवला असेल तर त्या प्रकरणीं असा रिपोर्ट चौकशींत पुरावा म्हणून घेतला पाहिजे.

मात्र, ज्या प्रश्नाबाबत रिपोर्ट पुरावा म्हणून घेतला जातो त्या प्रश्नाबाबत साक्ष देण्यासाठीं पंचायतीचे कोणाही सभासदास साक्षीदार म्हणून हजर रहावें लागणार नाहीं; परंतु मॅजिस्ट्रेटनें त्याला योग्य वाटेल तर जास्त माहिती मागवावी.

**११४. पंचायतीचे किंवा गांवकोर्टाचे सभासद वगैरे सरकारी नोकर समजावे.**— पंचायतीचा किंवा गांवकोर्टाचा प्रत्येक सभासद, व पंचायतीनें किंवा गांवकोर्टानें नेमलेला किंवा ठेवलेला प्रत्येक अधिकारी व नोकर हा इंडियन पिनल कोडचे कलम २१ खालीं सरकारी नोकर समजला पाहिजे.[१]

---

मॅजिस्ट्रेटास क्रि. प्रो. कोडाच्या ४८८ कलमाखालीं हुकूम करितां येतो. व या कलमाखालीं असा हुकूम करण्यापूर्वीं, पक्षकारांची परिस्थिति वगैरे लक्षांत घेऊन त्यांना किती पोटगी देववावी याबद्दल चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं मॅजिस्ट्रेट पंचायतीला सांगू शकेल.

१ इं.पि. कोडाचें कलम २१ मध्यें, 'सरकारी नोकर' या सदराखालीं कोणते लोक येतात हें सांगितलें आहे. पंचायतीचे आणि गांवकोर्टाचे सर्व सभासद, अधिकारी व नोकर हे 'सरकारी नोकर' ह्या सदराखालीं मोडतात, असें ह्या कलमांत सांगितलें आहे. इं. पि. कोडमध्यें 'सरकारी नोकर' आणि समाजाचे इतर घटक ह्यांच्यांत भेद केलेला आहे. कारण असे कांहीं गुन्हे आहेत कीं, ते शाबीत होण्यासाठीं, गुन्हेगार सरकारी नोकर असावा लागतो. (ते गुन्हे इं. पि. कोडाचे १२ वे भागांत वेगळे दिलेले आहेत.) शिवाय, 'सरकारी नोकर' म्हणून काम करतांना त्यांना देण्यांत येणाऱ्या सवलती ह्या विशेष प्रकारच्या असून त्या त्यांच्या पुरत्याच असतात. 'सरकारी नोकरांना' ह्या विशेष सवलती असल्यामुळें आणि त्याचे बरोबर त्यांचे हातीं सत्ता व अधिकार असल्यामुळें, त्यांनीं केलेल्या गुन्ह्याबद्दल त्यांना इतर लोकांपेक्षां कडक शिक्षा ठेविलेली आहे.

**११५. कांहीं कायदे रद्द करणें व अपवाद.**—मुंबई ग्रामपंचायत कायदा १९२० ह्यावरून रद्द केला आहे;

मात्र—

(अ) त्या रद्द करण्यामुळें कोणत्याही मनुष्यानें त्या कायद्याखालीं देणें असलेल्या रक्कम देण्याच्या जबाबदारीला, किंवा त्या कायद्याखालीं आधींच केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणाला किंवा बेकायदेशीरपणाला बाध येत नाहीं;

(ब) मुंबई ग्रामपंचायत कायदा १९२० सालीं स्थापन केलेल्या व हा कायदा अमलांत येण्याचे वेळीं अस्तित्वांत आलेल्या सर्व ग्रामपंचायती या कायद्याखालीं स्थापन केलेल्या आहेत असें समजलें पाहिजे;

व ह्याप्रमाणें स्थापन झाल्या आहेत असें समजलें जाणाऱ्या पंचायतींकडे त्या सर्व पंचायतींचे हक्क येतील व जबाबदाऱ्या दिल्या जातील.

व त्या रद्द केलेल्या अशा कोणत्याही पंचायतीबाबत केलेली, काढलेली किंवा बसवलेली कोणतीही नेमणूक, जाहीरनामा, नोटीस, कर, हुकूम, परवाना, नियम किंवा पोटनियम हे जर या कायद्याचे ठरावास विसंगत नसतील, व या कायद्याखालीं केलेल्या, काढलेल्या किंवा बसवलेल्या कोणत्याही नेमणुकीनें, जाहीरनाम्यानें, नोटिशीनें, करानें, हुकुमानें, नियमानें किंवा पोटनियमानें रद्द झाले नसतील तर व तोंपर्यंत, या कायद्याचे कलमाखालीं स्थापन केल्या आहेत असें समजलें जाणाऱ्या पंचायतीसंबंधानें या कायद्याच्या कलमाखालीं केले आहेत, काढले आहेत किंवा बसवले आहेत असें समजलें पाहिजे.

(२) जोंपर्यंत एकाद्या गांवांत हा कायदा व नियम व पोट-नियम अमलांत आहेत तोंपर्यंत त्या गांवांत परिशिष्टांत दिलेले कायदे, परिशिष्टाच्या तिसऱ्या रकान्यांत दर्शविल्याइतके अमलांत असणार नाहींत.

## परिशिष्ट.

(कलम ११५ पहा.)

| कायद्याचा नंबर व साल. | विषय. | किती रद्द केला. |
|---|---|---|
| मुंबई कायदा ७, १८६७ चा | बॉम्बे डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट, १८६७ | कलमें ३३ व ३४. |

परिशिष्ट अ

## मुंबई सरकारनें
# या कायद्याबाबत केलेल्या कानू

१९३५

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | गांवपंचायतींच्या निवडणुकीबाबत कानू | १–१० |
| २ | कमिशनरानें चौकशी करण्याच्या रीतीचें नियमन | ११–१३ |
| ३ | कलेक्टरनें मुलकी गांव धारण करणारा किंवा त्याचा वारचा नेमण्याबद्दलचें नियमन करण्याबाबत | १३–१४ |
| ४ | पंचायतींचा सरपंच किंवा डेप्युटी सरपंच किंवा सभासदांच्या हुद्याची जागा रिकामी झाल्याची नोटीस ज्या रीतीनें दिली पाहिजे त्या रीतीचें नियमन | १५ |
| ५ | पंचायतीस मिळालेल्या सर्व रकमा व तिकडे येणाऱ्या सर्व रकमा ज्या रीतीनें कबज्यांत ठेवल्या पाहिजेत ती रीत ठरवण्याबाबत | १५–१६ |
| ६ | कर व फी ज्या दरानें बसवल्या पाहिजेत तो दर व ती रीत याबावत | |
| | अ. सामान्य कानू | १६–१९ |
| | ब. घरांच्या जमिनींच्या मालकावर किंवा त्यांचा भोगवटा करणाऱ्या इसमावर कर बसवण्याबाबत | १९–२६ |
| | क. यात्रेकरूंवर कर बसवण्याबावत | २६–२७ |
| | ड. जत्रा व उत्सव यांवर कर बसवण्याबाबत | २७ |
| | इ. मालाच्या विक्रीवर कर बसवण्याबाबत | २८ |
| | फ. ऑक्ट्रॉय बसवण्याबाबत | २८–२९ |
| | ग लग्नकार्ये, दत्तविधान व मेजवान्यांवर कर बसवण्याबाबत | २९–३० |
| ७ | कर व फी बसवण्याच्या कमाल दर ठरवण्याबाबत | ३०–३३ |

| | | |
|---|---|---|
| ८ | पंचायतीस येणें असलेले कर व इतर रकमा वसूल करण्याबद्दल कामगारास द्यावयाच्या मेहनतान्याची रीत ठरवण्याबावत | ३३–३४ |
| ९ | जिल्हा लोकलबोर्डानें गांवपंचायतीस द्यावयाच्या कर्जाच्या शर्तीबावत | ३५ |
| १० | गांवचें न्यायदानमंडळ | ३६–४७ |
| ११ | गांवपंचायतीचें बजेट व अकौंट्स् (हिशेब) यांबावत | ४८–८९ |

# सन १९३४ च्या मुंबईच्या
# गांवपंचायतींच्या निवडणुकीबाबत कानू

मुक्काम जंजिरे, मुंबई, तारीख ६ माहे जून सन १९३४.

[ सन १९३५ च्या जानेवारीचा जाहीरनामा नं. एस्. १७४१३ अन्वयें सुधारलेल्या ]

नंबर एस्. १७४१३—सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट (सन १९३३ चा मुंबईचा आक्ट ६ वा) याचें कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (क) याअन्वयें मिळालेले अधिकार चालवून, मुंबई सरकार हे, गांवपंचायतीतील सभासदांची निवडणूक कोणत्या रीतीनें करण्यांत यावी, ती रीत ठरविण्याबाबत खालील कानू करीत आहेत. त्या येणेंप्रमाणें:—

१. लहान सरनामा:—या कानूंस "सन १९३४ च्या मुंबईच्या गांवपंचायतींच्या निवडणुकीबाबत कानू" असें म्हणावें.

२. व्याख्या:—या कानूंत, विषयास किंवा संदर्भास बाध येत नसेल तर—

(१) "आक्ट" या शब्दाचा अर्थ, सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतीबाबत आक्ट, असा समजावा;

(२) "निवडणूक" या शब्दाचा अर्थ, पंचायतीच्या सभासदाची निवडणूक, असा समजावा;

(३) "अध्यक्षस्थानीं असणारा अंमलदार" या शब्दांचा अर्थ, अध्यक्षस्थानीं असणारा अंमलदार म्हणून कानू ८ अन्वयें कलेक्टरनें नेमलेला कोणताही इसम, असा समजावा;

(४) "कलम" या शब्दाचा अर्थ, सदरहू आक्टाचें कलम, असा समजावा;

(५) "स्पेशल अंमलदार" या शब्दांचा अर्थ, कलम ७ (३) अन्वयें अधिकार चालविण्यासाठीं कलम ९५ (३) अन्वयें सरकारनें नेमलेला अंमलदार, असा समजावा;

(५-अ) "गांवची चावडी" या संज्ञेंत सन १८७९ चा जमिनमहसुलाचा कायदा याअन्वयें चावडी म्हणून समजण्यांत येणाऱ्या जागेचा समावेश होतो;

(५-ब) "गांवपंचायतीची कचेरी" या संज्ञेचा अर्थ सदरहू आक्टाच्या १९ व्या कलमाअन्वयें ठरविलेली पंचायत भरण्याची जागा, असा आहे; आणि

(६) "मतदार" या शब्दाचा अर्थ, निवडणुकीचे वेळीं मत देण्यास कलम ७ (२) अन्वयें हक्क असलेला इसम, असा समजावा.

३. मतदारांच्या याद्या तयार करणें:—(१) याबाबत कलेक्टरानें नेमलेल्या एखाद्या अंमलदाराकडून किंवा एखाद्या इसमाकडून मतदारांची यादी कलेक्टर तयार करवून घेईल. अशी यादी निवडणुकीसाठीं ठरविलेल्या तारखेपूर्वी निदान दोन महिने आधीं गांवच्या देशभाषेंत तयार केली पाहिजे.

(२) मतदारांची यादी व संबंध असलेल्या इसमांनीं स्पेशल अंमलदाराकडे, किंवा कोणताही स्पेशल अंमलदार नेमणेंत आलेला नसेल तर, कलेक्टराकडे सदरहू यादींत फेरफार करण्याबद्दल नोटिशीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत अर्जी करण्यास सदरहू इसमास जिच्या योगें विनंति करण्यांत येईल अशी नोटीस या दोन्ही, सदरहू यादी तयार झाल्यानंतर सोईच्या दृष्टीनें शक्य तितक्या लवकर, प्रसिद्ध करून त्यांच्या प्रती गांवच्या चावडीचे ठिकाणीं किंवा गांवपंचायतीच्या कचेरीचे ठिकाणीं, किंवा पोट-कलम (१) अन्वयें सदरहू यादी तयार करणाऱ्या अंमलदाराकडून किंवा इसमाकडून त्याबाबत नेमण्यांत येईल अशा इतर सार्वजनिक जागीं चिकटविल्या पाहिजेत.

४. मतदारांची यादी सुधारणें:—(१) कानू ३ ची पोट-कानू (२) अन्वयें प्रसिद्ध केलेल्या मतदारांच्या यादींत ज्या इसमाचें नांव दाखल करण्यांत आलें नसेल व सदरहू यादींत आपलें नांव दाखल करण्यांत यावें

असें जो हक्कानें सांगत असेल असा कोणताही इसम आणि ज्या मनुष्याचें नांव सदरहू यादींत दाखल करण्यांत आलेलें असून आपलें स्वतःचें किंवा कोणत्याहि इसमाचें नांव सदरहू यादींत चुकीनें दाखल करण्यांत आलें आहे किंवा सदरहू यादींतून कोणत्याही इतर इसमाचें नांव चुकीनें वगळण्यांत आलें आहे असें ज्या इसमास वाटत असेल असा कोणताहि इसम या दोघांस सदरहू यादी अशा रीतीनें प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आंत सदरहू यादी सुधारण्यासाठीं कानू ३ (२)अन्वयें प्रसिद्ध केलेल्या नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या अंमलदाराकडे लेखी अर्जी करण्याचा अधिकार आहे.

(२) मतदारांची यादी सदरहू अंमलदाराच्या निकालानुसार सुधारण्यांत येऊन ती कानू ३ अन्वयें मतदारांची यादी तयार करणाऱ्या अंमलदाराकडून किंवा इसमाकडून निवडणुकीच्या तारखेपूर्वीं निदान एक महिना आधीं प्रसिद्ध करण्यांत येईल व तिच्या प्रती गांवच्या चावडीचे ठिकाणीं किंवा गांवपंचायतीचे कचेरीचे ठिकाणीं किंवा सदरहू अंमलदाराकडून किंवा इसमाकडून ठरविण्यांत येईल अशा इतर सार्वजनिक ठिकाणीं चिकटविण्यांत येतील.

(३) मत देण्यास आपण लायक आहों याविषयीं स्पेशल अंमलदाराची, किंवा स्पेशल अंमलदार नेमलेला नसेल तर, कलेक्टरची जो कोणी खात्री करील अशा प्रत्येक इसमाचें नांव निवडणुकीचे तारखेस किंवा त्या तारखेपूर्वीं अशा यादींत दाखल करण्यांत येईल.

५. **मत देण्याचा कोणास हक्क आहे**:—मतदारांच्या यादींत ज्याचें नांव दाखल केलें गेलें आहे अशा प्रत्येक इसमास, व कलम ७ (२) मधील ठरावान्वयें मत देण्याचा हक्क असलेला इसम आपण आहों याविषयीं अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराची जो खात्री करील अशा प्रत्येक इसमास मत देण्याचा हक्क असेल.

६. **मत देण्याचा कोणास हक्क नाहीं**:—कलम ७ (२) मध्यें निर्दिष्ट केलेल्या लायक्या ज्या इसमास नसतील असा कोणताहि इसम मत देण्यास लायक असणार नाहीं.

७. निवडणुकीची रीत:—निवडणूक बॅलटनें (मतपत्रिका टाकून) किंवा हात वर करून करण्यांत यावी ही गोष्ट कलेक्टर ठरवील.

८. निवडणुकीपूर्वी करावयाच्या गोष्टी:—कलेक्टरनें—

(अ) कलम ७ (१) अन्वयें त्यानें नेमलेल्या तारखेस ज्या ठिकाणीं व जे वेळीं निवडणूक करण्यांत येईल तें ठिकाण व वेळ ठरविली पाहिजे.

(ब) निवडणूक करण्यासाठीं अध्यक्षस्थानीं असणारा अंमलदार नेमला पाहिजे.

(क) निवडणुकीची तारीख, वेळ व ठिकाण आणि अध्यक्षस्थानीं असणारा अंमलदार याची नेमणूक या गोष्टींची लेखी नोटीस गांवच्या देशभार्षेत गांवच्या चावडीत किंवा इतर सार्वजनिक जागीं निवडणुकी-साठीं ठरविलेल्या तारखेपूर्वी निदान पंधरा दिवस आधीं प्रसिद्ध करविली पाहिजे, आणि

(ड) निवडणुकीसाठीं ठरविलेल्या दिवसापूर्वी गांवांत दवंडी पिटवून सर्व मतदारांनीं निवडणुकीसाठीं नेमलेल्या दिवशीं व वेळीं व ठिकाणीं हजर राहण्याबद्दल नोटीस देवविली पाहिजे.

९. हात वर करून निवडणूक करावयाची असेल तेव्हां निवडणुकीचे वेळीं काम चालविण्याची रीत:—जेव्हां निवडणूक हात वर करून करावयाची असेल तेव्हां काम चालविण्याची रीत खालीं लिहिल्याप्रमाणें असावी, ती येणेंप्रमाणें—

(१) निवडणुकीसाठीं नेमलेल्या दिवशीं व वेळीं व ठिकाणीं अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें कानू ८ मधील रक्कम (ड) अन्वयें दिलेल्या नोटिशीनुसार जमलेल्या इसमांच्या सभेत अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे, व जे इसम मतदार नसतील अशा सर्व इसमांना सभेतून वगळलें पाहिजे.

(२) अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें निवडणुकीस उभें राहण्याची ज्यांची इच्छा असेल अशा उमेदवारांस पुढें येण्यास सांगितलें पाहिजे आणि जे उमेदवार कलम ८ अन्वयें नालायक नसतील अशा

उमेदवारांचीं नांवें लिहून घेतलीं पाहिजेत. कोणताहि उमेदवार नालायक ठरविण्यांत येईल तर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें त्याबाबतचीं कारणें थोडक्यांत नमूद केलीं पाहिजेत.

(३) योग्य रीतीनें लायक असलेल्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सभासदांच्या संख्येहून अधिक नसेल तर, अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें असे उमेदवार योग्य रीतीनें निवडून आले असें तावडतोब जाहीर करावें.

(४) योग्य रीतीनें लायक असलेल्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या सभासदांच्या संख्येहून अधिक असेल, तर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें उमेदवारांचीं नांवें वाचावीं व निवडावयाच्या सभासदांची संख्या सांगून मतें देण्याची ठरविलेली रीत जमलेल्या मतदारांस समजावून सांगावी.

(५) योग्य रीतीनें लायक असलेल्या प्रत्येक उमेदवाराचें नांव—

(अ) हात वर करून,

(ब) "होय" व "नाहीं" असे मतदारांचे वेगवेगळे गट करून किंवा

(क) उमेदवारांपैकीं प्रत्येक उमेदवारास किती मतें मिळालीं हें समजून घेऊन नमूद करितां येईल अशी जी रीत अध्यक्षस्थानीं असणारा अंमलदार ठरवील त्या इतर सोइस्कर रीतीनें

निरनिराळें मतास टाकावें.

(६) उमेदवारांपैकीं दरेक उमेदवारास मिळालेल्या मतांच्या संख्येवरून त्यांचा अनुक्रम ठरवून एक किंवा अनेक उमेदवार निवडण्यांत आल्याचें जाहीर करण्यांत यावें.

(७) (सभासदाचा) हुद्दा स्वीकारण्याची ज्यांची तयारी असेल अशा कोणत्याहि (दोन किंवा अधिक) उमेदवारांना समसमान मतें मिळालीं असल्याचें आढळून येईल तेव्हां, आणि एक जादा मत दिल्यानें सदरहू उमेदवारांपैकीं एखाद्या उमेदवारास निवडून येण्याचा हक्क प्राप्त होत असेल तेव्हां असें जादा मत ज्या इसमास किंवा इसमांस देण्यांत आलें आहे असें

समजण्यांत येईल असा इसम किंवा असे इसम निवडून आला किंवा आले ही गोष्ट अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराच्या समक्ष व तो ठरवील अशा रीतीनें चिठ्ठ्या टाकून ठरविली पाहिजे.

१०. बॅलटनें (मतपत्रिका टाकून) निवडणूक करावयाची असेल तेव्हां निवडणुकीचे वेळीं काम चालविण्याची रीतः—निवडणूक बॅलटनें करावयाची असेल तेव्हां काम चालविण्याची रीत खालीं लिहिल्याप्रमाणें असेल. ती येणेंप्रमाणें:—

(१) निवडणुकीस उभें राहण्याची इच्छा असलेल्या प्रत्येक उमेदवारानें पंचायतीवर काम करण्याची आपली तयारी असल्याचें दर्शविणारी अर्जी अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराकडे निवडणुकीसाठीं ठरविलेल्या तारखेपूर्वीं निदान दहा दिवस आधीं सादर केली पाहिजे.

(२) अशी अर्जी मिळाल्यानंतर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें कलम ८ अन्वयें निवडणुकीसाठीं उमेदवार नालायक आहे किंवा नाहीं या-संबंधीं आपला निकाल जसा असेल त्याप्रमाणें सदरहू अर्जी नाकारल्याविषयींच्या किंवा स्वीकारल्याविषयींच्या निकालासंबंधींचा शेरा त्या अर्जीवर लिहिला पाहिजे, आणि, अर्जी नाकारण्यांत आली असेल तर सदरहू अर्जी नाकारण्याबद्दलच्या आपल्या कारणांचा थोडक्यांत उल्लेख करून आपला निकाल उमेदवारास कळविला पाहिजे.

(३) अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें अर्जी नाकारल्याबद्दलच्या त्याच्या निकालावर कलेक्टरकडे किंवा याबाबत नेमलेल्या अंमलदाराकडे सदरहू निकालाच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आंत अपील करण्याचा अधिकार आहे. प्रसंगाप्रमाणें, कलेक्टरनें किंवा अशा अंमलदारानें निवडणुकीसाठीं नेमलेल्या तारखेपूर्वीं दोन दिवसांहून अधिक उशिरा नाहीं इतक्या अवधींत अपीलावर निकाल दिला पाहिजे.

(४) ज्या उमेदवारांच्या अर्ज्या अखेरीस स्वीकारण्यांत आल्या असतील त्या उमेदवारांची संख्या निवडावयाच्या इसमांच्या संख्येहून जास्त नसेल तर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें असे उमेदवार योग्य रीतीनें निवडण्यांत आले असें तावडतोब जाहीर करावें.

(५) ज्या उमेदवारांच्या अर्ज्या अखेरीस स्वीकारण्यांत आल्या असतील त्यांची संख्या निवडावयाच्या इसमांच्या संख्येहून अधिक असेल तर मतांची नोंद घेण्यांत यावी; आणि अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें–

(अ) अशा उमेदवारांची एक यादी तयार करावी;

(ब) त्यांपैकीं दरेक उमेदवारास निरनिराळी व स्पष्ट निशाणी द्यावी; आणि

(क) गांवच्या चावडीचे ठिकाणीं किंवा गांवपंचायतीच्या कचेरींत किंवा अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराकडून त्याबाबत नेमण्यांत येईल अशा इतर सार्वजनिक जागीं निवडणुकीसाठीं ठरविलेल्या वेळेपूर्वी निदान २४ तास आधीं अशा उमेदवारांची यादी, त्यांपैकीं दरेक उमेदवारास दिलेल्या निशाणीसह, चिकटवावी.

(६) निवडणुकीसाठीं नेमलेल्या दिवशीं व वेळेस व ठिकाणीं मतांची नोंद घेण्यांत यावी.

(७) अध्यक्षस्थानीं असणाऱ्या इसमानें कानू ८ ची रक्कम (ड) अन्वयेंच्या नोटीशीस अनुसरून जमलेल्या इसमांच्या सभेंत अध्यक्षस्थानीं बसावें; आणि त्यानें मतदार नसलेल्या सर्व इसमांस सदरहू सभेच्या जागेंतून वगळावें.

(८) मतांची नोंद घेण्यास सुरुवात करण्यापूर्वी, निवडणुकीसाठीं आपला निवडणुकीचा एजंट म्हणून कोणत्याहि मतदार इसमास नेमल्या-बद्दलचा लेखी करार करून तो अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराचे हवालीं करण्याचा उमेदवारास अधिकार आहे.

(९) मतांची नोंद घेण्यास सुरुवात करण्यापूर्वी अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें उमेदवारांपैकीं दरेक उमेदवारास एकेक पेटी नेमून देऊन अशा पेटीवर उमेदवाराचें नांव निशाणी हीं चिकटवावीं. मतांची नोंद घेण्यास सुरुवात करण्यापूर्वी अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें उमेदवार इसमांच्या समक्ष अशा पेटयांना कुलुपें लावून त्या सीलबंद केल्या पाहिजेत, व त्या आडोशाच्या जागेंत ठेविल्या पाहिजेत.

(१०) मतदारांनीं आपलीं मतें देण्यास सुरुवात करण्यापूर्वी अध्यक्ष

स्थानीं असणाऱ्या अंमलदारानें जमलेल्या मतदारांस मतें देण्याची ठरविलेली रीत समजावून सांगावी.

(११) आपलीं सर्व मतें एकाच उमेदवारास किंवा तीं (कित्येक) उमेदवारांत वांटन देण्याचा मतदारांस अधिकार आहे.

(१२) मतदारांनीं एकामागून एक अशा रीतीनें सदरहू आडोशाच्या जागेकडे जावें आणि सदरहु आडोशाच्या जागेंत शिरण्यापूर्वीं प्रत्येक मतदारास निवडावयाचे सभासद जितके असतील तितक्या कागदाच्या चिठ्या देण्यांत याव्या. अशा चिठ्यांस अनुक्रम नंबर देऊन अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें, त्यांवर स्टांप बठविला पाहिजे किंवा आपली सही केली पाहिजे; अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें मतदारास अशा चिठ्या देण्यांत आल्या हें दर्शविण्यासाटीं ज्या ज्या मतदारास अशा चिठ्या दिल्या असतील त्या त्या मतदारांच्या नांवांची नोंद ठेवली पाहिजे.

(१३) चिठ्या मिळाल्यावर मतदारानें आडोशाच्या जागेंत जाऊन ज्या उमेदवारास किंवा उमेदवारांस मतें देण्याची इच्छा असेल त्या त्या उमेदवारांच्या पेटींत किंवा उमेदवारांच्या पेट्यांत मत नोंदण्याच्या कागदावर कोणतीहि खूण न करतां चिठ्या टाकून मत द्यावें.

(१४) जो कोणताहि मतदार अशक्त असल्यामुळें ठरविलेल्या रीतीनें मतें देण्यास असमर्थ असेल अशा उमेदवारास जरूर ती मदत करण्याचा अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारास अधिकार आहे.

(१५) फक्त एकाच मतदारास एके वेळीं आडोशाच्या जागेंत जाऊं दिलें जाईल आणि त्यानें आपलें मत दिल्यानंतर आडोशाची जागा ताबडतोब सोडून गेलें पाहिजे.

(१६) मतदारास चिठ्या मिळाल्यानंतर व आडोशाच्या जागेंतून तो बाहेर येण्यापूर्वीं कोणत्याहि मनुष्यास त्याजबरोबर बोलतां चालतां येणार नाहीं.

(१७) मतें देण्याचें काम संपल्याबरोबर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें उमेदवार आणि प्रत्येक उमेदवाराचा एक निवडणुकीचा एजंट यांजखेरीज इतर सर्व मनुष्यांस सभेच्या जागेंतून बाहेर घालविलें पाहिजे.

(१८) नंतर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें एके वेळीं एकेक पेटी उघडून हजर असतील अशा उमेदवारांच्या व एजंटांच्या समक्ष प्रत्येक उमेदवारास दिलेलीं मतें मोजलीं पाहिजेत.

(१९) मतांची मोजणी पुरी झाल्यावर अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें ज्या उमेदवारास किंवा उमेदवारांस जास्तींत जास्त मतें देण्यांत आलीं असतील अशा उमेदवारांपैकीं दरेकास मिळालेल्या मतांच्या संख्येच्या क्रमानुसार तो किंवा ते निवडण्यांत आले आहेत असें ताबडतोब जाहीर केलें पाहिजे.

(२०) कोणत्याहि उमेदवारांस समसमान मतें मिळालीं असल्याचें आढळून येईल तेव्हां आणि १ जादा मत दिल्यानें सदरहू उमेदवारांपैकीं एखाद्या उमेदवारास निवडून येण्याचा हक्क प्राप्त होत असेल तेव्हां असें जादा एक मत ज्या इसमास किंवा इसमांस देण्यांत आलें आहे, असें समजण्यांत येईल असा इसम किंवा असे इसम निवडून आला किंवा आले ही गोष्ट अध्यक्ष-स्थानीं असणाऱ्या अंमलदाराच्या समक्ष व तो ठरवील अशा रीतीनें चिठ्या टाकून ठरविली पाहिजे.

११. निकाल जाहीर करणें:—अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदारानें निवडलेल्या उमेदवाराचें नांव किंवा निवडलेल्या उमेदवारांचीं नांवें गांवच्या चावडींत किंवा गांवपंचायतीच्या कचेरींत किंवा अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमलदाराकडून त्याबाबत नेमण्यांत येईल अशा इतर सार्वजनिक जागीं डकवविलें पाहिजे किंवा डकवविलीं पाहिजेत; आणि असें नांव किंवा अशीं नांवें कलेक्टराकडे ताबडतोब कळविलें किंवा कळविलीं पाहिजेत.

१२. निकाल प्रसिद्ध करणें:—प्रत्येक निवडणुकीचा निकाल कलेक्टरास आवश्यक वाटेल अशा रीतीनें त्यानें प्रसिद्ध केला पाहिजे आणि तो डिस्ट्रिक्ट लोकलबोर्डासहि त्यानें कळविला पाहिजे.

१३. चालविलेल्या कामाची नोंद:—अध्यक्षस्थानीं असणाऱ्या अंमल-दारानें प्रत्येक निवडणुकीच्या चालविलेल्या कामाची नोंद ठेविली पाहिजे.

१४. प्रसंगोपात्त रिकाम्या होणाऱ्या जागा:—कलम २३ (१)

अन्वयें पंचायतीच्या निवडलेल्या सभासदाच्या हुद्याची जागा रिकामी झाली असल्याबाबतची नोटीस मिळाल्यावर किंवा एखादी निवडणूक कलम ९ अन्वयें कलेक्टरकडून गैरकायदेशीर ठरविण्यांत येईल तेव्हां अशा रीतीनें रिकामी झालेली जागा भरून काढण्यासाठीं, सोईच्या दृष्टीनें शक्य असेल तितक्या लवकर एक पोट निवडणूक केली पाहिजे,आणि या कानू आवश्यक असतील अशा फेरफारांसह अशा पोट-निवडणुकीस लागू होतील.

---

# NOTIFICATION

Re:

## RULES UNDER THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1933.

सन १९३३ च्या मुंबईच्या
गांवपंचायतींबाबत आक्टाअन्वयें केलेल्या कानू.

## मुंबई सरकार.

जनरल डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे-मुंबई, तारीख १८ माहे डिसेंबर सन १९३४.

नंबर एस्. १७४।१.—सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट ( सन १९३३ चा मुंबईचा आक्ट ६ वा ) याचें कलम १०८, पोट-कलम (१), रकमा (अ), (ब), (ड), (ई), (म), (न), (ओ), आणि (पी) यांवरून मिळालेले अधिकार चालवून, मुंबई सरकार खालील कानू करीत आहेत. त्या येणेंप्रमाणें—

कलम ४ अन्वयें कमिशनरानें ज्या रीतीनें चौकशी चालविली पाहिजे त्या रीतीचें नियमन करण्याबाबत सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट याचें कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (अ) अन्वयें केलेल्या कानू.

१. (१) कलम ४ अन्वयें अर्जी आल्यावर कमिशनरनें अशी अर्जी आल्याची एक लेखी नोटीस प्रसिद्ध करवून संबंध असलेल्या स्थानिक प्रदेशांतील रहिवाशांकडून (स्थानिक प्रदेश गांव म्हणून) जाहीर करण्या-बद्दलच्या योजनेविरुद्ध हरकती मागविल्या पाहिजेत. सदरहू हरकती अशी नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत कमिशनरकडे दाखल केल्या पाहिजेत.

(२) अशा नोटिशीची प्रत खालील ठिकाणीं डकवून सदरहू नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे—

(अ) सदरहू स्थानिक प्रदेशावर अधिकार असणारा एखादा तालुका-लोकलबोर्ड असल्यास त्या तालुका-लोकलबोर्डाच्या ऑफिसांत,

(ब) सदरहू स्थानिक प्रदेशावर हुकमत असणाऱ्या मामलतदाराच्या किंवा महालकऱ्याच्या ऑफिसांत, आणि

(क) सदरहू स्थानिक प्रदेशांतील चावडींत गांवपंचायतीचें एकादें ऑफिस असल्यास त्या ऑफिसांत किंवा कमिशनर फर्मावील अशा सदरहू स्थानिक प्रदेशांतील इतर सार्वजनिक जागीं.

चावडींत किंवा कोणत्याहि इतर सार्वजनिक जागीं नोटीस प्रसिद्ध केल्याची गोष्ट गांवांत दवंडी पिटवून जाहीर केली पाहिजे.

(३) सदरहू नोटिशीच्या प्रती कलेक्टराकडे व जिल्हा-लोकल-बोर्डाच्या अध्यक्षाकडे पाठविल्या पाहिजेत.

२. (१) कलम ४, रक्कम (३) अन्वयें स्थानिक प्रदेश गांव म्हणून जाहीर करण्याबद्दलची अर्जी मिळाल्यावर कमिशनरनें सदरहू अर्जी कलेक्टरकडे पाठवून तिच्या खरेपणाविषयीं व त्या अर्जीवर सह्या करणारे सर्व इसम प्रौढ वयाचे व सदरहू स्थानिक प्रदेशांतच राहणारे इसम आहेत किंवा कसें याविषयीं रिपोर्ट मागविला पाहिजे.

(२) पोट-कानू (१) अन्वयें मागविलेल्या रिपोर्टासोबत कलेक्टरानें गांव म्हणून जाहीर करण्याचें योजिलेल्या स्थानिक प्रदेशाचा प्लान किंवा नकाशा पाठवून, सदरहू स्थानिक प्रदेशाचा विस्तार, तेथील लोकसंख्या व त्यांतून वसूल होणारी लोकलफंड-पट्टीची रक्कम यांविषयीं, आणि अशा प्रदेशांत मुलकी गांव धारण करणारा कोणी असल्यास, अशा प्रदेशांत असा मुलकी गांव समाविष्ट करून सदरहू प्रदेश गांव म्हणून जाहीर करण्या-विरुद्ध अशा धारण करणाराची हरकत आहे किंवा कसें याविषयीं रिपोर्टहि पाठविला पाहिजे.

३. कमिशनरनें, कानू १ अन्वयें प्रसिद्ध केलेल्या नोटिशीमुळें कोण-त्याहि हरकती आल्या असल्यास त्या हरकती, आणि कानू २ अन्वयें

कलेक्टरानें केलेला रिपोर्ट हे सर्व विचारांत घेऊन, आणि त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी चौकशी करून, कलम ४ च्या विशेष ठरावाअन्वयें सरकारनें काढावयाचा एखादा जाहीरनामा–कोणताहि असल्यास–अशा जाहीरनाम्यास पात्र राहून, सदरहू अर्जी मंजूर करावी किंवा नाकारावी हें ठरवावें. कमिशनरनें अर्जी मंजूर केल्यास कलम ४ अन्वयें मुंबई सरकारी गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून (सदरहू स्थानिक प्रदेश गांव आहे असें) जाहीर केलें पाहिजे. अर्जी नामंजूर केल्यास, अशी नामंजुरी कमिशनरानें अर्जदारास कळविली पाहिजे.

---

## कलम ६ अन्वयें कलेक्टरानें (मुलकी गांव) धारण करणारा किंवा त्याचा वारचा ज्या रीतीनें (पंचायतीचा सभासद म्हणून) नेमला पाहिजे त्या रीतीचें नियमन करण्याबाबत सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट याचें कलम १०८, पोट–कलम (१), रक्कम (ब) या अन्वयें केलेल्या कानू.

१. (१) कलेक्टरानें, प्रसंगाप्रमाणें, मुलकी गांवचा धारण करणारा किंवा मुलकी गांवचा मुख्य धारण करणारा कलम ८ अन्वयें नालायक नसल्यास, सदरहू धारण करणारास किंवा मुख्य धारण करणारास लेखी नोटीस देऊन अशा नोटिशीच्या (तारखेपासून) पंधरा दिवसांच्या आंत तो (पंचायतीचा सभासद म्हणून) काम करण्यास समर्थ व राजी आहे किंवा नाहीं तें सांगण्यास आणि काम करण्यास असमर्थ किंवा नाखूष असेल तर (आपला) वारचा नेमण्यास फर्माविलें पाहिजे. जर, प्रसंगाप्रमाणें सदरहू धारण करणारा किंवा मुख्य धारण करणारा (पंचायतीचा सभासद म्हणून) काम करण्यास समर्थ असून काम करण्याची आपली खुषी दर्शवील तर कलेक्टरनें त्यास (पंचायतीचा सभासद म्हणून) नेमलें पाहिजे. जर, प्रसंगाप्रमाणें, धारण करणारा किंवा मुख्य धारण करणारा एखादा वारचा नेमील व असा वारचा कलम ८ अन्वयें नालायक नसून कलेक्टर त्यास पसंत करील तर कलेक्टरानें असा वारचा नेमला पाहिजे. जर सदरहू वारचा कलम ८ अन्वयें नालायक

असेल किंवा कलेक्टर त्यास कोणत्याहि इतर कारणावरून पसंत करीत नसेल, तर कलेक्टरनें, लेखी नोटीस देऊन, प्रसंगाप्रमाणें, सदरहू धारण करणारास किंवा मुख्य धारण करणारास कलम ८ अन्वयें नालायक नसलेला व कलेक्टरास पसंत असलेला (आपला) वारचा अशा नोटिशीच्या (तारखेपासून) आठ दिवसांच्या आंत नेमण्याची आणखी संधी दिली पाहिजे, आणि, प्रसंगाप्रमाणें सदरहू धारण करणारा किंवा मुख्य धारण करणारा कलम ८ अन्वयें नालायक नसलेला व कलेक्टरास पसंत असलेला (आपला) वारचा नेमील तर कलेक्टरानें अशा वारच्यास (पंचायतीचा सभासद म्हणून) नेमलें पाहिजे.

(२) मुलकी गांवचा मुख्य धारण करणारा इसम ठरविण्याच्या कारणांसाठीं कलेक्टरानें गांवच्या धारण करणारांपैकीं दरेक धारण करणाराच्या हिश्शाची किंमत विचारांत घेतली पाहिजे. अशा गांवाची वहिवाट सर्व हिस्सेदारांच्या वतीनें हिस्सेदारांपैकीं एकच हिस्सेदार पहात असेल, तर, सदरहू वहिवाटदार हाच मुख्य धारण करणारा आहे असें समजण्यांत यावें.

२. (१) जर एकटा धारण करणारा (पंचायतीचा सभासद म्हणून) काम करण्यास असमर्थ किंवा नाखूष असेल व कानू १ मध्यें ठरविलेल्या रीतीनें (आपला) वारचा नेमण्यास चुकेल, तर कलेक्टरानें कलम ८ अन्वयें नालायक नसलेला एखादा योग्य इसम अशा धारण करणाराचा वारचा म्हणून नेमला पाहिजे.

(२) जर मुख्य धारण करणारा (पंचायतीचा सभासद म्हणून) काम करण्यास असमर्थ किंवा नाखूष असेल व कानू १ मध्यें ठरविलेल्या रीतीनें (आपला) वारचा नेमण्यास चुकेल, तर कलेक्टरानें बाकीच्या धारण करणारांपैकीं कलम ८ अन्वयें नालायक नसलेला व लायक असा त्यास वाटणारा कोणताही एक धारण करणारा किंवा कोणताहि असा धारण करणारा मिळत नसल्यास कलम ८ अन्वयें नालायक नसलेला व योग्य असा त्यास वाटणारा कोणताहि इतर इसम (पंचायतीचा सभासद म्हणून) नेमला पाहिजे.

### कलम २३ अन्वयें, पंचायतीच्या सरपंचाच्या किंवा डेप्युटी सरपंचाच्या किंवा सभासदांच्या हुद्याची जागा रिकामी झाल्याची नोटीस ज्या रीतीनें दिली पाहिजे त्या रीतीचें नियमन करण्याबाबत सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट याचें कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (ड) अन्वयें केलेल्या कानू.

(१) सरपंचाच्या, डेप्युटी सरपंचाच्या किंवा (पंचायतीच्या) सभासदाच्या हुद्याची जागा रिकामी झाल्याची नोटीस सरपंचानें, सरपंचाच्या गैरहजिरीत डेप्युटी सरपंचानें, आणि सरपंच व डेप्युटी सरपंच या दोहोंच्या गैरहजिरीत सेक्रेटरीनें अशी जागा रिकामी झाल्या दिवसापासून सात दिवसांच्या आंत कलेक्टरास दिली पाहिजे. सरपंचाच्या हुद्याची जागा रिकामी असेल तर नोटीशीची प्रत जिल्हा-लोकलबोर्डाच्या अध्यक्षास पाठविली पाहिजे.

२. सदरहू नोटिशींत जागा रिकामी झाल्याचें कारण दिलें पाहिजे; आणि मरण पावल्याच्या किंवा राजिनामा दिल्याच्या कारणाखेरीज इतर कोणत्याहि कारणामुळें सदरहू जागा रिकामी झाली असेल तर ज्या प्रसंगामुळें ती जागा रिकामी झाली असेल ते प्रसंग सदरहू नोटिशींत लिहिले पाहिजेत.

---

### कलम ३२ अन्वयें पंचायतीला मिळालेल्या सर्व फंडाच्या रकमा व तिजकडे येणाऱ्या सर्व रकमा ज्या रीतीनें कबज्यांत ठेविल्या पाहिजेत ती रीत ठरविण्याबाबत सन १९३३ चा मुंबईचा गांवपचायतींबाबत आक्ट याचें कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (इ) अन्वयें केलेल्या कानू.

१. (१) चालू खर्च भागविण्यासाठीं पन्नास रुपयांहून अधिक नाहीं इतकी पर्मनंट अॅडव्हान्स (कायमची) आगाऊ रक्कम म्हणून ठेवण्यास आपल्या सेक्रेटरीस परवानगी देण्याचा पंचायतीस अधिकार आहे.

(२) दरेक महिन्याच्या अखेरीस सरपंचानें किंवा त्याच्या गैरहजिरींत डेप्युटी सरपंचानें सेक्रेटरीचा पर्मनंट ॲडव्हान्स अकौंट तपासून शिल्लक रक्कम बरोबर आहे किंवा नाहीं तें पहावें.

२. (१) पंचायतीस—

(१) कलेक्टर पसंत करील अशा बॅन्केंत कानू १ ची पोट–कानू (१) अन्वयें सेक्रेटरीजवळ ठेवावयाची परवानगी असलेल्या रकमेखेरीज इतर फंडांच्या सर्व रकमा अमानत ठेवण्याचा अधिकार आहे, किंवा

(२) अशा फंडांच्या रकमा पंचायतीच्या नांवें सन १९०१ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याचें कलम ३ रक्कम (१८) मध्यें सांगितलेल्या सरकारी सिक्युरिट्यांत गुंतविण्याचा व वेळोवेळीं आवश्यक वाटेल त्याप्रमाणें अशा सिक्युरिट्यांची विल्हेवाट लावण्याचा अधिकार आहे.

(२) अशा फंडांच्या सर्व रकमा, पोट–कानू (१) अन्वय अमानत ठेविलेल्या किंवा गुंतविलेल्या नसल्यास त्या शंभर रुपयांहून अधिक नसतील तर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत व अशा फंडांच्या रकमा शंभर रुपयांहून अधिक असतील तर सोईच्या दृष्टीनें शक्य तितक्या लवकर, तालुक्याच्या सब्–ट्रेझरींत अमानत ठेविल्या पाहिजेत.

---

## कलम ८९ च्या कलमांत निर्दिष्ट केलेले कर व फी ज्या दरानें व ज्या रीतीनें बसविल्या पाहिजेत तो दर व ती रीत सदरहू कलमाअन्वयें ठरविण्याबाबत कलम १०८, पोटकलम (१), रक्कम (म) अन्वयें केलेल्या कानू.

### (अ) सामान्य कानू.

१. प्रत्येक पंचायतीनें कोणताहि कर किंवा फी बसविण्यापूर्वी पंचायतीच्या सभेंत पास केलेल्या ठरावावरून खालीं लिहिलेली काम चालविण्याची रीत अनुसरिली पाहिजे.—

(अ) कलम ८९ (२) अन्वयें जे कर किंवा फी बसविण्याचा अधिकार आहे असा एक किंवा अधिक कर किंवा फी पंचायतीनें पसंत करावी, आणि

(ब) असे कर किंवा फी बसविण्यासाठीं स्थानिक परिस्थितीस जुळतील असे (आपणास) आवश्यक वाटतील असे नियम तयार करून ते जिल्हालोकलबोर्ड व कलेक्टर या दोघांच्या मार्फत कमिशनरच्या मंजुरीसाठीं सादर करावे, आणि

(१) जे इसम, जी मिळकत किंवा दोन्ही (करास किंवा फीस) पात्र करण्याचा पंचायतीचा विचार असेल त्या इसमांचे किंवा मिळकतीचे किंवा दोहोंचे वर्ग आणि ज्या माफी देण्याची पंचायतीची इच्छा असेल त्या माफी;

(२) ज्या रकमेबाबत किंवा ज्या दरानें असा प्रत्येक (इसमाचा किंवा मिळकतीचा) वर्ग करास किंवा फीस पात्र करण्याचा पंचायतीचा विचार असेल ती रक्कम किंवा तो कराचा किंवा फीचा दर;

(३) कर किंवा फी बसविण्याची रीत आणि ज्या तारखांस सदरहू कर किंवा फी किंवा त्यांचे कांहीं हप्ते बसल्यास, ते हप्ते द्यावयाचे असतील त्या तारखा; आणि

(४) ज्या बाबती निर्दिष्ट करण्याची आवश्यकता वाटेल अशा इतर बाबती; पंचायतीनें निर्दिष्ट केल्या पाहिजेत.

२. जेव्हां पंचायत कलम ८९ अन्वयें एखादा कर किंवा फी बसविण्याचें योजील किंवा जेव्हां सदरहू पंचायत आधींच बसविण्यांत आलेल्या एखाद्या कराचा किंवा फीचा दर वाढविण्याचें योजील तेव्हां तिनें सदरहू योजना व तिचे नियम हे दोन्ही गांवात दवंडी पिटवून व पंचायतीच्या कचेरीत किंवा गांवच्या चावडीत नोटीस लावून जाहीर केले पाहिजेत. सदरहू नोटिशींत ज्या तारखेस पंचायत सदरहू योजना विचारांत घेईल अशी सदरहू नोटीस प्रसिद्ध करण्याच्या तारखेपासून एक महिन्याहून अधिक आधींची नसलेली तारीख निर्दिष्ट केली पाहिजे.

३. जो कोणी गांवचा रहिवाशी योजिलेला एखादा कर किंवा फी किंवा दर बसविण्यास किंवा त्यास पात्र करावयाच्या इसमांच्या किंवा मिळकतीच्या वर्गास किंवा दरांतील कोणत्याहि वाढीस हरकत घेईल त्यास वरील कानू २ अन्वयें प्रसिद्ध केलेल्या नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी लेखी किंवा ज्या तारखेस पंचायत सदरहू योजनेचा विचार करील त्या तारखेस तोंडीं एखादी हरकत किंवा सूचना करण्याचा अधिकार आहे.

४. पंचायतीनें कानू ३ अन्वयें केलेल्या सर्व हरकतींचा किंवा सूचनांचा ठरविलेल्या तारखेस आणि जरूर तर त्यानंतरच्या दिवशीं विचार केला पाहिजे, आणि सदरहू योजना फेरफारांसहित किंवा फेरफारांशिवाय मंजूर करण्याचा सदरहू पंचायतीस अधिकार आहे. मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं आधीं योजिलेला कराचा किंवा फीचा दर वाढविला पाहिजे असें पंचायतीस वाटेल तर सदरहू वाढ अखेरची ठरविण्यापूर्वी नवीन नोटीस दिली पाहिजे.

५. कलम ८९ (२) अन्वयें बसवावयाच्या करांचा किंवा फींचा दर पंचायतीनें नक्की ठरविला पाहिजे आणि कमिशनरकडे त्याच्या मंजुरीसाठीं सादर केला पाहिजे; आणि सदरहू दर कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (न) अन्वयें सरकारनें ठरविलेल्या कमाल दरापेक्षां अधिक असतां कामा नये.

६. कमिशनरनें मंजूर केलेले सर्व नियम व ज्या फेरफारांस पात्र ठेवून ते मंजूर केले असतील ते फेरफार पंचायतीनें गांवांत प्रसिद्ध केले पाहिजेत. व सदरहू मंजुरी व तशी मंजुरी मिळाल्याची तारीख व तिचा नंबर हे सर्व एका नोटिशींत देऊन सदरहू नोटीसहि गांवांत प्रसिद्ध केली पाहिजे. तसेंच सदरहू नोटीस प्रसिद्ध केल्याची गोष्ट दवंडी पिटवून पंचायतीनें जाहीर केली पाहिजे, आणि अशा रीतीनें प्रसिद्ध केलेल्या नियमांत सांगितल्याप्रमाणेंचा कर किंवा फी ही, अशा नोटिशींत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा व अशी नोटीस प्रसिद्ध करण्याच्या तारखेपासून एक महिन्याहून कमी नाहीं अशा तारखेपासून, त्याप्रमाणें बसविण्यांत येईल, आणि त्यापासून

येणारे उत्पन्नाचा विनियोग, ज्या शर्तीस पात्र ठेवून मंजुरी देण्यांत आल असेल अशा कांहीं शर्ती असल्यास, त्या शर्तीप्रमाणें पंचायतीनें केला पाहिजे मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं—

(१) एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस सुरू होणाऱ्या व मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस संपणाऱ्या वर्षी ( सालोसाल ) द्यावयाचा कर किंवा फी कोणत्याहि सालांतील पुढील तारखा म्हणजे तारीख १ एप्रिल, तारीख १ जुलै, तारीख १ आक्टोबर किंवा तारीख १ जानेवारी यांखेरीज इतर तारखेस अंमलांत येतां कामा नये, व

(२) जर सदरहू कर किंवा फी तारीख १ एप्रिल खेरीज इतर कोणत्याहि तारखेस अंमलांत आला तर तो पुढील सालच्या एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेपर्यंत तिमाहीनें वसूल करण्यांत येईल.

७. सदरहू कर सरपंचानें किंवा याबाबत पंचायतीनें योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या कोणत्याहि इसमानें वसूल केला पाहिजे. अशा प्रत्येक भरण्याबद्दल एक पावती तो भरणा घेणाऱ्या इसमानें दिली पाहिजे.

---

## (ब) सदरहू आक्टाचें कलम ८९ (२) (१) अन्वयें घरांच्या व जमिनींच्या मालकांवर किंवा त्यांचा भोगवटा करणाऱ्या इसमांवर कर बसविण्याबाबत कानू.

१. या कानूंत, विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर—

(अ) " मालक " या संज्ञेंत एखादें घर किंवा जमीन भाड्यानें दिली तर अशा घराचें किंवा जमिनीचें भाडें जो घेतो किंवा ज्यास घेण्याचा हक्क आहे अशा इसमाचा समावेश होतो.

(ब) " भोगवटा करणारा " या संज्ञेंत घराचा किंवा जमिनीचा प्रत्यक्ष कबजा—मग तो मालक, एजंट किंवा भाडेकरी या

नात्यानें असो—ज्या इसमाकडे आहे अशा इसमाचा समावेश होतो.

(क) "वार्षिक भाडयाची रक्कम" या संज्ञेचा अर्थ, ज्या वार्षिक भाडयानें घर किंवा जमीन दरवर्षी किंवा सालोसाल भाडयानें दिली जाईल अशी वाजवी अपेक्षा आहे असें वार्षिक भाडें, असा समजावा.

(ड) "घर" या संज्ञेचा अर्थ, एकाच आवारांत असलेली व एकाच भोगवटा करणाराकडून वापरण्यांत येणारी एखादी इमारत किंवा इमारतीचा सेट (समूह), असा समजावा.

(इ) "जमीन" या संज्ञेचा अर्थ, सदरहू गांवठाणांत असलेली खुली जमीन, असा समजावा.

२. कमिशनरच्या मंजुरीनें पंचायतीनें याबाबत करावयाच्या नियमांत दरेक गांवच्या बाबतींत ठरविण्यांत येईल त्याप्रमाणें, इमारतीच्या किंवा जमिनीच्या किंवा दोहोंच्या मुद्दल किंमतीवर किंवा वार्षिक भाडयाच्या रकमेवर ठरविलेल्या दरानें सदरहू कर आकारला पाहिजे.

३. खालील घरें व जमिनी यांना या कराची माफी असेल:—

(अ) सरकारच्या, लोकलबोर्डाच्या व पंचायतींच्या मालकीचीं असलेलीं व सार्वजनिक कारणांसाठींच फक्त वापरण्यांत येणारीं सर्व घरें व जमिनी;

(ब) धार्मिक, शैक्षणिक किंवा धर्मादाय कारणांसाठींच केवळ वापरण्यांत येणारीं सर्व घरें व जमिनी.

(क) शंभर रुपयांहून कमी मुद्दल किंमतीचीं किंवा पांच रुपये किंवा त्यांहून कमी वार्षिक भाड्याची रक्कम येणारीं सर्व घरें व जमिनी.

४. (१) जेव्हां घरांवर किंवा जमिनीवर किंवा दोहोंवर पट्टी बसविण्यांत येईल, तेव्हां सरपंचानें आकारणीची यादी तयार करावी किंवा करवावी. त्या यादींत—

(अ) घराचा किंवा जमिनीचा नंबर;

(ब) माहीत असल्यास, मालकाचें व भोगवटा करणाराचें नांव;

(क) प्रसंगाप्रमाणें, मुद्दल किंमत किंवा वार्षिक भाड्याची रक्कम; आणि

(ड) त्यावर आकारलेल्या कराची रक्कम;

या गोष्टी असल्या पाहिजेत.

(२) जेव्हां कर वार्षिक भाड्याच्या रकमेवर आकारण्यांत आला असेल तेव्हां सदरहू रकमेच्या शेंकडा १० टक्क्यांइतकी रक्कम दुरुस्तीसाठीं किंवा इतर कोणत्याहि कारणासाठीं लागणाऱ्या सर्व खर्चाबाबत सूट म्हणून त्यांतून वजा करण्यांत यावी.

(३) अशी आकारणीची यादी तयार करण्याच्या कारणासाठीं सरपंचास किंवा त्याच्या हुकुमावरून काम करणाऱ्या कोणत्याहि इसमास गांवांतील एखादें घर किंवा जमीन तपासण्याचा अधिकार आहे; आणि सरपंचाच्या हुकुमानुसार कोणत्याहि अशा घराचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटा करणारा, सदरहू हुकुमांत निर्दिष्ट करण्यांत येईल अशा वाजवी मुदतींत, आपल्या उत्तम समजुतीप्रमाणें किंवा भरंवशाप्रमाणें एक खरें पत्रक देण्यास बांधलेला आहे; आणि सदरहू पत्रकांत मालकाचें किंवा भोगवटा करणाराचें नांव किंवा दोहोंचीं नांवें व त्याच्या किंवा त्यांच्या राहण्याचें ठिकाण आणि वार्षिक भाड्याची रक्कम आणि अशा घराच्या किंवा जमिनीच्या किंमतीचा त्याचा अंदाज या गोष्टी देऊन आपली सही केली पाहिजे.

५. जेव्हां कर भरण्यास प्रथमतः पात्र असलेल्या इसमाचें नांव निश्चित समजणार नाहीं तेव्हां आकारणीच्या यादींत व सदरहू इसमावर जी कोणतीहि नोटीस बजावण्याची आवश्यकता वाटेल त्या नोटिशींत आणखी कांहीं न लिहितां, अशा जागेचा "धारण करणारा" म्हणून त्याचा उल्लेख करणें पुरेसें होईल.

६. आकारणीची यादी पुरी झाल्यावर पंचायतीच्या कचेरींत यादी पाहण्यासाठीं ठेविली आहे असें गांवांत दवंडी पिटवून जाहीर केलें पाहिजे,

आणि सदरील नोटिशीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आंत नाहीं अशा दिवशीं हरकती विचारांत घेऊन त्यावर निकाल देण्यांत येईल असेंहि गांवांत दवंडी पिटवून जाहीर केलें पाहिजे.

७. ज्या इसमाचें नांव सदरहु यादींत असेल अशा प्रत्येक इसमास, कोणत्याहि मिळकतीचा मालक किंवा भोगवटा करणारा म्हणून हक्क सांगणाऱ्या प्रत्येक इसमास, सदरहू यादींत समाविष्ट केलेली कोणतीहि मिळकत कबजांत असणाऱ्या प्रत्येक इसमास, आणि अशा इसमाच्या एजंटास सदरहू यादी तपासण्याची व त्या यादींतील उतारे कोणतीहि फी न देतां घेण्याची मुभा असेल.

८. आकारणीस घेतलेल्या सर्व हरकती कानू ६ अन्वयें प्रसिद्ध केलेल्या नोटिशींत निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा पंचायतीची सभा ज्या कोणत्याहि नंतरच्या तारखेपावेतों तहकूब झाली असेल त्या तारखेस पंचायतीकडून विचारांत घेण्यांत येऊन निकाल देण्यांत येईल; व पंचायतीचा निकाल आकारणीस हरकत घेणाऱ्या इसमास कळविण्यांत येईल. निकाल कळविल्याच्या तारखेपासून तीस दिवसांचे आंत जिल्हा–लोकलबोर्डाकडे अपील करतां येईल व जिल्हा–लोकलबोर्डाचा हुकूम अखेरचा समजण्यांत येईल. अपील करण्यांत येईल तेव्हां जिल्हा–लोकलबोर्डाच्या हुकुमाप्रमाणें व इतर बाबतींत पंचायतीच्या निकालाप्रमाणें आवश्यक अशा सर्व सुधारणा आकारणीच्या यादींत पंचायत करवून घेईल. या सर्व सुधारणांवर त्यांच्या खरेपणाविषयीं सरपंचाची सही असली पाहिजे.

९. लगत मागील कानू अन्वयें खरेपणाविषयीं सही केलेल्या यादींतील नोंदी बसवावयाच्या कराच्या रकमेचा निर्णायक पुरावा म्हणून समजण्यांत येतील.

१०. (१) सदरहू आकारणीच्या यादींत कोणत्याहि मिळकतीसंबंधींची नोंद कपटामुळें, आकस्मिक कारणामुळें किंवा चुकीमुळें गाळण्यांत आली असेल किंवा चुकीची करण्यांत आली असेल तर अशी नोंद, किंवा बांधण्यांत आलेलें, फेरफार करण्यांत आलेलें, जादा बांधकाम करण्यांत आलेलें किंवा सर्वस्वीं किंवा अंशत: फिरून बांधण्यांत आलेलें कोणतेंहि घर

याच्या संबंधींची नोंद, जेव्हां असें बांधकाम, फेरफार, जादा बांधकाम किंवा नवीन बांधकाम आकारणीची यादी तयार करण्यांत आल्यानंतर पुरें करण्यांत आलेलें असेल तेव्हां, सदरहू यादींतील फेरबदलांत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याहि इसमास नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याहून कमी नाहीं अशा तारखेची-या तारखेपूर्वी फेरफार करण्याविरुद्ध कोणतीहि हरकत केली पाहिजे—नोटीस देऊन, दाखल करून किंवा तिच्यांत फेरफार करून आकारणीच्या यादींत कोणतेहि वेळीं फेरफार करण्याचा पंचायतास अधिकार आहे.

(२) कोणत्याहि अशा फेरफारांत हितसंबंध असलेल्या कोणत्याहि इसमानें अशा नोटिशींत ठरविलेल्या तारखेपूर्वी केलेल्या हरकतीची व्यवस्था सर्व बाबतींत ती कानू ६ अन्वयें केलेली अर्जी असल्याप्रमाणेंच केली पाहिजे.

(३) या कानूअन्वयें केलेली नोंद किंवा फेरफार—बांधण्यांत आलेल्या, फेरफार केलेल्या, जादा बांधकाम केलेल्या किंवा फिरून बांधलेल्या घराच्या बाबतींत, असें बांधकाम, फेरफार, जादा बांधकाम किंवा फिरून बांधणी करण्याचें काम ज्या दिवशीं पुरें करण्यांत आलें असेल त्या दिवशीं किंवा नवीन बांधलेली, फेरफार केलेली, जादा बांधकाम केलेली किंवा फिरून बांधलेली इमारत ज्या दिवशीं प्रथम भोगवटयांत आली असेल त्या दिवशीं—या दोहोंपैकीं जी गोष्ट आधीं घडली असेल त्या दिवशीं किंवा इतर बाबतींत सदरहू नोंद किंवा फेरफार करणें ज्या गोष्टींवरून योग्य झालें असेल त्या गोष्टी चालू सरकारी सालांत, ज्या दिवशीं घडल्या असतील त्या सर्वांत आधींच्या दिवशीं केली असल्याप्रमाणेंच अमलांत येईल; आणि प्रसंगाप्रमाणें, सदरहू कर किंवा वाढविलेला कर, अशा वर्षी अशा दिवसानंतर वर्षांतील शिल्लक दिवसाचें सबंध वर्षाशीं जें प्रमाण असेल, त्या प्रमाणांत वसूल केला पाहिजे.

११. (१) जेव्हां घरांतील किंवा जमिनीवरील किंवा दोहोंवरील पट्टी देण्यास पात्र असलेलें कोणतेंहि घर किंवा त्या घराचा कोणताहि भाग पाडून किंवा काढून टाकण्यांत येईल तेव्हां सदरहू पट्टी भरण्यास प्रथमतः पात्र असलेल्या इसमानें त्याबाबतची लेखी नोटीस सरपंचास दिली पाहिजे.

(२) अशी नोटीस देण्यांत येईतोंपर्यंत, सदरील इसम, जर सदरहू घर किंवा त्याचा कोणताहि भाग पाडण्यांत किंवा काढून टाकण्यांत आलें किंवा आला नसता तर, अशा घराचे किंवा भागाचे बाबतींत जी पट्टी देण्यास पात्र झाला असता ती प्रत्येक पट्टी देण्यास पात्र असण्याचें चालू राहील.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं या कानूंतील कोणताहि मजकूर जें कोणतेंहि घर किंवा जो कोणताहि घराचा भाग पडला असेल किंवा जळून गेला असेल अशा घराच्या किंवा घराच्या भागाच्या बाबतींत लागू असणार नाहीं.

१२. (१) प्रत्येक वर्षीं आकारणीची नवीन यादी तयार करण्याची जरूर नाहीं. आकारणीच्या यादीच्या प्रत्येक भागाची दर तीन वर्षांतून निदान एकदां तरी पूर्ण दुरुस्ती केली पाहिजे या शर्तीस पात्र राहून, पंचायतीस एखाद्या वर्षाच्या यादींत असलेल्या किंमती व आकारणी ह्या त्यांत, जरूर वाटतील ते फेरफ़ार करून, पुढें लगत येणाऱ्या सालासाठीं (बरोबर म्हणून) स्वीकारण्याचा अख्त्यार आहे.

(२) परंतु कानू ४ ते ११ यांतील ठराव, नवीन आकारणीची यादी सरकारी सालाच्या सुरुवातीस जणू पूर्ण करण्यांत आली असें समजून, दरसाल लागू होतील.

१३. ज्या घरावर किंवा जमिनीवर आकारणी करण्यांत आलेली असेल अशा घराचा किंवा जमिनीचा प्रत्यक्ष भोगवटा करणारा अशा घराचा किंवा जमिनीचा मालक असेल किंवा शेतकीखेरीज इतर कोणत्याहि कारणासाठीं पट्ट्यानें धारण करणारा असेल तर त्याजकडून प्रथमतः कर वसूल करण्यांत येईल. सदरहू जमिनीचा किंवा घराचा भोगवटा मालक स्वतः करीत नसेल तर सदरहू कर,—

(अ) जर ती मिळकत भाड्यानें दिलेली असेल तर भाड्यानें देणाराकडून;

(ब) जर ती मिळकत पोट-भाड्यानें दिलेली असेल तर वरिष्ठ भाड्यानें देणाराकडून;

(क) जर ती मिळकत भाड्यानें दिलेली नसेल तर ती भाड्यानें देण्याचा हक्क ज्या इसमास पोहोंचत असेल त्या इसमाकडून;

प्रथमत: वसूल करण्यांत येईल:

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं जेव्हां सदरहू कर वार्षिक भाड्याच्या रकमेच्या आधारें ठरविण्यांत आलेला असेल तेव्हां, अशा करा-बद्दल येणें असलेली कोणतीहि रक्कम, ती प्रथमत: देण्यास पात्र असलेल्या इसमाकडून वसूल न झाल्यास, ती ज्या घराच्या संबंधानें येणें झालेली असेल त्याच्या कोणत्याहि भागाचा भोगवटा करणाराकडून त्यानें दरसाल द्यावयाच्या भाड्याचें, त्या सगळ्या घराबद्दल त्याप्रमाणें द्यावयाच्या एकंदर भाड्यास, किंवा आकारणीच्या सहीसूद यादीमध्यें त्याची एकंदर भाड्याची रक्कम कोणतीहि दाखल केलेली असल्यास तीस, म्हणजे यांपैकीं जी रक्कम मोठी असेल तीस, जें प्रमाण बसत असेल त्याच प्रमाणानें त्या कराच्या येणें असलेल्या रकमेचा भाग म्हणून वसूल करण्याचा अख्त्यार आहे. आणखी असें ठरविण्यांत येत आहे कीं या कानूअन्वयें कराची रक्कम देण्यास प्रथमत: पात्र नसलेल्या कोणत्याहि भोगवटा करणारानें दिलेली किंवा त्या-कडून वसूल करण्यांत आलेली कोणतीहि रक्कम ती देण्यास जो इसम प्रथमत: पात्र असेल त्याच्या हिशोबीं मुजरा देण्याचा हक्क अशा भोगवटा करणारास आहे.

१४. ज्या कोणत्याहि इमारतीवर किंवा जमिनीवर वार्षिक भाड्याच्या किंमतीवर ठरविलेली व सालोसाल द्यावयाची पट्टी बसविली असेल ती इमारत किंवा जमीन सबंध वर्षभर किंवा ज्या वर्षाच्या भागाबद्दल पट्टी बसवावयाची असेल त्या भागांत रिकामी व भाडें उत्पन्न झाल्याशिवाय राहील, तेव्हां रिकामी असल्याच्या मुदतीच्या प्रमाणांत सदरहू पट्टीची रक्कम पंचायतीनें माफ केली पाहिजे किंवा परत दिली पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं अशी पट्टीची माफी देणें किंवा ती परत देणें ही गोष्ट, सदरील इमारत किंवा जमीन लागोपाठ नव्वद दिवसांहून कमी नाहीं इतक्या मुदतीपर्यंत रिकामी असून सदरहू इमारत किंवा जमीन रिकामी व भाडें उत्पन्न झाल्याशिवाय राहिल्याच्या गोष्टी-

बद्दलची लेखी नोटीस सरपंचास देण्यांत येईल तो प्रसंग खेरीज करून पट्टीची अशी माफी देतां कामा नये किंवा ती परत देतां कामा नये.

आणखी असें ठरविण्यांत येत आहे कीं ज्या तारखेस अशी नोटीस सरपंचास देण्यांत येईल त्या तारखेपूर्वीच्या कोणत्याहि मुदतीबद्दल पट्टीची माफी देण्यांत येणार नाहीं किंवा ती परत दिली जाणार नाहीं.

---

## क. कलम ८९ (२) (२) अन्वयें यात्रेकरूंवर कर बसविण्याबाबत कानू.

१. या कानूंत "यात्रेकरू" या शब्दाचा अर्थ, गांवच्या हद्दींतील कोणत्याहि पूजाअर्चा करण्याचे ठिकाणीं धार्मिक पूजाअर्चा करण्यासाठीं जो गांवचा रहिवाशी नसलेला इसम गांवच्या हद्दींत येतो तो इसम, असा समजावा.

२. पंचायतीनें ठरवावयाच्या व कलम १०८ चें पोट-कलम (१) ची रक्कम (न) अन्वयें सरकारनें ठरविलेल्या कमाल दराहून अधिक नसणाऱ्या व कमिशनरनें मंजूर केलेल्या दरानें जिल्ह्याच्या माजिस्ट्रेटच्या पसंतीनें दरेक पंचायतीनें ठरविलेल्या मुदतींत सदरहू गांवीं येणाऱ्या प्रत्येक यात्रेकरूकडून कर वसूल करण्यांत यावा.

३. असा कर दिल्यावर यात्रेकरूचा सहीसूद पास प्रत्येक यात्रेकरूस देण्यांत येईल.

४. या कानूंच्या कारणांसाठीं द्यावयाच्या यात्रेकरूंच्या पासांचा आकार, नमुना व रंग पंचायतीनें ठरवून असे पास छापून घ्यावे.

५. यात्रेच्या संपूर्ण मुदतींत सदरहू पास कायदेशीर समजला जाईल.

६. पंचायतीकडून सदरहू कारणासाठीं ठरविण्यांत येईल अशा एक किंवा अनेक जागीं कर वसूल केला जाईल.

७. खालील इसमांना वरील कराची माफी असेल:—

(अ) आपापलीं हुद्याचीं कामें करण्यासाठीं सदरहू गांवीं येणारे सर्व सरकारी व लोकलबोर्डाचे नोकर,

(ब) साधू, बैरागी, फकीर वगैरे, आणि

(क) बारा वर्षांपेक्षां कमी वयाचे इसम.

८. या कानूंच्या कारणांसाठीं एखादा इसम यात्रेकरू आहे किंवा कसें किंवा साधू, बैरागी, फकीर वगैरेंपैकीं आहे किंवा कसें याविषयीं "सरपंचानें " दिलेला निकाल अखेरचा समजला पाहिजे.

---

## ड. कलम ८९ (२) (३) अन्वयें जत्रा व उत्सव यांवर कर बसविण्याबाबत कानू.

१. प्रत्येत पंचायतीनें, जिल्हा-माजिस्ट्रेटाच्या मंजुरीनें, सदरहू गांवीं भरणाऱ्या कोणत्याहि जत्रेंत किंवा करण्यांत येणाऱ्या उत्सवांत ज्या मुदतींत व ज्या हद्दींत कर किंवा फी बसवावयाची असेल ती मुदत किंवा त्या मुदती व त्या हद्दी ठरविल्या पाहिजेत.

२ कोणत्याहि इसमास दुकान, छप्पर, स्टॉल काढण्याच्या कारणासाठीं किंवा कोणत्याहि प्रकारचा व्यापार करण्यासाठीं किंवा सिनेमासाठीं सर्कससाठीं किंवा इतर तशाच कारणासाठीं, सहरहू कारणासाठीं या कानूअन्वयें त्यानें आधीं परवाना मिळविला असेल तें खेरीज करून, कानू १ मध्यें निर्दिष्ट केलेल्या मुदतींत व हद्दींत, कोणतीहि खुली जागा किंवा जमिनीचा एखादा प्लॉट यांचा भोगवटा करण्याची परवानगी असणार नाहीं.

३. भोगवटा करावयाच्या प्लॉटच्या आकाराप्रमाणें कमिशनरच्या मंजुरीनें पंचायतीनें ठरविलेल्या दरानें कर भरल्यावर परवाना देण्यांत येईल.

४. सदरहू कारणासाठीं पंचायतीनें अधिकार दिलेल्या एका किंवा अनेक इसमांकडे सदरहू कर आगाऊ भरला पाहिजे. त्या इसमानें किंवा इसमांनीं कानूंअन्वयें ठरविलेल्या नमुन्यांत (पैशाचा भरणा केल्याबाबत) पावती दिली पाहिजे.

---

## इ. कलम ८९ (२) (४) अन्वयें मालाच्या विक्रीवर कर बसविण्याबाबत कानू.

१. गांवच्या सीमेंत भरलेल्या बाजाराच्या किंवा जत्रेच्या हद्दींत विकण्यासाठीं माल मांडून बसणाऱ्या प्रत्येक इसमानें यांत यानंतर ठरविल्याप्रमाणें कर दिला पाहिजे.

२. कलम १०८ (१) ची रक्कम (न) अन्वयें सरकारनें ठरविलेल्या दरांहून अधिक नाहीं असा आकारावयाचा दर एक तर भोगवटयांत आणण्याची परवानगी दिलेल्या प्लाटच्या आकाराप्रमाणें किंवा विक्रीसाठीं मांडावयाच्या मालाच्या परिमाणाप्रमाणें प्रत्येक पंचायतीनें नक्की ठरवावा व तशा दराबाबत कमिशनरची मंजुरी मिळवावी.

३. याबाबत पंचायतीनें अधिकार दिलेल्या इसमास सदरहू जागीं सदरहू कर मागितल्यावर दिला पाहिजे, व सदरहू इसमानें या कानूअन्वयें ठरविलेल्या नमुन्याप्रमाणें एक पावती दिली पाहिजे.

---

## फ. कलम ८९ (२) (५) अन्वयें पंचायतीनें ऑक्ट्रॉय बसविण्याबाबत कानू.

१ प्रत्येक पंचायतीनें कलेक्टरची मंजुरी घेऊन ऑक्ट्रॉयच्या हद्दी व ज्या नाक्यावर ऑक्ट्रॉय वसूल करावयाचा त्या नाक्यांची संख्या व त्यांच्या जागा या गोष्टी ठरविल्या पाहिजेत.

२. खालील वस्तूंची गांवच्या हद्दींत खपासाठीं, विक्रीसाठीं किंवा उपयोगासाठीं आयात करण्यांत येऊन बाहेरगांवांहून येऊन गांवांमधून इतर गांवीं त्या नेण्यांत येत नसतील तेव्हां पंचायतीनें ठरवावयाच्या दरांनीं सदरहू वस्तूंवर ऑक्ट्रॉय घेण्यांत येईल:—

कापड,
केरोसिन (घासलेट तेल),
इमारती लांकूड,

(कारुगेटेड) लोखंडी पत्रे,

साखर किंवा गूळ,

कमिशनरनें मंजूर केलेल्या इतर वस्तु.

३. कानू २ मध्यें सांगितलेल्या वस्तू किंवा माल आयात करणाऱ्या इसमानें सदरहू कारणासाठीं ठरविलेल्या नाक्यावर ऑक्ट्राय भरला पाहिजे.

४. ऑक्ट्रॉय भरल्याची एक पावती पंचायतीकडून ठरविण्यांत येईल अशा नमुन्यांत देण्यांत येईल.

५. सरकारनें किंवा लोकलबोर्डानें किंवा गांवपंचायतीनें आपल्या उपयोगासाठीं आयात केलेल्या वस्तूंवर किंवा मालावर कोणताहि ऑक्ट्रॉय घेतां कामा नये.

---

## ग. कलम ८९ (२) (६) अन्वयें लग्नकार्यें, दत्तविधान व मेजवान्या यांजवर कर बसविण्याबाबत कानू.

१. प्रत्येक पंचायतीनें गांवच्या हद्दींत एखाद्या इसमानें किंवा इसमांनीं केलेल्या प्रत्येक मेजवानीवर, दत्तविधानावर, समारंभावर किंवा लग्नकार्यावर आकारावयाच्या व कलम १०८ (१), रक्कम (न) अन्वयें ठरविलेल्या कमाल मर्यादेहून अधिक नसणाऱ्या करांचे एक किंवा अनेक दर नक्की ठरविले पाहिजेत व याबाबत ठरविणें आवश्यक असेल अशा निरनिराळ्या प्रकारांत लग्नकार्यें, मेजवान्या वगैरे यांचें वर्गीकरण करण्याबाबतचे नियम यांसह सदरहू दर कमिशनरच्या मंजुरीसाठीं सादर केला किंवा केले पाहिजे.

२. एखादें लग्नकार्य किंवा मेजवानी कोणत्या वर्गांतील आहे तो वर्ग सदरहू लग्नकार्यावर किंवा मेजवानीवर करण्यांत आलेल्या खर्चावरून पंचायतीनें ठरविला पाहिजे. दत्तविधान कोणत्या वर्गांत घालावयाचें तें मूल दत्तक घेणाऱ्या इसमाच्या सांपत्तिक परिस्थितीवरून पंचायतीनें ठरविलें पाहिजे. असें वर्गीकरण पसंत नसणाऱ्या गांवच्या कोणत्याहि

रहिवाशास मामलतदाराकडे अपील करण्याचा अधिकार आहे; आणि सदरहू बाबतींतील मामलतदाराचा निकाल अखेरचा समजण्यांत येईल.

३. गांवांत लग्नकार्याचा समारंभ करणाऱ्या दरेक आईबापांनी किंवा पालकानें, मूल दत्तक घेणाऱ्या प्रत्येक इसमानें व मेजवानी देणाऱ्या प्रत्येक इसमानें, प्रसंगाप्रमाणें, लग्नाच्या, दत्तविधानाच्या किंवा मेजवानीच्या तारखेपूर्वीं निदान तीन दिवस आधीं सदरहू गोष्टीची लेखी खबर सरपंचास दिली पाहिजे आणि कानू १ अन्वयें बसविलेला कर दिला पाहिजे. ठरविल्याप्रमाणें नोटीस देण्यांत न येईल तर संबंध असलेला इसम ठरविलेल्या दराच्या दुप्पट दरानें सदरहू कर भरण्यास पात्र होईल.

---

## कलम ८९ मध्यें निर्दिष्ट केलेले कर किंवा फी बसविण्याचा कमाल दर कलम ९० अन्वयें ठरविण्याबाबत कलम १०८ (१), पोटरक्कम (न) अन्वयें केलेली कानू.

कलम ८९ अन्वयें बसवावयाच्या करांचे व फीचे दर खालीं सांगितलेल्या दरांहून अधिक असतां कामा नयेः—

| | कमाल दर. |
|---|---|
| १. घरपट्टी— | |
| (अ) घराच्या मुद्दल किमतीवर आकारलेल्या पट्टीसाठीं. | घराच्या मुद्दल किमतीच्या दरेक शंभर रुपयांस ४ आणे. |
| (ब) घरभाड्याच्या रकमेवर आकारलेल्या पट्टीसाठीं. | वार्षिक घरभाड्याच्या रकमेवर शेंकडा ८ टक्के. |
| २. यात्रेकरूंवरील कर .... | प्रत्येक यात्रेकरूकडून ४ आणे. |
| ३. जत्रा व उत्सव यांवरील कर.... | (अ) दुकानाच्या किंवा छप्पराच्या किंवा स्टालच्या (गाळ्याच्या) कारणासाठीं व्यापलेल्या ९ चौरस फुटांहून अधिक क्षेत्रफळ नसणाऱ्या |

कमाल दर

प्रत्येक प्लाटबद्दल जत्रेच्या किंवा उत्सवाच्या मुदतीपर्यंत ४ आणे, आणि ९ चौरस फुटांच्या प्रत्येक जादा प्लाटबद्दल किंवा त्याच्या भागाबद्दल ६ पै.

(ब) सिनेमा, सर्कस किंवा इतर करमणुकीच्या खेळासाठीं घेतलेल्या जागाबद्दल दर एकरीं प्रत्येक दिवसास पन्नास रुपये.

४. मालाच्या विक्रीवर कर....

(अ) व्यापलेल्या प्लॉटच्या क्षेत्रावर कर दिला पाहिजे असें पंचायत ठरवील तर ३(अ) मध्यें दिल्याप्रमाणेंच दर असेल, परंतु तो दरेक दिवसासाठीं असेल.

(ब) विक्रीसाठीं मांडलेल्या वस्तूंच्या एकूण संख्येवर ठरविलेल्या दरानें कर घेतला पाहिजे असें पंचायत ठरवील तर कमाल दर प्रत्येक दिवसासाठीं खालीं लिहिल्याप्रमाणें असेल:—

(१) भाजी किंवा फळफळावळ—

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| (अ) करंडी (टोपली) | ० | ० | ६ |

| | कमाल दर | |
|---|---|---|
| | | रु. आ. पै. |
| (ब) गोण | .... | ० १ ० |
| (क) गाडी | .... | ० ४ ० |
| | | रु. आ. पै. |
| (२) धान्य— | | |
| (अ) डोकीवरील बोजा | .... | ० ० ६ |
| (ब) गोण | .... | ० २ ० |
| (क) गाडी | .... | ० ४ ० |

५. ऑक्ट्रॉय—

| | रु. | आ. | पै. | |
|---|---|---|---|---|
| कापड सुती | १ | ० | ० | दरेक बंगाली मणास |
| कापड लोकरीचें .... | १ | ८ | ० | ,, ,, ,, |
| कापड रेशमी .... | ३ | ० | ० | ,, ,, ,, |
| केरोसिन (घासलेट तेल).... | ० | २ | ० | प्रत्येक डब्यास. |
| बांधकामाचें सामान— | | | | |
| (अ) इमारती लांकूड.... | ० | ८ | ० | प्रत्येक गाडींतील ओझ्यास (म्हणजे १६ बंगाली मणांस). |
| (ब) कॉरुगेटेड लोखंडी पत्रे. | ० | ४ | ० | प्रत्येक बंगाली मणास |
| इतर वस्तू .... | ० | ४ | ० | ,, ,, ,, |

६. लग्नसमारंभ, दत्तविधान व मेजवान्या यांजवरील कर.—

अ लग्नसमारंभ.—

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| वर्ग १ .... .... .... | ५ | ० | ० |
| वर्ग २ .... .... .... | २ | ० | ० |
| वर्ग ३ .... .... .... | १ | ० | ० |
| वर्ग ४ .... .... .... | ० | ८ | ० |

| ब दत्तविधान.— | | | | कमाल दर. | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ग १ | .... | .... | .... | ५ | ० | ० |
| वर्ग २ | .... | .... | .... | २ | ० | ० |
| वर्ग ३ | .... | .... | .... | १ | ० | ० |
| वर्ग ४ | .... | .... | .... | ० | ८ | ० |
| क मेजवान्या.— | | | | | | |
| वर्ग १ | .... | .... | .... | ३ | ० | ० |
| वर्ग २ | .... | .... | .... | १ | ० | ० |
| वर्ग ३ | .... | .... | .... | ० | ८ | ० |
| वर्ग ४ | .... | .... | .... | ० | ४ | ० |

---

## सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट यांचें कलम ९१ (५) अन्वयें पंचायतीस येणें असलेले कर व इतर रकमा वसूल करण्याबद्दल गांवकामगारांस द्यावयाचा मेहनताना व ज्या रीतीनें असा मेहनताना देण्यांत आला पाहिजे ती रीती या गोष्टी ठरविण्याबाबत सदरहू आक्टाचें कलम १०८ पोट-कलम, (१), रक्कम (ओ) अन्वयें केलेल्या कानू.

१. पंचायतीचे कर व पंचायतीस देणें असलेल्या इतर रकमा वसूल करण्याबद्दल गांवकामगारांना द्यावयाचा मेहनताना वसूल केलेल्या प्रत्येक रुपयामागें एक आणा असेल आणि तो खालीं लिहिल्याप्रमाणें वाटून देण्यांत यावा:—

| | पै | |
|---|---|---|
| (१) तलाठी (किंवा कुळकर्णी) .... | ५ | मेहनतान्यादाखल गांव पंचायतीकडून वसूल केलेल्या दरेक आण्यांतून (तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १९२९ चा रेव्हिन्यूडिपार्टमेंटांतील सरकारी ठराव नं. ७४८५/२४ पहा). |
| (२) पाटील .... .... | ४ | |
| (३) गांवचा हलक्या प्रतीचा नोकर. .. | ३ | |

२. कलम ३२ बरोबर वांचावयाच्या कलम १०८, पोट–कलम (१) रक्कम (ई) अन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू २ ची पोट–कानू (२) अन्वयें सब्–ट्रेझरींत आपआपल्या फंडाच्या रकमा ज्यांनीं अमानत ठेविल्या आहेत अशा पंचायतींच्या बाबतींत पंचायतींस येणें असलेल्या रकमा वसूल करण्यासाठीं गांवकामगारांना व नोकरांना द्यावयाचा मेहनताना नगदी सालअखेर शक्य तितक्या लवकर सरपंचानें सब्–ट्रेझरीवर दिलेल्या व प्रसंगाप्रमाणें, मामलतदारानें किंवा महालकऱ्यानें मखलाशी केलेल्या चेकनें दिला पाहिजे. गांवकामगार व सरपंच यांच्यांत कोणताहि मतभेद उद्भवल्यास तो असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर यांजकडे लिहून पाठवून मिटविण्यांत यावा. असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर यांचा निकाल अखेरचा समजण्यांत येईल.

३. कलम ३२ बरोबर वांचावयाच्या कलम १०८, पोट–कलम (१) रक्कम (इ) अन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू २ अन्वयें कलेक्टरानें पसंत केलेल्या कोणत्याहि बँकेंत आपआपल्या फंडांच्या रकमा ज्यांनीं अमानत ठेविल्या असतील अशा पंचायतींच्या बाबतींत गांवकामगारांनीं सरपंचाकडे आपलें बिल सादर करून मेहनताना वसूल करावा. गांवकामगार व सरपंच यांच्या दरम्यान मतभेद उद्भवल्यास तो असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टराकडे लिहून मिटविण्यांत यावा. असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टर यांचा निकाल अखेरचा म्हणून समजावा.

४. तलाठी (किंवा कुळकर्णी) हा कानू १ प्रमाणें मेहनताना वांटून देण्याबाबत जबाबदार समजला जाईल.

## कलम ९३ अन्वयें जिल्हा-लोकलबोर्डास गांवपंचायतीस ज्या शर्तीवर कर्जे देण्याचा अधिकार आहे त्या शर्ती ठरविण्याबाबत सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतीबाबत आक्ट याचें कलम १०८, पोट-कलम (१), रक्कम (पी) अन्वयें केलेल्या कानू.

१. कर्जासाठीं पंचायतीनें केलेली कोणतीहि अर्जी पंचायतीच्या सभासदांच्या एकूण संख्येच्या दोन-तृतीयांश मतानें पास झालेल्या ठरावावरून करण्यांत आलेली असल्याशिवाय ती जिल्हा-लोकलबोर्डानें विचारांत घेतां कामा नये.

२. जिल्हा-लोकलबोर्डास, कानू १ प्रमाणें पंचायतीनें केलेल्या अर्जीवरून, ज्या कामावर खर्च करण्यासाठीं पंचायतीस रकमेची जरूरी आहे त्या कामाच्या मंजूर केलेल्या अंदाजी रकमेहून अधिक नसणारी कर्जाऊ रक्कम पंचायतीच्या फंडांच्या तारणावर पंचायतीस देण्याचा अधिकार आहे.

३. गेल्या तीन वर्षांच्या हिशोबाच्या आधारानें काढलेला अंदाजी चालू वसूल अंदाजी चालू खर्चापेक्षां जितक्या रकमेनें जास्त असेल त्या रकमेच्या पांचपट रकमेहून अधिक रक्कम जिल्हा-लोकलबोर्डानें पंचायतीस कर्जाऊ देतां कामा नये.

४. जिल्हा-लोकलबोर्डानें दिलेल्या कर्जावर पंचायतीनें द्यावयाचा व्याजाचा दर जिल्हा-लोकलबोर्ड व पंचायत या दोहोंच्या दरम्यान केलेल्या आपआपसांतील कबुलायतीवरून ठरविला पाहिजे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं असा व्याजाचा दर, सन १८८३ चा जमीन सुधारण्यासाठीं द्यावयाच्या कर्जाऊ रकमांबाबत आक्ट [ लॅन्ड् इंप्रूव्हमेंट लोन्स आक्ट ] या अन्वयें सरकारकडून ज्या दरानें कर्जाऊ रकमा वेळोवेळीं देण्यांत येत असतील त्या दराहून अधिक असतां कामा नये.

५. जिल्हा-लोकलबोर्डानें पंचायतीस दिलेली कर्जाऊ रक्कम (पंचायतीनें) दहा सारख्या हप्त्यांहून अधिक नाहीं इतक्या हप्त्यांनीं व्याजासहित परत दिली पाहिजे.

## RULES UNDER SECTION 108 (1) (*g*), (*h*), (*i*), (*j*), (*k*) and (*l*) OF THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1933.

## मुंबई सरकार.

### जनरल डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १९ माहे डिसेंबर सन १९३४.

नं. एस्. १७४/४.—सन १९३३ चा मुंबईचा ग्रामपंचायतींबाबत आक्ट (सन १९३३ चा मुंबईचा आक्ट नं. ६ वा) याच्या १०८ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमाच्या रकमा (ग), (ह), (आय्), (जे), (के) व (ल) यावरून मिळालेले अधिकार चालवून मुंबई सरकार हे गांवच्या न्यायदानमंडळांस मार्गदर्शक होण्यासाठीं पुढील कानू करीत आहेत; त्या येणेंप्रमाणें:—

१. लहान सरनामा—या कानूंस सन १९३४ च्या मुंबईच्या गांवच्या न्यायदानमंडळाबाबत कानू असें म्हणावें.

२. व्याख्या—या कानूंत विषयास किंवा संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर—

(१) "आक्ट" या शब्दाचा अर्थ, सन १९३३ चा मुंबईचा गांव-पंचायतींबाबत आक्ट, असा आहे.

(२) "नमुना" या शब्दाचा अर्थ, या कानूंस जोडलेला नमुना, असा आहे.

(३) "सभासद" या शब्दाचा अर्थ, गांवच्या न्यायदानमंडळाचा सभासद, असा आहे.

(४) "कलम" या शब्दाचा अर्थ, सदरहू आक्टाचें कलम, असा आहे.

(५) "गांवची चावडी" या संज्ञेंत, सन १८७९ चा मुंबईचा जमीन-महसुलाबाबत कायदा याअन्वयें चावडी म्हणून समजल्या जाणाऱ्या जागेचा समावेश होतो.

(६) या कानूंत व्याख्या न दिलेल्या परंतु सदरहू आक्टांत व्याख्या दिलेल्या शब्दांचा व संज्ञांचा, त्यांचा सदरहू आक्टांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल.

३. गांवच्या न्यायदानमंडळावर धारण करणारा किंवा त्याचा वारचा ह्यांची नेमणूक—कलेक्टरानें धारण करणाराची किंवा त्याच्या वारच्याची गांवच्या न्यायदानमंडळावर नेमणूक करावयाची ती, ६ व्या कलमाचे कारणासाठीं, १०८ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमाच्या (ब) रकमेअन्वयें केलेल्या कानूंत ठरविली आहे त्याच रीतीनें केली पाहिजे.

४. चेअरमन गैरहजर असेल किंवा अध्यक्ष होण्यास असमर्थ असेल त्याप्रसंगीं चेअरमनाची नेमणूक—चेअरमननें गांवच्या न्यायदानमंडळाच्या बैठकींत अध्यक्षस्थान स्वीकारलें पाहिजे. चेअरमन गैरहजर असेल तेव्हां किंवा तो अध्यक्ष होण्यास असमर्थ असेल त्या बाबतींत, हजर असलेल्या सभासदांनीं आपल्यापैकीं एकास त्या बैठकीच्या वेळीं चेअरमन होण्यासाठीं निवडलें पाहिजे. मतें समसमान पडल्याचें बाबतींत चेअरमनाची निवडणूक चिठ्ठ्या टाकून ठरविली पाहिजे.

५. बैठकीची जागा—गांवच्या न्यायदानमंडळानें आपली बैठक, पंचायतीची बैठक भरण्याची जागा म्हणून १९ व्या कलमाअन्वयें ठरविलेल्या बैठक भरण्याचे जागीं भरविली पाहिजे आणि जर अशी जागा मिळण्यासारखी नसेल, तर सदरहू बैठक गांवच्या चावडींत भरविली पाहिजे; जर गांवांत कोणतीहि चावडी नसेल तर गांवच्या न्यायदानमंडळास पोटतुकडी माजिस्ट्रेटानें अगोदर पसंत केलेल्या व संबंध असलेल्या सर्व लोकांस येतां येण्याजोग्या इतर कोणत्याहि जागीं आपली बैठक भरविण्याचा अधिकार आहे.

६. बैठकीचे तास—चेअरमनानें, इतर सभासदांच्या सल्लामसलतीनें, बैठकीचे तास ठरविले पाहिजेत.

७.कोरम—पांच सभासद असलेल्या गांवच्या न्यायदानमंडळाकरितां कोरम तिघांचें असेल व सात सभासद असलेल्या गांवच्या न्यायदानमंडळाकरितां कोरम चारांचें असेल.

८. दावा किंवा खटला दाखल करण्याच्या संबंधांत फी—दावा किंवा खटला दाखल करण्याच्या संबंधांत पुढील दरांनीं फी आकारली पाहिजे, म्हणजे:—

(१) दाव्यांचे बाबतींत, जेव्हां दाव्याची रक्कम किंवा किंमत—

(अ) १० रुपयांहून ज्यास्त नसेल तेव्हां.... ....आठ आणे.

(ब) १० रुपयांहून ज्यास्त असेल परंतु २५ रुपयांहून जास्त नसेल तेव्हां ....एक रुपया.

(क) २५ रुपयांहून जास्त असेल परंतु ५० रुपयांहून ज्यास्त नसेल तेव्हां ....एक रुपया आठ आणे.

(ड) ५० रुपयांहून जास्त असेल परंतु ७५ रुपयांहून ज्यास्त नसेल तेव्हां ....दोन रुपये.

(इ) ७५ रुपयांहून जास्त असेल परंतु १०० रुपयांहून ज्यास्त नसेल तेव्हां ....दोन रुपये आठ आणे.

(२) ( कोणत्याहि अपराधाच्या किंवा कोणत्याहि पोट-कायद्याच्या भंगाच्या संबंधांत पंचायतीच्या वतीनें करण्यांत आलेल्या फिर्यादीखेरीज इतर ) फौजदारी फिर्यादीचे बाबतींत—आठ आणे.

९. **रजिस्टरें.**—गांवच्या न्यायदानमंडळानें पुढील रजिष्टरें ठेविलीं पाहिजेत, म्हणजे:—

(१) नमुना १ मध्यें, चालविलेल्या कामांचें रजिस्टर.

(२) नमुना २ मध्यें दाव्यांचें रजिस्टर.

(३) नमुना ३ मध्यें खटल्यांचें रजिस्टर.

१०. **भाषा:**—गांवच्या न्यायदानमंडळानें चालवावयाचें कामकाज व न्यायदानमंडळाचीं सर्व रजिस्टरें हीं सदरहू गांव ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्याच्या (देश) भाषेंत किंवा पोटतुकडी माजिस्ट्रेट फर्मावील अशा सदरहू गांवच्या इतर भाषेंत अनुक्रमें चालविण्यांत आलें पाहिजे व ठेवण्यांत आलीं पाहिजेत.

११. **समन्सचा नमुना.**—गांवच्या न्यायदानमंडळानें काढलेलें दरेक समन्स दुहेरी असलें पाहिजे व तें प्रतिवादी किंवा आरोपित इसम ह्यांचे बाबतींत नमुना नं. ४ मध्यें व साक्षीदाराचे बाबतींत नमुना नं. ५ मध्यें असलें पाहिजे.

१२. **प्रोसेस फी.**—गांवच्या न्यायदानमंडळानें काढलेल्या दरेक समन्साबद्दल, जेव्हां सदरहू समन्स गांवच्या (हद्दीच्या) आंत बजावलें असेल

तेव्हां एक आणा व जेव्हां सदरहू समन्स सदरहू गांवच्या (हद्दीच्या) बाहेर बजावलें असेल तेव्हां चार आणे इतकी फी आकारली पाहिजे.

१३ दावे किंवा खटले ह्यांच्या सुनावण्या व तहकुब्या.—शक्य असेल तेथवर दावा किंवा खटला ह्यांची सुनावणी ठरविलेल्या दिवशीं पुरी करण्यांत आली पाहिजे आणि जर ती अशा रीतीनें पुरी करण्यांत आली नाहीं तर ती सुनावणी, लेखी नमूद करून ठेवावयाच्या कारणांवरून पुढल्या दिवसापर्यंत तहकूब ठेवण्याचा अधिकार आहे व त्यानंतर ती रोजच्या रोज चालू ठेविली पाहिजे. जर कोणत्याहि दाव्याचा किंवा खटल्याचा निकाल त्याच्या पहिल्या सुनावणीच्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत होणार नाहीं तर चेअरमनानें त्याबाबतच्या कारणांचा. पोटतुकडी माजिस्ट्रेटाकडे रिपोर्ट केला पाहिजे.

१४. पुरावा नमूद करणें.—गांवच्या न्यायमंडळानें त्यानें इन्साफ केलेल्या दरेक दाव्याच्या किंवा खटल्याच्या चालविलेल्या कामाचें एक 'मिनिट' ठेविलें पाहिजे व त्यांत हितसंबंध असलेल्या पक्षकारांनीं दिलेल्या मुद्याचे जाबजबाब, पुराव्याच्या सारांशाच्या थोडक्यांत असलेल्या टिपणासह, नमूद केलेले असले पाहिजेत.

१५. कागदपत्र.—जर कोणत्याहि दाव्यांत किंवा खटल्यांत कोणतेही कागदपत्र हजर करण्यांत येतील तर त्यांची नोंद करण्यांत येऊन त्यांवर शेरा मारण्यांत आला पाहिजे व सदरहू दावा किंवा खटला ह्यांचा निकाल झाल्यानंतर ज्यानें ते हजर केले असतील त्या इसमास ते परत दिले पाहिजेत.

१६. फैसल्ला, हुकुम किंवा हुकुमनामा.—गांवच्या न्यायदानमंडळानें प्रसंगाप्रमाणें, दाव्यांच्या रजिस्टरांत (नमुना २) किंवा खटल्याच्या रजिस्टरांत (नमुना ३) फैसल्ला, हुकूम किंवा हुकूमनामा थोडक्यांत नमूद केला पाहिजे; आणि सदरहू निकाल सांगणाऱ्या सभासदांनीं त्यावर आपापल्या सह्या केल्या पाहिजेत किंवा आंगठ्याचे ठसे उठविले पाहिजेत; व सदरहू दाव्याचा किंवा खटल्याचा निकाल हजर असलेल्या पक्षकारांस कळविला पाहिजे. पक्षकारांनीं रजिस्टरावर (फैसल्ला, हुकूम किंवा हुकूमनामा कळल्याबद्दल) सह्या केल्या पाहिजेत किंवा आपल्या आंगठ्याचे ठसे उठविले पाहिजेत.

१७. रजिस्टरांतील नोंदींच्या नकला पुरविणें.—(१) दावे व खटले ह्यांच्या रजिस्टरांतील नोंदींच्या नकला, एका दाव्याच्या किंवा खटल्याच्या संबंधांतील दरेक नकलेकरितां चार आणे फी देण्यांत आल्यानंतर, चेअरमनानें किंवा तो गैरहजर असल्यास, पंचायतीचा सेक्रेटरी--कोणी असल्यास--त्यानें किंवा ५९ व्या कलमाअन्वयें नेमिलेल्या सभासदानें दिल्या पाहिजेत.

(२) चेअरमनानें सदरहू नक्कल एक तर स्वत: केली पाहिजे किंवा पंचायतीचा कोणताहि सेक्रेटरी असल्यास त्यांजकडून, किंवा गांवच्या तलाठ्याकडून किंवा शाळामास्तराकडून, किंवा इतर कोणत्याहि लिहितां वाचतां येणाऱ्या इसमाकडून करविली पाहिजे. दरेक नक्कल-चेअरमनानें रजिस्टराबरोबर ताडून पाहिली पाहिजे व ती 'खरी नक्कल' असल्याबद्दल त्यानें दाखला दिला पाहिजे.

(३) पोटकानू (१) अन्वयें वसूल केलेल्या नकलेच्या फीच्या रकमे-पैकीं अर्धी रक्कम, सदरहू नक्कल करणाऱ्या इसमास दिली पाहिजे व उरलेली रक्कम गांवफंडांत भरली पाहिजे.

१८. फीबद्दल पावती.—कानू ८ व १२ अन्वयें घ्यावयाची फी चेअरमनास किंवा गांवांत तो गैरहजर असेल तर, पंचायतीचा कोणताहि सेक्रेटरी असल्यास त्यास किंवा ५९ व्या कलमान्वयें नेमिलेल्या सभासदास रोख दिली पाहिजे. असा चेअरमन, सेक्रेटरी किंवा सभासद ह्यानें, देण्यांत आलेल्या रकमेबद्दल एक पावती ताबडतोब आपल्या सहीनिशीं गांवचें न्यायदानमंडळ पसंत करील अशा नमुन्याप्रमाणें दिली पाहिजे, व सदरहू रक्कम गांवफंडाच्या खातीं जमा टाकली पाहिजे व ती कॅशबुकांतील फीच्या आसनांत दाखल केली पाहिजे.

१९. समन्सांच्या बजावणीबद्दल गांवकामगारास फी देणें.—जर समन्साची बजावणी करण्यासाठीं एखाद्या गांवकामगारास नेमण्यांत येईल तर १२ व्या कानूअन्वयें घेतलेली फी अशा अमलदारास (कामगारास) देण्यांत आली पाहिजे.

२०. दंड, नुकसानीचा मोबदला वगैरेंच्या रकमा देणें व त्यां-बद्दलची पावती.—गांवच्या न्यायमंडळाच्या हुकुमान्वयें किंवा हुकुम-नाम्याअन्वयें दंड, नुकसानीचा मोबदला म्हणून किंवा इतर प्रकारें कोणतीहि

रक्कम देण्यास पात्र असलेल्या दरेक इसमानें, सदरहू रक्कम चेअरमनाकडे किंवा गांवांत तो गैरहजर असल्यास, पंचायतीचा कोणताहि सेक्रेटरी असल्यास त्याजकडे किंवा ५९ व्या कलमाअन्वयें नेमिलेल्या सभासदाकडे भरली पाहिजे. असा चेअरमन, सेक्रेटरी किंवा सभासद ह्यानें अशा रीतीनें मिळालेल्या रकमेबद्दलची पावती, सदरहू आक्टाच्या १०८ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमाच्या (फ) रकमेअन्वयेंच्या कानूंस ठरविलेल्या "सामान्य पावती" च्या नमुन्याप्रमाणें दिली पाहिजे. जेव्हां गांवच्या न्यायमंडळाच्या हुकुमाअन्वयें किंवा हुकुमनाम्याअन्वयें कोणत्याहि इसमास कोणतीहि रक्कम देण्यांत आली असेल तेव्हां अशा रीतीनें दिलेल्या रकमेबद्दलची पावती कोणत्याहि इसमाकडून गांवच्या न्यायमंडळाकडून पसंत करण्यांत येईल अशा नमुन्यांप्रमाणें घेण्यांत आली पाहिजे.

२१. दाव्यांतील खर्च.--पैशाबद्दलच्या दाव्यांतील खर्चाबद्दलचे हुकूम, परिस्थितीस अनुसरून असले पाहिजेत व अशा खर्चांत कानू ८ व १२ या अन्वयें दिलेल्या फी व गांवच्या न्यायदानमंडळास जो देवविणें वाजवी असल्याचें वाटेल असा, ६७ व्या कलमाच्या (३) ऱ्या पोट-कलमाअन्वयें आलेल्या, साक्षीदारांच्या खर्चाचा तेवढा भाग ह्यांचा समावेष झाला पाहिजे.

## नमुना नं. १.

### चालवावयाच्या कामांचें रजिस्टर

| तारीख<br>१ | हजर असलेल्या सभासदांचीं नांवें<br>२ | करण्यांत आलेलें कामकाज<br>३ |
|---|---|---|
| | | |

## नमुना

च्या गांवच्या न्यायदानमंडळापुढें

| दावा नं. | अर्जाची तारीख | वादीचें नांव, बापाचें नांव व राहण्याचें ठिकाण, त्याच्या दाव्याचा सारांश, त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा व तारीख, व चेअरमन किंवा सभासद ह्यांची सही. (कलम ६०) | बैठकीकरितां ठरविलेली तारीख, वेळ व जागा. (कलम ६१) | पुरावा हजर करण्यासाठीं व दाव्याची सुनावणी करण्यासाठीं ठरविलेली तारीख, वेळ व जागा. (कलम ६२) | वादीच्या पुराव्याचा सारांश व त्याच्या साक्षीदारांचीं नांवें व त्यांच्या साक्षींचा सारांश. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

हुकुमनामा ( किंवा ) हुकूम देणाऱ्या गांवच्या न्यायमंडळाच्या सभासदांच्या सह्या किंवा अंगठ्याचे ठसे.

चेअरमनची सही.

नं. २.

दाखल केलेल्या दाव्यांचें रजिस्टर.

| प्रतिवादी किंवा त्याचा वारचा यांचें नांव, बापाचें नांव व राहण्याचें ठिकाण, त्याच्या कैफियतीचा सारांश व त्याच्या साक्षीदारांच्या साक्षींचा सारांश त्या साक्षीदारांच्या नांवांसह | देण्यांत आलेला हुकुमनामा किंवा हुकूम, इतर गोष्टींबरोबरच, कोणतीहि रक्कम हुकुमनाम्यांत देवविण्यांत आली असल्यास ती सांगून त्या हुकुमनाम्याबाबत किंवा हुकुमाबाबत थोडक्यांत दिलेल्या कारणासह हुकुमनामा किंवा हुकूम ह्यांची तारीख व न्यायदानमंडळाचा चेअरमन व सभासद ह्यांच्या सह्या. | सदरहू हुकुमनामा किंवा हुकूम ह्यांची दरोबस्त किंवा अंशतः फेड किंवा उलगडा ज्या तारखेस व ज्या रीतीनें करण्यांत आला ती तारीख व रीति. (कलम ८०.) | डिस्ट्रिक्ट जज्जानें मागाहून दिलेला कोणताहि हुकूम. (कलम ८७.) |
|---|---|---|---|
| ७ | ८ | ९ | १० |
| | | | |

भिन्न मत असलेल्या गांवच्या न्यायदानमंडळाच्या सभासदांच्या सह्या किंवा आंगठ्याचे ठसे.

**नमुना**

**च्या गांवच्या न्यायदानमंडळापुढें**

| खटला नं. | अर्जाची तारीख | फिर्यादीचें नांव, बापाचें नांव, राहण्याचें ठिकाण, त्याच्या फिर्यादीचा सारांश, त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा व तारीख व चेअरमन किंवा सभासद ह्यांची सही. (कलम ६०) | बैठकी करितां ठरविलेली तारीख, वेळ व जागा. (कलम ६१) | खटल्याच्या सुनावणीसाठीं ठरविलेली तारीख, वेळ व जागा. (कलम ६२.) | फिर्यादीच्या व त्याच्या साक्षीदारांच्या साक्षीचा सारांश, त्या साक्षीदारांच्या नांवांसह. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

बदरहू हुकूम देणाऱ्या गांवच्या न्यायमंडळाच्या सभासदांच्या सह्या किंवा आंगठ्याचे ठसे.

चेअरमनची सही.

नं. ३.

दाखल केलेल्या खटल्यांचें रजिस्टर.

| आरोपित इसम किंवा त्याचा वारसा याचें नांव, बापाचें नांव, राहण्याचें ठिकाण, त्याच्या कैफियतीचा सारांश, त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा व तारीख व त्याच्या वतीनें असलेल्या साक्षीदाराच्या साक्षींचा सारांश त्या साक्षीदारांच्या नांवांसह. | दिलेल्या हुकुमांची तारीख त्याबाबतच्या थोडक्यांत कारणांसह. ( कलम ७२ ) | दंड किंवा नुकसानीच्या मोबदला यांच्या रकमांची वसुली. (कलम ८५ ) | कलेक्टरनें मागाहून दिलेला कोणताहि हुकूम. (कलम ८७). |
| --- | --- | --- | --- |
| | | | |

भिन्नमत असणाऱ्या गांवच्या न्यायमंडळाच्या सभासदांच्या सह्या किंवा अंगठ्याचे ठसे.

# नमुना नं ४.

## प्रतिवादी किंवा आरोपित इसम ह्यास समन्स.

दावा / खटला नंबर ——————————

पक्षकारांचीं नांवें ——————————

दाव्याचें / फिर्यादीचें स्वरूप ——————————

दाखल केल्याची तारीख ——————————

ज्याअर्थी हा दावा / खटला —————————— च्या गांवच्या न्यायदान-मंडळापुढें —————— रोजीं (तारीख व वेळ) —————— येथें (जागा), सुनावणीसाठीं ठेवण्यांत येणार आहे, त्याअर्थी तुम्हीं —————— या तुम्हांस, तुमच्या दाव्यांत प्रतिपक्ष चालविण्यासाठीं / तुमच्या खटल्यांत तुमचा बचाव देण्यासाठीं कोणतेंहि कागदपत्र असल्यास त्यांसह व तुमच्या साक्षीदारांसह हजर राहण्याबद्दल यावरून फर्माविण्यांत येत आहे.

तारीख ——————————

चेअरमनाची सही.

# नमुना नं. ५.

## साक्षीदारांस समन्स.

दावा/खटला नंबर ______

पक्षकारांचीं नांवें ______

दाव्याचें/खटल्याचें स्वरूप ______

दाखल केल्याची तारीख ______

ज्याअर्थी तुम्हीं ______ या तुम्हांस वरील दाव्यांत/खटल्यांत

साक्ष देण्याबद्दल/पुढें सांगितलेले दस्तऐवज हजर करण्याबद्दल फर्माविण्यांत आलेलें आहे; त्या-

अर्थी ______ च्या गांवच्या न्यायदानमंडळापुढें ______ रोजीं

(तारीख व वेळ) येथें (जागा), हजर राहण्याबद्दल/सदरीं सांगितलेले दस्तऐवज हजर

करण्याबद्दल तुम्हांस यावरून फर्माविण्यांत येत आहे.

आज, तारीख माहे सन १९३

चेअरमनाची सही.

## THE VILLAGE PANCHAYATS BUDGET AND ACCOUNTS RULES, 1935.

# मुंबई सरकार.

## जनरल डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख २ माहे जानेवारी सन १९३५.

नंबर एस्. १७४।६.—सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट (सन १९३३ चा मुंबईचा आक्ट नंबर ६ वा) याच्या १०८ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमाच्या (फ) रकमेवरून मिळालेले अधिकार चालवून मुंबई सरकार हे पुढील कानू करीत आहेत, त्या येणेंप्रमाणें:—

१. या कानूंस सन १९३४ च्या गांवपंचायतींचें बजेट व अकौंट्स (हिशोब) यांबाबत कानू असें म्हणावें.

२. या कानूंत विषयावरून किंवा संदर्भावरून कांहीं बाध येत नसेल तर—

(१) "आक्ट" या शब्दाचा अर्थ, सन १९३३ चा मुंबईचा गांवपंचायतींबाबत आक्ट, असा आहे.

(२) "सरकारी साल" या शब्दांचा अर्थ, एप्रिल महिन्याच्या १ ल्या तारखेस सुरू होणारें वर्ष, असा आहे.

(३) "नमुना" या शब्दाचा अर्थ, या कानूंस जोडलेला नमुना, असा आहे.

(४) "कलम" या शब्दाचा अर्थ, सदरहू आक्टाचें कलम, असा आहे.

(५) "गांवची चावडी" या संज्ञेत सन १८७९ चा मुंबईचा जमीन-महसुलाबाबत कायदा याअन्वयें चावडी म्हणून समजण्यांत येणाऱ्या जागेचा समावेश होतो.

(६) या कानूंत व्याख्यांत न केलेल्या परंतु सदरहू आक्टांत व्याख्या दिलेल्या शब्दांचा व संज्ञांचा, त्यांचा सदरहू आक्टांत जो अर्थ सांगितला आहे, तोच अर्थ असेल.

३. बजेट एस्टिमेट ( जमाखर्चाचें अंदाजपत्रक ) हें पंचायतीकडून ३६ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमाअन्वयें दरसाल आक्टोबर महिन्याच्या १० व्या तारखेस किंवा त्यापूर्वी सादर करण्यांत आलें पाहिजे व तें नमुना १ प्रमाणें असलें पाहिजे.

४. पंचायतीनें आपले हिशोब (अकौंट्स्) नमुने ४ ते २२ यांप्रमाणें ठेविले पाहिजेत व तिनें जिल्हा–लोकलबोर्डास दरसाल जून महिन्याच्या १ ल्या तारखेस किंवा त्यापूर्वी आपलीं जमा व खर्चाचीं पत्रकें नमुने २ व ३ याप्रमाणें सादर केलीं पाहिजेत.

५. जर जिल्हा–लोकलबोर्डाच्या मतें, कोणत्याहि पंचायतीची स्थानिक परिस्थिति लक्षांत घेतां, नमुने ४ ते २२ यांपैकीं कोणत्याहि नमुन्याप्रमाणें तिनें हिशोब ठेवण्याबद्दल फर्माविणें आवश्यक नाहीं असें असेल तर जिल्हा–लोकलबोर्डास, कलेक्टरच्या आगाऊ मंजुरीनें, कानू ४ हींत कोणताहि मजकूर असला तथापि, सदरहू नमुन्यांपैकीं कोणत्याहि नमुन्याप्रमाणें हिशोब ठेवण्याची अशा पंचायतीस माफी देण्याचा अधिकार आहे.

६. (१) गांवांतील प्रौढ रहिवाशांची सभा ३६ साव्या कलमाच्या (४) थ्या पोटकलमाअन्वयें सरकारी साल संपल्यापासून दोन महिन्यांचे आंत गांवच्या चावडींत किंवा जर गांवांत कोणतीहि चावडी नसेल तर ज्या जागीं सरपंचाच्या मतें गांवच्या रहिवाश्यास येतां येऊं शकेल अशा त्या गांवांतील इतर कोणत्याहि जागीं सरपंचानें ठरवावयाच्या तारखेस भरविण्यांत आली पाहिजे.

(२) सदरहू सभेच्या तारखेपूर्वी निव्वळ तीन दिवस अगोदर, ज्या वेळीं व जागीं सदरहू सभा भरावयाची असेल ती वेळ व जागा व त्या सभेंत चालावयाचें कामकाज–इतक्या गोष्टी निर्दिष्ट करणारी एक लेखी नोटीस सदरहू सभेच्या जागीं लावण्यांत आली पाहिजे व तसेंच ती गांवांत दवंडी पिटूनहि देण्यांत आली पाहिजे.

(३) सरपंचानें व सरपंचाच्या गैरहजेरींत डेप्युटी सरपंचानें सदरहू सभेच्या अध्यक्षस्थानीं बसलें पाहिजे. सरपंच व डेप्युटी सरपंच या दोघांच्याहि गैरहजेरींत हजर असलेल्या सभासदांनीं, आपल्यांपैकीं एकास सदरहू सभेंत अध्यक्षस्थानीं बसण्यासाठीं निवडलें पाहिजे.

---

# नमुना १.

सालाबद्दल जिल्ह्याच्या तालुक्यांतील गांवच्या गांवपंचायतीचें बजेट एस्टिमेट (जमाखर्चाचें अंदाजपत्रक).

| जमा | खर्च |
|---|---|
| तारीख १ माहे एप्रिल सन १९ रोजीं सुरुवातीची शिल्लक.<br>१. सन १९०१ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याच्या १९१ व्या कलमाअन्वयें गांवफंडास सरकारनें लावून दिलेली रक्कम.<br>२. ८९ व्या कलमाअन्वयें बसविलेल्या करांचें किंवा फीचें उत्पन्न.<br>(१) घरें व जमिनी ह्यांचे मालक किंवा भोगवटा करणारे यांवरील कर.<br>(२) यात्रेकरूंवरील कर.<br>(३) जत्रा व उत्सव यांवरील कर.<br>(४) मालाच्या विक्रीवरील कर.<br>(५) ऑक्ट्रॉय्.<br>(६) विवाह, दत्तविधानें व मेजवान्या यांवरील कर.<br>(७) (निर्दिष्ट करावयाचा) इतर कोणताहि कर. | १. सामान्य एस्टाब्लिश्मेंट (नोकरवर्ग)—<br>(अ) सेक्रेटरी.<br>(ब) इतर नोकरवर्ग.<br>(क) कचेरीचा सादिलवार खर्च.<br>(ड) नोकरवर्गाचा फिरतीचा भत्ता.<br>२. पाणीपुरवठा —<br>(अ) नवीन कामें.<br>(ब) दुरुस्त्या —<br>(क) तळ्यांच्या —<br>(२) विहिरींच्या.<br>३. दळणवळणाचीं साधनें —<br>(अ) किरकोळ रस्ते, बंधारे किंवा रस्त्याखालून पाणी जाण्याचे गटार ह्यांचीं बांधकामें.<br>(ब) किरकोळ रस्ते, बंधारे किंवा रस्त्याखालून पाणी जाण्याचें गटार ह्यांची मरामत.<br>४. सार्वजनिक उपयुक्ततेचीं इतर कामें. |

| जमा | खर्च |
|---|---|
| ३. कलमें ४५, ४६ व ४८ यांअन्वयें वसूल केलेले दंड व नुकसानभरपाई म्हणून देण्याबद्दल हुकूम केलेल्या रकमा—<br>(अ) हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा व सन १८७१ चा गुरांच्या अतिक्रमणाविषयींचा आक्ट या अन्वयेंचे दंड.<br>(ब) गोटकायद्यांच्या भंगाबद्दल दंड.<br>(क) नुकसानभरपाई.<br>(ड) इतर बाबी.<br>४. लावून दिलेल्या रकमा—<br>(अ) कलम ३१ (२) (ह) अन्वयें सरकारनें लावून दिलेल्या.<br>(ब) कलम ९३ (१) (आय्) अन्वयें जिल्हा लोकल-बोर्डानें लावून दिलेल्या.<br>५. मदतीदाखल रकमा (कॉन्ट्रिब्यूशन्स)—<br>(अ) सरकारकडून.<br>(ब) जिल्हा-लोकलबोर्डाकडून.<br>(क) इतर मदतीदाखल रकमा.<br>६. ५९ व्या कलमाअन्वयेंच्या फी.<br>७ पंचायतीकडे असलेल्या जमिनी | ५. पंचायतीकडे असलेल्या सरकारी इमारतींची मरामत.<br>६. आरोग्य व झाडलोट —<br>(अ) (१) नोकरवर्ग.<br>(२) सादिलवार.<br>(ब) बांधकाम व मरामत<br>(१) मोऱ्यांची.<br>(२) खतांच्या खड्ड्यांची.<br>७. दिवाबत्ती —<br>(अ) नोकरवर्ग.<br>(ब) तेल.<br>(क) इतर जरूरीच्या जिन्नसा.<br>८. जत्रा, बाजार व गाड्यांचे अड्डे.<br>९. कसाईखाना —<br>(अ) बांधकाम.<br>(ब) दुरुस्ती.<br>१०. प्रेतें जाळण्याच्या व पुरण्याच्या जागा —<br>(अ) खरेदी.<br>(ब) मरामत.<br>११. कोंडवाडे —<br>(अ) नोकरवर्ग.<br>(ब) सादिलवार.<br>(क) कोंडवाडेवाल्यांचें वेतन.<br>१२. हत्यारें (टूल्स्) व यंत्रें (प्लांट)<br>१३. कर्जावरील व्याज. |

| जमा | खर्च |
|---|---|
| किंवा इतर मिळकती या पासूनचें उत्पन्न.<br>८. कोंडवाड्यांपासूनची जमा.<br>९. विक्रीचें उत्पन्न—<br>(अ) धूळ, घाण, शेण, केर-कचरा व इतर वस्तु ह्यांच्या विक्रीचें.<br>(ब) निरुपयोगी मिळकतीच्या विक्रीचें.<br>१०. किरकोळ जमा.<br>११. कर्जें, अनामत रकमा व कर्जाऊ दिलेल्या रकमा—<br>(अ) सरकारकडून मिळालेलें कर्ज.<br>(ब) जिल्हा—लोकलबोर्डाकडून घेतलेलें कर्ज.<br>(क) गांवच्या शाळेचे कारणा-साठीं व २८ व्या कलमा-अन्वयें इतर कर्तव्यें पार पाडण्यासाठीं, जिल्हा—लोकलबोर्डानें, स्थानिक अधिकाऱ्यानें किंवा स्कूल—बोर्डानें पंचायतीच्या हवालीं केलेला पैसा.<br>(ड) कर्जाऊ दिलेल्या रकमा.<br>एकूण जमा.<br>(सुरवातीची शिल्लक धरून) सर्व मिळून होणारी एकूण रक्कम. | १४. किरकोळ.<br>१५. कर्जें, अनामत रकमा व कर्जाऊ दिलेल्या रकमा—<br>(अ) कर्जांची फेड.<br>(ब) अनामत रकमांची फेड.<br>(१) जिल्हा—लोकलबोर्डानें सोंपून दिलेल्या बांध-कामांवरील खर्च.<br>(२) गांवच्या शाळेवरील खर्च.<br>(क) कर्जाऊ दिलेल्या रकमा.<br>एकूण खर्च.<br>अखेरची शिल्लक.<br>सर्व मिळून होणारी एकूण रक्कम. |

## नमुना २.

च्या गांवपंचायतीचा सालाबद्दल जमेचा
वार्षिक हिशोब.

१. भाग.

२. जिल्हा.

३. पंचायतीचें नांव.

४. सुरुवातीची शिल्लक.

५. सन १९०१ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल आक्ट याच्या १९१ व्या कलमाअन्वयें सरकारनें लावून दिलेल्या रकमा.

६. ८९ व्या कलमाअन्वयें करांपासून जमा होणाऱ्या रकमा—

(अ) घरें व जमिनी ह्यांचे मालक किंवा भोगवटा करणारे यांवरील कर.

(ब) यात्रेकरूवरील कर.

(क) जत्रा व उत्सव यांवरील कर.

(ड) मालांच्या विक्र्यांवरील कर.

(इ) ऑक्ट्रॉय.

(फ) विवाह, दत्तविधानें व मेजवान्या यांवरील कर.

(ग) ( निर्दिष्ट करावयाचा ) इतर कोणताहि कर.

७. दंड व नुकसानभरपाईच्या रकमा यांपासूनच्या जमा रकमा—

(अ) दंड—

(१) हिंदुस्थानच्या अपराध्यांस शिक्षा

करण्याविषयींचा कायदा व सन १८७१ चा गुरांचे अतिक्रमणाविषयींचा आक्ट यां अन्वयेंचे दंड व कलम ४५ (१) (अ) व (ब) व कलम ४६ (अ) व (ब) यांअन्वयें वसूल झालेले दंड व रकमा.

(२) कलम ४५ (१) (क) अन्वयें पोटकायद्यांच्या भंगाबद्दल केलेले दंड.

(ब) ४८ व्या कलमाअन्वयेंच्या नुकसानभरपाईच्या रकमा.

(क) इतर बाबी.

८. लावून दिलेल्या रकमा—

(अ) कलम ३१ (२) (ह) अन्वयें सरकारनें लावून दिलेल्या.

(ब) कलम ९३ (१) (आय्) अन्वयें जिल्हालोकलबोर्डानें लावून दिलेल्या.

९. मदतीदाखल रकमा (कॉन्ट्रिब्यूशन्स)—

(अ) सरकारकडून.

(ब) जिल्हा-लोकलबोर्डाकडून.

(क) इतर मदतीदाखल रकमा.

१०. ५९ व्या कलमाअन्वयेंच्या फी.

११. पंचायतीकडे असलेल्या मिळकतीपासूनचें उत्पन्न.

१२. कोंडवाड्यांपासूनच्या जमा.

१३. विक्रीचें उत्पन्न—

(अ) धूळ, घाण, शेण, केरकचरा व इतर वस्तू ह्यांच्या विक्रीचें.

(ब) निरुपयोगी मिळकतीच्या विक्रीचें.

१४. किरकोळ जमा.

१५. कर्जें, अनामत रकमा व कर्जाऊ दिलेल्या रकमा—

(अ) सरकारकडून मिळालेलें कर्ज—

(ब) जिल्हा-लोकलबोर्डाकडून घेतलेलें कर्ज.

(क) गांवच्या शाळेचे कारणासाठीं व २८ व्या कलमाअन्वयें इतर कर्तव्यें पार पाडण्यासाठीं जिल्हा-लोकल-बोर्डानें, स्थानिक अधिकाऱ्यानें किंवा स्कूलबोर्डानें पंचायतीच्या हवालीं केलेला पैसा.

१६. एकूण जमा रकमा.

१७. (सुरुवातीची शिल्लक धरून) सर्व मिळून होणारी एकूण रक्कम.

१८. लोकसंख्येच्या दर माणशीं पडणारें जमेचें प्रमाण.

---

## नमुना ३.

—च्या गांवपंचायतीचा सालाबद्दलचा खर्चाचा वार्षिक हिशोब.

१. भाग.

२. जिल्हा.

३. पंचायतीचें नांव.

४. सामान्य एस्टाब्लिश्मेंट (नोकरवर्ग)—
(अ) सेक्रेटरी.
(ब) इतर नोकरवर्ग.
(क) कचेरीचा सादिलवार खर्च.
(ड) नोकरवर्गाचा फिरतीवा भत्ता.

५. पाणीपुरवठा —
(अ) नवीन कामें.
(ब) दुरुस्त्या—
(१) तळ्यांच्या.
(२) विहिरींच्या.

६. दळणवळणाचीं साधनें—
(अ) किरकोळ रस्ते, बंधारे किंवा रस्त्याखालून पाणी जाण्याचें गटार ह्यांचीं बांधकामें
(ब) किरकोळ रस्ते, बंधारे किंवा रस्त्याखालून पाणी जाण्याचें गटार ह्यांची मरामत.

७. सार्वजनिक उपयुक्ततेचीं इतर कामें.

८. पंचायतीकडे असलेल्या सरकारी इमारतींची मरामत.

९. आरोग्य व झाडलोट—
(अ) (१) नोकरवर्ग.
(२) सादिलवार.
(ब) बांधकाम व मरामत.
(१) मोऱ्यांची.
(२) खताच्या खड्यांची.

१० दिवाबत्ती—
(अ) नोकरवर्ग.
(ब) तेल.
(क) इतर जरूरीच्या जिन्नसा.

११. जत्रा, बाजार व गाड्यांचे अड्डे.

१२. कसाईखाना—

(अ) बांधकाम.

(ब) दुरुस्ती.

१३ प्रेतें जाळण्याच्या व पुरण्याच्या जागा—

(अ) खरेदी.

(ब) मरामत.

१४. कोंडवाडे—

(अ) नोकरवर्ग.

(ब) सादिलवार.

(क) कोंडवाडेवाल्यांचें वेतन.

१५. हत्यारें (टूल्स्) व यंत्रें (प्लांट).

१६. कर्जावरील व्याज.

१७. किरकोळ.

१८. कर्जें, अनामत रकमा व कर्जाऊ दिलेल्या रकमा—

(अ) कर्जांची फेड.

(ब) अनामत रकमांची फेड.

(१) जिल्हा—लोकलबोर्डानें सोंपून दिलेल्या बांधकामांवरील खर्च.

(२) गांवच्या शाळेवरील खर्च.

(क) कर्जाऊ दिलेल्या रकमा.

१९. एकण खर्च.

२०. जमेंतून खर्च वजा जाऊन राहिलेली शिल्लक रक्कम.

२१. एकूण खर्च व शिल्लक रक्कम मिळून होणारी रक्कम.

२२. लोकसंख्येच्या दरमाणशीं पडणारें खर्चाचें प्रमाण.

नमुना

सन १९३ सालाबद्दलचें

ची

जमा

| जमेचा महिना व तारीख. | अनुक्रम नंबर. | जमेचा तपशील कोणाकडून मिळाले. | कोणत्या खात्यावर. | हिशोबाचें सदर. | रक्कम | सुरुवातीच्या शिलकेसह रोजची एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

टीप.—कॅशबुकावर दरेक दिवसाच्या

४.

सामान्य कॅशबुक.

गांवपंचायत.

नांवें

| अदा केल्याची तारीख. | चेक नंबर. | व्हौचर नंबर. | अदा केल्याचा तपशील. | | हिशोबाचें सदर. | रक्कम | अखेरच्या शिलकेसह रोजची एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोणास अदा केलें. | कोणत्या खात्यावर. | | | |
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| | | | | | | | |

अखेरीस सरपंचानें सही केली पाहिजे.

**नमुना**

सन १९३   च्या   महिन्याबद्दल जमा / अदा केलेल्या रकमांचें

________________ ची

| (बजेटांत असल्या प्रमाणेंचे) हिशोबाचे दर. | बजेट ग्रांट. | तारखा | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

५.

र्गीकरण केलेलें रजिस्टर.

विपंचायत.

| | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | महिन्याबद्दलची एकूण रक्कम. | मागील महिन्याच्या अखेरीपर्यंतची एकूण रक्कम. | मागपासून पुढें चालू एकूण रक्कम. |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

## नमुना ६.

### सामान्य पावती.

———————————————— ची गांवपंचायत.

बुक नं. पावती नं.

———————————— कडून ———————————— च्या

खातीं रक्कम रुपये ( ) मिळाली.

सेक्रेटरी

टीप.—ही पावती कार्बन पेपरवरून काढलेल्या दुहेरी प्रतीची असली पाहिजे.

टीप.—नमुने देण्यांत यावयाचे वेळीं बुकांचे नंबर व पावत्यांचे नंबर हे त्यावर छापण्यांत किंवा शिक्क्यानें वठविण्यांत आलेले असले पाहिजेत.

## नमुना ७.

नमुना

करास पात्र असलेल्या इमारती व जमिनी ह्यांची सन १९      -१९

———————————————— ची

| अनुक्रम नंबर. | रस्त्याचें नांव. | मिळकत नंबर. | मिळकतीचें वर्णन. | मालकाचें नांव. | भोगवटा करणारांचें नांव. | वार्षिक भाड्याची किंमत किंवा इतर (ठरविलेली) किंमत | आकारणी केलेल्या करांची रक्कम. | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | कर. | कर. | कर. | एकूण रक्कम. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |

७.

## सालाबद्दलची आकारणीची यादी (असेस्मेंट लिस्ट)

गांवपंचायत.

| वार्षिक भाड्याची किंमत किंवा इतर (ठरविलेली) किंमत. | अपिलांचे निकाल व मागाहूनचे फेरफार | | | | मागाहून वाढ किंवा घट झाल्याचे बाबतींत हुकुमांचे उल्लेख व शेरे.<br>टीप.—शेरे व दुरुस्त्या यांवर त्यांच्या खरेपणाबद्दल सरपंचानें सही केली पाहिजे. |
|---|---|---|---|---|---|
| | कर. | कर. | कर. | एकूण रक्कम | |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | |

नमुना

सन १९ —१९ सालाबद्दल आकारणी केलेल्या

———————————— चीं

वार्ड
सर्कल

| मिळकत नंबर. | इस्टेटीचें (मिळकतीचें) नांव. | ज्या इसमांकडून करयेणें असेल त्या इसमांचीं नांवें. | मागणी. | | | | | | | | | पावती नंबर व तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कर. | | | कर. | | | कर. | | | |
| | | | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | |
| | | | | | | | | | | | | |

८.

## करांच्या मागणीचें रजिस्टर.

गांवपंचायत.

| वसुल्या. | | | | | | | | | सूट. | | | | बाकी. | | | | सूट देण्यास मंजुरी देणाऱ्या हुकुमांचे उल्लेख व शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कर. | | | कर. | | | कर. | | | | | | | | | | | |
| मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. | कर. | कर. | कर. | एकूण रक्कम. | कर. | कर. | कर. | एकूण रक्कर. | टीप — शेरे व दुरुस्त्या यांजवर त्यांच्या खरेपणाबद्दल सरपंचानें सही केली पाहिजे. |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

## नमुना ९.

### करांबद्दल पावती.

———————————— ची गांवपंचायत.

बुक नं. पावती नं.

———————————— यांजकडून घर नं. बिल नं.

याबद्दल सन १९ –१९ सालाकरितां पुढें नमूद केलेल्या रकमा करादाखल मिळाल्या.

| करांचीं नांवें. | वसूल केलेल्या रकमा. | | |
|---|---|---|---|
| | मागील बाकी. | चालू कर. | एकूण रक्कम. |
| | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. |
| घरपट्टी .... .... | | | |
| ——पट्टी .... .... | | | |
| ——पट्टी .... .... | | | |
| नोटीस फी .... .... | | | |
| वारंट फी .... .... | | | |

तारीख माहे सन १९ .

टीप.—हा पावतीचा नमुना कार्बन पेपरवरून काढलेल्या दुहेरी प्रतीचा असला पाहिजे.

टीप.—नमुने छाप्यांत येतेवेळीं बुकांचे नंबर त्यांवर छापण्यांत आलेले असले पाहिजेत.

वसूल करणाऱ्या कारकुनाच्या सहीचीं आद्याक्षरें.

नमुना १०.

## नमुना

सन १९ -१९ सालाबद्दल

_______________________________ ची

| अनुक्रम नंबर. | ज्यानें मागणीची रक्कम द्यावयाची त्या इसमाचें नांव व पत्ता. | मागणीचें स्वरूप | मागणी करण्याबद्दल अखत्यार. | मागणी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | हप्ता. | रक्कम. | एकूण रक्कम. |
| | | | | | | |

१०.

## किरकोळ मागण्यांचें रजिस्टर.

गांवपंचायत.

| बिल नंबर व तारीख | वसुल्या | | सूट. | | बाकी. | शेरे. टीप.—शेरे व दुरुस्त्या यांजवर खरेपणाबद्दल सरपंचानें सही केली पाहिजे. |
|---|---|---|---|---|---|---|
| | जमेचा नंबर व तारीख. | रक्कम. | हुकुमाचा नंबर व तारीख. | रक्कम. | | |
| | | | | | | |

# नमुना ११.

## ऑक्ट्राय् जमा.

———————————————ची गांवपंचायत.

बुक नं. चें नाकें.

पावती नं.

आयात करणाराचें / मालकाचें नांव ———————

| मालाचें वर्णन | वाहनाचा किंवा ओझ्याचा प्रकार. | वजन संख्या किंवा किंमत. | ऑक्ट्रॉय्चा दर. रक्कम. | ऑक्ट्रॉय्चा दर. प्रत्येकीं. | भरण्यांत आलेली ऑक्ट्रॉय्ची रक्कम. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| एकूण .... | | | | | |

आयातीची वेळ.

तारीख माहे सन १९ .

नाकेंकारकुनाच्या
सहीचीं आद्याक्षरें.

टोल पावती नंबर—

व्हीलटॅक्स रजिस्टर.

प्लेट नंबर—

टीप.—ही पावती कार्बन पेपरवरून काढलेल्या दुहेरी प्रतीची असली पाहिजे.

टीप.—नमुने देण्याचे वेळीं बुक नंबर व पावती नंबर हे त्यांवर छापलेले असले पाहिजेत.

# नमुना १२.

सन १९  -१९ सालाबद्दल ऑक्ट्रॉय्‌च्या वसुलीचें रजिस्टर.

———————————ची गांवपंचायत.

———चें नाकें.

| तारीख. | पावती नंबर व बुक नंबर. | मालकाचें किंवा आयात करणाराचें नांव. | मालाचें वर्णन. | वाहनाचा प्रकार. | वजन, संख्या किंवा किंमत. | दर. | | ऑक्ट्रॉय्‌ची रक्कम. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | रक्कम. | प्रत्येकी. | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | एकूण | .... | | |

लन नंबर  वर  कडे पाठविलें.

नाकेकारकुनाची सही

# नमुना १३.

## ऑक्ट्रॉय्.

### वसूल रकमांची एकत्रित केलेली नोंद.

—————————— ची गावपंचायत.

| तारीख. | नाक्यांचीं नांवें. | | | | एकूण रक्कम | ज्या रोजकीर्दींत (डेबुकांत) जमा टाकिली त्याचा अनुक्रम नंबर व पृष्ट. | सेक्रेटरीची सही. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. | ब. | क. | ड. | | | |
| | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | रु. आ. पै. | | | |

सेक्रेटरी.

सरपंच.

# नमुना १४.

———————————————— ची गांवपंचायत.

बिल नं,

| जिन्नसाचें नांव. | परिमाण किंवा वजन. | दर. | यूनिट (घटक). | रक्कम. |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | | | रु. । आ. पै. |

| | | |
| --- | --- | --- |
| १.लावून दिलेली रक्कम .... | | दाखला देण्यांत येतो कीं या बिलांत दाखविलेले दर व परिमाणें हीं बिनचूक आहेत व जिन्नसा मीं घेतल्या आहेत. |
| २.मागील खर्च .... | | |
| ३.या बिलांत दाखबिलेला खर्च | | |
| २ व ३ ह्यांची बेरीज .... | | |
| हातीं राहणारी शिल्लक .... | | |

तारीख माहे सन जिन्नसा घेणाऱ्या इसमाची सही.

मंजुरीसाठीं पंचायतीस सादर केलें. मीं दाव्याची चौकशी केली असून तो सर्वतोपरीं बरोबर असल्याचें मला आढळून आलें आहे.

सेक्रेटरी.

ठराव नंबर तारीख माहे सन

बिलांत नमूद केलेली रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत येत आहे

तारीख माहे सन सरपंच.

दाव्याच्या पूर्ण फेडीदाखल रु. ( ) (अक्षरीं)ची रक्कम मिळाली.

स्टांप (तिकिट).

व्होचर नं. पैसे घेणाराची सही.

रोजकीर्दींत (डेबुकांत) पान वर दाखल केलें.

सेक्रेटरी.

## नमुना १५.

### स्केल (पगाराच्या प्रमाणाचें) रजिस्टर.

———————————————चीं गांवपंचायत.

| नेमणुकीचें नांव. | १९ पासून मंजूर केलेलें स्केल. | | | १९ पासून मंजूर केलेलें स्केल. | | | १९ पासून मंजूर केलेलें स्केल. | | | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नंबर. | दरेक नेमणुकीचा माही पगार.* | आधार व सरपंचाची सही | नंबर. | दरेक नेमणुकीचा माही पगार.* | आधार व सरपंचाची सही. | नंबर. | दरेक नेमणुकीचा माही पगार.* | आधार व सरपंचाची सही. | |
| (१) जनरल ॲड्मिन्स्ट्रेशन (सामान्य कारभार) | | | | | | | | | | |

एकूण (१) जनरल ॲड्मिन्स्ट्रेशन.

* जर कोणत्याहि नेमणुकीचा पगार वाढता असेल तर, किमान व कमाल पगार, बढतीची मुदत व प्रमाण ह्या गोष्टी दरेक बाबतींत ह्या आसनांत देण्यांत आलेल्या असल्या पाहिजेत.

# नमुना १६.

न १९ —१९ सालाबद्दलचा स्टांपांचा (तिकिटांचा) हिशोब.

————————ची गांवपंचायत.

| रीख | मिळाले. | | लावले. | | रोजची शिल्लक. | सेक्रेटरी-च्या सहीचीं अद्याक्षरें. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | व्हौचर नं. | मिळालेल्या स्टांपांची किंमत. | पत्रें नंबर. | लावलेल्या स्टांपांची किंमत. | | | |
| | | रु. आ. पै | | रु. आ. पै | | | |

टीप—हातीं असलेल्या स्टांपांची शिल्लक महिन्यांतून निदान एकदां तरी रपंचानें किंवा इतर जबाबदार अधिकाऱ्यानें ताडून पाहिली पाहिजे व त्याबद्दल खला दिला पाहिजे.

नमुना

पावतीबुकें / सामान ह्यांचा स्टॉक

ची

| तारीख. | सुरुवातीची शिल्लक. | मिळालेली संख्या किंवा परिमाण. | एकूण. | कोणास दिले किंवा कोणत्या कारणा-करितां तें. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

टीप—हातीं असलेल्या स्टॉकच्या बिनचुकरणाबद्दल पडताळा सरपंचानें

१७.

अकौन्ट (सांठ्याचा हिशोब).

गांवपंचायत.

| दिलेल्या (जिनसां)-ची संख्या किंवा परिमाण. | शिल्लक. | देणाऱ्या अंमलदाराची सही. | घेणाऱ्या इसमाची सही. | शेरे. |
|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | |

मुदतोमुदतीनें घेतला पाहिजे व सालअखेर जरूर घेतला पाहिजे.

नमुना

डेड्स्टॉक किंवा जंगम मिळकत

__________________ची

| अनु-क्रम नंबर | जिन्नसांचें वर्णन. | खरेदीबद्दल आधार व खरेदीची तारीख. | संख्या किंवा परिमाण. | किंमत. | कचेरीच्या मुख्याच्या सहीचीं आद्याक्षरें. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | रु. आ. पै | |

१८

हु-यांच्या रजिस्टराचा नमुना.

गांवपंचायत.

| अखेरची विल्हेवाट. | | वसूल झालेली रक्कम व ट्रेझरींत जमा टाकल्याची तारीख. | स्टॉकमध्यें असलेली शिल्लक. | कचेरीच्या मुख्याच्या सहीचीं आद्याक्षरें. | शेरे. |
|---|---|---|---|---|---|
| संख्या किंवा परिमाण व विल्हेवाटीचें स्वरूप. | अखत्यारपत्र किंवा व्हौचर. | | | | |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | | | | | |

## नमुना

कर्जाऊ ( आडव्हान्स ) दिलेल्या / अनामत (डिपॉझिट) ठेवलेल्या

———————————— ची

| १ महिना व तारीख. | २ इसमाचें नांव. | ३ कर्जाऊ दिलेल्या किंवा अनामत ठेवलेल्या रकमेचा तपशील. | ४ व्हौचर नं. किंवा पावती नं. | ५ रक्कम. | ६ माही एकूण. | रोख फंड | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ७ एप्रिल. | ८ मे. | ९ जून. | १० जुलै. | ११ ऑगस्ट. |
| | | | | | | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै | रु. आ. पै |

टीप.—शेरे व दुरुस्त्या ह्यांच्या खरेपणाबद्दल

९.

कमांचें रजिस्टर.

ांवपंचायत. ........

| वा तोडजोड | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सप्टेंबर. | आक्टोबर. | नोव्हेंबर. | डिसेंबर. | जानेवारी. | फेब्रुवारी. | मार्च. | एकूण फंड. | फोडीची तारीख किंवा तोड-जोडीच्या व्हौचराचा नंबर. | साल अखेर बाकी रक्कम. | शेरे. |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| .आ.पै | रु.आ.पै | रु.आ.पै | रु.आ पै | रु.आ.पै | रु.आ.पै | रु.आ.पै | | | | |

ांवर सरपंचानें सही केली पाहिजे.

नमुना

पेटी (किरकोळ)

| तारीख | चेकाचा नंबर. | कोणाकडून मिळाले ते. | तपशील. | (तसलमात) इंप्रेस्ट्स् शिवाय इतर रकमा. | इंप्रेस्ट (तसलमात). | एकूण रक्कम. |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

२०.

कॅशबुक.

———ची गांवपंचायत.

| तारीख | व्हौचराचा नंबर | कोणास दिले. | तपशील. | ५ व्या आसनांत दर्शविलेल्या रकमेंतून अदा. | इंप्रेस्ट (तसलमात) मधून अदा | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| | | | | | | |

## नमुना

सन १९३  च्या  महिन्यांत  (कामाचें स्वरूप)

———————————— ची

| नांव व हुद्दा. | बापाचें नांव व गांव. | १ | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

२१.

## वर कामावर लावलेल्या इसमांचा हजेरीपट.

गांवपंचायत.

| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | एकूण. | दर. | रक्कम. | इ. | देणें बाकी रक्कम. | पैसे घेणाराची सही किंवा आंगठ्याचा ठसा. | पैसा अदा करण्याचे वेळीं पैसे देणाऱ्या अंमलदारानें करावयाची तारखेनिशीं सहीचीं आद्याक्षरें. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

## नमुना २२.

——————————ची गांवपंचायत.

[बाहेरील बाजू (शीट).]

सन १९ चा नं.—

भाग—

पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट.

तारीख माहे सन १९ .

फंड सदर —
मेजर सदर—
मायनर सदर—
सर्व्हिस सदर—
खात्याचें सदर—

मध्यें येण्याचा संभव असलेल्या खर्चाचा
एक्झिक्यूटिव्ह एंजिनिअर ,ह्यांनीं तयार केलेला अंदाज,
(कॉल किंवा अखत्यार) रु.
ची गांवपंचायत व चा जिल्हा—लोकलबोर्ड ह्यांनीं मंजूर केलेला.
सामान्य वर्णन.

गोषवारा.

| परिणाम. | बाबी | दर. | | | प्रत्येकीं | रक्कम. | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै | | रु. | दशांश. |
| | | | | | | | |

एंजीनिअर. एक्झिक्यूटिव्ह एंजीनिअर.

तारीख माहे सन १९

[ आंतील बाजू (शीट). ]

[एस्टिमेट मेझरमेंट शीट (अंदाजासंबंधीं मोजमापांचें पत्रक)].

**मोजमाप.**

| —— | नंबर. | लांबी. | रुंदी. | खोली | परिमाण दशांशांत. | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

मुद्रक—शंकर रामचंद्र दाते, पुणें अ. वि. गृहाचा लोकसंग्रह छापखाना,
६२४ सदाशिव पेठ, पुणें शहर

प्रकाशक—न. चिं. केळकर, चिटणीस लो. टिळक स्मारक स्वराज्य संघ
व लो. टिळक पर्स फंड, पुणें.